

सं. डॉ. स. गं. मालशे

# अध्यापक
# आचार्य अत्रे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 3939

REFBK-0024757

संदर्भ निबंध


**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 JAN 1986

2 FEB 1986

19 MAR 1986

3 APR 1986

23 APR 1986

4 MAY 1986

29 OCT 1986

( क्र. मा. पद्दा )
५०००–३–८४

# अध्यापक अत्रे

आचार्य अत्रे

संपादक : डॉ. स. गं. मालशे

REFBK-0024757

परचुरे प्रकाशन—मुंबई चार

प्रकाशक
सौ. शुभदा विष्णू परचुरे
परचुरे प्रकाशन
२०३/४, मेहता भवन
३११, राजा राममोहन रॉय मार्ग
गिरगाव, मुंबई–४०० ००४
श्रीमती गिरीष पै

© सौ. मीना देशपांडे

आवृत्ती पहिली : १३ ऑगस्ट १९८५

मुखपृष्ठ सजावट : सुभाष अवचट

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणे ३०

मूल्य ४० रुपये

नोंदणी क्र. 3939
२४७५८
१२.१२.८५
(स्थळ प्रत)

# प्रस्तावना

" मूल हा विसाव्या शतकातला अजब शोध, असे समजले जाते. या नवीन बाल-युगाचे आम्ही पाईक आहोत. अध्यापनशास्त्राचा किंवा कलेचा विचार करावयाचा तो आमच्या दृष्टीने नव्हे ! त्या योगाने आम्हांला बालमनाचा ठाव लागून त्यातील निसर्गदत्त गुणांचा पूर्ण व सुंदर विकास कसा करावा, हे समजले नाही तर या चर्चेला काही किंमत नाही ! "

**अध्यापन** व. १ अं. १ ( जानेवारी १९३१ )

प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाला वाहिलेल्या आचार्य अत्र्यांच्या ' अध्यापन ' या मासिकाच्या संपादकीयातील हे उद्‌गार आहेत. एखाद्या पानावर ठरलेल्या दवबिंदूत सारे उद्यानच्या उद्यान प्रतिबिंबित व्हावे, तसे ' अध्यापक अत्रे ' या ग्रंथाचे सारसर्वस्व या संपादकीय पानावरील उद्‌गारात प्रतिबिंबित झाले आहे. कारण या ग्रंथातील सर्वच लेखांतून शिकविणारा पेक्षा शिकणाराला केंद्रीभूत मानले आहे. त्याच्या मनाचा ठाव घेणाऱ्या मानसशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून शिक्षणाची पुनर्घटना व्हावी, असा आग्रह धरलेला आहे.

## इंग्लंडची अपूर्वाई टिकावी

इंग्लंडातील शैक्षणिक प्रयोगाविषयीचे आणि विशेषतः बालशिक्षणाविषयीचे या ग्रंथातील लेखन महत्त्वाचे आहे. टी. डी. च्या निमित्ताने अत्रे हे त्या क्षेत्राशी निगडीत होते; शिवाय तेथे एका प्राथमिक शिक्षकाच्या घरीच त्यांचा रहिवास होता. अर्थात त्यांचे हे लेखन सांगोवांगीचे नाही; ते ' चक्षुर्वै सत्यम् ' स्वरूपाचे व अनुभवजन्य आहे, म्हणून मोलाचे आहे. लंडनमध्ये गेली पंधरा वर्षे शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणारे माझे

स्नेही श्री. शशिकांत देव यांच्याशी या लेखनासंबंधी चर्चा करण्याची सुसंधी मला नुकतीच मिळाली. आचार्य अत्रे १९२७–२९ च्या दरम्यान तेथे होते, तो काळ आणि आजचा काळ यात महदंतर पडलेले आहे. ज्याच्या साम्राज्यावरील सूर्य कधीच मावळत नाही, असा एक वैभवसंपन्न देश, असे इंग्लंडचे आज वर्णन करता येण्यासारखे नाही. तुलेनेने तो आज एक गरीब आणि गरजू देश बनला आहे, तरीपण आचार्यांनी तेथील शिक्षणाविषयी जे लिहिले आहे, ते तात्पर्याने आजही खरे ठरेल, हाच निष्कर्ष आमच्या चर्चेतून दृढ झाला.

काही तपशिलात फेर पडलेला आहे; पण तत्त्व तेच आहे. आता तेथील शाळा तिमजली नाहीत, अनेक-मजली आहेत. सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाची वयोमर्यादा चौदावरून आता अठरावर गेली आहे. आपल्यासारख्या विकसनशील देशांच्या मानाने तेथील शिक्षणपद्धती आजही आदर्शच म्हणावी लागेल. आपल्याप्रमाणे 'सब घोडे बारा टक्के' असा प्रकार तेथे नाही. शिक्षणसंस्थांचे स्वातंत्र्य अद्यापही अबाधित आहे. मॉंटेसरी, किंडर गार्टन, डाल्टन प्लॅन यांसारख्या मूलप्रधान तसेच स्वयंशिक्षणावर भर देणाऱ्या नवशिक्षणपद्धतींचे गुणविशेष तेथील शिक्षणपद्धतीने आत्मसात केलेले आहेत. व्याख्यानबाजीपेक्षा कृतिप्रधान संकल्पपद्धतीच्या पाठांना तीत महत्त्वाचे स्थान आहे. क्रमिक पुस्तके, शैक्षणिक साहित्य, गणवेष शाळाच पुरविते. सहलींचा खर्चही तीच करते. क्रीडांगणे, तलाव, ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये, छोटी नाट्यगृहे यांसारख्या सुविधांची जोड तेथील शालेय उपक्रमांना भरपूर प्रमाणात मिळते. नवनवीन प्रयोगांना वाव देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, अशी गतिशील शिक्षणपद्धती तेथे उत्क्रांत होत आलेली आहे. तिची परंपरा दीडशे वर्षांची आहे. विख्यात कादंबरीकार चार्लस डिकन्स (१८१२–७०) याच्या ऑलिव्हर ट्विस्ट आणि डेव्हिड कॉपरफिल्ड यांसारख्या ललितकृतींतील विदारक चित्रणामुळे तेथील जनतेचे डोळे उघडले. मग 'छडी लागे छमछम'चा जमाना हळूहळू मागे पडला. मनोवैज्ञानिक संशोधनाबरोबर बालमानसशास्त्राचाही विकास होत गेला. बालमानसशास्त्रातील सिद्धांतांनी आणि सिद्धींनी तेथील शैक्षणिक प्रगतीला विशेषच हातभार लागला. १९४४ साली 'इगॅलिटेरियल ॲक्ट' संमत झाला आणि शैक्षणिक सुधारणांच्या प्रदीर्घ परंपरेला गवसणी घालून तिच्यावर राजमान्यतेची मुद्रा उमटविली गेली.

इंग्लंडमधील शिक्षकवर्गाचे जीवनमान आजही वरच्या श्रेणीचे आहे. शिक्षकाची पत्नीही नोकरीत असते. पण पुष्कळदा त्यामागे गरजेपेक्षा आपल्या व्यक्तित्वाच्या स्वतंत्र विकासाची कल्पनाच प्रबळ असते. एखादी पूरक नोकरी पत्करावी वा शिकवण्यांच्या मागे लागावे, असे शिक्षकाचे तुटपुंजे वेतन नसते. तरीपण समाजातील अन्य घटकांच्या मानाने आपले स्थान खाली घसरू नये, म्हणून तेथील बलवान शिक्षण संघटना दक्ष असतात आणि पगारवाढीच्या मागणीचा सतत पाठपुरावा करीत असतात. सध्या

पोलिसांचे पगार तिपटीने वाढल्याने शिक्षक संघटनेची अशी चळवळ सुरू आहे.

पालकवर्गाच्या जागरूकतेसंबंधीचे अभ्यांचे निरीक्षण अद्यापही अबाधित आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि लोकशाही या गोष्टी त्यांच्या रक्तात भिनलेल्या आहेत. तेव्हा आपल्या पाल्यांनी नुसत्या पुस्तकी पोपटपंचीपेक्षा स्वानुभवाने तयार व्हावे, याकडे ते लक्ष देतात. वयात येताच मुलांनी आपापले प्रश्न स्वतःच सोडवावे, अगदी विवाहासारख्या महत्त्वाच्या समस्यांविषयीही आपले आपण निर्णय घ्यावे आणि मग आपण घेतलेल्या भल्याबुऱ्या निर्णयांच्या परिणामांचे दायित्व टाळू नये, अशी त्यांची अपेक्षा असते त्या दृष्टीने मुलांची सर्वांगीण प्रगती कशी होईल, हे ते पाहतात. शिक्षक-पालक-सहकार्य हा तेथील शैक्षणिक क्षेत्रातला स्पृहणीय विशेष आहे. इंग्लंडमधील शिक्षक-पालकसंघटना नामधारी नसतात किंवा आपल्याकडील शिरस्त्याप्रमाणे नुसत्या इमारत-निधी उभारण्यापुरत्या नैमित्तिकही नसतात. या संघटना निरनिराळ्या शैक्षणिक प्रश्नांवर वा योजनांवर चर्चा घडवून आणतात. त्या वेळी पालकांकडून व्यक्त केल्या गेलेल्या अपेक्षांची योग्य ती दखल घेतली जाते आणि पुढील वर्षासाठी नवे उपक्रम आखले जातात. सध्या इंग्लंडमध्ये आशियायी लोकांची वस्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या पालकवर्गाची दृष्टी मात्र भिन्न असते. इंग्लंडातला पालकवर्ग मुलाची अभिवृत्ती ( ॲप्टिट्यूड ) पाहून त्या त्या व्यवसायाची निवड करण्यास त्याला उत्तेजन देतो, पण भारतीय पालकांप्रमाणे तेथील आशियाई मंडळींना आपल्या मुलांनी कुणीकडून तरी डॉक्टर व्हावे, असे वाटत असते. जादा शिकवणीसाठी पैसा खर्च करण्याची त्यांची सिद्धता असते. मुलांची अभिवृत्ती पाहण्यासाठी चाचण्याही तयार झालेल्या असून तद नुसार मुलांना व्यवसायमार्गदर्शन व्हावे, अशी काळजी शिक्षणसंस्था घेत असतात आणि इंग्रज पालक प्रायः विसंवादी सूर काढीत नाहीत. अभ्यांच्या या ग्रंथात 'बालकदिन' नावाचा एक छोटेखानी लेख आहे. तो खरे तर 'बालकदिन' नसून गाभ्याच्या दृष्टीने 'पालक दिनच' आहे. आपल्या पालकांच्या बेजबाबदारपणाची हजेरी घेणारा आहे.

इंग्लंडमधील शिक्षणपद्धतीच्या गतिशीलतेचे अलीकडचे गमक म्हणजे स्वान-प्रतिवृत्त. गेल्या शंभर वर्षांतील शैक्षणिक स्थितिगतीचा मागोवा घेऊन लॉर्ड स्वान यांच्या नेतृत्वाखाली शिक्षणखात्याकडे एक प्रतिवृत्त नुकतेच सादर झाले आहे. त्याची कार्यवाही टप्प्याटप्प्याने सुरू होणार आहे. इंग्लंडमधील शिक्षणक्षेत्रातील आजवरची वाटचाल ही वंशश्रेष्ठत्वाच्या सुप्त प्रेरणेतूनच झालेली आहे असा ठपका या प्रतिवृत्तात ठेवण्यात आलेला असून त्यावर तोडगा म्हणून बहुसांस्कृतिक ( Multi-Cultural ) शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आलेली आहे. आचार्य अभ्यांनी तेथील धार्मिक शिक्षण आणि खेळ यांविषयी लिहिले आहे. सर्वत्र खिश्चन हा एकच धर्म असल्याने तेथील धार्मिक शिक्षणात एकजिनसीपणा आहे, असे त्यांचे निदान आहे. पण स्वान-प्रतिवृत्तानुसार आता ख्रिस्ती धर्माबरोबरच हिंदू, बुद्ध, मुस्लिम इत्यादी धर्मांची माहिती

स्नेही श्री. शशिकांत देव यांच्याशी या लेखनासंबंधी चर्चा करण्याची सुसंधी मला नुकतीच मिळाली. आचार्य अत्रे १९२७–२९ च्या दरम्यान तेथे होते, तो काळ आणि आजचा काळ यात महदंतर पडलेले आहे. ज्याच्या साम्राज्यावरील सूर्य कधीच मावळत नाही, असा एक वैभवसंपन्न देश, असे इंग्लंडचे आज वर्णन करता येण्यासारखे नाही. तुलेनेने तो आज एक गरीब आणि गरजू देश बनला आहे, तरीपण आचार्यांनी तेथील शिक्षणाविषयी जे लिहिले आहे, ते तात्पर्याने आजही खरे ठरेल, हाच निष्कर्ष आमच्या चर्चेतून दृढ झाला.

काही तपशिलात फेर पडलेला आहे; पण तत्त्व तेच आहे. आता तेथील शाळा तिमजली नाहीत, अनेक-मजली आहेत. सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाची वयोमर्यादा चौदावरून आता अठरावर गेली आहे. आपल्यासारख्या विकसनशील देशांच्या मानाने तेथील शिक्षणपद्धती आजही आदर्शच म्हणावी लागेल. आपल्याप्रमाणे ' सब घोडे बारा टक्के ' असा प्रकार तेथे नाही. शिक्षणसंस्थांचे स्वातंत्र्य अद्यापही अबाधित आहे. मॅाटेसरी, किंडर गार्टन, डाल्टन प्लॅन यांसारख्या मूलप्रधान तसेच स्वयंशिक्षणावर भर देणाऱ्या नवशिक्षणपद्धतींचे गुणविशेष तेथील शिक्षणपद्धतीने आत्मसात केलेले आहेत. व्याख्यानबाजीपेक्षा कृतिप्रधान संकल्पपद्धतीच्या पाठांना तीत महत्त्वाचे स्थान आहे. क्रमिक पुस्तके, शैक्षणिक साहित्य, गणवेष शाळाच पुरविते. सहलींचा खर्चही तीच करते. क्रीडांगणे, तलाव, ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये, छोटी नाट्यगृहे यांसारख्या सुविधांची जोड तेथील शालेय उपक्रमांना भरपूर प्रमाणात मिळते. नवनवीन प्रयोगांना वाव देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, अशी गतिशील शिक्षणपद्धती तेथे उत्क्रांत होत आलेली आहे. तिची परंपरा दीडशे वर्षांची आहे. विख्यात कादंबरीकार चार्लस डिकन्स ( १८१२–७० ) याच्या ऑलिव्हर ट्विस्ट आणि डेव्हिड कॉपरफिल्ड यांसारख्या ललितकृतींतील विदारक चित्रणामुळे तेथील जनतेचे डोळे उघडले. मग ' छडी लागे छमछम 'चा जमाना हळूहळू मागे पडला. मनोवैज्ञानिक संशोधनाबरोबर बालमानसशास्त्राचाही विकास होत गेला. बालमानसशास्त्रातील सिद्धांतांनी आणि सिद्धींनी तेथील शैक्षणिक प्रगतीला विशेषच हातभार लागला. १९४४ साली ' इजॉलिटेरियल ॲक्ट ' संमत झाला आणि शैक्षणिक सुधारणांच्या प्रदीर्घ परंपरेला गवसणी घालून तिच्यावर राजमान्यतेची मुद्रा उमटविली गेली.

इंग्लंडमधील शिक्षकवर्गाचे जीवनमान आजही वरच्या श्रेणीचे आहे. शिक्षकाची पत्नीही नोकरीत असते. पण पुष्कळदा त्यामागे गरजेपेक्षा आपल्या व्यक्तित्वाच्या स्वतंत्र विकासाची कल्पनाच प्रबळ असते. एखादी पूरक नोकरी पत्करावी वा शिकवण्यांच्या मागे लागावे, असे शिक्षकाचे तुटपुंजे वेतन नसते. तरीपण समाजातील अन्य घटकांच्या मानाने आपले स्थान खाली घसरू नये, म्हणून तेथील बलवान शिक्षण संघटना दक्ष असतात आणि पगारवाढीच्या मागणीचा सतत पाठपुरावा करीत असतात. सध्या

पोलिसांचे पगार तिपटीने वाढल्याने शिक्षक संघटनेची अशी चळवळ सुरू आहे.

पालकवर्गाच्या जागरूकतेसंबंधीचे अत्र्यांचे निरीक्षण अद्यापही अबाधित आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि लोकशाही या गोष्टी त्यांच्या रक्तात भिनलेल्या आहेत. तेव्हा आपल्या पाल्यांनी नुसत्या पुस्तकी पोपटपंचीपेक्षा स्वानुभवाने तयार व्हावे, याकडे ते लक्ष देतात. वयात येताच मुलांनी आपापले प्रश्न स्वतःच सोडवावे, अगदी विवाहासारख्या महत्त्वाच्या समस्यांविषयीही आपले आपण निर्णय घ्यावे आणि मग आपण घेतलेल्या भल्याबुऱ्या निर्णयांच्या परिणामांचे दायित्व टाळू नये, अशी त्यांची अपेक्षा असते त्या दृष्टीने मुलांची सर्वांगीण प्रगती कशी होईल, हे ते पाहतात. शिक्षक-पालक-सहकार्य हा तेथील शैक्षणिक क्षेत्रातला स्पृहणीय विशेष आहे. इंग्लंडमधील शिक्षक-पालकसंघटना नामधारी नसतात किंवा आपल्याकडील शिरस्त्याप्रमाणे नुसत्या इमारत-निधी उभारण्यापुरत्या नैमित्तिकही नसतात. या संघटना निरनिराळ्या शैक्षणिक प्रश्नांवर वा योजनांवर चर्चा घडवून आणतात. त्या वेळी पालकांकडून व्यक्त केल्या गेलेल्या अपेक्षांची योग्य ती दखल घेतली जाते आणि पुढील वर्षासाठी नवे उपक्रम आखले जातात. सध्या इंग्लंडमध्ये आशियायी लोकांची वस्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या पालकवर्गाची दृष्टी मात्र भिन्न असते. इंग्लंडातला पालकवर्ग मुलाची अभिवृत्ती ( ॲप्टिट्यूड ) पाहून त्या त्या व्यवसायाची निवड करण्यास त्याला उत्तेजन देतो, पण भारतीय पालकांप्रमाणे तेथील आशियाई मंडळींना आपल्या मुलांनी कुणीकडून तरी डॉक्टर व्हावे, असे वाटत असते. जादा शिकवणीसाठी पैसा खर्च करण्याची त्यांची सिद्धता असते. मुलांची अभिवृत्ती पाहण्यासाठी चाचण्याही तयार झालेल्या असून तद नुसार मुलांना व्यवसायमार्गदर्शन व्हावे, अशी काळजी शिक्षणसंस्था घेत असतात आणि इंग्रज पालक प्रायः विसंवादी सूर काढीत नाहीत. अत्र्यांच्या या ग्रंथात ' बालकदिन ' नावाचा एक छोटेखानी लेख आहे. तो खरे तर ' बालकदिन ' नसून गाभ्याच्या दृष्टीने ' पालक दिनच ' आहे. आपल्या पालकांच्या बेजबाबदारपणाची हजेरी घेणारा आहे.

इंग्लंडमधील शिक्षणपद्धतीच्या गतिशीलतेचे अलीकडचे गमक म्हणजे स्वान-प्रतिवृत्त. गेल्या शंभर वर्षांतील शैक्षणिक स्थितिगतीचा मागोवा घेऊन लॉर्ड स्वान यांच्या नेतृत्वाखाली शिक्षणखात्याकडे एक प्रतिवृत्त नुकतेच सादर झाले आहे. त्याची कार्यवाही टप्प्याटप्प्याने सुरू होणार आहे. इंग्लंडमधील शिक्षणक्षेत्रातील आजवरची वाटचाल ही वंशश्रेष्ठत्वाच्या सुप्त प्रेरणेतूनच झालेली आहे असा ठपका या प्रतिवृत्तात ठेवण्यात आलेला असून त्यावर तोडगा म्हणून बहुसांस्कृतिक ( Multi-Cultural ) शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आलेली आहे. आचार्य अत्र्यांनी तेथील धार्मिक शिक्षण आणि खेळ यांविषयी लिहिले आहे. सर्वत्र ख्रिश्चन हा एकच धर्म असल्याने तेथील धार्मिक शिक्षणात एकजिनसीपणा आहे, असे त्यांचे निदान आहे. पण स्वान-प्रतिवृत्तानुसार आता ख्रिस्ती धर्माबरोबरच हिंदू, बुद्ध, मुस्लिम इत्यादी धर्मांची माहिती

करून दिली जाणार आहे. अन्य संस्कृतींविषयीचा ब्रिटिश लोकांचा अलिप्तपणा त्यामुळे कमी व्हावा, असा त्यामागे स्तुत्य हेतू आहे.

धार्मिक शिक्षणाप्रमाणेच व्यायाम आणि खेळ यांसंबंधीही पुनर्विचार चालू झाला आहे. फूटबॉल, रक्बी यांसारखे आक्रमक आणि स्पर्धात्मक खेळ प्रतिपक्षाला चीत करण्याची प्रवृत्ती वाढीस लावतात, त्याऐवजी अन्य संस्कृतीतील नवनवीन व्यायाम आणि खेळ यांचे संशोधन सुरू झाले आहे. आपल्या उपनिषदादी ग्रंथांतून षड्रिपू हे स्वतःतच वास करीत असतात, त्यांवर माणसाने मात केली पाहिजे, ही जी शिकवण दिलेली आहे, तिची विचारार्हता पटत चालली आहे. अनेक शाळांच्या नाट्यशिक्षण· वर्गांच्या अभ्यासक्रमात योग विद्येचा तसेच भारतीय नृत्यकलेचा अंतर्भावही झालेला आहे.

'पब्लिक स्कूल्स' हे एक स्वतंत्र जग' असल्याचे अत्र्यांनी म्हटले आहे, ( २६ ) ते खोटे नाही. आठव्या हेन्रीने उमरावव र्गाच्या मुलांच्या शिक्षणासाठी या खास वसति-गृही शाळा भरपूर अनुदान देऊन सुरू केल्या. त्यातील सुविधांची संपन्नता नि शिस्त बरीच हेवा करण्यासारखी असली तरी अशा उच्चभ्रू शाळांत शिकून तयार झालेल्यांच्या ठायी समाजापासून फटकून राहण्याची मूळची अलिप्त वृत्ती अधिकाधिक दृढ होत जाते, ही गोष्ट आता कळून चुकली आहे.

आचार्य अत्र्यांनी इंग्लंडातील शिक्षणपद्धतीविषयी पुष्कळच आत्मीयतेने लिहिले आहे. डाल्टन-पद्धतीवर स्वतंत्र लेख लिहून तर केंब्रिजच्या 'मॉल्टिंम हाऊस स्कूल'चा पुरेसा परिचय करून देऊन ( २६ व ६९ ) 'मूल' प्रधान स्वयंशिक्षणाच्या आणि स्वयंसंशोधनाच्या या पद्धती त्यांना अभिनव वाटल्या. यात मुलांना स्वातंत्र्य दिले जाते; पण शिक्षक मात्र अधिक 'गुलाम' बनतात. चुकारतट्टू आणि बेजबाबदार शिक्षकांना अशा पद्धतीत स्थान नाही. मुलांवर सोपवल्यास आणि नडेल तेथेच मार्ग-दर्शन केल्यास मुले आत्मशिक्षण करू शकतात. अर्थात् अशा प्रयोगांना सामग्रीही विशेष प्रकारची लागते. नीट नियोजन झाले नाही तर प्रयोग कसा फसतो, याचाही उल्लेख अत्र्यांनी केला आहे ( ५८ ) तसेच काव्य, व्याकरण, भाषाज्ञान, इतिहास या विषयांना नेटका न्याय होत नाही, हेही स्पष्ट केले आहे ( ६० ).

पाश्चात्त्य शिक्षणपद्धतीसंबंधी लिहिताना अत्र्यांची 'अपूर्वाई'चीच भावना असली तरी त्या लेखनात अतिशयोक्तीचा भाग फारसा नाही. १८७० पर्यंत इंग्लंडमध्येही प्राथमिक शिक्षणाबद्दल अनास्था होती, १९०२ पासून तेथे खरी प्रगती सुरू झाली, ( ६४ ) या त्यांच्या विधानावरून त्यांना वास्तवतेचे भान आहे, हे दिसून येते.

मार्गारेट थॅचरच्या राजवटीपासून वारे विरुद्ध दिशेने वाहू लागण्याची चिन्हे मात्र आहेत. इंग्लंडची घसरलेली आर्थिक स्थिती, आणि गेल्या सहा वर्षांत भेडसावू लागलेला बेकारीचा प्रश्न यामुळे शैक्षणिक खर्चाला कात्री लावण्याकडे कल झुकत आहे. पुनश्च

'थ्री आर्स', ( लेखन, वाचन व गणित ) ची किंवा व्याकरणी शाळांची ( ग्रामर स्कूल्सची ) भलावण चालू झालेली आहे. लोकशाही मूल्ये अंगी लागलेला ब्रिटिश पालकवर्ग आणि वृत्तपत्रे अशा संकुचित धोरणांवर टीकाच करतात. शिक्षकसंघटनेचा ह्या पारंपरिक वृत्तीला कसून विरोध असतो. काळाच्या घड्याळाचे काटे मागे नेण्याचा थेचरबाईंचा प्रयत्न सुखासुखी सफल होईलसे दिसत नाही. इंग्लंडची शैक्षणिक क्षेत्रातील अपूर्वाई टिकावी, असेच कोणाही सुज्ञ व्यक्तीस वाटेल.

## नवशिक्षणाचे खंदे समर्थक

'शिक्षकाचे व्यक्तिसामर्थ्य' हा लेखही डाल्टनपद्धतीच्या पाश्चात्त्य तत्त्वांनुसार चालणाऱ्या शाळेतील शिक्षकाच्या दृष्टीने लिहिलेला आहे. 'मूल'प्रधान, तुकडी वा वर्गरहित स्वयंशिक्षणाच्या शाळेसाठी शिक्षकाची योग्यता कोणत्या प्रकारची असावी, याची नेटकी कल्पना त्यात मांडलेली आहे. या लेखाच्या जोडीने परिशिष्ट दोनमधील आपल्या सहकाऱ्यांसाठी तयार केलेली 'आचारसंहिता' वाचल्यास ती भारतीय परिस्थितीला खचितच पूरक व पोषक होईल. मुले अनुकरणशील असतात, तेव्हा बाह्य पोषाखापासून तो नैतिक चारित्र्यापर्यंत शिक्षकाचे वर्तन आदर्श असावयास पाहिजे, असा आचार्य अत्र्यांचा आग्रह आहे. मुलांसमोर आपल्या सहकाऱ्यांविषयी टवाळीचे उद्गार कधीही काढू नयेत येथपासून तो मुलांना अपशब्दच नव्हे, तर टोपणनावेही ठेवू नयेत, येथपर्यंत बारकाव्याच्या सूचना त्यात आहेत ( ३६–३७ ).

विविध प्रकारची दृक्साधने वापरून पाठ मनोरंजक कसे करावेत आणि नवी परीक्षा पद्धती कशी असावी, याची तपशिलवार चर्चा करून प्रत्यक्ष एका कवितेच्या अध्यापनाचे प्रात्यक्षिकही अत्र्यांनी करून दाखविलेले आहे. त्यात प्रश्न कसे असावे याच्या जोडीने प्रश्न कसे नसावे, याचीही उद्बोधक चर्चा केली आहे. पाठाच्या प्रात्यक्षिकात 'सुमन' या शब्दातील श्लेषाची फोड करावयाची अनवधानाने राहून गेलेली दिसते. होमरही कधी कधी डुलकी घेतो तसे येथे झाले की मुलांच्या वयोगटामुळे ती फोड करता आली नाही ? पण गोष्ट कितीही किचकट असली तरी ती रोचकपणे उकलून दाखवणे, यात तर अत्र्यांचा हातखंडा, तेव्हा एकंदरीत येथे पहिल्याच पर्यायाची शक्यता अधिक दिसते. मात्र पाठ मनोरंजक करण्याच्या साधनांची कल्पना आणून देत असताना विषय प्रवेशाच्या पायरीवर कथा किंवा गोष्ट हे वाचिक साधन अतिशय आकर्षक ठरते, असे नमूद करून कथाकथनाच्या कलेचे जे तंत्र त्यांनी सांगितले आहे ( ४०–४१ ) ते मौलिक आहे. त्याला स्वानुभूतीचा सुगंध असल्याने तर ते खचितच मननीय ठरावे. बाकी या पाठ-परीक्षेसारख्यां विवेचनातील नावीन्य आता पूर्वी इतके राहिलेले नाही. पेस्टेलोझीने केलेले शैक्षणिक प्रयोग, हर्बार्टच्या पाठाध्यापनाच्या पायऱ्या आणि टर्मनने विकसित केलेल्या बुद्ध्यंक चाचण्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा एक भागच

होऊन बसलेल्या आहेत; तेव्हा या संदर्भातील काही निदाने थोडीफार कालबाह्य ठरणारी आहेत. तरीसुद्धा अत्र्यांसारख्या कुशल शिक्षकाच्या आणि सराईत लेखकाच्या लेखणीतून ते विवेचन उतरलेले असल्याने त्याला एक स्वयंभू महत्त्व आहे. सोनाराने कान टोचावे, तसा तो प्रकार ठरण्याजोगा आहे; कारण सारे नवसिद्धांत कोळून प्याला, तरी व्यवहारात शिक्षक हा प्राणी प्रायः स्थितिशील आहे. अत्र्यांनी लिहिलेय म्हणून निदान तो कुतूहलाने वाचील आणि प्रशिक्षणाच्या काळात शिकलेल्याचे तेवढेच दृढीकरण होईल.

'संभाषणपद्धती'चे ('डायरेक्ट मेथड'चे) अत्रे मोठे पक्षपाती वाटतात आणि या पद्धतीने अभ्यासक्रम कधीच पुरा होत नाही, अशी एक तक्रार सतत कानी पडत असते. पण या तक्रारीत तथ्यांश असला तरी पण नुसत्या व्याख्यानबाजीच्या शिकवण्याने खरे शिक्षण होत नाही. परीक्षेपुरती घोकंपट्टी करून मुले वरच्या वर्गात जात असतात. कोणत्याही तत्त्वाची कार्यवाही निष्ठापूर्वक व्हावयास पाहिजे. 'पाट्या टाकण्या'ची वृत्ती शिक्षणक्षेत्रात तरी अगदी अशोभनीयच ठरावी. पद्धती कोणतीही आणली, तरी विनायकाचा वानर बनविण्यात आपण पटाईत आहोत. शिक्षकवर्गसुद्धा प्रशिक्षणाच्या परीक्षेपुरतीच नवशिक्षणाची तत्त्वे अंगीकारतो. घोकंपट्टीविरुद्ध नवशिक्षणपद्धतीचा कटाक्ष आहे. पण परीक्षेच्या बाबतीत मुले घोकलेले ओकतात, तद्वतच काहीसा प्रकार नवपद्धतीवर निष्ठा नसणाऱ्या कित्येक शिक्षकांकडूनही घडत असतो. त्यामुळे हे नवे तत्त्वज्ञान त्यांच्या अंगी खऱ्या अर्थाने लागत नाही. परीक्षेसाठी हे सारे ताकापुरते रामायण असते; प्रत्यक्ष व्यवहारात पहिले पाढे पंचावन्नच चालू राहतात. अत्रे हे नवशिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते असले, तरी त्यांनी त्याचा स्वीकार डोळसपणे केलेला होता. वर उल्लेखिलेले विषयप्रवेशातील कथाकथनाचे महत्त्व सांगताना, एका मुद्द्यावर त्यांनी मॉंटेसरीबाईंच्या मताशी विरोध दर्शविलेला आहे. भुताखेताच्या काल्पनिक गोष्टी मुलांना सांगू नयेत, या बाईंच्या मतावर आक्षेप घेताना, मोठ्या माणसांना सत्यासत्याची जाणीव झालेली असते, तरी त्यांनासुद्धा जर काल्पनिक गोष्टी आवडतात, तर मुलांची स्वाभाविक ओढ अशा अद्भुताकडे असणारच, अशा आशयाचे त्यांनी समर्थन केलेले आहे. नवशिक्षणाच्या तांत्रिक अंगीकारातून होणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांच्या आणि सहाध्यायांच्या काही फसगमती त्यांनी आपल्या आत्मनिवेदनात कथन केल्या आहेत (१०-११ व २०). 'कऱ्हेच्या पाण्या'च्या पहिल्या दोन खंडांतून विद्यार्थी, शिक्षक, शाळाप्रमुख आणि दिपोटी यांचे कित्येक किस्से विखुरलेले आहेत (खं. १, पृ. ३८–३९, ५५–५७, ७१–७१, २३६, २९२–३०६ व खं. २, पृ. ३०–३१, ४४–४९ इ.). 'हत्ती आणि सहा आंधळे' या इंग्रजी नमुना पाठामुळे गुरूची विद्या गुरूला फळावी, तसा अनवस्था प्रसंग आपल्यावर कसा ओढवला, त्याचे खुमासदार वर्णन त्यांनी स्वतःच केले आहे (२२–२३). कधी कधी 'संभाषणपद्धती'तील ठरीव पायऱ्यांचे स्तोम

अनाठायीही ठरते. एखादी प्रासादिक कविता नुसती परिणामकारकपणे वाचली वा गायिली गेली, तरी पुरे होते. मुलांच्या मनात ती मुळी केवळ तेवढ्यानेच घर करते. अशा स्थितीत पाठाच्या प्रत्येक पायरीला पाय लावलाच पाहिजे, अशा खुळचट समजुतीने मग पुढील पायऱ्यांची यांत्रिक आणि तांत्रिक कवायत होत राहते.

अत्र्यांच्या ठायी या बाबतीतले तारतम्य पुढील काळात तरी खचितच होते. ' यशस्वी अध्यापन ' या पुस्तकाच्या छोटेखानी पुरस्कारात त्याची खूण पटते. शिक्षकांनी अध्यापनतंत्राचा काळजीपूर्वक अभ्यास करावा, पण या तंत्राचे त्यांना विस्मरण होईल, तेवढे चांगले; कारण तंत्रात गुरफटून समरसता हरवली तर पाठ निर्जीव होतो, असा रास्त इशारा त्यांनी दिलेला आहे ( ११२ ). आपले ज्येष्ठ व श्रेष्ठ स्नेही आणि शैक्षणिक बाबतीतले सल्लागार प्रा. एम्. आर. परांजपे यांच्याशी एके काळी त्यांनी दोन हात केले होते. परांजप्यांनी ' डायरेक्ट मेथड ' वर आक्षेप घेणारे दोन लेख ' फ्रीप्रेस ' मध्ये लिहिले तेव्हा अत्र्यांनी त्यांचे सावेश खंडण करणारे तीन लेख लिहून नवशिक्षणपद्धतीचे समर्थन केले होते आणि प्राचार्य हॅमले या त्यांच्या गुरूंनी त्यांचे पत्राने खास अभिनंदनही केले होते. ही हकीगत ' कऱ्हेचे पाणी ' मध्ये सांगत असताना अत्र्यांनी तेथे पुस्ती जोडली आहे : " भाषांतरपद्धती आणि संभाषणपद्धती ह्यांचा समन्वय करावयास हवा," असे त्यांचे म्हणणे होते. ते काही अवाजवी नव्हते. ( खं. १ पृ. ३१७ ). जुनी परीक्षापद्धती मुलांच्या ज्ञानापेक्षा त्यांच्या स्मरणशक्तीची परीक्षा घेते, तीत घोकंपट्टीला उत्तेजन मिळते, म्हणून तीत बदल झाला पण ती ' अति ' नव बनल्यामुळे फुटकळ प्रश्नोत्तरांचा सुळसुळाट सुरू झाला. सलगपणे विचाराविष्कार करण्याची विद्यार्थ्यांची क्षमताच मंदावली. तेव्हा अलीकडेच शालान्त परीक्षेतील प्रश्नपद्धतीत फेरफार करण्यात आला असून पुनश्च निबंधस्वरूपी उत्तरांचे प्रश्न वाढविण्याच्या दिशेने लंबक झुकला आहे. एकूण पृथ्वी गोल आहे, हाच याचा इत्यर्थ !

## सर्वांगीण लेखनाचा अप्रतिम वस्तुपाठ !

पृथ्वीचा गोल या शब्दप्रयोगावरून स्मरण झाले, ते या ग्रंथातील आचार्यांच्या अप्रतिम लेखाचे. अनेक शैक्षणिक दृक्साधनांपैकी नकाशा हे एक साधन. भूगोलाच्या अध्यापनात अधूनमधून उपयोगी पडणारे. पण ' नकाशासंग्रहा 'च्या प्रस्तावनेच्या निमित्ताने अत्र्यांनी केवळ नकाशा या साधनाची बारीकसारीक अंगोपांगे नीटसपणे उलगडून दाखविली आहेत. एखाद्या निष्णात जलतरणपटूने जलाशयाच्या विस्ताराचा आणि खोलीचा सलील ठाव घेत आपल्या हातातील विजेरीच्या शोधज्योतीने त्या जलाशयाचा कोपरा न् कोपरा उजळावा, तसा प्रत्यय ही प्रस्तावना वाचताना आल्यावाचून राहात नाही. भूगोलाची विपर्यस्त व्याख्या आणि रास्त व्याख्या, भूगोलाध्यापनातील नकाशाचे स्थान, भूगोल आणि मानवी जीवन, भूगोल आणि सृष्टिशास्त्र, भूगोल आणि

इतिहास, भूगोल आणि प्रवासवर्णने, नकाशांचे विविध प्रकार आणि त्यांचे उपयोग, पृथ्वीचा गोल हे नकाशाला पूरक ठरणारे उपसाधन आणि त्याचे उपप्रकार, नकाशा पाहण्याच्या रीती आणि त्यांचा परिणाम, टांगल्या नकाशामुळे किंवा भुईवर पसरलेल्या नकाशामुळे मुलांचे होणारे पूर्वग्रह, ' वर ' आणि ' खाली ' अशा स्थलविषयक भाषा-प्रयोगांमुळे विद्यार्थ्यांची होणारी दिशाभूल, नकाशाच्या आराखड्यांचे रेखाटण आणि ते भरण्याच्या तऱ्हा असे एक ना दोन झाडून सारे विषय अत्र्यांनी करतळावरील आवळ्याप्रमाणे स्पष्ट केले आहेत. मनुष्यप्राणी आणि भौगोलिक परिस्थिती यांचे घनिष्ठ संबंध त्यांनी ऑस्ट्रेलियातील रानटी टोळ्यांच्या आणि एस्किमोंच्या जिण्याची माहिती सांगून उघड केले आहेत. नकाशा हा काही स्थळ दाखविण्याचे कार्य करीत नाही. त्यामागील कार्यकारण संबंध दर्शविणे हे महत्त्वाचे असते. नकाशा पाहण्याने मुलांच्या कल्पकतेचा परिपोष झाला पाहिजे. प्रदेशाच्या मर्यादा आणि स्थळे यांचा अभ्यास करताना तो इतिहासाच्या साहचर्याने केल्यास अधिक अर्थपूर्ण होतो, हा मुद्दा विशद करताना त्यांनी जमशेटपूर आणि किर्लोस्करवाडी या स्थलनामांची चपखल उदाहरणे दिली आहेत. भूगोल आणि इतिहास यांच्या अन्योन्य साहचर्याच्या विषयावरून एका ऐतिहासिक गोष्टीची आठवण होते. ती गोष्ट म्हणजे नेपोलियनची रशियावरील स्वारी. इतिहासकार नमूद करतात की, नेपोलियनच्या दारुण पराभवाची कारणमीमांसा करताना रशियन लोक उद्‌गार काढतात : " Our greatest generals were General January and General February ! " नेपोलियनचा पराभव झाला, तो प्रतिकूल हवामानामुळे म्हणजेच विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे ! ज्ञाताकडून अज्ञाताकडे जावे, असे शिक्षणक्षेत्रातले एक महत्त्वाचे सूत्र आहे. ते घट्ट पकडून एका साध्या दृक्साधनावर आपल्या तैलबुद्धीच्या बळावर एखादा तज्ज्ञ लेखक कसा सर्वांगीण प्रकाश टाकू शकतो, याचा सुंदर वस्तुपाठ म्हणजे आचार्य अत्र्यांची ही प्रस्तावना !

## पुस्तकसंपादनाची पूर्व सिद्धता

' मराठी क्रमिक पुस्तकांचा जीर्णोद्धार पूर्वार्ध ' या शीर्षकाचा एक लेख या ग्रंथात आहे त्याचा उत्तरार्ध अत्र्यांनी कधीच लिहिलेला दिसत नाही. या लेखात मराठी जुन्या क्रमिक पुस्तकांची कॉव्हर्नेटनप्रतिवृत्ताच्या आधारे त्यात विस्ताराने जी माहिती दिलेली आहे, ती अत्यंत अभ्यासपूर्ण असून शेवटच्या परिच्छेदातील दोनचार वाक्यांत ती पुस्तके कशी बोधवादी दृष्टिकोणातून सिद्ध करण्यात आलेली आहेत, त्याविषयी शेरे मारले आहेत. म्हणजे यात ' जीर्ण ' पुस्तकांची चांगली माहिती असली, तरी त्यांच्या ' उद्धारा ' ची दिशा मात्र दाखविलेली नाही. या लेखाच्या उत्तरार्धाच्या अभावी ' वासंती ' आणि ' अरुण वाचन ' या पुस्तकांच्या प्रस्तावना त्याचा उत्तरार्ध असे समजून चालावयास हरकत नाही. ' वासंती ' च्या प्रस्तावनेत सरकारी क्रमिक पुस्तकातील

पद्यविभागाची सालंकृत बोळवण केलेली आहे. प्रायः प्रत्येक पद्यधड्याच्या नावाला किंवा त्यातील पद्यपंक्तींना लगामी लावून त्याचा निपटनिरंजन सपकपणा उघड केला आहे. प्रस्तावनेच्या उत्तरार्धात 'वासंती' मधील कवितांच्या निवडीची स्तुती केलेली आहे. अर्थात तीवरून क्रमिक पुस्तकांतून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व सामाजिक प्रेरणा मिळावी, तसेच त्यांना काव्यसौंदर्याची गोडी लागावी, हे हेतू स्पष्ट होतात. मात्र विधायक सूचनांपेक्षा विध्वंसक अंगावर तीत खूपच भर असल्याने तत्कालीन सरकारी क्रमिक पुस्तक समितीला ही टीका झोंबली. त्यांनी प्रस्तावना वगळून सदर पुस्तक मंजूर केले! दि. गं. केळकर (कवी अज्ञातवासी) यांनी 'महाराष्ट्र शारदा, भाग १' म्हणून आधुनिक कवितांचा एक संग्रह काढला होता. अत्र्यांनी तदनंतरच्या नवोदित कवींच्या कवितांचा 'महाराष्ट्र शारदा, भाग २' या नावाचा संग्रह संपादित करून एक प्रकारे आपली क्रमिक वेच्यांच्या पुस्तकाची रंगीत तालीमच केली. संपादकीयातील एक गमतीचे वाक्य उद्‌धृत करण्याजोगे आहे. ते असे : "मागील भागाच्या संपादकांचे सांपत्तिक सामर्थ्य मजमध्ये नसल्याने मला कवींकडून छपाईचा खर्च गोळा करावा लागला." असो. 'क्रमिक पुस्तकांचा जीर्णोद्धार' या विषयावरील त्यांच्या व्याख्यानाचाही एक उल्लेख आढळून येतो. २७।९।१९३१ रोजी भाऊसाहेब चुणेकर यांच्या अध्यक्षतेखाली येलूर येथे शिक्षकांचे एक गटसंमेलन भरले होते. त्याच्या वृत्तांतात पां. म. जोशी यांनी म्हटले आहे, "त्यांतील (क्रमिक पुस्तकांतील) पद्यभागाविषयीदेखील श्री. अत्रे यांनी केलेली टीका अयोग्य, असे कोण म्हणेल?" (**अध्यापन**, ऑक्टो. १९३१, पृ. ४४२). हे भाषण उपलब्ध नाही. त्यांचे एकच भाषण उपलब्ध होते. मात्र ते आहे वेगळ्या थाटाचे. "राजकीय क्षितिजावर उजाडले असले, प्रांतिक स्वराज्याचा अरुणोदय झाला असला आणि नव्या युगाचे सोनेरी उन्ह चोहोंकडे पसरले असले तरी तात्यापंतोजीच्या झोपडीत अजून आवसेची मध्यरात्रच करकरते आहे." (११५), असे म्हणत अत्र्यांनी प्राथमिक शिक्षकांच्या दुःस्थितीला मुलुखमैदानी भाषेत वाचा फोडली आहे. प्राथमिक शिक्षकांच्या वेतनमानाचा तौलनिक अभ्यास त्यात आलेला आहे. पण भर आहे, तो शिक्षकांचे दुखणे जळजळीत शब्दांत वेशीवर टांगण्यावर! पण अशा भाषणांपेक्षा त्यांच्या अधिक क्रांतिकारक आणि विधायक कार्याकडे वळू या.

### क्रमिक पुस्तकांतील क्रांतीचे अग्रदूत

त्यांच्या क्रमिक पुस्तकांपैकी 'नवयुग वाचनमाला' ही खूपच गाजली. तीत अत्र्यांनी स्वतःच्या 'रत्नाकरा'दी मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या शिशुकथा घेतल्या आहेत. त्या पुस्तकरूपाने काढण्याचा त्यांचा संकल्प असावा. 'अध्यापन'मध्ये 'बिचारी बालके' या पुस्तकाचे प्रासिद्धक आढळते. त्यात म्हटले आहे : "हे पुस्तक शिक्षक व पालक यांनी जरूर वाचावे. मनोविकासाचे ज्ञान नसल्यामुळे शिक्षक-पालकांच्या

कडून मुलांच्या वृत्ती कशा मारल्या जातात, हे लहान लहान व चटकदार गोष्टी लिहून श्री. प्र. के. अत्रे यांनी फारच मार्मिकपणे दाखविले आहे. अशा विषयावर निघणारे हे पहिले पुस्तक होय " ( जून १९३१, मलपृष्ठ ४). या भलावणीत अक्षराचीही अतिशयोक्ती नाही, ही गोष्ट ' कावळ्यांची शाळा ' आणि ' फुले आणि मुले ' या त्यांच्या बालकथांच्या संग्रहावरून पुरेपूर पटेल. श्रवणेंद्रियांच्या द्वारे मुलांच्या मनात प्रतिमाचित्रे उमटतात. त्यांना संपूर्ण अर्थ कळलेला नसतो. पण धून मनात घुमत राहावी, तसे त्यांचे होते. म्हणून लहान मुलांच्या पुस्तकांत पुनरुक्तीचे नादानुवर्तित्व असले पाहिजे, हे अत्र्यांनी बरोबर ओळखले होते.

' नवयुगवाचनमाले 'साठी आचार्य अत्र्यांनी काही खास धडेही लिहिले. या मालेविषयीचा विस्तृत इतिहास त्यांनी स्वतःच लिहून ठेवलेला आहे गुजराथच्या दौऱ्यात भावनगरची ' दक्षिणामूर्ती ' ही गिजूभाई बधेकांची ' अद्‌भुत ' शिक्षणसंस्था त्यांनी पाहिली. गुजराती बालवाङ्मयात क्रांती करणारी गिजूभाई आणि ताराबाई मोडक यांची पुस्तके पाहून ते प्रभावित झाले. कर्नाटक मुद्रणालयाच्या मंगेशराव कुळकर्ण्यांनी विनंती केल्यावर मग त्यांनी कोणत्या धोरणाने क्रमिक पुस्तकांचे लेखन केले, ते खुद्द त्यांच्याच शब्दांत सांगणे बरे : " लहान मुले ज्या भाषेत बोलतात, त्याच घरगुती भाषेचा आरंभीच्या पुस्तकामध्ये मी सर्रास उपयोग केलेला आहे. प्रौढ माणसे बोलतात ती किंवा छापील पुस्तकामध्ये जशी वापरतात तशी भाषा मुलांना वाचायला लावणे हे मानसशास्त्राच्या विरुद्ध आहे. वाचनात मुलांची झपाट्याने प्रगती व्हावी, एवढ्यासाठी वाचताना ओळखीचे शब्द फिरून फिरून यावेत, एवढेच नव्हे तर काही काही धड्यांची भाषा कवितेच्या कडव्यासारखी रुणझुणती, नादमधुर नि तालबद्ध असावयाला हवी, या कल्पनेने मी ' बालवाचना 'तले आणि पहिलीच्या पुस्तकातले कित्येक धडे रचलेले आहेत. " ( कऱ्हेचे पाणी, खं. २ पृ. १०६). माध्यमिक शाळांसाठी कविवर्य गिरीशांच्या सहकार्याने त्यांनी ' अरुणवाचनमाला ' सिद्ध केली. तिने महाराष्ट्रातील दोन पिढ्यांची तरी वाङ्मयीन अभिरुची घडविलेली आहे. विषयांची विविधता राखूनही त्यांनी शालेय क्रमिक पुस्तकांचा एक मानदंडच निर्माण केला. त्या मालेचे खूपच अनुकरण झाले. पुढे त्यांनीही ' सुभाषवाचनमाला ' काढली; पण ' अरुणवाचनमाले 'ची अपूर्वाई तिला लाभली नाही. ' अरुणवाचना 'ची प्रस्तावना म्हणजे अद्यापही क्रमिक पुस्तकांच्या रचनेसंबंधी दशाज्ञा सांगणारी एक आदर्श संहिताच आहे. वाढाळू विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्राची जाण, राजकीय आणि सामाजिक संक्रमणकाळाचे भान आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कलात्मक दृष्टीची बूज ठेवूनच त्यांनी पाठांची निवड केलेली आहे. " मात्र वाङ्मयात्मक स्वरूप असल्याशिवाय कोणत्याही ऐतिहासिक, भौगोलिक वा शास्त्रीय धड्याची निवड करण्यात आलेली नाही " ( पृ. १२९ ) असा निर्वाळा त्यांनी दिलेला होता आणि तो यथार्थच होता.

## धाराप्रवाही चलच्चित्रपट

'मी शिक्षक कसा झालो?' हे पहिले प्रकरण म्हणजे अत्र्यांच्या शैक्षणिक जीवनाचे दर्शन पारदर्शक आणि धाराप्रवाही शैलीने घडविणारा एक चलच्चित्रपटच आहे. प्रारंभीच्या काळातला चिटवळ पण वाङ्मयप्रेमी विद्यार्थी, बी.टी.च्या परीक्षेत पहिला क्रमांक पटकावल्याने आत्मसाक्षात्कार झालेले नवशिक्षणाचे अग्रदूत, कॅंप एज्युकेशन सोसायटीचा जीव ओतून कायाकल्प घडवून आणाणारे मुख्य शिक्षक ही अत्र्यांची रूपे ठसठशीतपणे मनात भरतात. त्यांचे शैक्षणिक कार्य विविधांगी आहे. त्यांनी स्काऊटचे प्रशस्तिपत्र मिळविलेले होते, त्यामुळे शाळेत शिस्त ठेवणे, शैक्षणिक सहली घेऊन जाणे या गोष्टींत त्यांनी (मुख्य शिक्षक असूनही) जातीने लक्ष घातले. त्यांची चित्रकला चांगली होती त्यामुळे फळ्याचा उपयोग ते उत्तम करीत. बी. टी. च्या अभ्यासातील शब्दांचा डोंगर आपण कसा पचविला, त्याचे त्यांनी दिलेले वर्णन चित्तवेधक आहे (१८–१९).

पाण्याच्या स्वभावातील दोन गुण अत्र्यांमध्ये होते. पहिला 'पाणी तेरा रंग कैसा जिस मे मिलावे वैसा' म्हणतात, त्याप्रमाणे मिळून मिसळून वागण्याचा गुण. ते विद्यार्थ्यांत मिसळत, त्यांच्याबरोबर खेळांत, सहलीत, पाठांच्या नाट्यीकरणांत भाग घेत. पाठांचे नाट्यीकरण केल्यास विषय चांगला ठसतो, असे बॅलार्डचे मत होते. 'सोहराब आणि रुस्तुम'च्या नाट्यीकरणात अत्र्यांनी सोहराबची तर विठ्ठलराव शिराळे यांनी रुस्तुमची भूमिका वठविली होती, अशी माहिती शिराळे यांच्या टिपणवहीत आहे. मुलांमुलींची सरमिसळ नाटके तेव्हा होत नसत, म्हणून खास कुमारांसाठी त्यांनी 'प्रल्हाद', 'वीरवचन' आणि 'गुरुदक्षिणा' अशी तीन नाटके लिहिली. पुण्याच्या पूर्वभागात शाळा नव्हती तसेच रास्तापेठेच्या टापूत मुलींची शाळा नव्हती, म्हणून त्यांनी धनराज गिरजी प्रशाला (१९२७) आणि मुलींची आगरकर प्रशाला (१९३४) या शाळा काढल्या. आगरकर प्रशालेत ते वरच्या वर्गांना इंग्रजी आणि भूगोल शिकवीत असत. पुण्यातील शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी त्यांनी एस. टी. सी. आणि बी. टी. चे वर्ग काढले. त्या वर्गातील अध्यापनाचा बहुतेक भार त्यांनाच वहावा लागे. प्राथमिक शिक्षकांसाठी गांधी ट्रेनिंग कॉलेज काढले. 'सोहराब आणि रुस्तुम' या इंग्रजी खंड-काव्याला इंग्रजीत प्रस्तावना आणि टिपणे लिहून त्यांनी एक २०० पानांचे पुस्तक काढले होते. (कऱ्हेचे पाणी, खं. १, पृ २६७).

## शाळेबाहेरील शैक्षणिक उपक्रम

याखेरीज शाळेबाहेरील शैक्षणिक जगात ते अतिशय आत्मीयतेने भाग घेत. त्यांनी शिक्षकांसाठी 'अध्यापन' (१९३१) आणि 'इलाखा शिक्षक' (१९३९) ही मासिके चालविली. 'अध्यापन' हे शैक्षणिक प्रश्नांचा शास्त्रीय व कलात्मक दृष्टिकोणातून विचार

करण्याला वाहिलेले होते; तर 'इलाखाशिक्षका'चे उद्दिष्ट शिक्षकांची लढाऊ संघटना उभी करणे हे होते. 'अध्यापन' दीड वर्ष तर 'इलाखाशिक्षक' सरासरी एकच वर्ष चालले. 'अध्यापन' मध्ये अत्र्यांचे स्वतःचे तसेच सहसंपादक भा. धों. कर्वे यांचे लेख येत. दर अंकात एकेका शिक्षणशास्त्रज्ञाचा परिचयपर लेख छायाचित्रासह प्रसिद्ध होत असे.

शैक्षणिक चर्चा आणि सभासंमेलनात ते अगत्याने भाग घेत. 'शिक्षाविचारमंडळ' नावाच्या पुण्यातील संस्थेचा प्रा. एम्. आर. परांजपे यांनी पुनरुद्धार केला. 'परीक्षेची नवी पद्धत' या विषयावर अत्र्यांनी निबंध वाचला. 'रत्नाकरा' त 'मुलांचे स्वातंत्र्य' या विषयावर अत्र्यांची लेखनमाला प्रसिद्ध होणार होती. त्यातला तो पहिला लेख असल्याचे संपादकांनी म्हटले होते (**रत्नाकर**, सप्टेंबर, १९२६) ११–९–१९३० रोजी 'इंग्लंडमधील पालक मुलांची कशी काळजी घेतात?' या विषयावर त्यांनी एक व्याख्यान दिले होते (**प्राथमिक शिक्षण**, नोव्हें. १९३०). १२ ते १७ जानेवारी १९३१ पुण्याच्या 'प्रॅक्टिसिंग स्कूलमध्ये अत्र्यांनी कन्याशिक्षक मंडळीच्या सभेत व्याख्यान दिले होते. तदनंतर विडंबन कविताही म्हटल्या होत्या. (प्राथमिक शिक्षण, एप्रिल १९३३, पृ. १७–२०) गायकवाडवाड्यात भरलेल्या 'वर्धाशिक्षणयोजने' वरील चर्चेत त्यांनी समवायी शिक्षणपद्धतीचे समर्थन केलेले होते (**आचार्य अत्रे : विविधदर्शन**, १९५८ पृ. २६९).

ते शैक्षणिक परिषदांतून तसेच शिक्षकांच्या गटसंमेलनांतून भाग घेत असत. तेथे 'क्रमिक पुस्तकांचा जीर्णोद्धार', 'कवितेचे अध्यापन', 'इंग्लंडातील शिक्षण', 'संभाषण पद्धती' 'परीक्षा पद्धती' यांसारख्या विषयांवर बोलत. १९३९ साली भरलेल्या प्राथमिक शिक्षक परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते. शैक्षणिक परिषदांतून ते आदर्श पाठ घेत. ते प्रायः भूगोल वा भाषा विषयाचे असत. विषयाच्या ज्ञानाबरोबरच त्यांच्या ठायी गायन, चित्रकला, अस्खलित वाणी आणि विनोदबुद्धी या गोष्टी असल्याने त्यांचे पाठ कमालीचे रंगत.

या काळात त्यांनी खास स्त्रियांसाठी 'मनोरमा' (१९२९) मासिक चालविले. त्यात तत्कालीन विदुषींचे विशेषतः महिला विद्यापीठातील विदुषींचे लेख येत. अत्र्यांच्या काही विडंबन कविता त्यात प्रसिद्ध झालेल्या होत्या. अशा या मासिकांच्या उद्योगात त्यांचे 'उपद्‌व्यापी' मित्र गो. गो. अधिकारी यांचे त्यांना साहाय्य असे. अत्र्यांची शैक्षणिक कामगिरी अशी चौफेर दृष्टी फेकणारी आणि अत्यंत विधायक स्वरूपाची होती.

## दशांगुळे उरला

येथवरच्या विवेचनावरून 'अध्यापक अत्रे' या ग्रंथाची तसेच तदनुषंगाने आचार्य

अत्रे यांच्या शिक्षणविषयक मतांची आणि कार्याची पुरेशी ओळख व्हावी. शिक्षणाची पारंपरिक पठडी आणि तिच्यातील उणिवा, नवशिक्षणाचे साध्य आणि साधने, शिक्षकांची कर्तव्ये आणि पालकांचा प्रतिसाद, शैक्षणिक सुविधा आणि त्यांचा उपयोग, नवी पाठपद्धती आणि तिची प्रात्यक्षिके, परीक्षेचे हेतू आणि तिची कार्यवाही, क्रमिक पुस्तकांचे कंठाळी स्वरूप आणि त्यांच्या जीर्णोद्धाराच्या नव्या दिशा-थोडक्यात शैक्षणिक सिद्धांत आणि व्यवहार यांना बहुतांशी गवसणी घालणारा त्यांचा हा ग्रंथ वैशिष्ट्यपूर्ण ठरावा. मी 'बहुतांशी' असा सावध शब्द हेतुतःच योजीत आहे. 'अध्यापक अत्रे' या ग्रंथातील लेख दुर्मिळ होते. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय पुण्याचे प्रादेशिक ग्रंथालय, अहमदनगर कॉलेजचे ग्रंथालय येथून ते मिळवावे लागले. त्यासाठी श्रीमती शिरीष पै, कु. लतिका जोशी, प्रा. य. न. पंडित, श्री. विठ्ठलराव शिराळे, डॉ. गं. ना. मोरजे पोतदार संग्रहाचे कुळकर्णी गुरुजी, आणि श्री. अग्निहोत्री या मंडळींचा मला साभार उल्लेख केला पाहिजे. तरीपण अत्रे यांचे शैक्षणिक लेखनकार्य असे विखुरलेले आहे की त्यातले काही लेखन मागे ठेवावेच लागले. आपले ज्येष्ठ स्नेही एम्. आर. परांजपे यांना 'फ्रीप्रेस' मधून तीन इंग्रजी लेख लिहून अत्र्यांनी जे उत्तर दिले होते, ते उत्तराचे लेख येथे अंतर्भूत केलेली नाहीत. रशियाच्या दौऱ्यानंतर तेथील शिक्षणपद्धतीचा परिचय त्यांनी 'नवयुग' च्या वाचकांना करून दिला होता. कलकत्ता आणि त्रिवेंद्रम् येथील 'भुकेल्या पिढी' ने आरंभिलेल्या गलिच्छ चाळ्यांचा खरपूस समाचार त्यांनी 'विद्यार्थ्यांची गुंडगिरी' या अग्रलेखात घेतला होता. (मराठा, १०–१०–१९६४). हे उर्वरित लेखनासंबंधी झाले. त्यांच्या अंतरीची एक अधुरी राहिलेली इच्छा सांगू का?—सांगतोच. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील यशानंतर संयुक्त महाराष्ट्र समिती सत्तेवर येण्याचा रंग दिसत होता. तसे झाले असते तर आपण महाराष्ट्रराज्याचे शिक्षणमंत्री व्हावे, असे त्यांचे एक स्वप्न होते. 'मी शिक्षक कसा झालो!' या लेखातले शेवटचे वाक्य "शिक्षणाच्या कार्यात जीव अजून घोटाळतोच आहे" असे आहे. या सुखस्वप्नाच्या प्रकाशात या भिंगुळवाण्या उद्गारांमुळे अनेक कल्पना-तरंग मनात उमटवून जातात!—तर सांगायची गोष्ट हीच की, 'तो जगदात्मा दशांगुळे उरला' म्हणतात, तसे 'अध्यापक अत्रे' दशांगुळे उरणारेच होते.

मुंबई, १३-८-८५

**डॉ. स. गं. मालशे**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | मी शिक्षक कसा झालो ? | १ |
| २ | शिक्षकाचे व्यक्तिसामर्थ्य | ३२ |
| ३ | पाठ मनोरंजक कसा करावा ? | ३८ |
| ४ | परीक्षेची नवी पद्धत | ४५ |
| ५ | डाल्टन–पद्धती | ५७ |
| ६ | इंग्लंडातील मुलांची जोपासना | ६२ |
| ७ | इंग्लंडातील प्राथमिक-शिक्षण | ६४ |
| ८ | बालकदिन | ७० |
| ९ | आधुनिक कवितेचे अध्यापन | ७४ |
| १० | ‘ तगरीचे फूल ’ : पाठाचे प्रात्यक्षिक | ७८ |
| ११ | मराठी क्रमिक पुस्तकांचा जीर्णोद्धार-पूर्वार्ध | ८१ |
| १२ | ‘ वासंती ’ : प्रस्तावना | ९० |
| १३ | ‘ नकाशासंग्रह ’ : प्रस्तावना | ९९ |
| १४ | ‘ यशस्वी अध्यापन ’ : पुरस्कार | १११ |
| १५ | प्राथमिक शिक्षकांची दुरवस्था : भाषण | ११३ |
| | परिशिष्ट १ ले : ‘ शिक्षकांसाठी ’ : अरुणवाचन : ‘ प्रास्ताविक ’ | १२५ |
| | परिशिष्ट २ रे : एका विद्यार्थी आणि सहकारी व्यक्तीच्या टिपणवहीतून | १३२ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

# १

# मी शिक्षक कसा झालो ?

शिक्षकाच्या व्यवसायाशी आमच्या अत्रेमंडळींचा फार जुना संबंध. माझे सारे चुलते आणि चुलत चुलते मराठी शिक्षक होते. व्ह. फा. ची परीक्षा झाली की एखादे दुसरे वर्ष ' ट्रेनिंग ' ला जाऊन यावयाचे आणि तालुक्यातल्या तालुक्यात कुठल्या तरी प्राथमिक मराठी शाळेत शिक्षक व्हायचे, हा आमच्या मंडळीचा शिरस्ता अगदी ठरून गेला होता.

इंग्रजी तिसरी इयत्ता झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी मी सासवडहून पुण्याला आलो. माझ्या वडिलांना ' पूना बँके 'त अकाउंटंटची नोकरी मिळाली. ' नादारी ' मिळाल्यामुळे मी भावेस्कूलमध्ये दाखल झालो. तेथे संबंध जो आला तो कवी आणि नाटककार शिक्षकांशी. त्यामुळे वकील होण्याचा विचार अजिबात डोक्यातून उडाला. मनाशी खूणगाठ बांधली की आपण आयुष्यात लेखक व्हायचे. एक दोन शिक्षक वकिलीची परीक्षा पास होऊनही वकिली करीत नव्हते. वकिली चालत नसल्याने ते शिक्षक झाले होते, हे त्या वेळी माझ्या लक्षात आले नाही. त्यांनी वकिलीच्या धंद्यासंबंधी माझे मन कलुषित केले.

माझे सारे लक्ष कवितांकडे आणि नाटकांकडे होते. गडकरी हे माझे आदर्श होते. त्यामुळे अभ्यासाकडे मी विशेष लक्ष दिले नाही. शिवाय मी काही हुषार विद्यार्थी नाही. माझा बौद्धिक वकूब सामान्य आहे, असे मला राहून राहून वाटे; पण मी कुठल्याही परीक्षेत नापास म्हणून कधी झालो नाही. परीक्षेच्या आधी महिनाभर अभ्यास केला की मला पुरा होई. माझ्या धाकट्या चुलत्यांनी ' पहिली जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप ' मिळवली होती. त्या वेळी चहूंकडे त्यांचे नाव झाले होते.

त्यांचा धडा मी गिरवावा असे शिक्षकांना वाटे; पण त्यांच्या त्या अपेक्षांच्या ओझ्याखाली माझा जीव मात्र गुदमरून जाई. परीक्षा पास होण्यातच मला माझ्या पराक्रमाची पराकाष्ठा वाटे. आमच्या वेळी मॅट्रिकच्या परीक्षेचा निकाल फार कडक लागला. शाळेतून सव्वाशे विद्यार्थी बसले होते. त्यांपैकी दहा का बारा पास झाले. त्यांत मी होतो. अकारविल्ह्याप्रमाणे माझे नाव बोर्डावर पहिले झळकले. ते पाहून सबंध मॅट्रिक परीक्षेत माझा नंबर पहिला आल्याइतका माझ्या वडिलांना आनंद झाला.

कॉलेजात गेल्यावर माझे कवितांचे वेड आणखीच बळावले. मासिक मनोरंजनात माझ्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. त्यामुळे कॉलेजातली 'स्कॉलर' मंडळी मला खिजगणतीत नसल्याप्रमाणे वाटू लागली. कॉलेजच्या त्रैमासिकांतही माझ्या कविता पहिल्या पानावर झळकू लागल्या. एक दोन प्रोफेसरांनी माझ्या काव्याची खूपच वाखाणणी केली. त्यामुळे स्वर्गाला डोके घासत असल्याचा मला भास झाला. मग अभ्यासाकडे कोठून लक्ष लागणार? माझा वेळ कॉलेजच्या लायब्ररीत जाई. इंग्रजी वाङ्मयातल्या बहुतेक सर्व नामांकित लेखकांची पुस्तके मी वाचून काढली. मोलियरच्या नाटकांनी तर मला वेड लावले.

लेखक होण्याचा माझा इकडे असा जंगी प्रयत्न चालू असता, मला वकील करण्याचे बेत तिकडे माझे वडील जोराने रचू लागले. पण वडिलांचे आकस्मिकपणे निधन झाले. कसे तरी वर्ष निभावले अन् मी बी. ए. झालो. परीक्षेत अगदी किमान मार्क मला मिळाले. एक जरी त्यात कमी पडला असता तरी मी नापास होत होतो. बी. ए. झाल्यानंतर पुढे काय करायचे, हे वडिलांच्या आकस्मिक मृत्यूमुळे ठरल्या-सारखेच झाले होते. त्यांच्या इच्छेला मी बांधला गेलो होतो. एलएल. बी. होण्या-वाचून मला सुटकाच नव्हती. एके दिवशी सकाळी मी उठलो अन् मुंबईची गाडी पकडली.

कुठेतरी नोकरी केली तरच मला मुंबईत राहता येणार होते. जयकरांच्या शाळेत एक सहामाही तर रॉबर्ट मनी हायस्कूलमध्ये अवघा एक महिना मी होतो. महिन्याअखेरीस फोर्टमधल्या 'न्यू हायस्कूल'मध्ये महिना सवाशे रुपये पगारावर वरच्या वर्गाचा संस्कृत शिक्षक म्हणून माझी नेमणूक झाली. वर्तमानपत्रातली जाहिरात वाचून केलेल्या अर्जावर मला ही नोकरी मिळाली होती. 'न्यू हायस्कूल' ही मुंबईतली सर्वांत मोठी अन् जुनी शाळा. भर्डा आणि मर्झबान ह्या दोघा पार्शी पदवीधरांनी ती १८९० च्या सुमारास काढली. गेल्या पन्नास-साठ वर्षांत मुंबईच्या निरनिराळ्या क्षेत्रांत जी मोठमोठी माणसे होऊन गेली, त्यांतली बहुतेक सारी ह्याच शाळेत शिकली असे आढळून येईल. एस्प्लनेड मैदानासमोरच्या दोन प्रशस्त टोलेजंग इमारतींमध्ये ती भरते. हॉर्नबी रोडवरही तिची आणखी एक इमारत आहे. मुलांची

संख्या दोन-अडीच हजारांवर असेल. पार्शी आणि गुजराती मुलांचा या शाळेत विशेष भरणा असतो. शिक्षकही बहुतेक पार्शीच. अशी सुव्यवस्थित आणि सुयंत्रित शाळा साऱ्या हिंदुस्थानात नसेल. इंग्लंडमधल्या एखाद्या 'पब्लिक स्कूल'सारख्या शिस्तीच्या अन् शिक्षणाच्या परंपरा तिने येथे निर्माण केल्या आहेत. सर्व अद्ययावत शैक्षणिक साधनांनी आणि सामग्रीत ती सज्ज आहे. विद्यार्थीजीवनाच्या सर्व आघाड्यांवर वर्षानुवर्षे तिचे काम अगदी यंत्रासारखे चालू आहे. ग्रंथालय, वस्तु-संग्रह, शरीरसंवर्धन, क्रिकेट, बॉक्सिंग, मासिक सहली, स्काउटिंग, बँड, नाट्य, वक्तृत्व असे कोणतेही एक क्षेत्र नाही, की ज्यात ह्या शाळेने प्रावीण्य मिळविले नाही. शिक्षकांना सढळ हाताने पगार देऊन त्यांच्या 'प्रॉव्हिडंट फंडा'ची उत्तम व्यवस्था अनेक वर्षांपासून ह्या शाळेने केलेली आहे आणि एवढे असून वर्षानुवर्षे ह्या शाळेने सरकार-कडून कधी पैचीही ग्रँट घेतली नाही. पुण्यामधल्या दुय्यम शाळांचे नेहमी तोंड भरून कौतुक केले जाते; पण खरे सांगायचे म्हणजे त्यातली एकही शाळा 'न्यू हायस्कूल'च्या पासंगाला पुरणार नाही.

माझे सगळे विद्यार्थी गुजराती हिंदू असत; पण पार्शी विद्यार्थ्यांच्या संगतीने ते चांगलेच वात्रट अन् दंगेखोर झाले होते. पहिल्या दिवशी मला त्यांनी छळण्याचा प्रयत्न केला. वर्गात मी प्रवेश केला तेव्हा चोहोंकडून सिंहाच्या गर्जना उठल्या. मी समोर पाहू लागलो. विद्यार्थ्यांची तोंडे तर मिटलेली होती अन् सिंहाच्या आरोळ्या कुठून उमटताहेत, हे मला कळेना. मग माझ्या लक्षात आले की तोंडे मिटून नाकांतून मुले हा आवाज काढताहेत. मी व्यासपीठावर चढलो अन् शांतपणे म्हणालो, "Good Morning Lions!" त्याबरोबर 'सिंह' ओरडायचे थांबले. मुलांना कल्पना नव्हती की, त्यांच्या 'गर्जनां'चे इतक्या थंडपणे मी स्वागत करीन. मी खुर्चीवर बसून संस्कृतचे पुस्तक उघडतो आहे, तोच 'सिंह' पुन्हा घुमायला लागले. तेव्हा सर्व वर्गाकडे मी स्थिर आणि कठोर दृष्टीने एकदा पाहिले आणि म्हणालो, "मी संस्कृतचा 'मास्तर' तर आहेच; पण सर्कशीत 'रिंगमास्तर'चेही काम मी केलेले आहे. खेळ चालू असता सिंहांनी ओरडावे, कामाच्या वेळी नाही. याउपर 'सिंह' जर ओरडायला लागले, तर एकेकाची शेपटे धरून मी त्यांना पिंजऱ्यात कोंबीन." त्याबरोबर 'सिंह' जागच्या जागी खतम् झाले. पुन्हा त्यांचा उपसर्ग मला कधी झाला नाही.

प्रत्येक नव्या शिक्षकाला विद्यार्थी त्रास देण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी विनोद आणि क्रोध ह्यांचा समर्पक समन्वय घालून शिक्षकाने शिस्त राखण्याचा प्रयत्न करावा. पुष्कळदा तर नुसत्या 'दृष्टी'ने काम भागते. शिक्षकाचे डोळे पाहूनच मुलांना त्याचा वकूब कळून येतो; पण अनुभवाने शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाचा जसाजसा विकास होऊ लागतो, तसतसे त्याच्या नजरेत सामर्थ्य उत्पन्न होते.

'न्यू हायस्कूल'मध्ये प्रवेश करीपर्यंत सहासात महिन्यांच्या अनुभवाने माझे व्यक्तिमत्त्व पुष्कळच प्रखर झालेले होते. ह्या शाळेत दोन वर्षे काम करावयाची मला संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. आदर्श शाळेमधली व्यवस्था आणि शिस्त कशी असावी, हे ह्या ठिकाणी मला प्रत्यक्ष पाहावयाला मिळाले आणि त्याचा पुढील आयुष्यात मला फार उपयोग झाला.

'न्यू हायस्कूल'मध्ये शिक्षक झाल्यानंतर माझ्या वेषभूषेत मला आपादमस्तक बदल करावा लागला. धोतर नेसून तेथे शिकवणे शक्यच नव्हते. थोड्याच दिवसांनी गांधीजींची असहकारितेची चळवळ सुरू झाली अन् मुंबईचे वातावरण खादीमय होऊन गेले. तेव्हा एक दिवस मीही खादीचा सूट अन् गांधी टोपी घालून शाळेत गेलो. त्यामुळे शाळेच्या वातावरणात खूपच खळबळ उडाली. राजकीय दृष्ट्या शाळेचे वातावरण तसे अतिशयच प्रतिगामी होते. ह्याच सुमारास शाळेचे ज्येष्ठ संस्थापक भर्डा हे मरण पावले. तेव्हापासून शाळेचे नाव 'भर्डा न्यू हायस्कूल' असे ठेवण्यात आले. ह्या शाळेत आल्यापासून मला गुजराती समजू लागले. सारा वेळ तीच भाषा कानांवर पडे. मी गुजराती वाचायला शिकलो आणि गुजराती वाङ्मयातील प्रमुख 'साक्षरां'च्या निवडक कृतींचा करून घेता येईल तेवढा परिचय करून घेतला.

फर्स्ट एलएल. बी. चे माझे पहिले वर्ष निर्वेधपणे पार पडले; पण परीक्षेला काही मी बसलो नाही. ...दोनदा परीक्षा हुकल्यानंतर माझे एलएल. बी. बद्दलचे आकर्षणच कमी झाले. आपल्या हातून काही ही परीक्षा होत नाही, असे माझे मन मला भिववू लागले. माझ्या स्वाभिमानाला तो ताण सहन होईना. मी वकील होणार नाही, तर काय शिक्षक होणार जन्मभर ? मुंबईत आल्यापासून माझ्या वाङ्मयालाही ओहटी लागली होती. माझ्या महत्त्वाकांक्षेचे पंख हळूहळू गळून पडताहेत हे माझ्या लक्षात आले.

पुण्याला आल्यानंतर पुढे काय करायचे हा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला. शिक्षकाच्या व्यवसायावाचून मला पुण्यात दुसरे काय करता येण्यासारखे होते ? मी पाच-सात अर्ज खरडले अन् पुण्याच्या प्रत्येक शाळेकडे पाठवून दिले. पंधरा पंधरा दिवस होऊन गेले; पण एका शाळेकडून उत्तर आले असेल तर शपथ ! असे अर्ज करून का पुण्यात कुठे नोकरी मिळते ? मी हताश होऊन स्वस्थ बसलो. एक दिवस माझ्या ओळखीचा एक माणूस मला लष्करातल्या एका गृहस्थाकडे घेऊन गेला. त्याचे नाव बाळासाहेब म्हस्के. पुण्यात पूर्वी गंगारामभाऊ म्हस्के म्हणून एक नामांकित वकील होऊन गेले, त्यांचे हे चिरंजीव. मोठे सुखवस्तू आणि स्वास्थ्यप्रिय गृहस्थ होते. 'कँप एज्युकेशन सोसायटी' नावाची एक जुनी संस्था लष्करात होती. मागासलेल्या वर्गाच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी १८८९ साली ती

स्थापन झालेली होती; तिचे ते सेक्रेटरी होते. लष्करातली मोठमोठी मंडळी त्या संस्थेची सभासद होती. पण संस्थेमध्ये काय चालले आहे, ह्याचा वर्षानुवर्षे बाळासाहेब म्हस्क्यांनी त्यांना कधी पत्ता लागू दिला नाही. संस्था जणू काही आपल्याच खाजगी मालकीची आहे, अशा तऱ्हेने तिचा ते कारभार हाकीत असत. त्यामुळे इंग्रजी पाच इयत्तांच्या पुढे शाळेची प्रगती होऊ शकली नाही. किंबहुना, शाळेची प्रगती होऊ नये, असेच बाळासाहेबांचे धोरण होते. त्यांच्या त्या चमत्कारिक स्वभावामुळे चांगले शिक्षक शाळेत येत नसत आणि आले कुणी, तरी वर्षापेक्षा जास्त ते टिकत नसत. दरवर्षी ‘ हेडमास्तर पाहिजे ’ अशी त्या शाळेची स्थानिक वर्तमानपत्रांत जाहिरात असायची, हे अगदी ठरून गेले होते. तीच जागा मिळवून देण्यासाठी माझ्या मित्राने मला बाळासाहेबांकडे आणले होते.

बाळासाहेब आपल्या अंधाऱ्या दिवाणखान्यात एका कोचावर स्वस्थपणे पडलेले होते. त्यांचे मलिन, कृष्णवर्ण आणि स्थूल शरीर त्या दिवाणखान्याच्या जुनाट वातावरणाला शोभण्यासारखे होते. त्यांच्या नाकपुड्या तपकिरीने भरलेल्या होत्या अन् त्यातली बरीचशी तपकीर त्यांच्या सखलादी बाराबंदीवर सांडलेली होती. माझी माहिती आधीच माझ्या मित्राने त्यांना करून दिली होती. तेव्हा मला पाहताच तपकिरीची चिमूट नाकात कोंबीत बाळासाहेब म्हणाले, “ आमची शाळा गरीब आहे, बरे का मास्तर. इथे मुंबईसारखा पगार नाही मिळायचा ! ” मी अर्धवट दात विचकून म्हणालो, “ पगारासंबंधी माझी काहीही अट नाही ! तुम्ही द्याल तो मला मान्य आहे. ” त्या माझ्या उत्तराने बाळासाहेब खूष झाले. इतके की त्या आनंदाच्या भरात महिना पस्तीस रुपये पगारावर शाळेचा हेडमास्तर म्हणून त्यांनी माझी ताडकन् नेमणूक करून टाकली. माझ्या पगाराचा तो ‘ भरगच्च ’ आकडा ऐकून पाण्यात ढेकूळ पडावे, असा मी खजील झालो; पण काही बोललो नाही. काय बोलणार ? म्हटले चला, पस्तीस तर पस्तीस. गावातल्या शाळेत पन्नास रुपयावर असिस्टंट मास्तर होण्यापेक्षा, लष्करातल्या ह्या शाळेत पस्तीस रुपयांवर हेडमास्तर झालेले काय वाईट ? बडोदे संस्थानचे दिवाण होण्यापेक्षा भोर संस्थानचा राजा होणे बरे ! दुसऱ्या दिवसापासून मी ‘ कँप एज्युकेशन सोसायटी ’च्या हेडमास्तरपदाची सूत्रे हातात घेतली.

ह्या शाळेच्या स्वरूपाची कल्पना त्याची भौगोलिक पार्श्वभूमी लक्षात घेतल्यावाचून यायची नाही. पुणे शहराचे दोन स्पष्ट भाग पडतात. एक गाव आणि दुसरा लष्कर. ह्या दोन्ही भागांचे एकमेकांशी काही साम्य नाही. गावातून लष्करात आले किंवा लष्करातून गावात गेले की, एका देशातून दुसऱ्या देशात गेल्यासारखे वाटते. गावाची वाढ पेशवाईच्या राजवटीमध्ये झाली असल्याने, त्यावर ब्राह्मणी संस्कृतीची गडद छाया पडलेली आहे, तर लष्कराची वस्ती ही गोऱ्या सैन्याच्या गरजेमधून निर्माण

झाली असल्यामुळे, त्याजवर साहेबी संस्कृतीचा ठळक छाप उमटलेला आहे. सभा-संमेलने अन् व्याख्याने ह्यांचा धुमाकूळ गावात बाराही महिने चाललेला असतो, तर पावसाळ्यामध्ये घोड्यांच्या शर्यतीचा 'सीझन' पुण्यात सुरू झाला, म्हणजेच लष्करातील जनतेच्या उत्साहाला अमर्याद भरती येते. अष्टौप्रहर मराठी भाषेखेरीज दुसरा एक शब्द गावात ऐकू यावयाचा नाही, तर लष्करातल्या जनतेचा एकूण एक व्यवहार हमेश इंग्रजी किंवा हिंदुस्थानी भाषेतून चाललेला असतो. अशा रीतीने गाव आणि लष्कर हे पुण्याचे दोन भाग म्हणजे दोन स्वतंत्र 'राष्ट्रे' आहेत. दोघांचे आचार निराळे, विचार निराळे आणि संस्कृतीही निराळी.

गाव आणि लष्कर ह्यांच्या सरहद्दीवर 'कँप एज्युकेशन सोसायटी'ची शाळा बांधलेली असल्याने दोन परस्परविरोधी संस्कृतींच्या संगमाचे अत्यंत बकाली आणि गलिच्छ स्वरूप त्या ठिकाणी आढळून येते. दोन नद्यांचा संगम जेथे होतो, तेथे विस्तीर्ण जलाशय निर्माण होतो; तर दोन संस्कृतींची गाठ जेथे पडते, तेथे दोन्ही संस्कृतींमधल्या सर्व अनिष्ट गोष्टींचा प्रचंड उकिरडा माजतो. ह्या सीमाविभागाला 'चार बावडी' असे नाव आहे. महादजी शिंद्यांनी आपल्या लष्करातल्या घोड्यांना पाणी पिण्यासाठी चार विहिरी इथे बांधल्या होत्या, असे म्हणतात. त्या विहिरी बुजून गेल्या; पण त्यांची कीर्ती अजून शिल्लक आहे. तथापि 'चार बावडी'पेक्षा 'चोर-बावडी' हे नाव ह्या विभागाला विशेष शोभून दिसेल. कारण गावातील अन् लष्करातील उपद्व्यापी अन् उडाणटप्पू लोकांचा अनेक वर्षांपासूनचा हा चव्हाटा होऊन बसला होता. त्यात 'बाबाजान' नावाच्या एका वृद्ध स्त्रीने आपल्या वास्तव्यासाठी ही जागा निवडल्यापासून तर सांजसकाळ तिच्या दर्शनासाठी येणाऱ्या हिंदुमुसलमान भक्तांची त्या ठिकाणी यात्राच भरत असे.

बाजाच्या पेटीच्या भसाड्या सुरावर तारस्वरामध्ये गजल अन् कवाल्या किंचाळत कोणी ना कोणी तरी गायक-गायिका बाबाजानसमोर हमेश बसलेल्या असत. तिच्या पाठीमागे असलेल्या मोकळ्या मैदानात एका बाजूला फकीर, बैरागी, भिकारी अन् महारोगी हे कायमचा तळ ठोकून असत, तर दुसऱ्या बाजूच्या उघड्या जागेत नाना तऱ्हेचे नमुनेदार उद्योग चालत. न्हावी लोक सदैव कोणा ना कोणाची तरी डोकी ताशीत बसलेले असत. पठाण लोक 'लोखंडी गोळा' फेकून शक्तीच्या शर्यती खेळत असत. 'बुड्ढीके बाल' सुकविण्याचा कारखाना तर नेहमीच कोपऱ्यात उघडलेला असे. नाही तर लोखंडी सळयांवर गरम गरम कबाब भाजण्याचे काम दुसरीकडे सदोदित चाललेले दिसे. गारोड्याचा किंवा डोंबाऱ्याचा खेळ तिथे चाललेला नाही, असा तर एक दिवस जात नसे. कधी कधी चमत्कारिक औषधांचे जाहिरातवाले विचित्र पोषाख करून तेथे अशी प्रचंड गर्दी जमवीत की, काही विचारू नका. मोहरमच्या दिवसांत 'वाघ' रंगवण्याचे काम दिवसभर तेथे चाले आणि रात्री हे

'वाघ' बेहोष होऊन परत आले, म्हणजे त्यांना धुऊन शुद्धीवर आणण्याची व्यवस्था तेथेच होई.

चारबावडीचे हे एवढे तपशीलवार वर्णन करण्याचे कारण असे की, असल्या भयानक चव्हाट्यावर 'कँप एज्युकेशन सोसायटी'चे वास्तव्य असल्याने तिच्या अस्तित्वावर आणि कार्यावर 'चारबावडी संस्कृती'ची हिडीस सावली पडलेली होती. त्यामुळे त्या शाळेत मुलांची शिस्त राखणे आणि त्यांना शिक्षण देणे या गोष्टी सर्वस्वी अशक्य होऊन बसल्या होत्या. चारबावडीच्या मैदानात सदैव ठाण मांडून बसलेले फकीर, भिकारी, महारोगी अन् मवाली ह्यांना 'कँप एज्युकेशन सोसायटी'संबंधी विलक्षण आत्मीयत्व वाटत असे. बाहेर मुलांना ड्रिल शिकवायला नेले की, ते पाहायला सर्वांच्या आधी ह्या मंडळींची गर्दी जमे. एवढेच नव्हे तर ड्रिलमास्तरला मधून मधून ते सूचनाही देत. वर्गात शिक्षक एखादा धडा शिकवू लागला की बाहेर उभे राहून ही मंडळी मोठमोठ्याने त्याचे कौतुक करीत आणि शाळा बंद झाली रे झाली की, चारबावडीचे हे भयंकर रहिवासी तिच्या प्रशस्त व्हरांड्यात सायंकाळी सात वाजल्यापासून तो दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजेपर्यंत आपली रकटी, चिंध्या, मडकी, थाळ्या, नरोट्या अन् झोळ्या घेऊन राजरोसपणे मुक्काम ठोकीत. मग रात्री त्यांचे स्वयंपाकपाणी, खाणेपिणे आणि इतर शारीरिक विधी आरामशीरपणे शाळेच्या व्हरांड्यात नाही तर अंगणात चालत.

शाळेची सूत्रे हाती घेतल्यानंतर 'चारबावडी संस्कृती'चे तिजवर प्रत्यही होणारे हे भीषण आक्रमण कसे थांबवावे, ह्याचा मी विचार करू लागलो. पहिल्या प्रथम दोन रामोशी रात्रीचे राखणदार ठेवले आणि रोज रात्रौ शाळेच्या व्हरांड्यात घुसणारा भिकाऱ्यांचा नि मवाल्यांच्या गलिच्छ लोंढा आधी थांबवला. त्यांनी राखणदाराशी दंगा करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याच्या मदतीला काही दिवस पोलिस आणून ठेवावे लागले. काही महिन्यांनी जेव्हा काटेरी तारांचे पक्के कंपाऊंडच मी उभारले, तेव्हा तो उपसर्ग कायमचा थांबला. ही शाळा इंग्रजी पाचवी इयत्तेपर्यंतच असली, तरी विद्यार्थी वयाने प्रौढ आणि शरीरांनी उंचेपुरे नि मजबूत असत. ते शिक्षकांना मुळीच जुमानीत नसत. सायकलवर बसून व्हरांड्यातून खुशाल फेऱ्या घालीत. वर्गातून वाटेल तेव्हा बाहेर येत. बाहेर गारोड्याचा किंवा डोंबाऱ्याचा खेळ चालू झाला की अर्धी शाळा ओस पडे. मधल्या सुट्टीत कित्येक विद्यार्थी बाहेर जाऊन विड्या ओढीत, नाही तर जुगार खेळत. रेसचा दिवस असला की पुष्कळशी मुले शाळेत येत नसत. काही रेसग्राउंडवर कामे करून पैसे मिळवीत, तर काही सबंध दिवसभर रेस पाहात उभी राहात. मला तर आरंभी आपण एखाद्या 'गुन्हेगार मुलांच्या शाळे'त (Reformatory) आलो आहोत की काय, असेच वाटे.

आफ्रिकेच्या जंगलात जाऊन तेथल्या रानटी टोळ्यांना सुधारणाऱ्या मिशनऱ्या-

पेक्षाही माझे काम अवघड होते. मी मनाशी विचार केला की, आता येथे पड खाऊन किंवा मऊपणाने वागून काही भागायचे नाही. हातात दंडा घेऊन चांगला रौद्र अवतार दाखविला, तरच उपयोग होईल. एक दिवस सकाळी अकरा वाजता पहिली घंटा व्हायच्या सुमारास वेताची लांबलचक अन् जाडजूड छडी घेऊन मी व्हरांड्यात फिरू लागलो. माझ्या हातातले ते तेजस्वी आयुध बघून अर्ध्या अधिक पोरांची गाळण उडाली. छडी घेऊन शाळेतून हिंडणारा असा शिक्षक आजपर्यंत त्यांनी कधी पाहिलाच नव्हता; पण जी प्रौढ वयाची अन् बनलेली मुले होती, त्यांनी माझ्या हातातल्या छडीची मुळी दखलच घेतली नाही. त्यांचे नेहमीचे उद्योग चालूच होते. माझ्या छडीला जणू काही त्यांनी आव्हानच दिले. तथापि, पहिल्या दिवशी छडीचा उपयोग मी केलाच नाही. दुसऱ्या दिवसापासून मात्र माझ्या छडीचे सत्र मी निर्दय-पणे सुरू केले. उशिरा येणाऱ्या, वाटेल तेव्हा बाहेर जाणाऱ्या, वर्गात शिवीगाळ अन् दंगा करणाऱ्या एकूण एक दंगेखोरांना दयामाया न दाखविता सर्रास झोडपून काढले. कुठल्याही बारीकसारीक गुन्ह्याला क्षमा म्हणून करायची नाही, असे मी धोरण ठेवले. पाचवीच्या वर्गात दोन-तीन ' दादा ' होते. उंचीने नि अंगाने ते माझ्याएवढेच होते. त्यांनी हात पुढे करण्याचे साफ नाकारले, तेव्हा छडी खाली टाकून एकेकाच्या मुस्कटात अशी काही भडकावली की, ती त्यांच्या गालांना नि माझ्या हातालाच माहीत.

सात दिवसांच्या आत मी सारी शाळा सुतासारखी सरळ आणली. ' कँप एज्युकेशन सोसायटी 'त कोणी तरी एक ' भयंकर ' हेडमास्तर आल्याची बातमी वणव्यासारखी साऱ्या लष्करात पसरली. कित्येक पालकांनी शाळेत येऊन माझे अभिनंदन केले, तर कित्येकांनी शाळेचे सेक्रेटरी बाळासाहेब म्हस्के ह्यांच्याकडे माझ्याविरुद्ध तक्रारी केल्या; पण त्याच दिवशी खुद्द म्हस्क्यांच्या दोन मुलांना मी बडवून काढले होते, त्यामुळे तेच आपल्या दिवाणखान्यात थरथर कापत बसले होते. त्यांची शाळेत येऊन मला विचारण्याची छातीच नव्हती. शाळेतल्या वातावरणात एकदम जमीनअस्मानाचा फरक झालेला कोणाच्याही सकृद्दर्शनी लक्षात येण्यासारखा होता. त्यामुळे माझे ' मारके ' धोरण कोणाला कितीही नापसंत असले, तरी त्याचा उघडपणे ते निषेध करू शकत नव्हते. मुलांनाही मनातून शिस्तीची आवड असते. स्वभावतःच काही ती दुर्वर्तनी नसतात. शाळेच्या वातावरणात भराभर फरक पडत चालला आहे, हे जसे त्यांच्या लक्षात आले, तसे आपण होऊनच त्यांनी माझ्याशी सहकार्य करावयाला सुरुवात केली. मग पुढे छडी वापरण्याचे कधी कारणच उरले नाही. मी शाळेच्या व्हरांड्यात नुसता उभा राहिलो, तरी सर्व वर्ग शांतपणे आपापली कामे करू लागत. माझ्या प्रखर व्यक्तिमत्त्वाचा हा लौकिक प्रारंभीच जो एकदा प्रस्थापित झाला, तो अठरा वर्षे मी शाळेत असेपर्यंत कायम होता.

आधुनिक शिक्षणशास्त्रात छडीचा किंवा शारीरिक शिक्षेचा उपयोग सर्रास निषिद्ध मानलेला आहे. 'नव्या शिस्ती'ची उभारणी प्रेमाच्या पायावर करण्यात आली आहे. तथापि, कोणत्या मुलांच्या बाबतीत कोणत्या साधनांचा उपयोग करावा, हे त्यांच्या मानसिक आणि सांस्कृतिक पातळीवर अवलंबून आहे. त्या बाबतीत कोणताही एखादा ठोकळेबाज नियम घालून ठेवता येत नाही. सद्धेतूने केलेल्या शारीरिक शिक्षेच्या यातना मुलांना होत नाहीत. मुलांना शिक्षकांबद्दल प्रेम वाटावे अन् त्याचा धाकही पण वाटावा, अशा मताचा मी आहे. अर्थात कॅंप एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत प्रारंभी शिस्त प्रस्थापित करण्यासाठी जो अघोरी उपाय मी योजला त्याचे मूल्यमापन त्या वेळची तेथली अपवादात्मक परिस्थिती लक्षात घेऊनच केले पाहिजे. त्यातून 'तात्पर्य' काढण्याचे किंवा त्यावर 'शेरा' मारण्याचे आता कारण नाही.

एवढ्यात वार्षिक परीक्षा संपल्या आणि नवे वर्ष सुरू झाले. त्या वेळी एप्रिल महिन्यात शाळांचे वर्ष सुरू होत असे. मी शाळेचे संपूर्ण हायस्कुलात रूपांतर करावयाचे ठरविले आणि त्याप्रमाणे वर्तमानपत्रांत जाहीर केले. सहावी सातवीच्या वर्गात पोरांचा असा काही लोंढा आला की विचारू नका. लष्करातली कित्येक मुले गावातल्या शाळेत जात होती. ही शाळा सुधारल्याचे त्यांना कळल्यावर त्यांचाही ओघ इकडेच वळला. मुलींनाही प्रवेश द्यावयाचे मी ठरविले. एका महिन्यात मुलांची संख्या शंभर सव्वाशेवरून तीनशेपर्यंत चढत गेली. सुसंस्कृत आणि संपन्न कुटुंबातील मुलांचे प्रमाणही वाढले. आणि व्यवस्थित पोषाख केलेले विद्यार्थी टापटिपीने शाळेत येताना दिसू लागले. त्यामुळे शाळेचा पूर्वीचा चेहरा आणि मोहरा संपूर्णपणे बदलून गेला. शाळेच्या ह्या नवीन रूपांतरात जुन्या शिक्षकांचा फार मोठा अडथळा होऊ लागला. त्यांना कसे काढावयाचे ? बहुतेक सारी बाळासाहेब म्हस्के ह्यांच्या वशिल्याची तट्टे होती. त्यांतले काही शिक्षक तर असे नमुनेदार होते म्हणता !

एक शिक्षक वर्गात भूगोल शिकवीत होते. ते म्हणाले, "मुलांनो, दिशा दोन प्रकारच्या असतात. एक जमिनीवरच्या आणि दुसऱ्या नकाशातल्या. जमिनीवर सूर्याकडे तोंड करून उभे राहिलो तर 'जेवत्या हाता'ला दक्षिण अन् 'धुत्या' हाताला उत्तर; पण नकाशामध्ये डोक्याकडे उत्तर अन् पायाकडे दक्षिण. अशी गंमत आहे !" मी त्या मास्तरांना ती 'गंमत' ताबडतोब बंद करावयाला सांगितले. एक शिक्षक इतिहास शिकवीत होते. त्यांनी मुलांना विचारले, 'मुलांनो, आर्य लोक हिंदुस्थानात प्रथम किती आले ?" एका मुलाने सांगितले, "एक लक्ष तेरा हजार पाचशे एकवीस." शिक्षक ओरडले, "चूक !" दुसरा मुलगा म्हणाला, "एक लक्ष तेरा हजार पाचशे एकोणीस !" पुन्हा शिक्षक ओरडले, "चूक." कोणाही मुलाला बरोबर उत्तर देता येईना. तेव्हा शिक्षक म्हणाले, "आता मी सांगतो. एक लक्ष तेरा

हजार पाचशे वीस !" मी त्या शिक्षकांना म्हणालो, "मास्तर, एखादा 'आर्य' कमी जास्ती झाला, तर तुम्हाला आपला स्वतःचाच पूर्वज वगळल्यासारखे किंवा विनाकारण वाढल्यासारखे का वाटावे? अहो, पाचशे वीस काय किंवा एकोणीस काय?" शिक्षक म्हणाले, "छे, छे! तसे कसे चालेल? पुस्तकात जो आकडा दिला आहे, त्यात कमी जास्त करण्याचा कोणालाही अधिकार नाही!"

दुसरे एक मराठी शिक्षक वर्गात मुलांना वाटेल त्या बीभत्स शिव्या द्यायचे. त्यांचे उच्चार कुणबाऊ असत. एक दिवस एक 'कामाठी' पालक डोळे लाल करून रागारागाने आपल्या मुलासह माझ्या ऑफिसात आला अन् म्हणाला, "हे पाहा सर, तुमचा तो कोण मास्तर आहे, त्याला तुम्ही ताकीद द्या अं! त्याने माझ्या ह्या मुलाला काल फार वाईट शिवी दिली." मी त्या मास्तरांना ताबडतोब बोलावून आणले अन् विचारले, "काय हो मास्तर, तुम्ही म्हणे वर्गात वाईटसाईट शिव्या देता!" फारच भयंकर आरोप आपल्यावर झाला, असा दुःखी चेहरा करून ते मास्तर म्हणाले, "म्या? अन् श्या देतो? कोणता साला—" "हां हां मास्तर!" मी त्यांना लागलीच थोपवून धरले, "अहो, हे पालकच प्रत्यक्ष सांगताहेत की त्यांच्या ह्या मुलाला काल तुम्ही शिव्या दिल्या!" मास्तराने डोळे गरगर फिरवीत एकदम त्या पोराची मानगुटी पकडली अन् त्याला विचारले, "काय रं! काय श्या तुला काल दिल्या रं मी भडविच्या!" त्याबरोबर ताडकन् पालकाने मास्तरांचा गळा पकडला. त्यांची ती मारामारी सोडवता सोडवता अशी फजिती उडाली म्हणता माझी. शाळेचे एक कारकूनही त्या शिक्षकासारखे विचित्र होते. मराठी शाळेतून इंग्रजी शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मराठी आडनावांची त्यांनी सरसहा इंग्रजीत भाषांतरे करून टाकली. बाबू कृष्णा तेलीचा 'बाबू कृष्णा ऑइलमन', महादेव भिकोबा सोनाराचा 'महादेव भिकोबा गोल्डस्मिथ' अन् विष्णु शिवराम न्हाव्याचा 'विष्णु शिवराम बार्बर!' कॅटलॉग तपासताना ऑइलमन, गोल्डस्मिथ अन् बार्बर ही आडनावे बघून मी थबकलोच. कारकुनांना मी विचारले, "काय हो, ही काय भानगड आहे?" कारकून अदबीने हसून म्हणाले, "मीच ती आडनावे बदलली आहेत. हल्ली शाळेत सर्व दृष्टीनेच सुधारणा होऊ लागली आहे, तेव्हा मला वाटले की तिला आपणही थोडासा हातभार लावावा!" त्यांचा तो खुलासा ऐकून मला हसावे का रडावे, तेच कळेना.

सर्व शिक्षकांची मी सभा घेतली अन् माझ्या काय अपेक्षा आहेत, त्या मी त्यांना समजावून सांगितल्या. त्याबरोबर कित्येक जुने शिक्षक आपण होऊन निघून गेले. ह्या वातावरणात आपला निभाव लागायचा नाही, हे त्यांच्या लक्षात येऊन चुकले. कित्येक शिक्षकांना मी माझ्या अखत्यारात जावयाला सांगितले. एक शिक्षक स्वभावाने फार सज्जन होते; पण शिकवता म्हणून त्यांना येत नव्हते. त्यांना कसे

काढावे ह्या विवंचनेत मी होतो. इतक्यात त्यांचे वडील वारल्याची तार त्यांना गावाहून आली. तेव्हा ते मला म्हणाले, "माझे वडील वारलेत. तेव्हा आता मला नोकरी सोडून गावी गेलेच पाहिजे. तिकडे पाहायला कुणी नाही!" मी मनात म्हणालो, "देवच पावला!" कदाचित हे शिक्षक आपला बेत पुन्हा बदलतील म्हणून त्याच दिवशी त्यांना निरोप देण्यासाठी मी घाईघाईने शिक्षकांची सभा घेतली. सभेत साहजिकच त्या शिक्षकांच्या गुणांची वाजवीपेक्षा जास्त प्रशंसा झाली, अन् 'असे शिक्षक आज आपल्याला सोडून जात आहेत, ही फार खेदाची गोष्ट आहे' असे औपचारिक उद्गार प्रत्येक वक्त्याने काढले. त्याचा त्या शिक्षकाच्या मनावर भलताच परिणाम झाला. उत्तर देताना ते गहिवरून म्हणाले, "आपल्या सर्वांचे माझ्यावर एवढे प्रेम असेल ह्याची काही मला कल्पना नव्हती. मी जाणार ह्याबद्दल आपणाला जे दुःख होत आहे, ते पाहून मी आता अशी प्रतिज्ञा करतो की, ह्या जन्मात मी ह्या शाळेची नोकरी कधीच सोडणार नाही!" ती त्यांची प्रतिज्ञा ऐकून मी बसल्या जागेवरच दोन फूट उडालो. मग पुढे त्यांच्याशी खुबीचा युक्तिवाद करून त्यांना मी ती प्रतिज्ञा मागे घ्यावयाला लावले, तेव्हा ते नोकरी सोडून गावी गेले.

नवीन शिक्षकांच्या जागेवर मी लायक, उत्साही आणि तरुण माणसांच्या नेमणुकी केल्या. शाळेत ह्या सर्व घडामोडी ज्या चालल्या होत्या, त्या मी माझ्या अखत्यारात चालवलेल्या होत्या. त्यामध्ये काही शिक्षकमंडळींचे मला साहाय्य होते. संस्थेचे चिटणीस बाळासाहेब म्हस्के ह्यांना आम्ही कळवण्यापलीकडे काहीच विचारीत नव्हतो. त्यामुळे ते मनातल्या मनात खूप चडफडत. आपल्या आवाक्याबाहेर शाळा जाते आहे, हे त्यांच्या लक्षात येऊन चुकले; पण ते काही आम्हाला बोलू शकत नव्हते. संस्थेच्या 'शासक मंडळा'ला त्यांनी आजपर्यंत जसे धाब्यावर बसविले होते, तसे आम्ही आता त्यांना गुंडाळून ठेवीत होतो. रोज संध्याकाळी ते शाळेत फेरी मारीत, अन् तपकिरीचा बार नाकात भरीत भरीत मला म्हणत, "मास्तर, जरा बेताने चालू द्या. एकदम फार सुधारणा होते आहे, मध्येच कुठे तरी कोसळायचे!" मी त्यांना म्हणे, "तुम्ही त्याची काळजी करू नका. आम्ही तुमच्याकडे पैसे मागावयाला तर येत नाही ना?"

शाळेचे उत्पन्न जसे वाढू लागले, तसा तिचा खर्चही पण वाढू लागला. नवीन बाके, टेबले, खुर्च्या, कपाटे, पुस्तके, नकाशे, शास्त्रीय उपकरणे ह्यांना कमी का पैसा लागतो? मॅट्रिकच्या वर्गाला शिक्षणखात्याची अन् विश्वविद्यालयाची मान्यता मिळविण्यासाठी हे सर्व नवीन साहित्य विकत घेणे आवश्यकच होते. तेव्हा ह्यासाठी पैसा कोठून आणावयाचा? म्हणून संस्थेसाठी फंड गोळा करावयाला मी, माझे चुलते अन् संस्थेचे एक उत्साही सभासद श्री. ल. म. सत्तूर असे तिघेजण आम्ही बाहेर हिंडू

लागलो. मागासलेल्या आणि अस्पृश्य वर्गाच्या मुलांना शिक्षण देण्याचे आमचे कार्य असल्याने, त्यासाठी जनतेची मदत मागण्यात आम्हांला कोणताही कमीपणा वाटत नव्हता. पुण्या-मुंबईच्या धनिकांनी आम्हाला सढळ हातांनी मदत केली; पण सगळ्यांत 'वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब'ने आम्हाला आर्थिक साहाय्य करण्यात आघाडी मारली. आपल्या उत्पन्नातला काही ठराविक हिस्सा सार्वजनिक संस्थांना देण्याचा 'क्लब'चा शिरस्ता होता. त्याच्या नियंत्रणमंडळात मोठमोठे गोरे लष्करी अधिकारी असत. त्यांना जाऊन आम्ही पटवून दिले की, पहिल्या महायुद्धात लढलेल्या कित्येक हिंदी सैनिकांच्या मुलांना आमची शाळा फुकट शिक्षण देते. ह्या गोष्टीचा त्यांच्या मनावर विशेष परिणाम झाला अन् त्यानंतर एके दिवशी 'टर्फ क्लब'कडून देणगीदाखल आम्हाला दहा हजार रुपयांचा चेक आला. संस्थेच्या तीस वर्षांच्या हयातीत एवढी मोठी देणगी तिला कोणी दिली नव्हती. बाळासाहेब म्हस्के ह्यांना तो चेक बघून तर फेफरेच आले. दोन दिवस तो चेक ते आपल्या बाराबंदीत ठेवून होते.

ह्या देणगीमुळे आमच्या अंगात भलतेच स्फुरण चढले. शाळेत विद्यार्थी-जीवनाच्या सर्व आघाड्या मी धडाडीने सुरू केल्या. क्रिकेटच्या आणि हॉकीच्या सामन्यांत तर पहिल्याच वर्षी शाळेने चांगलेच नाव कमावले. स्काउटिंगचे ट्रेनिंग मी स्वतः घेऊन आलो आणि शाळेत बालवीरपथक सुरू केले. निरनिराळ्या वर्गांच्या मुलांना मी सहलीला घेऊन जात असे. मुंबईच्या 'भर्डा न्यू हायस्कूल'मध्ये मी ज्या ज्या गोष्टी शिकलो होतो, त्यांचे 'कँप एज्युकेशन सोसायटी'मध्ये मी सहीसही अनुकरण केले. त्यामुळे मॅट्रिकच्या वर्गांना सरकारी आणि विश्वविद्यालयाची मान्यता मिळण्यास आम्हाला मुळीच अडचण पडली नाही. अशा रीतीने 'सोसायटी'त पाऊल टाकल्यापासून एका वर्षाच्या आत तिला शहरातील इतर सन्मान्य संस्थां-प्रमाणे संपूर्ण हायस्कूलची प्रतिष्ठा मी प्राप्त करून दिली. त्या वर्षीचे विद्यार्थ्यांचे स्नेह-संमेलन तर असे थाटात झाले म्हणता! विद्यार्थ्यांसाठी 'प्रल्हाद' हे स्त्रीपात्रविरहित नाटक मी लिहिले. त्याचा साग्रसंगीत प्रयोग त्यांनी 'बाटलीवाला थिएटर'मध्ये करून दाखवला. तो पाहावयाला सारे लष्कर लोटले होते.

'सोसायटी'च्या शाळेला लष्करातले लोक पूर्वी 'म्हस्क्यांची शाळा' असे म्हणत. तिचा उल्लेख ते जेव्हा 'अत्र्यांची शाळा' असा करू लागले, तेव्हा बाळासाहेब म्हस्क्यांच्या तळपायाची आग साहजिकच त्यांच्या मस्तकामध्ये जाऊ लागली. कानामागून येऊन शिरजोर होणारी माझ्यासारखी माणसे त्यांना नको होती. त्यांनी मला आणि माझ्या सहकाऱ्यांना एकदम काढून टाकण्याचे कारस्थान रचले. संस्थेच्या प्रशासकमंडळाची सभा त्यांनी वर्षानुवर्षे भरवली नव्हती, ती त्यांनी या वर्षी भरविण्याचे ठरविले. प्रशासकमंडळातील सर्व सभासद त्यांच्या चांगल्याच परिचयाचे होते. त्यांना त्यांनी प्रत्यक्ष भेटून आमच्याविरुद्ध काय काय सांगितले

असावे, कोणास ठाऊक ! प्रशासकमंडळ सर्वस्वी बाळासाहेब म्हस्कयांच्या बाजूचे होते. त्यामध्ये मला किंवा माझ्या सहकाऱ्यांना ओळखणारे कोणीच नव्हते. तेव्हा आमच्याविरुद्ध बाळासाहेबांनी प्रशासकमंडळापुढे जशी आपली बाजू मांडली, तशी त्यांच्यापुढे आमची कैफियत मांडणारे किंवा आमचा कैवार घेणारे तेथे कोणीही नव्हते. संस्थेसाठी वर्षभर आम्ही जेव्हा हाडांची काडे करीत होतो, त्या वेळी आपल्या सुरक्षिततेची ह्या संस्थेमध्ये काय हमी आहे, ह्याचा चुकूनदेखील आम्ही विचार केला नव्हता. या संकटाला कसे तोंड द्यावयाचे ?

प्रशासकमंडळात आपले बहुमत केल्यावाचून आपला बचाव होणे अशक्य आहे, हे आम्हाला कळून चुकले, तेव्हा त्या उद्योगाला आम्ही लागलो. संस्था स्थापन झाली, त्या वेळी ती कंपनीच्या कायद्याखाली रजिस्टर्ड झाली होती; पण तिच्या घटनेचे नियम संस्थेच्या दप्तरी नव्हते. बाळासाहेब म्हस्कयांनासुद्धा ते माहीत नव्हते. तेव्हा ती नियमावली आम्ही ' रजिस्ट्रार ऑफ द कंपनीज 'च्या ऑफिसातून मुंबईहून मागवून घेतली. संस्थेला वर्षाचे पाच रुपये देणारा हा तिचा साधारण सभासद होतो आणि अशा सर्वसाधारण सभासदांची वार्षिक सभा भरून, तिच्यात ' प्रशासकमंडळा 'ची निवड होत जावी, असा संस्थेच्या घटनेत स्पष्ट नियम होता. तो वाचल्यावर आमचा मार्ग आम्हाला एकदम स्पष्ट दिसू लागला. आम्ही पाच पाच रुपये देणारे शे-दीडशे ' साधारण सभासद ' एकदम नोंदवून घेतले. आमच्याबरोबर फंड गोळा करण्याचे काम उत्साहाने करणारे जे ल. म. सत्तूर नावाचे गृहस्थ होते, ते संस्थेचे दुय्यम चिटणीस होते. संस्थेचे सर्व दप्तर आमच्याच ताब्यात होते, आम्ही केलेल्या नव्या साधारण सभासदांना सत्तुरांच्या सह्यांच्या छापील पावत्याही देऊन टाकल्या अन् ज्या दिवशी बाळासाहेब म्हस्कयांनी संस्थेच्या प्रशासकमंडळाची सभा शाळेच्या इमारतीत बोलावली होती, त्याच दिवशी, त्याच वेळी अन् तिथेच सत्तुरांच्या सहीने आम्ही संस्थेची ' वार्षिक साधारण सभा ' बोलावून ठेविली. ह्या आमच्या सभेचा बाळासाहेबांना काहीच सुगावा नव्हता.

ठरलेल्या दिवशी सकाळी नऊ वाजता प्रशासकमंडळाच्या दहा बारा सभासदांना एका जुटीने घेऊन बाळासाहेब शाळेत आले. पाहतात तो शाळेच्या हॉलमध्ये दीड दोनशे माणसे शांतपणे आपापल्या खुर्च्यांवर बसलेली आहेत. तो देखावा बघून बाळासाहेबांचे धाबे दणाणले. हा काय प्रकार आहे, हे प्रशासकमंडळाच्या सभासभासदांना कळेना. त्यांनी कोणाला तरी विचारले, " ही कसली सभा आहे ? " त्याने सांगितले, " ही संस्थेची ' वार्षिक साधारण सभा ' आहे. " तेव्हा बाळासाहेबांकडे वळून प्रशासकमंडळाचे सभासद म्हणाले, " काय हो, तुम्ही तर आम्हांला प्रशासकमंडळाची इथे सभा आहे म्हणून सांगितलेत, अन् इथं तर वार्षिक साधारण सभा दिसते आहे. ही काय भानगड आहे ? " बाळासाहेबांच्या लक्षात सगळा प्रकार

येऊन चुकला होता. त्यामुळे त्यांची बोबडीच वळली. ते त्यांना काय उत्तर देणार ? शेवटी त्या ठिकाणी भरलेली सभा ही ' वार्षिक साधारण सभा ' आहे का ' प्रशासकमंडळाची सभा ' आहे, ह्यासंबंधी वाद सुरू झाला. प्रारंभी दोघांतिघांची भाषणे झाल्यानंतर मी उठलो. मी म्हणालो, " आपण सर्व इथे वाद करीत आहात; पण संस्थेचे नियम काय आहेत हे तुम्हांला माहीत आहे काय ? नियम माहीत नसताना वाद कसचा करता ? "

प्रशासकमंडळाचे सभासद बाळासाहेब म्हस्क्यांना विचारू लागले, " नियम कुठे आहेत ? " बाळासाहेब म्हणाले, " तसे नियम काही नाहीत ! " तेव्हा नियमांच्या कागदांचे पुडके सभेला दाखवून मी ओरडलो, " संस्थेचे हे नियम माझ्याजवळ आहेत, ते पाहा. सरकारी शिक्का आहे त्यांच्यावर. बाळासाहेबांना काही एक माहिती नाही. "

चोवीस वर्षांचा माझ्यासारखा तरुण, बाळासाहेबांसारख्या ' अनुभवी ' माणसावर बेधडक आरोप करतो आहे, आणि तोही हातात लेखी पुरावा घेऊन, हे पाहून प्रशासकमंडळाचे वृद्ध सभासद चांगलेच हबकले. आमच्या बाजूच्या साधारण सभासदांनी टाळ्यांचा कडकडाट केला. मी पुढे म्हणालो, " संस्थेचे चिटणीस बाळासाहेब म्हस्के ह्यांना मी विचारतो की, ह्या प्रशासकमंडळाची निवड कुणी केली? कधी केली ? त्याच्या आतापर्यंत सभा किती झाल्या ? दरवर्षी साधारण सभा भरली पाहिजे अशी घटनेची आज्ञा आहे, ती तुम्ही इतक्या वर्षांत कधी पाळली आहे का ? मी तर असे म्हणतो की, सध्याचे हे ' प्रशासकमंडळ ' बेकायदेशीर आहे. साधारण सभासदांची आजच्या वार्षिक सभेत नव्या प्रशासकमंडळाची रीतसर निवड केली पाहिजे. " आम्ही जमवलेली मंडळी माझ्या प्रत्येक वाक्याला टाळ्या वाजवत होती. त्यामुळे बाळासाहेबांच्या पक्षपात्यांची तोंडे एकदम उतरून गेली. त्यानंतर संस्थेचे ' साधारण सभासद ' कोण हा प्रश्न निघाला. साधारण सभासदांचे पुस्तक आमच्याजवळ होते. आम्ही केलेल्या सर्व सभासदांची त्यांत रीतसर नावे नोंदलेली होती. ' प्रशासकमंडळा 'च्या सभासदांनी तर कित्येक वर्षांत आपली वर्गणीही दिली नव्हती. त्यामुळे त्यांचे चेहरे पाहण्यासारखे झाले. बाळासाहेबांनी आपल्याला भलत्या संकटात टाकले म्हणून ते त्यांच्यावर खूपच उखडले. शेवटी ही सभा ' वार्षिक साधारण सभा आहे की प्रशासकमंडळाची सभा आहे ' हा प्रश्न मतासाठी सभेपुढे टाकला. तेव्हा दीडशे हातांनी ' ती वार्षिक साधारण सभा ' आहे असा ठणठणीत निर्णय दिला. त्याबरोबर बाळासाहेब आणि त्यांचे मित्र मुकाट्याने उठून त्या सभेतून चालते झाले.

ते गेल्यावर सर्व रान आम्हाला मोकळेच झाले. वार्षिक साधारण सभेची बैठक भरवून आम्ही प्रशासकमंडळाची अन् कार्यकारी मंडळाची रीतसर निवड केली.

सर्व मंडळांत आमचीच माणसे आम्ही भरली. कार्यकारी मंडळात माझा आणि माझे सहकारी शिक्षक ह्यांचा समावेश करण्यात आला. अशा रीतीने चौतीस वर्षांनंतर 'कँप एज्युकेशन सोसायटी'ची सूत्रे रिकामटेकड्या ऐदी धनिकांच्या हातून निघून श्रमजीवी शिक्षकांच्या हातामध्ये आली. संस्थेच्या इतिहासातली ही सर्वांत मोठी क्रांती होय. शाळेचा ताबा आमच्या हातात होता, म्हणूनच ही क्रांती होऊ शकली. 'कँप एज्युकेशन सोसायटी' ही बाळासाहेब म्हस्के ह्यांचे जणू काही खाजगी वतन होऊन बसली होती. तेथून त्यांना हलवणे ही जवळजवळ अशक्य कोटीतली गोष्ट होती. असे असता आम्ही त्यांना हुसकून देऊन त्यांचा तो बालेकिल्ला ताब्यात घेतला, हे बघून लष्करातील नागरिकांना आश्चर्याचा प्रचंड धक्का बसला! पुण्याच्या डिस्ट्रिक्ट कोर्टात बाळासाहेबांनी आणि त्यांच्या मित्रांनी आम्ही निवडलेल्या प्रशासक-मंडळाविरुद्ध दिवाणी दावा दाखल केला. ह्या दाव्याचा पुढे दहा वर्षांनी निकाल लागला. तोपर्यंत स्वतः बाळासाहेब आणि वादी यांपैकी निम्मी मंडळी मरण पावलेली होती. दाव्याचा निकाल आमच्याच बाजूने लागला हे सांगायला नको.

संस्था आमच्या हाती आल्यानंतर आम्ही निर्धास्त झालो. इतर स्थानिक शिक्षण-संस्थांप्रमाणे अंतर्गत कारभाराची आम्ही पद्धतशीर व्यवस्था करून टाकली. मी आणि तीन-चार पदवीधर मिळून आम्ही संस्थेचे 'आजन्म सेवक' झालो. महिना शंभर रुपये पगारावर वीस वर्षे आम्ही संस्थेची सेवा करावी असे ठरले. जे बिन-पदवीधर शिक्षक होते, त्यांच्यासाठी 'आजन्म शिक्षकां'ची वेतनश्रेणी निर्माण करण्यात आली. ते सबंध वर्ष शाळेची शिस्त आणि व्यवस्था मजबूत करण्यात गेले. तथापि, शिक्षणाच्या दृष्टीने नवीन असे काहीच आम्ही करू शकलो नाही. कारण अध्यापनाच्या कलेची आणि पद्धतीची आमच्यापैकी कोणालाच माहिती नव्हती. वार्षिक तपासणीसाठी मध्यभागाचे त्या वेळचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर श्री. कृष्णराव पुंडलिक हे आले. ते मला म्हणाले, "तुम्ही फार उत्साही आणि हुषार दिसता; पण तुमच्या शिक्षणाच्या पद्धती फार जुन्या आहेत. तुमच्यासारख्यांनी आधुनिक शिक्षण-शास्त्राचा आणि अध्यापनपद्धतीचा अभ्यास करायला हवा." त्यांचे ते बोलणे माझ्या मनाला फार लागून राहिले.

मुंबई युनिव्हर्सिटीने शिक्षणशास्त्राची बी. टी. ची पदवी काढून त्या वेळी दोनच वर्षे झाली होती. तथापि, या पदवीचे शिक्षण देणाऱ्या मुंबईच्या सरकारी 'सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज' मध्ये खाजगी शाळांतील शिक्षकांना प्रवेश नसे; पण त्याच वर्षी खाजगी शाळांतल्या नऊ शिक्षकांना शिक्षणखात्याने त्या कॉलेजात घ्यावयाचे ठरविले. इन्स्पेक्टर पुंडलिक बोलायला आणि हे घडावयाला एकच गाठ पडली. ट्रेनिंग कॉलेजच्या प्रवेशासाठी शिक्षणखात्याकडे मी लागलाच अर्ज टाकून दिला. माझा अर्ज मान्य झाल्याचे महिन्यात उत्तर आले. चोवीस सालच्या जून महिन्यात

मी मुंबईच्या ट्रेनिंग कॉलेजात येऊन दाखल झालो. कॉलेजच्या वसतिगृहात मला प्रवेश मिळाला. वसतिगृहात राहण्याची माझ्या आयुष्यातली ती पहिलीच वेळ होती. सुखदायक जीवनाच्या एका अभिनव सृष्टीत आपण शिरत आहोत असे वाटले. त्यात सरकारकडून महिना पन्नास रुपयांची मला शिष्यवृत्ती मिळाली, त्यामुळे माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. निश्चित मनाने आणि निर्धास्त चित्ताने मी माझ्या नव्या अभ्यासक्रमात रममाण झालो.

ट्रेनिंग कॉलेजच्या जीवनातही त्या वर्षी मोठी क्रांती झालेली होती. प्रिन्सिपलच्या जागेवर एका प्रतिभाशाली आणि बुद्धिमान शिक्षणशास्त्रज्ञाची नेमणूक झाली होती. त्यांचे नाव एच. आर. हॅमले. हे मूळचे ऑस्ट्रेलियन असून मुंबईच्या विल्सन कॉलेजात पुष्कळ वर्षांपासून विज्ञानाचे प्राध्यापक होते. पाश्चात्त्य देशांमध्ये शिक्षणाच्या कलेत आणि शास्त्रात फार मोठी प्रगती झालेली होती आणि 'नवशिक्षणा'च्या दुंदुभी तिथे वाजू लागल्या होत्या प्राणिशास्त्र आणि मानसशास्त्र ह्यांचा शैक्षणिक तत्त्वज्ञानावर आणि अध्यापनपद्धतीवर फार मोठा परिणाम झालेला होता. राजकारणात राजेशाही पदच्युत होऊन लोकशाहीचा जमाना जसा सुरू झाला होता, त्याप्रमाणे शालेय सृष्टीत शिक्षकांची एकछत्री राजवट संपुष्टात येऊन शिष्याने आपल्या हातात राजदंड धारण केला होता. मुलांच्या उपजत प्रवृत्तींचा, शारीरिक अन् बौद्धिक विकासाचा आणि ज्ञात नि अज्ञात मनाच्या व्यापारांचा सूक्ष्म अभ्यास करणे हे शिक्षकांचे महत्त्वाचे कर्तव्य होऊन बसले होते. शिक्षण हा एक समाईक व्यापार आहे. त्यात शिक्षक आणि शिष्य ह्यांची देवघेव व्हावयाला पाहिजे, ह्यावर 'नवशिक्षणा'चा विशेष कटाक्ष होता. शिक्षकाने ज्ञानदान केले म्हणजे मुलांनी ते ग्रहण केले, असे नव्हे. एखादी गोष्ट 'दिली' असे केव्हा म्हणता येईल? ती 'घेतली' जाईल तेव्हा. घेण्यावाचून देण्याची क्रिया अपूर्ण आहे. ( इंग्रजीत teach आणि learn ही स्वतंत्र क्रियापदे असल्याने दोघांची सांगड घालण्यावर विशेष जोर देण्यात आला. त्या दृष्टीने मराठीत 'शिकविणे' आणि 'शिकणे' ही क्रियापदे 'नवशिक्षणा'च्या कल्पनेशी अधिक सुसंगत आहेत. मुलांना 'शिकण्यास लावणे' म्हणजे 'शिकविणे' असा त्यातून अर्थ निघतो ).

शिक्षणाच्या क्रियेत शिक्षकाच्या शिकवण्यापेक्षा शिष्याच्या शिकण्याला जास्त महत्त्व आहे, हा 'नवशिक्षणा'चा संदेश होता. हा ऊर्जस्वल संदेश मुंबई इलाख्यात प्रिन्सिपल हॅमले ह्यांनी प्रथम उद्घोषित केला आणि येथल्या शैक्षणिक जीवनात नवचैतन्य निर्माण केले असे माझे स्पष्ट मत आहे. प्रिन्सिपल हॅमले, ह्यांच्या ह्या क्रांतिकार्यात त्यांना सहकारी पण तसेच सामर्थ्यवान मिळाले. त्यांचे नाव प्रा. आर. पी. कार. हे गृहस्थ बंगाली असून पूर्वी बऱ्हाणपूरच्या हायस्कूलचे हेडमास्तर होते. ते लंडनला जाऊन शिक्षणशास्त्रातला 'टीचर्स डिप्लोमा' ( टी. डी. ) घेऊन आले

होते. जगातले एक नामांकित शिक्षणशास्त्रज्ञ सर पर्सी नन हे त्या वेळी 'लंडन युनिव्हर्सिटी 'मध्ये होते. त्यांचा 'Education, its data and first principles' हा ग्रंथ 'नवशिक्षणाची गीता' म्हणून समजला जात असे. सर पर्सींच्या हाताखाली शिकण्याचे भाग्य प्रा. कार ह्यांना लाभले होते. 'नवशिक्षणा' संबंधाचा विलक्षण उत्साह आणि आवेश ते लंडनहून घेऊन आले होते.

प्रिन्सिपल हॅमले आणि प्राध्यापक कार ह्या दोघांच्या मार्गदर्शकत्वाखाली शिक्षण-शास्त्राचा अभ्यास करणे, ही त्या वेळी एक अतीव भाग्याची गोष्ट होती. त्यांच्या सान्निध्यात राहणाऱ्यांना शिक्षणाकडे पाहण्याची एक मौलिक आणि कलात्मक दृष्टी येत असे. प्रिन्सिपल हॅमले मुंबईच्या ट्रेनिंग कॉलेजात येण्यापूर्वी, त्या कॉलेजातले वातावरण अत्यंत रूक्ष, कंटाळवाणे आणि अनाकर्षक होते. शिक्षणाच्या मध्ययुगीन तत्त्वांचे आणि पुरातन पद्धतीचे पिष्टपेषण त्या ठिकाणी चाललेले असे. आयुष्यातील सर्व आनंदाला आणि नावीन्याला विटलेल्या, शिक्षणाच्या सामर्थ्याबद्दल कसलीही श्रद्धा आणि आशा नसलेल्या, सरकारी शिक्षणखात्यात नोकरी टिकविणे आणि पगारवाढ मिळविणे ह्यातच जीविताची इतिकर्तव्यता मानणाऱ्या बुढ्ढुक आणि खत्रुड शिक्षकांचा पांजरपोळ म्हणजे 'ट्रेनिंग कॉलेज' असे त्या वेळी समीकरण होऊन बसले होते. त्यामुळे शिक्षणशास्त्र ही जीर्ण कल्पनांवर उभारलेल्या सिद्धान्तांची आणि आप्तवाक्यांवर आधारलेल्या ठोकळेबाज नियमांची एक किचकट कथा होऊन बसलेली होती. इतिहासजमा झालेल्या ट्रेनिंग कॉलेजच्या भग्न आणि प्राचीन भिंताडा-वर 'नवशिक्षणा'चा झेंडा दिमाखाने फडकवण्याचे कार्य प्रिन्सिपल हॅमले आणि प्राध्यापक कार ह्यांनी केले. त्या झेंड्याखाली उभे राहण्याचे भाग्य ज्या 'नव-शिक्षकां'ना लाभले, त्यांमध्ये मला स्थान मिळाले—एवढेच नव्हे तर अग्रेसर स्थान मिळाले—हा माझ्या आयुष्यातला एक अभूतपूर्व योगच म्हटला पाहिजे.

ट्रेनिंग कॉलेजात आलेल्या शिक्षकांची संख्या चाळिसाच्या आतबाहेर होती; पण विद्यालयीन अभ्यासक्रमात असाधारण सन्मान मिळविणाऱ्या सरकारी शिक्षण-खात्यांतील प्राध्यापकांचा आणि अधिकाऱ्यांचा त्यांत विशेष भरणा होता. बहुतेक शिक्षक वयाने आणि अनुभवाने प्रौढ होते. गुणांनी, अनुभवाने आणि वयाने कनिष्ठ असे जे काही थोडे शिक्षक होते, त्यांच्यामध्येच माझा समावेश होण्यासारखा होता. त्यामुळे एकाहीपेक्षा एक बुद्धिमान अशा त्या सर्व सहाध्यायांपुढे आपला काय निभाव लागणार, ही भीती ट्रेनिंग कॉलेजात पाऊल टाकल्याबरोबर साहजिकच माझ्या मनात उत्पन्न झाली. माझ्या बौद्धिक सामर्थ्याबद्दल मला विशेष आदर नव्हता. कारण त्याने आपले अस्तित्व तोपर्यंत कधी प्रकटच केले नव्हते; पण 'कँप एज्युकेशन सोसायटी 'मध्ये दोन वर्षे मी ज्या यशस्वी उलाढाली केल्या होत्या, त्यांनी माझ्या महत्त्वाकांक्षेला हलवून जागे केले होते. शिक्षणाच्या क्षेत्रात आपण

काही तरी अभिनव कर्तृत्व करून दाखवू असा काहीसा अस्पष्ट आणि संदिग्ध स्वरूपाचा साक्षात्कार मला होऊ लागला होता. निश्चिंत मनाने अभ्यास करण्याची संधी यापूर्वी मला आयुष्यात कधी मिळाली नव्हती. म्हणून, आपल्या मेंदूत जितकी बुद्धी आहे आणि अंगात जेवढी शक्ती आहे, तेवढी निकराने एकवटून ह्या संधीचा फायदा घ्यावयाचा अशी मी मनाशी प्रतिज्ञा केली.

अगदी पहिल्या दिवसापासून अभ्यास करावयाला मी प्रारंभ केला. शिक्षणशास्त्रातल्या आणि मानसशास्त्रातल्या काही काही व्याख्या फार कठीण असतात. त्या पाठ केल्या-वाचून लक्षात राहणे अशक्य. म्हणून सकाळी उठल्याबरोबर शौचमुखमार्जन करता करता रोज कमीत कमी दोन व्याख्या तरी न चुकता पाठ करण्याचा मी शिरस्ता ठेवला. कुठलाही वेळ फुकट म्हणून दवडायचा नाही, ही मनाशी खूणगाठ बांधली. वर्गात प्राध्यापकांच्या तोंडून पडणारे अक्षर न् अक्षर मी झपाट्याने वहीमध्ये लिहून घेई. संध्याकाळी ती टाचणे पुन्हा निराळ्या वहीत नीट लिहून काढी. मधल्या सुट्टीत वाचनालयातली शैक्षणिक नियतकालिके वाचावयाची आणि संध्याकाळी ग्रंथालया-मधले आधुनिक शिक्षणशास्त्रावरील ग्रंथ चाळावयाचे, हा मी रोजचा प्रघात ठेवला. ट्रेनिंग कॉलेजात गेलेल्या नवीन शिक्षकांच्या डोक्यात प्रारंभी असा काही गोंधळ उडतो की काही सांगता सोय नाही. प्रत्येक विषयाची पुस्तके भरपूर आणि एकेका पुस्तकाची पाचपाचशे पाने. एवढे सगळे वाचावयाचे केव्हा आणि त्यांतले लक्षात काय काय ठेवावयाचे ? शब्दांचे डोंगरच्या डोंगर पसरलेले. ते नुसते बघूनच डोळे फिरायला लागतात. ह्या डोंगरामधून वाट कशी काढायची, ह्याचा शांत चित्ताने विचार करून मी माझी एक योजना तयार केली.

प्रत्येक विषयाची सगळी पुस्तके संपूर्ण वाचण्याच्या मुळी भानगडीतच पडावयाचे नाही. त्यांतले एकच उत्कृष्ट पुस्तक निवडावयाचे आणि त्यातील महत्त्वाचे मुद्दे शोधून काढून, प्रत्येक मुद्द्यावर त्या ग्रंथकाराचे किमान विचार काय आहेत, तेवढेच टिपून ठेवावयाचे. केवढाही महत्त्वाचा मुद्दा घेतला तरी त्यासंबंधी अगदी मूलभूत असे दोनचारच विचार असतात. अशा रीतीने त्या पुस्तकाच्या आधाराने त्या विषयाचा सांगाडा तयार करावयाचा. मग त्या विषयावरच्या इतर सर्व पुस्तकांचा फक्त 'सूची'वरून अभ्यास करावयाचा. उदाहरणार्थ, अमुक एका मुद्द्यावर हा ग्रंथकार काय म्हणतोय् किंवा तो ग्रंथकार काय सांगतोय् हे त्याच्या त्याच्या ग्रंथाच्या सूचीवरून पाहावयाचे. त्यात एखादा नवीन विचार आढळला, तर तेवढाच आपल्या मूळ टाचणात नोंदून ठेवावयाचा. अशा रीतीने सर्व ग्रंथ संपूर्णपणे न वाचता, त्याच्यातले नेमके सार आपल्या पदरात पडते. कोणत्याही विषयावरचे आपले टाचण एकदा पक्के झाले की मग पुन्हा पुस्तकांच्या सर्व डोंगराची चढउतार करण्याची जरूर पडत नाही. ह्या पद्धतीने विषयाचा अभ्यास केला म्हणजे त्याच्या स्वरूपाची

नेमकी ओळख होते, महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या आणि गैरलागू गोष्टी कोणत्या हे जाणण्याची दृष्टी येते आणि परीक्षेसाठी उजळणी करताना निष्कारण धांदल होत नाही.

प्रत्येक विषयाची तीस तीस, चाळीस चाळीस पानांची मी अशी टाचणपुस्तके तयार करून ठेवली होती. त्यामुळे अवघ्या दोन तासांच्या आत कोणत्याही विषयाची संपूर्ण उजळणी मी करू शकत होतो. दोनतीन महिन्यांच्या आत सर्व विषयांच्या अंतरंगाचे मला उत्तम आकलन झाले. डोक्यातला आरंभीचा गोंधळ नष्ट झाला आणि अवघड गोष्टीही आटोक्यात आल्यासारखे वाटले. स्मरणशक्ती तर उत्तम काम देऊ लागली. तीन महिन्यांत माझ्या शंभरावर व्याख्या पाठ झाल्या. आणि अनेक शैक्षणिक सुभाषिते मला मुखोद्‌गत येऊ लागली. कोणत्याही विषयावर हा काय म्हणतो आहे आणि तो काय बोलतो आहे हे मी धडाधड सांगू लागलो.

आपल्या मानाने इतर शिक्षकांची कितपत तयारी आहे, ह्याची मी चाचणी घेऊ लागलो. चार शिक्षक एकत्र जमले की अज्ञान पांघरून काही तरी शंका त्यांना विचारावयाची. त्या शंकेचे त्यांना बहुधा निराकरण करता येत नसे, हे मला आढळून आले की इतरांपेक्षा माझी तयारी अधिक आहे, हे मला समजून येई आणि त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढे. ह्याच्या उलट कोणी मला शंका विचारली तर तिचे मी तपशीलवार उत्तर देई. तिजसंबंधी अधिक चर्चा करी. त्या योगाने माझी स्मरणशक्ती उजळली जाई. वर्गात प्राध्यापकांना मी पुष्कळदा अडवीत असे आणि त्यांना नसलेली माहिती सांगत असे. त्या दृष्टीने प्रिन्सिपल हॅमले हे मोठे खेळाडू होते. विद्यार्थी आपल्यापेक्षा शहाणपणा दाखवू लागला तर त्यांना त्याबद्दल राग येत नसे. अशा रीतीने थोड्याच काळात प्राध्यापकांवर आणि सहाध्यायांवर मी माझ्या अभ्यासाची चांगलीच छाप बसविली. ‘ युरोपमधील शिक्षणशास्त्राचा इतिहास ’ हा एक आम्हाला अभ्यासाला विषय होता. त्यावर आटोपशीर असे एकही पुस्तक त्या वेळी उपलब्ध नव्हते. मुळात फार मोठमोठी पुस्तके वाचावी लागत, म्हणून त्यासंबंधी प्रश्नोत्तर रूपाने मी एक सुंदर टाचण तयार केले. माझ्या पुष्कळशा सहाध्यायांनी त्याच्या नकलाही करून घेतल्या. ( मी कॉलेज सोडल्यानंतरही पुष्कळ वर्षे हे माझे टाचण विद्यार्थी वापरीत असत. )

ट्रेनिंग कॉलेजातील शिक्षकांना पाठ देण्याची कलाही शिकावी लागते. पाठांची टिपणे तयार करावयाची आणि त्याप्रमाणे वर्गात पाठ देऊन दाखवावयाचे, हा त्यांच्या अभ्यासातला एक महत्त्वाचा भाग आहे. प्रत्येक शिक्षकाला किमानपक्षी दोन विषय शिकवावे लागतात. मी इंग्रजी व भूगोल असे दोन विषय घेतले. भूगोल मी का घेतला ? तर मी स्वतः शाळेत विद्यार्थी असल्यापासून मला तो येत नव्हता आणि प्रा. कार हे भूगोल–अध्यापनाचे तज्ज्ञ होते. भूगोल विषयाच्या शिक्षणात

पाश्चात्त्य देशांमध्ये फार क्रांती झाली होती. भूगोल म्हणजे समुद्र, पर्वत, नद्या, शहरे, पिके आणि खनिज पदार्थ ह्यांच्या लांबलचक याद्यांची जंत्री नसून, माणसांचे वसतिस्थान झालेल्या पृथ्वीची ती एक मनोरंजक गोष्ट आहे, एवढा त्या विषयाकडे बघण्याच्या दृष्टिकोणात बदल झालेला होता. मी नावीन्याचा भोक्ता असल्याने या विषयाचे साहजिकच मला आकर्षण वाटले. चित्रकला आणि विनोद ह्या दोन देणग्या मजजवळ असल्यामुळे माझे पाठ अतिशय मनोरंजक वठत. फळयावर मी बोलबोल म्हणता खडूने रेखाचित्र रेखाटू शके. माझ्या पाठांची सर्व चित्रे मी स्वतः तर तयार करीच; पण इतरांनाही मी काढून देई. ( मी त्या वेळी काढलेली काही चित्रे अद्यापही ट्रेनिंग कॉलेजमध्ये आहेत, असे म्हणतात. )

इंग्रजी शिक्षण प्रत्यक्ष संभाषणाच्या पद्धतीने ( Direct Method ) शिकवले जावे, ह्या गोष्टीला त्या वेळी फार महत्त्व आले होते. मराठीचा वा गुजरातीचा उपयोग न करता, मुलांना कठीण इंग्रजी शब्दांचा अर्थ कसा समजावून द्यावयाचा ? अवघड गोष्ट आहे ही. प्रत्येक वस्तूचे चित्र किंवा प्रत्यक्ष क्रियेचा अभिनय करून दाखवता येईल असे नव्हे. ह्या बाबतीत ट्रेनिंग कॉलेजचे कित्येक शिक्षक इतकी अतिशयोक्ती करीत की हसता हसता पोट दुखून येई. ‘ Sleep ’चा अर्थ समजावून सांगण्यासाठी त्या वेळी एका शिक्षकाने वर्गात बिछाना आणला आणि त्यावर सपशेल झोपून आणि अंगावर ब्लँकेट ओढून त्यांनी मुलांना विचारले, “ What am I doing ? I am sleeping ! ” त्यानंतर वर्गातल्या चाळीस मुलांना अनुक्रमाने त्याने त्या बिछान्यावर झोपायला लावून “ I am sleeping ! ” असे म्हणावयाला लावले. सबंध तास त्यात निघून गेला. शिक्षकाने मोठ्या उत्सुकतेने प्रिन्सिपल हॅमले यांना विचारले. “ What do you think of my lesson ? ” प्रि. हॅमले निर्विकार चेहऱ्याने म्हणाले, “ I don’t know. I am also sleeping ! ” एका शिक्षकाला ‘ Lawyer ’ हा शब्द शिकवायचा होता. त्याने वकिलाचा पोषाख करून हातात बॅग घेतली आणि मोठ्या ऐटीने वर्गाकडे बघून त्याने विचारले, “ Boys, who am I ? ” त्याबरोबर एक चुणचुणीत पोरगा ताडकन् उठून ओरडला,: “ You are a barber ! ” जवळ जवळ दहा मिनिटे मागे बसलेले आम्ही शिक्षक हसत होतो. पुढे शिकवणे त्या शिक्षकाला अशक्य झाले. पाठांच्या वेळी पुष्कळदा अशा मौजा होत.

कॉलेजच्या इतर चळवळींमध्येही मी प्रामुख्याने भाग घेई. बॅडमिंटनचा मी ‘ चँपियन ’ होतो, आणि ‘ क्रिकेट-टीम ’चा कॅप्टन होतो. त्या वर्षी एस्प्लनेड मैदानावर क्रिकेटचे जे चौरंगी सामने झाले ते पाहण्यासाठी मी ट्रेनिंग कॉलेजचा खास तंबू उभारण्याची व्यवस्था केली होती. दुसऱ्या टर्ममध्ये ‘ वसतिगृहा’त माझ्या सहाध्यायांसाठी मी एक अध्यापनवर्गच उघडला. दहाबारा शिक्षक भोवती जमवून रोज

कोणत्या ना कोणत्या तरी विषयावर मी त्यांच्यापुढे प्रवचन देत असे. ह्या योगाने माझी सर्व विषयांची उत्तम तयारी होऊ शकली. तथापि परीक्षेत आपल्याला 'पहिला वर्ग' मिळेल असे मात्र मला कधी वाटले नाही. माझे पूर्वचारित्र्य सारे 'तिसऱ्या वर्गा'चे होते. मुंग्यांना पंख फुटले तरी त्यांना आभाळात थोडेच उडता येणार, असा मी स्वतःशी युक्तिवाद करीत असे.

परीक्षेत मला सर्व प्रश्न लिहिता आले नाहीत. कमीत कमी सहा प्रश्नांपैकी मी फक्त तीन किंवा चार प्रश्नांचीच उत्तरे लिहू शकलो. ह्याचे कारण, प्रत्येक प्रश्नावर मला एवढी साद्यंत माहिती होती की, एकेका प्रश्नाला मला तीन तीन पुरवणी पुस्तिका अपुऱ्या पडल्या. ज्या अर्थी आपण सर्व प्रश्न लिहिले नाहीत, त्या अर्थी आपल्या गुणांची बेरीज कमी भरेल आणि आपणाला 'वर्ग' मिळणार नाही, अशी मला धागधुग वाटू लागली; पण प्रत्यक्ष माझ्या परीक्षेचा निकाल जेव्हा लागला, तेव्हा 'डर्बी लॉटरी'च्या निकालात जणू काही आपले नाव आले, एवढा आश्चर्याचा आणि आनंदाचा धक्का मला बसला. पहिल्या वर्गात मी पहिला आलो होतो! माझ्या वर्षभराच्या उग्र उपश्चर्येने परीक्षेची भेसूर देवता अखेर प्रसन्न होऊन तिने आपला वरदहस्त माझ्या मस्तकावर ठेवला!

बी. टी. परीक्षेतील ह्या माझ्या अपूर्व यशाने माझ्या जीवनातील एका नवीन कालखंडाला सुरुवात झाली. मी अंतर्बाह्य बदलून गेलो. शिक्षणक्षेत्रात सर्वत्र माझे नाव आले. त्यामुळे लोकांचा माझ्याकडे पाहण्यात जसा फरक पडला, तशी माझीही मजकडे पाहण्याची दृष्टी बदलली. माझे पूर्वीचे विद्यालयीन कर्तृत्व अगदीच सामान्य होते. त्यामुळे माझ्यामध्ये एक प्रकारचा नैकृष्ट्य गंड उत्पन्न झाला होता. आपल्या बुद्धीचा मगदूर सामान्य असून, उच्च ज्ञान मिळविण्याचा किंवा विद्वत्ता संपादन करण्याचा वकूब तिच्यात नाही, असा माझा दृढ ग्रह होऊन बसला होता. माझ्या जीवनातले हे वैगुण्य ह्या यशाने नेस्तनाबूद करून टाकले आणि माझ्या व्यक्तिमत्त्वात जबरदस्त आत्मविश्वास निर्माण केला. एवढेच नव्हे तर ह्या यशाने माझ्या महत्त्वाकांक्षेला कर्तृत्वाचे आणि पराक्रमाचे एक महान क्षेत्र मोकळे करून दिले. एवढ्या तपशिलाने मी जे हे सांगतो आहे त्याचे कारण, केवळ आयुष्यात यश न मिळाल्याने अनेक बुद्धिमान आणि कर्तबगार माणसे अगतिक होऊन समाजाच्या तळाशी पडून राहतात, हे मला आग्रहाने सर्वांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. यशासारखे यश नाही, असे जे म्हणतात ते खरे आहे. सध्याच्या विषम समाजरचनेत आपल्या गुणांचा विकास करण्याची सर्वांना सारखी संधी मिळत नाही, त्यामुळे यशापयश हा एक दैवाचा खेळ होऊन बसला आहे. यशस्वी माणसे जगात असामान्य ठरतात आणि अपेशी माणसे सामान्य माणसांच्या समुदायात कुठे तरी लुप्त होतात.

आमच्या वेळी बी. टी. चा अभ्यासक्रम दोन वर्षांचा होता. पहिल्या वर्षी लेखी

परीक्षा आणि दुसऱ्या वर्षी पाठांची परीक्षा. दुसऱ्या परीक्षेतही मला पहिला वर्ग मिळाला. एवढ्या सन्मानाने मी बी. टी.ची परीक्षा पास होऊन पुण्याला आल्यानंतर पुणे शहरात शैक्षणिक जीवनात मी काय धुमाकूळ घातला असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. ' कँप एज्युकेशन सोसायटी 'त 'नवशिक्षणा'ची मी आघाडीच उघडली. नवीन पुस्तके, नवीन साहित्य आणि नवीन साधने ह्यांची शाळेत रेलचेल करून टाकली. ट्रेनिंग कॉलेजात जे जे म्हणून मी पाहिले ते ते सर्व मी माझ्या शाळेत घेऊन आलो आणि सरकारी शिक्षणखात्याच्या एस. टी. सी. परीक्षेसाठी पुण्यात दुय्यम शिक्षकांचा पहिला वर्ग उघडला. सर्व स्थानिक शाळांतील शिक्षकांनी ह्या वर्गात गर्दी करून सोडली. निरनिराळ्या शिक्षणसंस्थांमध्ये जाऊन इंग्रजी, मराठी, भूगोल ह्या विषयांवर आदर्श पाठ देण्याचा मी धडाका लावला. त्या वर्षी माझ्या हाताखालून किती तरी शिक्षक एस. टी. सी. ची परीक्षा पास झाले. त्या वेळची एक गंमत आठवली, ती सांगतो.

एकदा माझ्या वर्गात मी ' हत्ती आणि सहा आंधळे ' ह्या क्रमिक पुस्तकातल्या इंग्रजी कवितेवर आदर्श पाठ दिला होता. त्याची सर्व शिक्षकांनी आपापल्या वहीत टिपणे करून घेतली होती. पुढे एस. टी. सी.च्या पाठाची परीक्षा घ्यावयाला त्या वेळचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर रा. ब. के. जी. जोशी निरनिराळ्या शाळांतून हिंडू लागले. प्रथम ते भावेस्कूलमध्ये गेले. तेथे एका शिक्षकाने 'हत्ती आणि सहा आंधळे' हाच पाठ दिला. त्यानंतर ते ' न्यू इंग्लिश स्कूल 'मध्ये गेले. तिथेही एका शिक्षकाने तोच पाठ निवडला होता. रा. ब. जोश्यांना वाटले की केवळ योगायोगाने तोच तो पाठ झाला असेल. तेव्हा ते काही बोलले नाहीत. पुढे ते ' नूतन मराठी 'मध्ये गेले. ' हत्ती आणि सहा आंधळे ' हा पाठ शिक्षकाने सुरू केलेला पाहून ते हतबुद्ध झाले. ही काय भानगड आहे हे त्यांना कळेना. ते त्या शाळेच्या सुपरिंटेंडंटला म्हणाले, " मी जिथे जातो तिथे हा हत्ती अन् हे सहा आंधळे एकसारखा माझा का पाठलाग करीत आहेत, हे मला कळत नाही ! " तो धडा त्यांनी कसाबसा पाहिला. नंतर ते माझ्या शाळेत आले. त्यांना घेऊन मी वर्गात जाऊ लागलो. तेव्हा वर्गाच्या बाहेर मला थांबवून त्यांनी विचारले, " अत्रे, हा तुमचा शिक्षक पाठ कोणता घेणार आहे?" मी म्हणालो, " मला नाही माहीत. बघू या वर्गात जाऊन ! " रा. ब. जोशी म्हणाले, " I hope, it is not those six blind rascals and the wretched elephant ! " मला काही त्यांच्या म्हणण्याचा अर्थ उमगला नाही. वर्गात त्यांनी पाऊल टाकले तोच फळ्यावर ' सहा आंधळ्याचे आणि हत्ती 'चे चित्र शिक्षकांनी टांगून ठेवले होते ते बघून ते असे काही उखडले म्हणता ! " No; no; no ! I don't want to hear this lesson. Throw those blind men and the elephant out ! " शिक्षक बिचारा घाबरून थरथर कापू लागला. त्याला कळेना,

आपल्या हातून असा काय भयंकर गुन्हा झाला ! रा. ब. जोशी शांत झाल्यानंतर त्यांनी मला सर्व हकीकत सांगितली. तेव्हा माझी हसता हसता पुरेवाट झाली. स्वतंत्र बुद्धी न वापरता आमचे दुय्यम शिक्षक 'हत्ती'चे आंधळे अनुकरण कसे करतात, हे ह्या गोष्टीवरून दिसून येईल.

दुय्यम शिक्षणाचा विचार करणारी 'शिक्षा–विचार–मंडळ' नावाची एक संस्था पुण्यात होती. ह्या मंडळात मुलांना 'शिक्षा' कशी करावी, ह्याचा मास्तरलोक विचार करतात, अशी त्या नावाची गावात कित्येक लोक थट्टा करीत असत. ही संस्था जवळजवळ बंदच होती. प्रा. एम. आर. परांजपे ह्यांच्या नेतृत्वाखाली ह्या संस्थेचा जीर्णोद्धार करण्याच्या कामी मी पुढाकार घेतला. ह्याच संस्थेतर्फे 'मुंबई इलाखा दुय्यम शिक्षक परिषद' प्रा. पी. शेषाद्री ह्यांच्या अध्यक्षतेखाली आम्ही पुण्यात भरविली. तिचा मी एक चिटणीस होतो. ह्या परिषदेत सातआठशे शिक्षकांपुढे मी 'भूगोला'चा आदर्श पाठ दिला. त्या वर्षी महाराष्ट्रात ठिकठिकाणी ज्या प्राथमिक शिक्षकांच्या परिषदा भरल्या, त्यांपैकी बहुतेक परिषदांमध्ये मी आधुनिक शिक्षणावर व्याख्याने तरी दिली, नाही तर आदर्श पाठ तरी घेऊन दाखवले.

क्रमिक मराठी पुस्तकांमध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यता त्या काळात मला विशेष जाणवू लागली. म्हणून 'क्रमिक पुस्तकांचा जीर्णोद्धार' असा विषय घेऊन मी निरनिराळ्या परिषदांतून त्यावर जोरदार व्याख्याने देऊ लागलो. त्याच सुमारास वि. स. सुखटणकरांच्या 'वासंती' ह्या कवितासंग्रहाला मी एक 'प्रस्तावना' लिहिली. त्या प्रस्तावनेत जुन्या क्रमिक पुस्तकांमधल्या कवितांचे मी असे काही वाभाडे काढले म्हणता ! त्यामुळे शिक्षणखात्यात अगदी खालपासून वरपर्यंत खूपच खळबळ उडाली. ती प्रस्तावना म्हणजे विद्यार्थ्यांसाठी कवितांची निवड कशी केली पाहिजे, ह्या विषयावरचा एक निबंधच होय. दुसरी एक महत्त्वाची 'प्रस्तावना' त्याच वर्षी मी लिहिली. ती म्हणजे दातारांच्या 'भूगोल नकाशा-संग्राहा'ला. भूगोलाच्या अध्यापनात नकाशाचे काय स्थान आहे आणि त्याचा कसा उपयोग करावा, ह्याचे साद्यंत विवेचन मी त्या प्रस्तावनेत केलेले आहे. मराठीमध्ये दुसऱ्या कोणीही या विषयावर लिहिलेले मला माहीत नाही. मुंबई युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक परीक्षेचा भूगोल विषयाचा मी दोन वर्षे परीक्षक होतो.

पुणे शहराच्या पूर्व भागातील पुष्कळशी मुले 'कॅंप एज्युकेशन सोसायटी'च्या शाळेत येत होती. शाळेत विद्यार्थ्यांची संख्या जशी वाढू लागली, तशी 'सोसायटी'ची इमारत अपुरी पडू लागली. म्हणून गावातून येणाऱ्या मुलांसाठी रास्ता पेठेत संस्थेची शाखा काढली, तर लष्करच्या शाळेवरचा त्यांचा रेटा कमी होईल असे मला वाटले. त्याप्रमाणे सत्तावीस सालच्या प्रारंभी प्रा. एम्. आर. परांजपे ह्यांच्या हस्ते रास्ता पेठेतल्या शाखेचे उद्घाटन करण्यात आले.

ट्रेनिंग कॉलेजातील प्रा. कार हे लंडन युनिव्हर्सिटीचे टी. डी. असल्याने, आपणही विलायतेला जाऊन 'टीचर्स डिप्लोमा' घेऊन का येऊ नये, हा विचार बी. टी. झाल्यानंतर साहजिकच माझ्या मनात डोकावू लागला; पण विलायतेला जायला पैसा कोठून आणायचा, ही मोठी अडचण माझ्यापुढे होती. तथापि, 'लंडन युनिव्हर्सिटी'मध्ये आपल्याला प्रवेश तरी मिळतो का, हे आधी पाहावे म्हणून त्यासंबंधीची रीतसर सर्व माहिती मिळवून एक दिवस मी माझ्या सर्व सर्टिफिकिटांसह अर्ज तर टाकून दिला. 'लंडन डे ट्रेनिंग कॉलेज' हे शिक्षणशास्त्राचे शिक्षण देणारे लंडनमधील प्रमुख कॉलेज होय. सर्व ब्रिटिश साम्राज्यातल्या शिक्षकांचे प्रवेशअर्ज ह्या कॉलेजकडे येतात. त्यामुळे प्रत्येक देशाच्या वाट्याला दर वर्षी फारच मर्यादित जागा येतात, म्हणून आपल्याला ह्या कॉलेजात प्रवेश मिळेल की नाही, ह्याविषयी मी जरा साशंकच होतो; पण प्रिन्सिपल हॅमले ह्यांनी मला उत्कृष्ट शिफारसपत्र दिले होते. त्याचाच परिणाम होऊन की काय, मला प्रवेश देण्यात आला असल्याचे 'लंडन डे ट्रेनिंग कॉलेज'कडून ताबडतोब पत्र आले.

त्या वेळचे मुंबई इलाख्याचे शिक्षणमंत्री ना. हरिभाई देसाई ह्यांच्या अध्यक्षतेखाली पुण्याच्या दुय्यम शिक्षकांनी मोठ्या थाटाने मला निरोप दिला. सत्तावीस सालच्या एकतीस जुलैला मी 'रॅनपुरा' बोटीवर चढलो. माझ्या खिशात लंडनपर्यंतचे तिकीट अन् फक्त दीडशे रुपये होते. उच्च शिक्षण घेण्यासाठी आजपर्यंत एवढा दरिद्री माणूस हिंदुस्थानामधून विलायतेला कधी गेला नसेल! बोटीवर विलायतेला शिक्षणासाठी जाणारे अनेक विद्यार्थी होते. त्यांच्याजवळचे झगझगीत सामान पाहून अन् त्यांच्या खर्चाच्या अवाढव्य योजना ऐकून माझ्या छातीत धसका बसे. इंग्लंडमध्ये एक आठवडाभर तरी आपला निभाव लागेल की नाही ह्याची मला शंका वाटू लागली. मी 'डेक'वर चोरासारखा एका बाजूला बसे. कोणाशी मिसळण्याचे मला धैर्य होईना. सर पर्सी ननची 'नवशिक्षण गीता' नेहमी माझ्या हातात असे. बारा-तेरा दिवसांच्या बोटीच्या प्रवासात तीन चार वेळा तरी मी ती वाचून काढली. मार्सेल्स येथे उतरून पॅरिसमधून कॅलेला आणि तेथून डोव्हर मार्गाने मी लंडनला गेलो. लंडनला पोहोचल्यावर सरळ मी गॉवर स्ट्रीटमधल्या 'इंडियन स्टूडंट्स् हॉस्टेल'मध्ये जाऊन राहिलो.

माझे कॉलेज सुरू व्हायला महिनाभर अवकाश होता. उन्हाळ्याचे दिवस होते ते. त्यामुळे तेथली हवा फारच सुंदर होती. सृष्टिसौंदर्य तर अवर्णनीय होते. तो महिना लंडन शहर पाहण्यात घालवला. आठवड्यातून आम्हांला तीन दिवस कॉलेज असे. मंगळवारी आणि गुरुवारी पाठ देण्यासाठी शाळेत जावे लागे. शनिवारी आणि रविवारी दोन दिवस संपूर्ण सुट्टीच असे. जागतिक कीर्तीचे शिक्षणशास्त्रज्ञ 'लंडन डे ट्रेनिंग कॉलेज'मध्ये आम्हांला शिक्षक लाभले. सर पर्सी नन् हे तर नवशिक्षणाचे

३९३९ २८०५६ निबंध १२.१२.८५

शंकराचार्यच. ते आम्हांला शिक्षणशास्त्र शिकवीत. डॉ. सिरिल बर्ट हे एक महान मानसशास्त्रज्ञ होते. गुन्हेगार मुलांच्या मानसशास्त्रावरील त्यांचे ग्रंथ प्रमाणभूत मानले जातात. ते आम्हांला 'मानसशास्त्र' शिकवीत. सर डोव्हर विल्सन हे 'शिक्षणाचा इतिहास' शिकवण्याला होते. डॉ. गरे नावाचे 'एक भाषाशास्त्रज्ञ' आणि वैय्याकरणी आम्हांला इंग्रजीचे अध्यापन शिकवीत आणि ज्यांच्या 'ह्यूमन जॉग्रफीज्' ह्या पाठ्यपुस्तकांनी भूगोलाच्या शिक्षणात क्रांती केली, ते प्रा. फेअरग्रीव्ह आमचे 'भूगोला'चे अध्यापक होते. असे शिक्षक लाभणे हे आयुष्यातले एक महान भाग्य होते.

पाठ देण्यासाठी मला प्रथम लंडनमधल्या एका अत्यंत निकृष्ट वस्तीमधील प्राथमिक शाळेत धाडण्यात आले. हिंदुस्थानातला मी एक दुय्यम शिक्षक. इंग्लंड-मधल्या प्राथमिक शाळेत शिकवणे हा मला पोरखेळ होता; पण त्या लोकांना हिंदी शिक्षकांच्या बौद्धिक सामर्थ्याची कल्पना नसते. त्या शाळेमध्ये तिसऱ्या इयत्तेला मी इंग्रजी आणि भूगोल हे दोन विषय शिकवू लागलो. प्रारंभी प्रारंभी त्या मुलांचे इंग्रजी मला मुळी समजेनाच. कारण ती शुद्ध इंग्रजी बोलत नसत. 'कॉकनी' बोली बोलत. कॉकनी ही फक्त लंडनमध्येच बोलली जाते. ह्या बोलीतले उच्चार फारच विचित्र आहेत. 'पेपर' (वर्तमानपत्र)ला ते 'पायपर' म्हणतात. 'केन' (छडी)ला 'काईन'. 'प्लेग्राउंड'ला 'प्लॅयग्राउंड'. 'काउन्टी कौन्सिल'ला 'क्यॅउन्टी क्यॅवून्सील'. महिनाभराने मला मुलांचे बोलणे थोडे थोडे उमगू लागले. वर्तनाने मात्र मुले फार चांगली असत. कोणत्याही कामाला त्यांचा नकार म्हणून नसे. फार गरीब कुटुंबातली मुले होती ती. त्यांचे कपडे फाटके असत आणि त्यांच्या अंगाला काही तरी उग्र वास येई. दोन दोन महिने ती आंघोळच करीत नसत. मी त्यांपैकी कित्येकांच्या घरी जाऊन पालकांना त्याबद्दल विचारले. तेव्हा मला कळले की, लंडनमध्ये गरिबांच्या आणि कामगारांच्या घरात आंघोळीची मुळी सोयच नसते. त्यांना म्युनिसिपालिटीच्या सार्वजनिक 'स्नानगृहां'त जाऊन आंघोळी कराव्या लागतात.

दुसऱ्या टर्मपासून माझी बदली 'हॅरो काउन्टी स्कूल'मध्ये झाली. ही लंडन शहराच्या उपनगरातील एक उत्कृष्ट दुय्यम शाळा आहे. ह्या शाळेतले सर्व विद्यार्थी वरिष्ठ मध्यम वर्गातले असत. त्यामुळे त्यांचे पोशाख, भाषा आणि वागणे अतिशय स्वच्छ, शुद्ध आणि टापटिपीचे असे. ह्या शाळेतल्या विद्यार्थ्यांमध्ये मी अतिशय प्रिय झालो. 'हिंदुस्थानच्या भूगोला'वरचे माझे पाठ ऐकण्यासाठी पुष्कळदा शाळेचे हेडमास्तर आणि इतर शिक्षक येत. 'इंडियन स्टुडंटस् हॉस्टेल' मी महिन्याभराने सोडले आणि लंडनच्या उत्तर भागात रॉबर्ट केम नावाच्या एका इंग्रज प्राथमिक शिक्षकाच्या घरात राहावयाला गेलो.

इंग्लंडात प्राथमिक शिक्षकांचे जीवन कसे आहे, ते त्यांच्या कुटुंबातच राहिल्याने

मला चांगले कळून आले. ते घर शिक्षकाच्या मालकीचे होते. सर्व आधुनिक सुखसोयी त्यामध्ये होत्या. त्या शिक्षकाला वर्षाचा दोनशे पौंड पगार होता. तिकडच्या प्राथमिक शिक्षकांची आणि आपल्याकडील प्राथमिक शिक्षकांची नुसती तुलनासुद्धा होऊ शकणार नाही. आपल्याकडचे प्राथमिक शिक्षक खरोखरच 'प्राथमिक' अवस्थेमध्ये आहेत. प्राथमिक शिक्षकांच्या तेथे प्रचंड संघटना आहेत. 'नॅशनल टीचर्स युनियन'च्या एका स्थानिक शाखेच्या मासिक भोजनाला माझ्या घरमालकाबरोबर मी एकदा गेलो. त्या भोजनाला दोन तीन हजार शिक्षक हजर होते. त्या सर्व मेळाव्यात मी एकटाच हिंदी शिक्षक आहे, हे पाहून अध्यक्षाने मजबद्दल सद्भावना व्यक्त करण्याची सर्वांना सूचना केली. सर्वांनी उठून माझ्या नावाने 'आरोग्यपान' केले. मीही मग उत्तरादाखल दोन शब्द बोललो.

शनिवार-रविवारचा माझा सर्व वेळ मी इंग्लंडमधल्या नमुनेदार शिक्षण-संस्था पाहण्यात खर्च करी. कमीत कमी मी दहा-बारा 'पब्लिक स्कूल्स' तरी पाहिली असतील. 'पब्लिक स्कूल' हे स्वतंत्र जग आहे. ते पाहिल्याखेरीज त्याची कल्पना येणार नाही. राष्ट्रीय परंपरा, कडक शिस्त आणि सांघिक खेळ ह्यांच्या साहाय्याने तरुणांचे शरीर आणि चारित्र्य घडवण्याचे ते प्रचंड कारखाने आहेत, एवढे म्हटले म्हणजे पुरे. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज येथील विश्वविद्यालयेही मी पाहून आलो. केंब्रिज येथे 'मॉल्टिंग हाऊस स्कूल' नावाची एक विलक्षण शाळा एका धनिकाने काढली होती. तेथे मुलांपेक्षा शिक्षकच अधिक होते. शिक्षकांनी मुलांना काहीही शिकवावयाचे नाही, हेच त्या शाळेचे वैशिष्ट्य होते. सर्व तऱ्हेची शिक्षणसामग्री मुलांच्या भोवती ठेवण्यात आली होती. मुलांनी प्रश्न विचारले, तरच शिक्षकांनी सांगावयाचे, एऱ्हवी नाही. विद्यार्थ्यांना संपूर्ण स्वातंत्र्य देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा नैसर्गिक विकास करण्याचा जगामधला तो अभूतपूर्व प्रयोग होता. त्याचे पुढे काय झाले कोणास ठाऊक!

लंडनमध्ये कुठेतरी शिक्षणतज्ज्ञांची नेहमी व्याख्याने होत. ती मी नेहमी ऐकायला जाई. त्यामध्ये डॉ. पी. बी. बॅलार्ड ह्यांची व्याख्याने मला अतिशय आवडत. डॉ. बॅलार्ड हे 'लंडन काउन्टी काउन्सिल'च्या शिक्षणखात्यामध्ये इन्स्पेक्टर होते. त्यांनी 'नवशिक्षणा'वर अनेक स्फूर्तिदायक पुस्तके लिहिली आहेत. शास्त्रीय विषयावर विनोदी भाषण करणारा त्यांच्यासारखा प्रभावी वक्ता आजपर्यंत मी पाहिला नाही. ते बोलायला उभे राहिले की, श्रोते कान टवकारून बसत. प्रत्येक वाक्याला सभागृहातून हास्याच्या लहरी उठत. त्यांच्याजवळ निवडक हास्यकथांचा भरगच्च संग्रह होता. विनोदी वक्तृत्वाचे तंत्र मी त्यांच्याकडून उचलले.

शिक्षणाव्यतिरिक्त लंडनमधील रंगभूमी, नृत्यकला, वृत्तपत्रे आणि राजकारण ह्यांचाही मी होईल तितका परिचय करून घेतला. पार्लमेंटमध्ये दोनतीनदा जाऊन

बसलो. लॉइड जॉर्जचे भाषण मला नरसोपंत केळकरांसारखे वाटले. जिम मॅक्स्टन नावाचा एक स्वतंत्र मजूर सभासद होता, त्याचे वक्तृत्व मला अतिशय आवडले. अतिशय वेगाने आणि आवेशाने तो बोलत असे. लंडन शहराचे पुष्कळसे विभाग मी पाहिले. अर्थात सबंध लंडन शहर पाहणे शक्यच नाही. 'कोणाही माणसाला आपल्या सर्व हयातीत संपूर्ण लंडन पाहणे शक्य नाही' अशी एक तेथे म्हण आहे. तिच्यात अतिशयोक्ती नाही. वेळ सापडेल तसा इंग्लंडच्या निरनिराळ्या भागांतून प्रवास करून मी आलो. स्कॉटलंडच्या सरहद्दीवरील अपूर्वसुंदर अशा 'सरोवर प्रांता'त ( Lake District ) पंधरा दिवस राहून आलो. एवढे करून कॉलेजमधल्या माझ्या अभ्यासाकडे मी एवढेसुद्धा दुर्लक्ष केले नाही.

प्रत्येक टर्मला कोठल्या तरी एका शैक्षणिक विषयावर आम्हाला स्वतंत्र निबंध लिहावयाला सांगत. ह्या निबंधाच्या मगदुरावर शिक्षकाच्या कामाचे मूल्यमापन होत असे. पहिल्या टर्मला मी जो निबंध लिहिला होता, त्याला माझ्या परीक्षकाने A–1 असा शेरा दिला. एवढेच नव्हे, तर सर्व वर्गात माझे नाव घेऊन त्याने त्याची प्रशंसा केली. त्यामुळे कॉलेजमध्ये मला पुष्कळच प्रसिद्धी मिळाली. माझ्या तिन्ही निबंधांना A–1 असेच शेरे मिळाले. टी. डी. च्या परीक्षेला गुणही नसतात आणि वर्गही नसतो. त्यामुळे त्या परीक्षेत विद्यार्थी नुसता उत्तीर्ण झाला ह्यापेक्षा काहीही अधिक जाहीर करीत नाहीत. माझ्या पाठाच्या परीक्षेला स्वतः डॉ. नन् आणि बर्मिंगहॅमचे सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ डॉ. व्हॅलन्टाईन हे आले होते. टी. डी. च्या परीक्षेचा निकाल जाहीर व्हायला पंधरा दिवस अवकाश होता, तोपर्यंत मी 'गिलवेल पार्क' मध्ये जाऊन स्काउटिंगच्या 'वुडबॅज'चा अभ्यास पूर्ण केला. टी. डी. मिळाल्याचे तेथेच मला कळले. त्यानंतर सात-आठ दिवसांतच मी इंग्लंड सोडले.

मजजवळ फक्त साडेतीनशे रुपये शिल्लक उरले होते. तेव्हा 'मॅरिटाइम्स मेसॅजरी' ह्या फ्रेंच कंपनीच्या बोटीचे तिसऱ्या वर्गाचे कोलंबोपर्यंतचे तिकीट तीनशे पंधरा रुपयांना काढले.

बोटीवर पंधरा दिवसांच्या प्रवासात मजजवळ अवघे तीस का पस्तीस रुपये शिल्लक होते. कोलंबोला आल्यानंतर घरी तार करून पुण्यापर्यंतचे सेकंड क्लास प्रवासाचे पैसे मी मागून घेतले आणि मग आगगाडीत चढलो. दोन दिवसांनी पहाटे दीडच्या सुमारास पुण्याच्या स्टेशनावर जेव्हा मी उतरलो, तेव्हा फक्त हमालाला देण्यापुरतेच पैसे माझ्या खिशात होते एकंदर चौदा महिन्यांच्या माझ्या शिक्षणयात्रेला चौपनशे रुपये खर्च आला. लोकांचे कर्ज काढून मी परदेशी गेलो होतो, ह्या गोष्टीचे तेथे असताना एक क्षणभरही मला कधी विस्मरण झाले नाही. मध्यंतरी माझ्या विद्यार्थ्यांनी माझ्या 'गुरुदक्षिणे'चा प्रयोग करून आठशे रुपयांची

दक्षिणा मला पाठवून दिली, एवढेच काय ते माझे स्वतःचे पैसे म्हणता येतील. जरुरीपेक्षा एक पैही अधिक मी कधी खर्च केली नाही. म्हणून कमीत कमी खर्चात मी जास्तीत जास्त फायदा मिळवू शकलो, ह्याचेच मला विशेष समाधान वाटले. इंग्लंडला जाऊन आल्याने माझ्या जीवनाच्या तत्त्वज्ञानात जशी क्रांती झाली, तशी माझ्या शरीरातही प्रचंड क्रांती झाली. हिंदुस्थानातून निघताना माझे वजन १३० पौंड होते. परत आलो तेव्हा ते १९० पौंड झाले होते. माझ्या आईनेदेखील मला प्रथम ओळखले नाही. इंग्लंडमध्ये माझा अक्षरशः 'पुनर्जन्म' झाला असेच मी समजतो.

मालवणचे श्री. रा. वि. परुळेकर हे महाराष्ट्रातले पहिले टी. डी. आणि त्यानंतर दुसरा मी. त्यामुळे परत आल्यानंतर शिक्षणक्षेत्रात माझे साहजिकच कौतुक होऊ लागले. सरकारी शिक्षणखात्यात प्रिन्सिपल हॅमले हे माझे मोठे पुरस्कर्ते होते. त्यांच्या शिफारशीने निरनिराळ्या सरकारी कमिट्यांवर माझी नेमणूक झाली. बी. टी. चा परीक्षक होण्याचाही मान मला मिळाला. तथापि बी. टी. परीक्षेचा अभ्यासक्रम शिकवण्याची परवानगी 'कॅंप एज्युकेशन सोसायटी'ला मिळाली, हा माझा सर्वांत मोठा बहुमान होता. मी प्रविष्ट झालो तेव्हा जी शाळा शुद्ध 'धर्मशाळा' होती, तिचे रूपांतर अवघ्या दहा वर्षांत मी मुंबई विश्वविद्यालयाच्या पदवी-परीक्षेच्या महाविद्यालयात केले, हे माझ्या शिक्षकजीवनातले सर्वांत मोठे यश होय. एवढेच नव्हे तर त्या काळात माझी शाळा महाराष्ट्रातल्या अनेक शिक्षक यात्रेकरूंचे क्षेत्रस्थान होऊन बसली. माझे आदर्श पाठ आणि शैक्षणिक प्रयोग पाहण्यासाठी लांबलांबचे शिक्षक येऊ लागले. मुंबई विश्वविद्यालयाने बी. टी. साठी माझ्या शाळेला पाचच वर्षे मान्यता दिली होती. पुढे विश्वविद्यालयाने ती योजनाच रहित केली. त्या पाच वर्षांत माझ्या हातून पंधरा सोळा शिक्षक बी. टी. झाले.

इंग्लंडला जाण्यापूर्वी पुण्याच्या पूर्व भागात मी सोसायटीची जी शाखा काढली होती, ती इतकी झपाट्याने वाढत गेली की, तिचे स्वतंत्र हायस्कूलच करणे भाग पडले. ह्या शाळेसाठी पुणे म्युनिसिपालिटीने सुंदरशी जागा दिली आणि माझे मित्र कै. दादासाहेब गंधे ह्यांच्या सांगण्यावरून रा. ब. ठुबे ह्यांनी त्या जागेवर अत्यंत शोभिवंत अशी इमारत बांधून दिली. आमच्या संस्थेचे एक सभासद रा. ब. डॉ. नायडू ह्यांनी राजा धनराज गिरजी ह्यांच्याकडून त्या शाळेला पंधरा हजार रुपयांची देणगी मिळवून दिली म्हणून राजेसाहेबांचे नाव त्या शाळेला आम्ही दिले. ह्या शाळेच्या नव्या इमारतीचे उद्घाटन मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड ब्रेबोर्न ह्यांच्या हस्ते मोठ्या थाटाने करण्यात आले. पुण्याच्या पूर्वभागात दुसरी महत्त्वाची कामगिरी मी ह्या सुमारास केली. ती म्हणजे मुलींच्या शिक्षणासाठी 'आगरकर हायस्कूल'ची स्थापना. त्या भागात मुलींच्या दुय्यम शिक्षणाची एकही संस्था नव्हती. त्यांना लांबवर 'हुजूरपागे'त

जावे लागे. म्हणून आगरकरांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी जे कार्य केले, त्याचे स्मारक मुलींची एक शाळाच त्या विभागात काढून करावे असे मी ठरविले. तेवढ्यासाठी 'न्यू एज्युकेशन सोसायटी' नावाची मी एक स्वतंत्र संस्था स्थापन केली. सहा वर्षे मी ह्या संस्थेचा अध्यक्ष होतो. ह्या शाळेचा प्रारंभीचा सर्व खर्च मी माझ्या पदरचाच केला. ह्या हायस्कूलला मुंबई विश्वविद्यालयाकडून आणि शिक्षणखात्याकडून तावड-तोब मान्यता मिळाली. नामदार शास्त्री आणि नामदार जयकर ह्यांच्या अध्यक्षते-खाली ह्या शाळेची पहिली दोन स्नेहसंमेलने मी मोठ्या थाटाने साजरी केली. ही शाळा म्हणजे महाराष्ट्रातले आगरकरांचे एकमेव स्मारक होय.

'प्राथमिक शाळे'साठी 'नवयुग वाचनमाला' आणि दुय्यम शाळेसाठी 'अरुण वाचनमाला' ह्या दोन मराठी क्रमिक पुस्तकांच्या माला मी वि. द. घाटे आणि प्रा. कानेटकर ह्यांच्या साहाय्याने ह्या काळात लिहिल्या. हे माझ्या हातून झालेले एक महत्त्वाचे शैक्षणिक कार्य होय. क्रमिक पुस्तकात बदल व्हावयाला पाहिजे असा माझा फार वर्षांपासूनचा आग्रह होता. इंग्लंडहून परत आल्यानंतर 'कर्नाटक प्रेस'चे मालक मंगेशराव कुलकर्णी हे एकदा सहज मला भेटले. ते मला म्हणाले, "तुम्ही स्वतः का नवीन क्रमिक पुस्तके लिहीत नाही ? त्यासाठी लागेल तो खर्च मी देतो." तेव्हा ते काम मी हाती घेतले आणि सहा महिन्यांत 'नवयुग वाचनमाला' लिहून पुरी केली. तथापि, ह्या पुस्तकांना सरकारी मान्यता मिळविणे फार कठीण होते. कारण सरकारी क्रमिक पुस्तकांखेरीज दुसऱ्या क्रमिक पुस्तकांना मंजुरी देण्याचे सरकारचे ह्या काळात मुळी धोरणच नव्हते, त्या सरकारच्या मक्तेबाजीला प्रथम मी सुरुंग लावला.

जवळजवळ वीस वर्षेपर्यंत सबंध महाराष्ट्रात 'नवयुग वाचनमाला' खेरीज दुसरी क्रमिक पुस्तके वापरली जात नव्हती. महाराष्ट्रातल्या लक्षावधी मुलांची मराठी भाषा ह्या पुस्तकांनी घडविलेली आहे. नंतर ह्या मालेची अनुकरणे करण्याचा अनेकांनी प्रयत्न केला; पण भाषा, साहित्य आणि शिक्षणशास्त्र ह्यांचा स्वतंत्र प्रज्ञेने यशस्वी समन्वय घालण्याचा जसा 'नवयुग वाचनमाले'ने प्रयत्न केला आहे, तसा दुसऱ्या कोणालाही करता आला नाही. 'अरुण वाचन' हासुद्धा क्रमिक वाचन-पुस्तकांचा एक तेजस्वी आदर्श आहे. मराठी भाषेतील अद्ययावत आणि जिवंत वाङ्मयाचा आणि विचारांचा शालेय विद्यार्थ्यांना परिचय करून देण्याचा महाराष्ट्रातला तो पहिला धाडशी प्रयत्न आहे. शिवरामपंत परांजपे, अच्युतराव कोल्हटकर, विनोबा भावे आणि सानेगुरुजी ह्यांची शालेय सृष्टीला ओळख मी प्रथम करून दिली.

नगरपालिकेत निवडून आल्यावर शाळेच्या जगातून मी बाहेर पाय टाकला. प्राथमिक शिक्षकांसाठी नगरपालिकेतर्फे मी 'गांधी ट्रेनिंग कॉलेज' काढले, हे एक मोठे कार्य त्या वर्षी माझ्या हातून झाले. नगरपालिकेच्या क्षेत्रामधून मी राजकारणात

वाहात गेलो. चित्रपटकलेच्या व्यवसायानेही त्याच वेळी आपले सोनेरी दरवाजे माझ्यापुढे उघडले. शाळेचे जग माझ्या महत्त्वाकांक्षेला आणि कर्तृत्वाला अपुरे वाटू लागले. एकोणचाळीस साली 'कॅंप एज्युकेशन सोसायटी'च्या आजन्म सभासदत्वाचा मी राजीनामा दिला आणि शिक्षणक्षेत्रामधून बाहेर पडलो.

वकील होण्यासाठी म्हणून एकोणीस साली मी मुंबईला गेलो आणि तेथे शिक्षण-व्यवसायात जे पाऊल टाकले, ते बरोबर वीस वर्षांनी बाहेर काढले. शिक्षकाचा व्यवसाय हा माश्यांना पकडण्याच्या चिकटकागदा – ( tangle foot paper) सारखा आहे. त्याला माणूस एकदा चिकटला म्हणजे सहसा सुटत नाही, असे माझा एक पार्शी मित्र विनोदाने म्हणत असे. मी स्वतः शिक्षणाच्या व्यवसायात जरी अभावितपणे प्रवेश केला असला, तरी चिकटकागदाप्रमाणे मी त्या व्यवसायाला असहाय्यपणे वीस वर्षे चिकटला गेलो, असे मात्र विषादाने मी म्हणू शकणार नाही. माझ्या आयुष्यातील वीस तेजस्वी वर्षे शिक्षणव्यवसायात जातील अशी मात्र माझी मुळीच कल्पना नव्हती; पण एकदा आत पाऊल टाकल्यानंतर त्या व्यवसायाच्या सामर्थ्याचा साक्षात्कार मला झाला आणि मग माझे सर्वस्व त्यामध्ये ओतून, त्या 'चिकटकागदा'सह मी वर उडण्याचा प्रयत्न केला. कुठल्याही कार्यात पडल्यानंतर त्यामध्ये निर्जीवपणे पडून राहावयाचे हा माझ्या रक्ताचा मुळी धर्मच नाही. शिक्षणव्यवसायात मी काढलेला वीस वर्षांचा काळ हा माझ्या आयुष्यातला अतीव आनंदाचा आणि संतोषाचा काळ होय.

मला महिना शंभर रुपये पगार मिळत असे. ( त्यात तिकिटाचा एक आणा कमीच ) पुष्कळदा तर हा पगार आणि लेखनव्यवसायावर मला मिळत असलेले शेकडो रुपये मी माझ्या संस्थेसाठीच त्या वेळी खर्च केले. पैशाचा लोभ मला कधीच नव्हता. मला सेवेचे वेड आहे. 'सेवा आणि त्याग' ( Service & Sacrifice ) हे जे ब्रीदवाक्य मी 'कॅंप एज्युकेशन सोसायटी'च्या शिरोभागी ठेवले, ते वस्तुतः माझ्याच जीवनाचे ध्येय होते. शाळेच्या जगात मी तृप्त होतो; धुंद होतो. मग मी पगाराची अन् पैशाची कशाला पर्वा करू? सेवेचा आणि त्यागाचा माणसाला जो आध्यात्मिक मोबदला मिळतो, त्यापुढे मोहरांच्या ढिगाची काय मिजास आहे?

'कॅंप एज्युकेशन सोसायटी'सारख्या एका लहान अन् सामान्य शिक्षणसंस्थेमध्ये मी माझे सर्वस्व ओतले, ह्यात मी त्या संस्थेवर मोठे उपकार केले, असे मला कधीही वाटले नाही. उलट, क्षुद्र मत्सराच्या आणि हेव्याच्या जगापासून बाजूला अशा एका निवांत कोपऱ्यात माझ्या जीवनाची तपश्चर्या निर्वेधपणे करावयास मला संधी देऊन ह्या संस्थेने माझ्यावरच अनंत उपकार केले. 'कॅंप एज्युकेशन सोसायटी' ही माझी 'तपोभूमी' होय. ह्याच पार्श्वभूमीवर मी माझ्या वाङ्मयीन आणि सार्वजनिक जीवनाचे 'नीलचित्र' ( blue print ) रेखाटले. माझ्या वक्तृत्वाची, नाट्यलेखनाची आणि

समाजसेवेची ती एक प्रयोगशाळाच होती. मुलांना शिकवता शिकवता मीच शहाणा होत गेलो. ज्ञानाची उपासना करावयास लागणारे सर्व स्वास्थ्य आणि सामग्री मला येथेच मिळाली. सर्व जातींच्या आणि धर्मांच्या विद्यार्थ्यांना सतत अठरा वर्षे शिकवण्याची आणि त्यांच्या जीवनाशी संपूर्णपणे समरस होण्याची संधी ह्याच ठिकाणी मला लाभली. त्यामुळे माझ्या जीवनात समतेच्या तत्त्वज्ञानाची आणि पुरोगामी विचारांची बीजे पहिल्याने पेरली गेली. आजच्या राजकारणात माझी जी भूमिका आहे, तिचा उगम माझ्या शिक्षकीय जीवनातून झालेला आहे, हे समजल्याखेरीज तिची संगती लागणार नाही. 'कॅंप एज्युकेशन सोसायटी'ने मराठ्यांच्या, कामाठ्यांच्या, महारांच्या आणि मुसलमानांच्या मांडीला मांडी लावून मला जेवावयाला बसविले आणि जातिभेद हे माणुसकीचे लांच्छन आहे, हा भारताच्या उद्धाराचा महामंत्र मला शिकविला. मी त्या संस्थेचा जन्मोजन्मीचा ऋणी आहे.

संपली. माझ्या वीस वर्षांच्या शिक्षकीय जीवनाची गोष्ट इथे संपली. आयुष्य हे म्हशीसारखे हेकट आणि ओढाळ आहे. ते माणसाला कुठल्या कुठे फरफटत नेते. मी होतो कुठे आणि आलो कुठे ! शिक्षणक्षेत्रातली माझी शेकडो स्वप्ने तशीच अपुरी राहिली. समुद्रकिनाऱ्यावरच्या वाळूत रचलेले किल्ले अर्धवट सोडून मी अवखळ पोरासारखा दुसऱ्याच लाटेच्या मागे पळत गेलो. सर्जनशील बुद्धीला अनिरुद्ध संचार करावयाला शिक्षणक्षेत्रात अनंत आभाळे आहेत. स्वतंत्र भारताची नवीन मूर्ती घडवण्याचे सामर्थ्य फक्त शिक्षकात आहे. गगनाला गवसण्या घालणाऱ्या राजकीय पुरुषांच्या ध्येयवादी घोषणा साकार करून दाखवण्याची शक्ती फक्त शिक्षकात आहे. शिक्षक हेच जनतेचे खरे शिल्पकार आहेत

पारतंत्र्याच्या काळात परकीय सत्ताधाऱ्यांनी स्वार्थासाठी बांधून ठेवलेल्या ध्येयशून्य चबुतऱ्यावर नवभारताच्या शिक्षणाचे गगनचुंबी मनोरे बांधण्याचा हास्यास्पद प्रयत्न सध्या देशात चाललेला आहे. हे मनोरे कसे उभे राहू शकणार ? भारताच्या प्राचीन शिक्षकांना आणि त्यांनी देऊन ठेवलेल्या दिव्य मंत्रांना आजचे नेते विसरले आहेत. मानवतेचा शिक्षक होण्याचे सामर्थ्य भारताजवळ आहे. औपनिषदिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान ह्यांच्या तर्कशुद्ध समन्वयातूनच चिरंतन शांतीचा आणि सुखाचा मार्ग मानवतेला सापडेल; पण ते कार्य द्रष्ट्या आणि स्रष्ट्या शिक्षकांचे आहे. प्रतिभेची आणि कल्पनेची विद्युल्लता ज्यांच्या मस्तकात कडाडते आहे, अशा महाकवींचे आहे; पण हे कोणी कोणाला सांगायचे ? आणि ते ऐकण्याच्या मनःस्थितीत आज आहे कोण ?

शिक्षणाच्या कार्यात जीव अजूनही घोटाळतोच आहे.

[ 'मी कसा झालो'वरून संपादित. ]

# २

# शिक्षकाचे व्यक्तिसामर्थ्य

कोणत्याही शास्त्रामध्ये किंवा विषयामध्ये प्रामुख्याने दोन विभाग केले जातात; एक उपपत्ती ( थिअरी ) व दुसरा व्यवहार ( प्रॅक्टिस ). आपणांस नेहमी असे आढळून येते की, सत्यसृष्टीत उपपत्ती व व्यवहार ह्या दोहोंची सांगड घालणे फार कठीण असते. उपपत्ती ही उच्च व व्यापक असते आणि व्यवहार संकुचित असतो. शिक्षण-सृष्टीमध्ये उपपत्तीवर उभारलेले ध्येय व प्रत्यही दिले जाणारे शिक्षण, ह्या दोहोंत जितकी तफावत दिसून येते, तितकी इतरत्र क्वचितच पाहण्यास मिळेल. शिक्षणात ध्येय व व्यवहार यांची सांगड अद्याप घातली गेलेली नाही. शाळा म्हणजे काही एखादी पत्रांची पेटी नाही की, तिच्यात बाह्य जगातील ज्ञानाची पार्सले टाकता येतील. शाळा ही संस्कारभूमी आहे. तिच्यामध्ये काही विशिष्ट प्रकारचे संस्कार अनुभवी व्यक्तींकडून मुलांवर व्हावयाचे असतात.

कित्येक लोकांचा असा समज असतो की, शाळा म्हणजे ज्ञान देणारी संस्था आणि ११ ते ५ वाजेपर्यंत तेथे जे दिले जाते तेच शिक्षण. पण ही व्याख्या फार संकुचित आहे. ज्ञान देणे हे शिक्षणाचे केवळ एक अंग आहे व अध्यापन हा शिक्षणाच्या कार्यातील फक्त एक भाग, आणि तोही फार कमी महत्त्वाचा आहे.

शिकविणे आणि शिक्षण ह्यात फरक आहे. शिकविण्याची क्रिया मुले शिकल्या-शिवाय पुरी होत नाही. मुले शिकली तरच खरे शिक्षण दिले गेले असे म्हणता येईल. नाहीतर मुलगा शाळेत गेला म्हणजे त्याला ज्ञान मिळालेच, असे होत नाही. आज-काल कॉलेजमध्ये ज्या शिक्षणपद्धतीचा उपयोग केला जातो, त्याच पद्धती थोड्या-बहुत फरकाने शाळांतून अंमलात आणल्या जातात. मुलाला कोणता विषय शिकण्याची

हौस आहे, त्याची उपजत प्रवृत्ती कोणत्या विषयाकडे आहे, हे काही एक न पाहता शिकवावयाचे, असा सामान्यतः शिक्षकांचा प्रघात असतो. आपण बोलतो ते मुलास समजो की न समजो, शिक्षकांचे बोलणे चालूच असते. शिक्षण ही एक देवघेव आहे. ही एकांगी क्रिया नसून सापेक्ष क्रिया आहे, या गोष्टीकडे जुन्या शिक्षणात दुर्लक्ष झाले होते.

पुष्कळ शिक्षकांस असे वाटते की, आपण अमुक एक गोष्ट एकदा सांगितली की, मुलांच्या मनात बिंबलीच. त्यांना अशी खात्री असते की, आपण जी गोष्ट सांगितली ती मुलांना बरोबर पटलीच पाहिजे. शिवाय शिक्षणाचा ठरविलेला भाग त्यांना इतका काही महत्त्वाचा वाटतो की, तो पुरा झालाच पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष असतो. त्यामुळे मुलांना कळो अगर न कळो, उरलेला भाग ते मुलांवर बळेच लादू पाहतात. अमुक एक ' पोर्शन ' किंवा भाग मी शिकविला, असे म्हणण्यात त्यांना मोठे भूषण वाटते. पण मुले खरोखर काय शिकली, हे त्यांचे त्यांनाच समजत नाही. नियमित अभ्यासक्रम पुरा करावयाचा, याकडे त्यांची नजर असते. मास्तरांनी मुलांच्या मनावर काय परिणाम केला व किती शिकविले हे मोजण्याचे एखादे नवीन यंत्र तयार होईल, तर मात्र या शिक्षकांना अत्यंत आश्चर्य वाटण्यासारख्या गोष्टी कळून येतील.

व्याख्यानपद्धतीवर हल्ली बरेच आक्षेप घेण्यात येतात. ही सुधारण्याबद्दल निरनिराळ्या ठिकाणी बऱ्याच चळवळी झाल्या आहेत. सामान्यतः वर्गात शिक्षण काय द्यावे, मुलाची प्रवृत्ती काय आहे, ती अमुक एक विषय शिकतील किंवा नाही, सर्व मुले एकाच कलाची आहेत, की त्यांच्या प्रवृत्ती भिन्न आहेत, कोणता विषय कोणत्या मुलास शिकविला म्हणजे त्यात तो प्राविण्य मिळवू शकेल, वगैरे गोष्टींकडे शिक्षकांनी नीट लक्ष देऊन शिक्षण दिले, तरच मुलांच्या मनावर त्याचा योग्य परिणाम होईल व मुलांची निरनिराळ्या विषयांत प्रगती होईल. पण मुलांची सध्या अशी परिस्थिती शाळेत दिसून येत नाही. अमूक एक विषय शिकला पाहिजे, असे अभ्यासक्रमात ठरविलेले असले म्हणजे तो शिकलाच पाहिजे; कोणाला नको असेल तर ते चालावयाचे नाही, अशी जी आजकालची परिस्थिती उत्पन्न झाली आहे, ती सुधारणे अत्यंत इष्ट आहे.

आपण केव्हाही पाहिले तर काही मुले कमी बुद्धीची, काही जास्त बुद्धीची, अशी आढळून येतात. त्यांना त्यांच्या मानानेच शिकविले पाहिजे. हल्लीच्या शाळांतील मुलांची एका शिक्षणशास्त्रज्ञाने लहानमोठ्या आकाराच्या बाटल्यांशी तुलना केली आहे. वर्गात शिक्षक आपले व्याख्यान बादलीने पाणी फेकल्याप्रमाणे त्यांच्यावर फेकीत असतो. त्यातून जेवढे पाणी आत जाईल व त्याने बाटल्या काय भरतील त्या भरतील. बहुतेक पाणी फुकटच जाते, आणि शिक्षकाच्या श्रमाचा अपव्यय होतो.

ही स्थिती आमच्या बहुतेक शाळांची आहे. वर्गपद्धतीत हा मोठा दोष आहे. सर्व मुलांना एकाच पद्धतीने शिकविता येणे अशक्य आहे. प्रत्येक मुलाला निराळी पद्धत लाविली पाहिजे तरच त्याची प्रगती होईल, ही गोष्ट हल्लीच्या वर्गपद्धतीत शक्य नाही.

प्रत्येक मुलास आपला पूर्ण विकास करून घेण्यास व्यक्तिशः संधी देण्यात आली पाहिजे. जेथे अशी व्यक्तिशः संधी देण्यात येते, तेथे अधिक फायदा दिसून येतो. कारण मुलांवर अमुक एका विषयाचे जोखड किंवा बंधन नसते.

अशा रीतीने आता वर्गपद्धतीविरुद्ध चळवळ सुरू झाली आहे. आता शिक्षणाकडे बघण्याची दृष्टी बदलली आहे. प्रत्येक मूल ही स्वतंत्र व्यक्ती समजून तिच्या दृष्टीने शिक्षणाची रूपरेषा आखली पाहिजे. वर्गपद्धतीचे महत्त्व नाहीसे झाल्यामुळे अध्यापनाचेही महत्त्व कमी होत चालले आहे. कारण अध्यापनाची जागा मुलाच्या आत्मशिक्षणाने आता घेतली जात आहे. आता शिक्षकाचे काम म्हणजे मुलाला साधारणपणे कोणत्या अडचणी येतात, त्यांकडे लक्ष पुरवून त्यांचे निरसन कसे करावयाचे, याचा विचार करावयाचा व विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यास मदत करावयाची हेच आहे. पण वर्गपद्धती जोपर्यंत अजिबात नाहीशी झाली नाही तोपर्यंत अध्यापनाची बरीचशी जरूर भासणारच व वर्गपद्धती गेली तरीही अध्यापन पूर्णपणे नाहीसे होणार नाहीच. मात्र आता शिक्षकाच्या कार्याची दिशा बदलली पाहिजे.

नवीन शिक्षणात शिक्षक मागे बसतो व मुलांनीच स्वतः शिकावे अशी परिस्थिती उत्पन्न करतो. त्याने सूत्रधाराप्रमाणे शक्यतितके पडद्यापाठीमागे राहून शिक्षणाचे कार्य करावयाचे असते. तथापी यामुळे शिक्षकाची जबाबदारी कमी झाली आहे, असे मुळीच नाही; उलट अधिक वाढली आहे. सामान्य लोकांची अशी कल्पना असते की, कोणचाही माणूस शिक्षक झाला तरी चालेल. लहान मुलांना कमी शिकलेला मास्तर असला तरी त्यांना चालतो. त्यांची कल्पना अशी की वरच्या वर्गाला जास्त शिकलेला मास्तर हवा पण एवढ्याशा मुलाला इतका शिकलेला मास्तर कशाला ? पण तेच लहान मूल आजारी पडले तर मात्र त्यांना मोठा डॉक्टर लागतो, एखादा अर्धवट वैद्य पुरत नाही.

हे अज्ञान आता जात चालले आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. शिक्षकाच्या कामाला आता ‘ धंदा ’ हे स्वरूप येत चालले आहे व त्याच्या धंद्याचे वैशिष्ट्य अधिक प्रगट होऊ लागले आहे. कोणचाही धंदा घेतला तर त्याला काहीतरी पूर्वतयारी लागते. सध्यापेक्षा शिक्षकानेही काही अधिक तयारी केली पाहिजे, ह्यामुळे त्याचे कार्य जास्त जास्त अवघड होत चालले आहे; त्याचप्रमाणे ते अधिक व्यापक होत चालले आहे. नुसत्या शाळेपुरतेच ते मर्यादित राहिलेले नाही.

अलीकडच्या शिक्षणात शिक्षकाच्या व्यक्तित्वाचे ( पर्सनॅलिटी ) फार महत्त्व आहे. शिक्षकाचे चारित्र्य चांगले असले पाहिजे, कारण मुले त्याचे सारखे अनुकरण करीत

असतात. मुलांच्या अंगात अनुकरण करणे हा एक मोठा गुण आहे. लहानसहान गोष्टीतही शिक्षक जसे करील तसेच मुलेही करीत असतात. शिक्षकाने कॉलरची गुंडी उघडी टाकली तर मुलेही टाकतात. ते नीतीने वागत असले तर मुलेही तशी वागतात. ते रागावले की मुले रागावतात. सारांश, मुलांची स्थिती माकडासारखी असते. त्यांना चांगले वळण लागावे अशी इच्छा असेल, तर शिक्षकाने चांगलीच खबरदारी घेतली पाहिजे. शिक्षक म्हणजे त्यांचा आदर्श. जसे शिक्षक आचरणात आणील तसे मुले करतात. त्यांच्या डोळ्यांस ज्या गोष्टी दिसतात, त्यांचे ती झटकन् अनुकरण करू पाहतात.

शिक्षणाच्या कामात शिक्षकाने मुलांशी समरूप होऊन गेले पाहिजे. त्यांस कोणताही विषय शिकविताना मुलांच्या दृष्टीने पाहिले पाहिजे. विद्यार्थ्यांशी समरूप झाले की, शिक्षकाचे गुण मुलांत उतरतात. प्रथम मुले बाह्यांगाचे अनुकरण करतात व नंतर अंतरंगात समरूप होऊन त्याचे विचार आपल्यांत उतरवितात. तेव्हा शिक्षकाने बाह्यांगही सुंदर ठेवावे. पोषाखात टापटीप, स्वच्छता, इत्यादी गोष्टी असणे हे आवश्यक आहे. एकदा बाह्यांगावरून मुलांचा शिक्षकाविषयी वाईट ग्रह झाला की, त्याच्या शिक्षणाचा मुलांच्यावर काहीही परिणाम होणे शक्य नाही. त्याचप्रमाणे शिक्षकाचा पोषाख हा काही ठराविक पद्धतीचाच असावा, त्यात छचोरपणा व धरसोड असू नये. जरुरीशिवाय पोषाखात आज एक तर उद्या दुसरा, असा अकारण फेरफार करू नये.

तसेच शिक्षकाने कोणताही हुकूम देताना, तो विचार करून द्यावा. आपण असा विचार केला पाहिजे की, आपण जर विद्यार्थ्यांच्या जागी असतो, तर काय केले असते. जे काम सांगावे ते विचार करून सांगावे. एकदा हुकूम दिल्यावर मग मात्र त्यात काही झाले तरी फेरफार करू नये. एकदा असे झाले की, मुलांना दहा दिवसांची सुटी होती. मास्तरांनी सत्तर उदाहरणे करून आणण्यास सांगितली. इतकी उदाहरणे आपणांस होणे शक्य नाही, असे मुलांना वाटून त्यांनी सत्तराच्या ऐवजी सातच उदाहरणे करून आणली. 'असे का?' म्हणून विचारताच, "इतक्या वेळात एवढी उदाहरणे होणार कशी?" असा प्रश्न मुलांकडून आला. मास्तरही तेवढ्यावरच थांबले, कारण सगळ्याच मुलांनी तसे केले होते, तेव्हा ते तरी काय करणार?

शिक्षकाने आपले चारित्र्य चांगले ठेवावे. आपल्या अधिकाराचा विनाकारण फायदा घेऊ नये. उत्तम चारित्र्य ठेवणे ही काही लहानसहान गोष्ट नाही. ते फार अवघड काम आहे, पण ते साध्य करून दाखविले तर त्याचा मुलांच्या मनावर पुष्कळ परिणाम होतो. शिक्षक हा पंडित असला तर उत्तमच. पण शिक्षकाला खूप ज्ञान नसले तरी शिकविण्याची पद्धत आणि विषय मुलांच्या मनावर बिंबविण्याची

शक्ती पाहिजे. एकवार पद्धतशीर ज्ञान नसले तरी चालेल, पण जे ज्ञान असेल.ते मुलांच्या मनात उतरविण्याची कला पाहिजे. शिवाय तेवढ्यानेच भागणार नाही; शिक्षकाला मुलाचे मनात त्या विषयाबद्दल अभिरुची व जिज्ञासा उत्पन्न करता आली पाहिजे.

ही गोष्ट आपल्याला शाळेत नेहमी दिसून येते की, शाळेत कोणते शिक्षक अधिक प्रिय आहेत असे मुलांना विचारले तर "क्रिकेट शिकविणारे" असे उत्तर येईल. त्यांच्याभोवती दहापाच मुलांचा गराडा नेहमी असावयाचाच. अमक्याने अमुक रन्स काढल्या, अमक्याने चेंडू चांगला फेकला, वगैरे विषय तेथे निघतील. पण तेच गणित वगैरे शिकविणाऱ्या शिक्षकाजवळ कोणी जमतात काय? कोणी उत्साहाने जमत नाहीत. याचे कारण क्रिकेट शिकविणाऱ्या मास्तरांनी क्रिकेटमध्ये जी अभिरुची उत्पन्न केली, ती इतर मास्तरांनी केली नाही हे होय. शिक्षकाने मुलांमध्ये स्फूर्ती उत्पन्न करण्यास शिकले पाहिजे. त्याने आपल्या विषयाची चांगली तयारी केली पाहिजे. त्यात मुलांचे मन रंगेल अशी विनोदी वृत्ती धारण केली पाहिजे. मात्र तिचा अतिरेक होता कामा नये, नाहीतर उलट विषयाकडचे लक्ष भलतीकडे जाईल. आपल्या शिकविण्याने मुलांस शीण येता कामा नये.

त्याचप्रमाणे शिक्षकाला जो विषय शिकवावयाचा असेल, त्याचे ज्ञान असल्या-शिवाय उगाच शिकविण्यास जाऊ नये. एखाद्या विषयाची चांगली माहिती नसली, तर त्याने सौम्यपणाने पण स्पष्टपणे हेडमास्तरांस सांगावे, "मला हा विषय येत नाही; माझ्या आवडीचा दुसरा विषय मी शिकवीन."

शिक्षकाला व्यसने असू नयेत. निदान शाळेत तरी शिक्षकांनी धूम्रपान वगैरे करू नये. तसे केल्याने मुलेही तेच करतील. तेव्हा शिक्षकाने असे वागावे की, आदर्श म्हणून मुलांनी त्याचे अनुकरण करावे.

एका शिक्षकाने दुसऱ्याची टवाळी करू नये. मुलांच्या देखत त्यांची बेअदबी किंवा निंदास्तुती करू नये. वर्गात एका शिक्षकाविरुद्ध दुसऱ्या शिक्षकाने केव्हाही बोलता कामा नये. त्यापासून त्यांचा मान कमी होतो. व मुलांच्या मनावर त्या गोष्टी बिंबल्या की, त्यांचा ग्रह फार वाईट होऊन बसतो. एकदा असा वाईट ग्रह झाला म्हणजे त्याने कोणत्याही गोष्टी सांगितल्या, तरी त्या मुलांना पटत नाहीत. पुष्कळ वेळा दोन शिक्षकांत झुंज लावण्यात मुलांना फार गंमत वाटते, पण शिक्षकाने अशी संधी त्यांना देऊ नये. केव्हा केव्हा शिक्षकाचे तोंडून चुकीने काही गोष्टी बोलल्या जातात. चूक आढळून आली, तर ती ताबडतोब कबूल करावी. त्यात कमीपणा येत नाही. उलट असे केल्याने मुलांमध्ये शिक्षकाविषयी आदर उत्पन्न होतो. माहीत नसलेल्या गोष्टी खऱ्याच, असे वृथा प्रतिपादन करणारे शिक्षक नसले तरच बरे. त्यांच्यापासून फायदा होण्याऐवजी तोटाच होतो.

शिक्षकांच्या अंगी वक्तशीरपणा हा गुण जरूर असला पाहिजे. पुष्कळ वेळा असे

होते की, मुले पेपर्स किंवा वह्या तपासून मागतात व मास्तर उद्या तपासून आणतो, असे सांगतात. दुसऱ्या दिवशी पुन्हा विचारले की, काही तरी वायदा सांगतात. असे एकदा दोनदा पाहिले की, मुलांचा मास्तरांवरील विश्वास उडतो व त्यांनी काही सांगितले तरी खरे वाटत नाही. तेव्हा शिक्षकाने असे प्रकार शक्य तितके टाळावे. सध्याच्या शाळापद्धतीत दर तासानंतर पाच मिनिटांची विश्रांती देण्यात येते व वर्ग बदलत असतात. अशा वेळी तर वक्तशीरपणाची खबरदारी शिक्षकांनी अवश्य घेतली पाहिजे. दहा पाच मिनिटे उशिरा जाऊन, नंतर घाई घाई करून शिकविणारे शिक्षक बरेच असतात. पण त्यांच्या हातून शिक्षणाचे काम नीटसे होत नाही. त्याच-प्रमाणे तास संपला की, तावडतोब काम बंद करावे, हेही रास्त आहे. त्यापासून आपला करारीपणा दिसून येतो. मुलांची खात्री होते की, अमुक वेळात आपली येथून सुटका होणार. शिवाय घंटा झाल्यावर मुलांचे विषयांकडे लक्ष राहणे शक्य नसते.

मुलांशी शिक्षकाने कधीही असभ्यतेची भाषा वापरू नये. कित्येक शिक्षकांना अशी सवय असते की, मुलगा आला म्हणजे त्याला काहीतरी टोपण–नाव द्यावे. शिक्षकाने सभ्यपणा धरला पाहिजे. असभ्य शिक्षकाचा मान राहात नाही. मुले त्याचेच अनुकरण करून असभ्य भाषा वापरू लागतात व शिक्षकांनाही टोपण–नावे मिळतात.

तसेच शिक्षकाने आपली प्रकृती चांगली ठेवली पाहिजे. शरीर चांगले कमावले असले पाहिजे. शरीरापासून इतर व्यवसाय करावयाचे असतात तर त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. वर उल्लेखित केलेले नियम जर शिक्षक पाळतील तर त्यांचे व्यक्तिसामर्थ्य वाढावयास हरकत नाही.

[ **अध्यापन,** फेब्रु. १९३२ ]

शक्ती पाहिजे. एकवार पद्धतशीर ज्ञान नसले तरी चालेल, पण जे ज्ञान असेल.ते मुलांच्या मनात उतरविण्याची कला पाहिजे. शिवाय तेवढ्यानेच भागणार नाही; शिक्षकाला मुलाचे मनात त्या विषयाबद्दल अभिरुची व जिज्ञासा उत्पन्न करता आली पाहिजे.

ही गोष्ट आपल्याला शाळेत नेहमी दिसून येते की, शाळेत कोणते शिक्षक अधिक प्रिय आहेत असे मुलांना विचारले तर "क्रिकेट शिकविणारे" असे उत्तर येईल. त्यांच्याभोवती दहापाच मुलांचा गराडा नेहमी असावयाचाच. अमक्याने अमुक रन्स काढल्या, अमक्याने चेंडू चांगला फेकला, वगैरे विषय तेथे निघतील. पण तेच गणित वगैरे शिकविणाऱ्या शिक्षकाजवळ कोणी जमतात काय? कोणी उत्साहाने जमत नाहीत. याचे कारण क्रिकेट शिकविणाऱ्या मास्तरांनी क्रिकेटमध्ये जी अभिरुची उत्पन्न केली, ती इतर मास्तरांनी केली नाही हे होय. शिक्षकाने मुलांमध्ये स्फूर्ती उत्पन्न करण्यास शिकले पाहिजे. त्याने आपल्या विषयाची चांगली तयारी केली पाहिजे. त्यात मुलांचे मन रंगेल अशी विनोदी वृत्ती धारण केली पाहिजे. मात्र तिचा अतिरेक होता कामा नये, नाहीतर उलट विषयाकडचे लक्ष भलतीकडे जाईल. आपल्या शिकविण्याने मुलांस शीण येता कामा नये.

त्याचप्रमाणे शिक्षकाला जो विषय शिकवावयाचा असेल, त्याचे ज्ञान असल्या-शिवाय उगाच शिकविण्यास जाऊ नये. एखाद्या विषयाची चांगली माहिती नसली, तर त्याने सौम्यपणाने पण स्पष्टपणे हेडमास्तरांस सांगावे, "मला हा विषय येत नाही; माझ्या आवडीचा दुसरा विषय मी शिकवीन."

शिक्षकाला व्यसने असू नयेत. निदान शाळेत तरी शिक्षकांनी धूम्रपान वगैरे करू नये. तसे केल्याने मुलेही तेच करतील. तेव्हा शिक्षकाने असे वागावे की, आदर्श म्हणून मुलांनी त्याचे अनुकरण करावे.

एका शिक्षकाने दुसऱ्याची टवाळी करू नये. मुलांच्या देखत त्यांची बेअदबी किंवा निंदास्तुती करू नये. वर्गात एका शिक्षकाविरुद्ध दुसऱ्या शिक्षकाने केव्हाही बोलता कामा नये. त्यापासून त्यांचा मान कमी होतो. व मुलांच्या मनावर त्या गोष्टी बिंबल्या की, त्यांचा ग्रह फार वाईट होऊन बसतो. एकदा असा वाईट ग्रह झाला म्हणजे त्याने कोणत्याही गोष्टी सांगितल्या, तरी त्या मुलांना पटत नाहीत. पुष्कळ वेळा दोन शिक्षकांत झुंज लावण्यात मुलांना फार गंमत वाटते, पण शिक्षकाने अशी संधी त्यांना देऊ नये. केव्हा केव्हा शिक्षकाचे तोंडून चुकीने काही गोष्टी बोलल्या जातात. चूक आढळून आली, तर ती ताबडतोब कबूल करावी. त्यात कमीपणा येत नाही. उलट असे केल्याने मुलांमध्ये शिक्षकाविषयी आदर उत्पन्न होतो. माहीत नसलेल्या गोष्टी खऱ्याच, असे वृथा प्रतिपादन करणारे शिक्षक नसले तरच बरे. त्यांच्यापासून फायदा होण्याऐवजी तोटाच होतो.

शिक्षकांच्या अंगी वक्तशीरपणा हा गुण जरूर असला पाहिजे. पुष्कळ वेळा असे

होते की, मुले पेपर्स किंवा वह्या तपासून मागतात व मास्तर उद्या तपासून आणतो, असे सांगतात. दुसऱ्या दिवशी पुन्हा विचारले की, काही तरी वायदा सांगतात. असे एकदा दोनदा पाहिले की, मुलांचा मास्तरांवरील विश्वास उडतो व त्यांनी काही सांगितले तरी खरे वाटत नाही. तेव्हा शिक्षकाने असे प्रकार शक्य तितके टाळावे. सध्याच्या शाळापद्धतीत दर तासानंतर पाच मिनिटांची विश्रांती देण्यात येते व वर्ग बदलत असतात. अशा वेळी तर वक्तशीरपणाची खबरदारी शिक्षकांनी अवश्य घेतली पाहिजे. दहा पाच मिनिटे उशिरा जाऊन, नंतर घाई घाई करून शिकविणारे शिक्षक बरेच असतात. पण त्यांच्या हातून शिक्षणाचे काम नीटसे होत नाही. त्याच-प्रमाणे तास संपला की, ताबडतोब काम बंद करावे, हेही रास्त आहे. त्यापासून आपला करारीपणा दिसून येतो. मुलांची खात्री होते की, अमुक वेळात आपली येथून सुटका होणार. शिवाय घंटा झाल्यावर मुलांचे विषयांकडे लक्ष राहणे शक्य नसते.

मुलांशी शिक्षकाने कधीही असभ्यतेची भाषा वापरू नये. कित्येक शिक्षकांना अशी सवय असते की, मुलगा आला म्हणजे त्याला काहीतरी टोपण–नाव द्यावे. शिक्षकाने सभ्यपणा धरला पाहिजे. असभ्य शिक्षकाचा मान राहात नाही. मुले त्याचेच अनुकरण करून असभ्य भाषा वापरू लागतात व शिक्षकांनाही टोपण–नावे मिळतात.

तसेच शिक्षकाने आपली प्रकृती चांगली ठेवली पाहिजे. शरीर चांगले कमावले असले पाहिजे. शरीरापासून इतर व्यवसाय करावयाचे असतात तर त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. वर उल्लेखित केलेले नियम जर शिक्षक पाळतील तर त्यांचे व्यक्तिसामर्थ्य वाढावयास हरकत नाही.

[ **अध्यापन**, फेब्रु. १९३२ ]

# ३

## पाठ मनोरंजक कसा करावा ?

पाठामध्ये मनोरंजकता आणण्याची साधने दोन प्रकारची आहेत. पहिली वास्तविक: म्हणजे मॉडेल्स, चित्रे, फोटो, आकृती, नकाशे, आराखडे, प्रत्यक्ष वस्तू वगैरे. व दुसरी वाचिक: म्हणजे उपमा, रूपक, दृष्टांत, वर्णन, गोष्टी, अभिनय वगैरे बोलण्याची साधने. ह्यांपैकी पहिली वास्तविक साधने फार जपून वापरली पाहिजेत; नाही तर पाठात कृत्रिमता येते. व वर्ग म्हणजे एक प्रदर्शनच होते. आपल्या विषयासंबंधी हाती लागेल ते चित्र अगर फोटो तो विषय विशद करून द्यावयास उपयोगी पडेलच असे नाही. काही चित्रे अगर फोटो इष्ट गोष्टींवर प्रकाश पाडणारी नसतात. वास्तविक साधनांपैकी जेवढी जरूर असतील तेवढीच पाठाचे वेळी उपयोगात आणावी. बाकीची साधने उपलब्ध असली, तरी मुलांना फावल्या वेळी ती पाहण्यास सांगावे. ज्या वेळी एखाद्या गोष्टीची कल्पना वर्णनावरून नीटशी येत नसेल, त्या वेळी चित्राचा वगैरे जरूर उपयोग करावा. मुलांच्या मनात योग्य त्या प्रतिमा निर्माण करण्याचे काम निव्वळ त्यांच्या कल्पनेवर सोपवू नये. वर सांगितलेल्या साधनांनी मुलांची समजूत सहज व चांगली पटून मनोरंजनही होते. कारण मुलांना मूर्त गोष्टी आवडतात. निरनिराळी साधने जरूर वापरावी; पण ती थोडी वापरावी; त्यांचा अतिरेक करू नये. शिकविताना वास्तविक साधन म्हणून स्वतःचा उपयोग शिक्षकाने होता होईतो करू नये. स्वतःचे उदाहरण दिल्यास पुष्कळ वेळा ते हास्यास्पद होते.

अलीकडे दृक्‌शिक्षणाचे महत्त्व लोकांना हळू हळू पटू लागले आहे. काही लोक दृक्‌शिक्षण म्हणणे फक्त चित्रदीप ( मॅजिक लॅंटर्न ) वा चित्रपट ( सिनेमा ) एवढेच समजतात. पण दृक्‌शिक्षणाची व्याप्ती फार मोठी आहे. दृक्‌शिक्षणाची कल्पनाही

नवी नाही. कोरलेली लेणी, रंगविलेली ऐतिहासिक व इतिहासपूर्व चित्रे, ही त्या वेळची दृक्‌शिक्षणाची साधनेच होती. डोळा हे सर्वांत महत्त्वाचे इंद्रिय असल्यामुळे त्याच्या द्वारे जे ज्ञान मिळते, ते चांगले ठसते व टिकते, ही गोष्ट शिक्षणशास्त्रज्ञांना आता पूर्णपणे पटलेली आहे.

दृक्‌शिक्षणाच्या साधनांत प्रत्यक्ष वस्तूचे निरीक्षण हे सर्वांत चांगले. ह्या दृष्टीने सहली किंवा सफरी ह्यांचे शिक्षणात फार महत्त्व आहे. त्यांच्या योगाने शिक्षकाला मुलांच्या निकट सहवासाचा फायदा मिळून पुष्कळ वेळा कनिष्ठ बुद्धीच्या मुलांतूनसुद्धा काही चांगले गुण असतात, ते शोधून काढण्यास संधी मिळते. शिक्षणास मदत म्हणून ज्या वेळी सहल काढावयाची असेल, त्या वेळी मुलांपुढे काही तरी विशेष हेतू ठेवून तो उद्देश मुलांना आगाऊच स्पष्ट करून सांगावा, म्हणजे तिचा पूर्ण फायदा मिळेल. पदार्थसंग्रहालयात मुलांना नेणेही फार चांगले असते. पण त्याची मांडणी चांगली केलेली असली पाहिजे व तेथेही वरील नियम लागू पडतोच.

वर्गात उपयोगात आणावयाची दृक्‌शिक्षणाची साधने अनेक आहेत. प्रत्यक्ष वस्तूंची अगर प्राण्यांची मॉडेल्स ही शिकविण्यास फार उपयोगी असतात. पण बाजारात आयती विकत मिळणारी मॉडेल्स फार महाग असतात. ती शाळेत विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी स्वतः तयार करणे हे चांगले. त्यापासून विद्यार्थ्यांना त्या विषयाचा परिचयही जास्त चांगला होतो. नकाशे, गोल वगैरे साधनांविषयी माहिती पुढे येईलच. शिक्षकाला सर्वांत निकटचा व हमखास उपयोगी पडणारा मित्र म्हणजे फळा. शिक्षकाला झटकन चित्रे वगैरे काढता आली, तर फळ्यासारखे दृक्‌शिक्षणाचे सहज उपलब्ध होणारे दुसरे साधन नाही.

मुलांना आकड्यांमध्ये माहिती सांगितली, तर नीटशी समजत नाही. तेव्हा आकड्यांची चांगली कल्पना देण्यास निरनिराळ्या तऱ्हेच्या आलेखांचा ( ग्राफ्सचा ) फार उपयोग होतो. ह्या आलेखांत निरनिराळ्या रंगांचा उपयोग केला व उभे, आडवे रंगाचे पट्टे किंवा वर्तुळाचे विभाग वगैरेंनी आकडे मूर्त स्वरूपात मुलांपुढे उभे केले, तर भूगोल, इतिहास, अंकगणित वगैरे विषयांत फार मदत होते. चित्रे, फोटो वगैरेंचाही शिकविताना फार उपयोग होतो. पण बहुधा ही फार बारीक असतात व प्रत्यक्ष शिकविताना त्यांचा उपयोग करता येत नाही. वर्गात लावून ठेविली असता मुलांना ती फावल्या वेळी बघता येतात. हास्यचित्रे ( कार्टून्स ) आपण शिक्षणात अजून फारशी वापरू लागलो नाही; पण ती फार उपयोगी पडण्यासारखी असतात. कारण त्यांचे मदतीने अगदी थोडक्यात फार मार्मिकतेने एखादी गोष्ट झटकन पटवून देता येते.

चित्रांत एक दोष असतो की, त्यांचेमध्ये अंतराची कल्पना ( परस्पेक्टिव्ह ) येत नाही. स्टीरियॉस्कोपने ही गोष्ट साधता येते व एखादा देखावा प्रत्यक्ष उभा करता

येतो. पण हा एका वेळी फक्त एकालाच वापरता येणे शक्य असल्याने सबंध वर्गाला ३०—३५ यंत्रे असल्याशिवाय एकदम उपयोगात आणता येणार नाही. फावल्या वेळी बघण्याकरिता म्हणून वर्गात आणून ठेवल्यास हा उपयोगी पडण्यासारखा आहे. वर दिलेल्या सर्व साधनांतील उणीव भरून काढण्याकरिता मॅजिक लँटर्न व सिनेमा हल्ली उपयोगात आणतात. ह्यांचे निरनिराळे प्रकार आहेत. पण शैक्षणिक कामाकरिता त्यांचा उपयोग करावयाचा असेल, तर वर्गाची आगाऊ पूर्वतयारी केल्याशिवाय त्यांचा उपयोग करता कामा नये; केवळ करमणूक म्हणून मात्र त्यांचा केव्हाही उपयोग करण्यास हरकत नाही.

ही सर्व साधने झाली, तरी त्यांनी जिवंत शिक्षकाची जागा कधीही भरून निघणार नाही. त्याची जरूर नेहमी लागणारच. त्याचप्रमाणे वाचनालय वगैरे इतर साधनेही शाळेत हवीच. दृक्शिक्षणाची थोरवी सांगताना अतिशयोक्ती करता कामा नये. ते फक्त इतरांना पूरक आहे व ते योग्य तऱ्हेने वापरले तरच फायदा होतो. शाळेच्या बाहेर समाजशिक्षणातही दृक्शिक्षणाचे फार महत्त्वाचे स्थान आहे. पण त्यासंबंधी येथे लिहिण्याचे कारण नाही.

वर वाचिक साधने जी दिली आहेत, त्यांपैकी पाठ मनोरंजक करण्याचे सर्वात उत्कृष्ट साधन म्हणजे गोष्ट हे आहे. विषय-प्रवेशात गोष्टीचे महत्त्व फार आहे. गोष्टी मुलांना फार आवडतात व त्या त्यांच्या चटकन लक्षातही राहतात. कंटाळलेल्या मुलांचे लक्ष विषयाकडे खेचून आणण्याच्या कामी गोष्टींचा फार उपयोग होतो. परंतु हे सर्व फायदे गोष्टीची निवड चांगल्या प्रकारची झाली, तरच होतात. प्राचीन काळी गोष्टींचा उपयोग मुख्यतः नीतिशिक्षणाकडे केला जात असे. हल्ली सर्व विषय शिकविताना गोष्टींचा उपयोग होतो. मुलांच्या मनाप्रमाणे निरनिराळ्या तऱ्हेच्या गोष्टी सांगाव्या लागतात. अगदी लहान मुलांना लघुकथा किंवा लोककथा ( फोकलोर ) आवडतात. आपल्याकडे पाश्चात्त्य देशांप्रमाणे पऱ्यांच्या गोष्टी ( फेअरी टेल्स ) वगैरे नाहीत. पण त्यांची जागा पुराणांतल्या गोष्टींनी भरून काढता येते. मुलांना सहज समजतील, अशा देवादिकांच्या गोष्टी निवडून काढल्या, तर त्या त्यांना आवडतात. ८/९ वर्षांच्या मुलांना अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी फार आवडतात. मात्र योग्य निवड झाली पाहिजे. भुताखेतांच्या गोष्टी लहान मुलांना सांगू नयेत. कारण त्यांच्या मनात पुष्कळ वेळा भलतीशी भीती बसते. "मुलांच्या कल्पनाशक्तीचा विकास करावयाचा तर त्यांना फक्त खऱ्या असतील, तेवढ्याच सांगाव्या; कपोलकल्पित कथा सांगू नये."—असे मॉंटेसोरीचे म्हणणे आहे. पण ते निर्णयात्मक नाही. लहान मुलांची सृष्टीच काल्पनिक असते. मोठ्या माणसांना सत्यासत्याची बरीचशी जाणीव झालेली असते; तरी त्यांनासुद्धा काल्पनिक गोष्टी आवडतात. मग लहान मुलांना कल्पनेत भराऱ्या मारणे आवडते, यात नवल नाही. फुले, फळे, पक्षी

प्राणी यांची त्यांना उपजत आवड असते. आणि जोपर्यंत गोष्टींतील काल्पनिक भाग अशक्य आहे, याची जाणीव त्यांना उत्पन्न झालेली नाही, तोपर्यंत अशा गोष्टी सांगण्यास हरकत नसावी.

लहान मुलांना सांगावयाच्या गोष्टी साध्या असाव्या व त्यांची भाषा मुलांना समजेल अशी सोपी असावी. अगदी लहान मुलांच्या गोष्टीत शब्दांची पुनरावृत्ती असावी. पुनरावृत्तीने गोष्टीत माधुर्य आणि संगीत निर्माण होते. दाते यांच्या लोककथा किंवा कारखाननिसांनी लहान मुलांकरिता लिहिलेल्या गोष्टी ह्या चांगल्या गोष्टींची उदाहरणे होत. गोष्टींमध्ये नायक केवळ विचार करणारा नसावा, किंवा गोष्ट निव्वळ संभाषणात्मक नसावी. गोष्टीतील मुख्य पात्र काहीतरी क्रिया करणारे असावे; तीत काही तरी हालचाल ( ॲक्टिव्हिटी ) असली पाहिजे. उदाहरणार्थ, सुष्टांना बक्षीस आणि दुष्टांना दंड अशा तऱ्हेचा भावार्थ असलेल्या किंवा मारामारीच्या गोष्टी मुलांना फार आवडतात.

जी गोष्ट सांगावयाची ती शिक्षकाला पटलेली असून शिक्षकाचा तिच्यावर विश्वास पाहिजे. गोष्टीतील पात्रांविषयी शिक्षकाला सहानुभूती वाटून त्याने पात्रांशी तन्मय होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गोष्ट सांगताना अडखळता कामा नये, म्हणून शिक्षकाने ती पाठ करून ठेवावी. अशा तऱ्हेची शिक्षकाची पूर्वतयारी होईपर्यंत गोष्ट सांगू नये. गोष्ट सांगताना शिक्षकाचे तोंड सर्व मुलांना दिसले पाहिजे. कारण, शिक्षकाचे सर्व हावभाव व तोंडावरील आविर्भाव मुलांना दिसले, तरच मुलांच्या मनात योग्य भावना उत्पन्न होऊन त्यांना ती गोष्ट नीट कळेल. गोष्टीमधील अडचणींचा निरास अगोदरच करावा म्हणजे मध्येच मुले प्रश्न विचारणार नाहीत व गोष्टीचा धागा तुटून रसभंग होणार नाही. गोष्ट होता होईतो लहान असावी. पण मोठी असल्यास योग्य टप्प्याटप्प्याने तिचे भाग पाडावेत. प्रत्येक गोष्टीत एक शिखर ( क्लायमॅक्स ) असावे. गोष्टीमधील कुतूहलाची तार ताणली जाऊन, उत्सुकतेचा पारा चढून शिखराला पोचला पाहिजे. गोष्टीचे कथानक सारखे रंगत गेले पाहिजे व त्याप्रमाणे अभिनय, आवाज वगैरे सर्व बदलत गेले पाहिजे. हे गोष्टीचे शिखर उलटून गेल्यावर मात्र गोष्ट लवकर संपवावी; कारण मग पुढे लांबण लावण्यात मजा राहत नाही.

जी गोष्ट पुनः पुनः ऐकावयास आवडते, ती गोष्ट चांगली होय. ज्या गोष्टीचा मुलांना कंटाळा येत नाही, तीच मुलांच्या दृष्टीने योग्य समजावी. मात्र तीच गोष्ट पुन्हा सांगण्याचा प्रसंग आला, तर ती जशीच्या तशी त्याच स्वरूपात सांगू नये. गोष्टीतील निरनिराळ्या पात्रांच्या तोंडून ती गोष्ट वदविल्याप्रमाणे सांगावी, म्हणजे त्याच गोष्टीत नवीन मजा उत्पन्न होते.

पाठामध्ये मनोरंजकता आणण्याचे एक नेहमीचे साधन म्हणजे प्रश्नोत्तरे होत.

प्रश्नांमुळे कोणत्याही पाठात विविधता उत्पन्न होते. प्रश्नांचा मुख्य उद्देश विचारांना चालना देणे हा असतो. पण प्रश्न तीन प्रकारचे असतात : शोधक, प्रवर्तक आणि उजळणीचे. पाठाच्या पूर्वतयारीत पूर्वानुभव जागृत करण्यासाठी शोधक प्रश्न विचारून जुन्या विचारांचे शोधन करून ते स्मृतीत आणावे लागतात. दुसऱ्या प्रकारचे प्रश्न विषयप्रवेशात विचारावे लागतात. एका विचारावरून दुसरे विचार उत्पन्न करणे, उपलब्ध माहितीवरून अनुमाने काढणे व नवीन गोष्टीकडे जाणे वगैरेकरिता प्रवर्तक प्रश्नांचा उपयोग करावा लागतो. शिकविलेला भाग कितपत समजला आहे, हे पाहण्याकरिता ज्ञानाची उजळणी घ्यावी लागते, तेव्हा तिसऱ्या प्रश्नांचा उपयोग होतो.

इष्ट असेल, त्या प्रकारचे नेमके वळण मुलांच्या विचारांना लागेल; अशा तऱ्हेचे योग्य प्रश्न विचारणे, ही एक कला आहे. प्रश्न कोणते, कसे व कोणत्या वेळी विचारावयाचे, याचा नीट पूर्वविचार करून शिक्षकाला प्रश्नपद्धतीचा अभ्यास करावा लागतो. काही प्रश्न विचारणे चुकीचे असते. असल्या प्रकारचे प्रश्न कोणते, ते लक्षात ठेवून ते टाळले पाहिजेत. वाईट प्रश्नांची उदाहरणे पुढे दिली आहेत :—

१. **नंदीबैली प्रश्न :** ज्या प्रश्नांचे उत्तर फक्त ‘ होय ’ किंवा ‘ नाही ’ असे येते, त्या प्रश्नांना ‘ नंदीबैली प्रश्न ’ असे म्हणतात. ह्या प्रश्नांत मुलांना फारसा विचार करावा लागत नाही. कारण प्रश्नातच बहुधा त्याचे उत्तर सुचविलेले असते. उदाहरणार्थ, “ चार आहेत ना ? ” “ होय. ”, “ त्याला २ नी गुणले म्हणजे चार दुणे आठ झाले ना ? ” “ होय. ” असले प्रश्न विचारलेच तर लगेच “ तसे का ? ” असा प्रश्न विचारल्यास या प्रश्नांतील चुकीची दुरुस्ती होऊ शकते. कारण त्यात मुलांना विचार करावा लागतो.

२. **ज्योतिषी प्रश्न :** ज्या प्रश्नाचे उत्तर देताना काही एक माहिती नसता निव्वळ अनुमान करावे लागते, असे प्रश्न. ह्यामुळेही विचारांस काही चालना मिळत नाही. अनुमानधपक्याने मुले उत्तर देतात. उदाहरणार्थ—

“ आर्य लोक वर्णाने कसे होते ? ”

“ गोरे ? ” : “ चूक. ”

“ काळे ? ” : “ चूक. ”

“ मध्यम ? ” : “ बरोबर. ”

असल्या प्रश्नानंतरही लगेच कार्यकारणभावासंबंधी प्रश्न विचारले, तर चूक दुरुस्त होऊ शकते.

३. **सूचक प्रश्न :** प्रश्न विचारतानाच हावभावांनी, एखाद्या शब्दावर विशेष जोर देऊन किंवा अभिनयाने प्रश्नाचे उत्तर सुचवून ठेवू नये. कारण तसे केले, तर मुलाला उत्तर देताना काहीच श्रम पडत नाहीत. काही शिक्षकांना एखाद्या गोष्टीचे

निरूपण करताना वाक्यातले शेवटले एक दोन शब्द स्वतः न सांगता विद्यार्थ्यांना विचारण्याची सवय असते, तीही वाईट. कारण ते शब्द ओघानेच येतात व त्याबद्दल मुलांना विचार करावा लागत नाही.

**४. वारेमापी प्रश्न :** प्रश्न विचारताना त्यात काहीतरी नेमका हेतू असावा. प्रश्न मोघम असल्यास काय उत्तर द्यावयाचे हे मुलांना समजत नाही व घोटाळा होतो. चीनचा भूगोल शिकविताना एक शिक्षक चिनी लोकांविषयी माहिती देत होते. चिनी लोकही वडिलांचे श्राद्ध करतात, ही माहिती त्यांना तुलनेने पटवावयाची होती. तेव्हा त्यांनी विचारले, ' वडील वारल्यानंतर आपण काय करतो ? " ह्या प्रश्नाची " रडतो, " " स्मशानात नेतो, " " मिशा काढतो, " " श्राद्ध करतो " अशी अनेक उत्तरे आली. त्याचप्रमाणे एका शिक्षकाने श्वासोच्छ्वास शिकविताना पुढील प्रश्न विचारला होताः " जगतीतलावर मनुष्य उपजल्यापासून मरेपर्यंत काय करतो ? " या प्रश्नाला किती तरी उत्तरे संभवतील.

**५. प्रतिध्वनी-प्रश्न :** काहीतरी सांगून लगेच त्यासंबंधी प्रश्न विचारणे किंवा प्रश्न विचारून आपणच त्याचे लगेच उत्तर देणे याला ' प्रतिध्वनि–प्रश्न ' असे म्हणतात.

**६. पुच्छ प्रश्न :** लांबलचक गुंतागुंतीचा प्रश्न किंवा एकाच प्रश्नात मारुतीच्या शेपटाप्रमाणे अनेक प्रश्नांचा समावेश झालेला असला म्हणजे त्याला ' पुच्छप्रश्न ' म्हणतात. प्रश्न असा पाहिजे की, ज्या भागाचे उत्तर अपेक्षित असेल, तो भाग चटकन मुलाच्या लक्षात आला पाहिजे.

कोणते प्रश्न टाळावे, हे वर दिग्दर्शित केले. पण प्रश्न विचारावयाचे ते विचारण्यासही कौशल्य लागते. कोणचाही प्रश्न विचारावयाचा, तो सर्व वर्गाला सामुदायिक तऱ्हेने विचारावा. कोणच्याही एका मुलाला उद्देशून विचारू नये. कारण सर्व मुलांनी प्रश्नाचा विचार करावयाचा असतो. उत्तरे स्वीकारताना त्यांची योग्य निवड करणे हेही फार महत्त्वाचे आहे. जे उत्तर अंशतः चूक व अंशतः बरोबर असेल, ते ' चूक ' म्हणून सांगू नये. " थोडेसे बरोबर आहे, पण अजून सुधारले पाहिजे " असे सांगावे. त्याचप्रमाणे उत्तरात भाषेच्या दृष्टीने, माहितीच्या दृष्टीने अशा अनेक चुका असू शकतात. त्या सर्व चुका एकदम सुधारण्याचा प्रयत्न करू नये. कारण त्यामुळे मुलांचा सर्वच घोटाळा होण्याचा संभव असतो. ज्या दृष्टीने आपण प्रश्न विचारला असेल, तोच भाग महत्त्वाचा समजून इतर चुकांकडे दुर्लक्ष करावे.

मुलांच्या उत्तरांचा व प्रश्नांचा नेहमी सहानुभूतीने विचार करावा. पुष्कळ वेळा मुले चुकीची उत्तरे देतात, त्याला काही तरी कारण असते. त्यांच्या मनात काही चुकीची कल्पना बसून गेलेली असते, त्यामुळे भलतीच उत्तरे येतात. तेव्हा चुकीच्या उत्तरांपासूनही शिक्षकाला पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या असतात. उत्तर का चुकले, याच्या मुळाशी जाऊन मुलांचे गैरसमज दूर करण्याचा शिक्षकाने प्रयत्न

केला पाहिजे. त्याचप्रमाणे कित्येक वेळा विषय सोडून संदर्भ नसलेले भलतेच प्रश्न मुले विचारतात, त्या वेळीही संतापून न जाता मुलांचे शक्य तर समाधान करण्याचा प्रयत्न करावा.

धड्यात मुलांचे मन रमविण्याचा नेहमीचा राजमार्ग म्हणजे त्यांना स्वतःला काही तरी करावयास देणे हा होय. स्वतः करून पाहून त्यांनी नवीन गोष्टी शिकाव्या. शिक्षकाने नुसते सांगत सुटू नये. मुलांचे ज्ञान अनुभवजन्य असले पाहिजे. ' एखादा त्रिकोण घेतला ' अशी नुसती कल्पना करण्यास न सांगता ' त्रिकोण काढा ' म्हणून सांगितले व मुलांच्या हातून अशा प्रत्यक्ष गोष्टी घडल्या, तर त्यांना पाठात मजा वाटतेच; पण विषयही जास्त चांगला समजतो.

पाठामध्ये नेहमी वैचित्र्य असावे. तीच तीच गोष्ट नेहमी करीत गेले किंवा एखादा विषय त्याच त्याच पद्धतीने शिकवीत गेले, तर विद्यार्थ्यांना कंटाळा येतो, तेव्हा पद्धतीत नेहमी फरक करीत जावा व साधने बदलीत जावे. प्रश्न, गोष्ट वगैरेंचा आलटून पालटून उपयोग करावा. विद्यार्थ्यांबद्दल शिक्षकाला नेहमी सहानुभूती वाटत असली पाहिजे. मुलांना कळेल अशीच भाषा त्याने नेहमी वापरली पाहिजे.

शेवटी सांगावयाची, पण फार महत्त्वाची गोष्ट ही की, कोणताही पाठ यशस्वी होण्यास मुलांची जिज्ञासा पूर्णपणे जागृत झाली पाहिजे. कोणच्याही पाठात काही तरी अपूर्वता पाहिजे. ती असल्याशिवाय मुलांना नवीन गोष्टी शिकण्याची उत्सुकता वाटणार नाही व औत्सुक्याशिवाय त्यांचे लक्ष नीट लागणार नाही.

[ **अध्यापन**, नोव्हें. १९३१ ]

# ४

# परीक्षेची नवी पद्धत

शिक्षणक्रमाच्या कोणत्याही अवस्थेत परीक्षेला महत्त्वाचे स्थान राहणार. निरनिराळ्या परिस्थितीशी अनुरूप वर्तन करता यावे किंवा निरनिराळ्या प्रबोधकांशी ( Stimulus ) योग्य प्रतिक्रिया ( Reaction ) करता यावी, म्हणून आपण जे अनुभव मिळवितो, त्याचे नाव शिक्षण. शिक्षकांच्या कार्याचे यश मुलांच्या बौद्धिक प्राप्तीवर अवलंबून असते. तेव्हा मुलांच्या बुद्धिसंपत्तीची परीक्षा म्हणजे अध्यापनाच्या परिणामाचीच परीक्षा होय. परीक्षेचे हेतू दोन प्रकारचे असतात. एक, मुलांच्या ज्ञानप्राप्तीत सुधारणा होत चालली आहे की नाही, हे पाहणे व दुसरे, अध्यापन यशस्वी किंवा अयशस्वी झाले आहे, हे ठरविणे.

मानसशास्त्रदृष्ट्यादेखील परीक्षेचे समर्थन करता येते. दिलेल्या परिस्थितीशी मुलगा अनुरूप वर्तन करतो की नाही, हे पाहावयाचे असेल, तर त्याला तशा प्रकारची परिस्थिती देऊन तो तिच्याशी कसे वर्तन करितो, हे पाहणे क्रमप्राप्तच आहे. रामाला विटीदांडू खेळता येतो की नाही, हे पाहावयाचे असेल तर त्याला विटीदांडू खेळावयाला लावावयाचे किंवा सीतेला कशिदा काढता येतो की नाही, हे तिला कशिदा काढावयाला देऊन ठरवावयाचे, हा मार्ग उघड आहे. मुलाला गणित, निबंध, स्पेलिंग किंवा दुसऱ्या इतर विषयांचे किती ज्ञान आहे, हे पाहावयाचे असेल, तर त्याला त्या विषयाचे ज्ञान दर्शविण्याची संधी द्यावयास पाहिजे. जी प्रतिक्रिया किंवा जे उत्तर आपणांस हवे असेल, तीच प्रतिक्रिया किंवा तेच उत्तर येईल, अशा प्रकारचा प्रबोधक किंवा प्रश्न ज्या चाचणीत असेल, ती चाचणी सर्वांत उत्तम. मुलाला सहा या आकड्याचा व्यावहारिक अर्थ कळला की नाही, हे पाहताना त्या आकड्याच्या ज्ञानाचीच ज्यांत

फक्त जरूर पडेल, अशा प्रकारच्या वस्तू अगर संख्या त्याला द्यावयास पाहिजेत. परीक्षेच्या जुन्या स्वरूपात या महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलेले आढळते. या बाबतीत अलीकडील शिक्षणशास्त्रविचारात एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. प्रचलित पद्धतीने परीक्षेचा हेतू कितपत सिद्धीला जातो? वर दर्शविल्याप्रमाणे परीक्षेचा मुख्य हेतू अध्यापनाचे व शिक्षणाचे परिणाम अजमावून पाहणे हा होय, हे उघड आहे. पण या ठिकाणी दोन मुद्दे उपस्थित होतात. एक असा की, शिक्षणक्रमाचा केवढा प्रांत परीक्षेच्या आटोक्यात आणता येतो? दुसरे, हल्ली प्रचलित असलेली परीक्षेची पद्धती तिचे हेतू साध्य करण्याच्या कामी किती यशस्वी होते?

प्रथम पहिल्या मुद्द्याचा विचार करू. शिक्षणाचे मुलांच्यावर जे जे परिणाम होतात, ते सर्वस्वी परीक्षेच्या कसाला लागतात काय? सर्व नसले तर त्यांपैकी किती अंश परीक्षेच्या आटोक्यात येतो? मुलांच्या वैयक्तिक सामर्थ्याचा विकास करून भावी आयुष्यातील निरनिराळ्या परिस्थितीशी अनुरूप वर्तन करावयास त्याला क्षम करणे, हा शिक्षणाचा हेतू आहे. 'वैयक्तिक सामर्थ्य' हा शब्द व त्यातील कल्पना अत्यंत संकीर्ण स्वरूपाची आहे. चातुर्य व ज्ञान यांखेरीज करून त्यात इतर पुष्कळ गुणांचा अंतर्भाव होतो. ज्ञानविकासाबरोबर नैतिक विकास होत असतोच. हल्लीच्या परीक्षेत ज्ञानाची चाचणी होते; पण नैतिक किंवा भावनात्मक सामर्थ्याची मुळीच पारख होत नाही. ज्ञानप्राप्तीपेक्षा शिक्षणाचे परिणाम अधिक व्यापक आहेत. त्यांची पारख होईल, अशा प्रकारच्या पद्धती हल्लीच्या परीक्षेत नाहीत. अध्यापनाचा हेतू मुलांचा नैतिक विकास करून त्यांचे भावी आयुष्यातील वर्तन नैतिक नियमांस अनुसरून होईल, असा त्यांचा दृष्टिकोण बनवावयाचा व त्यांची उदात्त भावना व सौंदर्य-सेवनाची लालसा वृद्धिंगत करावयाची, हा आहे. शिक्षकाच्या शीलाची छाप मुलांच्या मनावर पडत असते. थोडक्यात म्हणावयाचे म्हणजे उत्कृष्ट शील, उदात्त आकांक्षा, ध्येयवादीपणा व नैतिक सामर्थ्यप्राप्ती हे शिक्षणाचे हेतू होत. हे हेतू शिक्षणक्रमात कितपत साध्य होतात, हे हल्लीच्या परीक्षेने मुळीच कळून येत नाही. अलीकडे सुधारलेल्या शिक्षणपद्धतीत मुलांच्या बुद्धीची (Intelligence) चाचणी घेण्याचे प्रयोग चालू आहेत व ते पुष्कळ अंशी यशस्वी झाले आहेत. चातुर्यमापनाची नवी नवी साधने दिवसेंदिवस उपलब्ध होत आहेत; पण शीलमापनाची साधने शोधून काढणे, हे इतके सोपे नाही. तथापि शीलमापनाच्या शोधास सुरुवात झालेली आहे. मनुष्यप्राण्यांच्या मानसिक व शारीरिक क्रियांमध्ये नेहमी एकवाक्यता असते, असे सिद्ध झाले आहे. तसेच बौद्धिक व नैतिक सामर्थ्यांत एक प्रकारची सुसंगती असते, असे टर्मन व थॉर्नडाइक या दोन संशोधकांना आढळून आलेले आहे. आपणांस अगदी सहजासहजी कळून येईल की, विद्यार्थ्यांच्या अंगी काही विशिष्ट नैतिक गुण असल्याशिवाय त्यांच्याकडून ज्ञानप्राप्ती यशस्वी रीतीने होत नाही.

उदाहरणार्थ चिकाटी, आत्मसंयमन, शारीरिक निरामयता, अवधान, धैर्य, आत्मविश्वास, प्रामाणिकपणा हे गुण विद्यार्थ्यांच्या अंगी अत्यंत आवश्यक आहेत. शीलमापनाच्या बाबतीत कशा प्रकारे शोध चालले आहेत. यासंबंधी एक उदाहरण देता येईल. डॉ. डाउने नावाच्या संशोधकाने शीलमापनाच्या कसोट्या ( Tests ) तयार केल्या आहेत. या कसोट्यांत मुलांच्या मानसिक सामर्थ्याची तर परीक्षा होतेच; पण त्याशिवाय कसोट्या सोडविताना लागणारे काही विशिष्ट नैतिक गुण मुलांच्या अंगी आहेत की नाहीत, हे कळून येते. उदाहरणार्थ, विरोधी अर्थाच्या विशेषणांच्या काही काही जोड्या घेतल्या आहेत: 'आळशी–उद्योगी', 'खर्चिक मितव्ययी' इ०. या विशेषणांपैकी स्वतःचे स्वभावदर्शक जे विशेषण असेल, त्यावर पेन्सिलीने खूण करावयास विद्यार्थ्यास सांगतात. या ठिकाणी, गुणदर्शक विशेषणावर खूण करणे ही गोष्ट महत्त्वाची नसून, ठराविक मुदतीत विद्यार्थी खूण करतात की नाही, त्यांना वेळ लागल्यास तो किती व का लागतो, हे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

हल्लींच्या परीक्षेत नैतिक गुणांची अगदीच पारख होत नाही, असे नाही. पण ती जितकी काळजीपूर्वक व कसोशीने व्हावयास पाहिजे, तितकी होत नाही. त्यावरून फार झाले तर मुलांच्या वर्तनाची व नैतिक सामर्थ्याची अंधुक व अस्पष्ट अशी कल्पना करता येईल. शिवाय परीक्षेचे वातावरण कृत्रिम असल्याकारणाने तेथील मुलांच्या वर्तनावरून ती स्वाभाविक परिस्थितीत अमुक एक तऱ्हेनेच वर्तन करतील, असा अदमास करणे चुकीचे होईल. शीलमापनाच्या कसोट्या अद्यापी प्रयोगावस्थेत असल्याकारणाने त्यांजविषयी नक्की मत देणे बरोबर नाही. पण त्यावरून नवीन शिक्षणपद्धतीच्या काय आकांक्षा आहेत, याची साधारण कल्पना येईल.

दुसरा मुद्दा असा की, हल्लीच्या परीक्षापद्धतीत आपण ज्या विषयाची चाचणी घेतो, ती त्याच विषयाची फक्त चाचणी असते काय? त्या चाचणीने त्या विषयासंबंधीचेच मुलांचे ज्ञान व चातुर्य कसाला लागते काय? त्याप्रमाणेच मुलांची प्रगती कळण्यास व त्यास शाळेतील वरच्या वर्गात घालण्यास परीक्षा हे विश्वासार्ह साधन आहे की काय? इंग्लंडमध्ये १८८८ साली "Nineteenth Century" या मासिकात मोठमोठ्या शिक्षणशास्त्रज्ञांच्या सह्यांनी एक लेख प्रसिद्ध झाला होता. त्यात परीक्षेच्या कुंडात शिक्षणाचा कसा होम चाललेला आहे, ह्याचे हृदयद्रावक वर्णन केलेले होते. तेव्हापासून तिकडील प्राथमिक शिक्षण जवळ जवळ परीक्षेच्या कचाट्यातून सुटले आहे. पण दुय्यम शिक्षण व कॉलेज–शिक्षण यांजवरील परीक्षांचे ओझे अद्यापी कमी झालेले नाही.

गेल्या वीस वर्षांत पाश्चात्त्य देशांत चातुर्यमापनाचे प्रयोग चाललेले आहेत व त्यांना शिक्षणक्रमात महत्त्वाचे स्थान प्राप्त होत चाललेले आहे. फ्रान्समध्ये बीने व सीमों, इंग्लंडमध्ये बर्ट व बॅलार्ड, अमेरिकेत टर्मन, थॉर्नडाइक व गॉडर्ड यांनी हजारो मुलांवर

कसोट्यांचे प्रयोग करून आपआपल्या चाचण्या ( Scales ) शास्त्रीय पद्धतीने तयार करून ठेवल्या आहेत. या मापनप्रयोगांत निरनिराळ्या चाचण्या तयार करणे व त्यांचे वयानुसार अगर वर्गानुसार वर्गीकरण करणे, यांचा समावेश होतो. या चाचण्या लाखो मुलांवर प्रयोगून पाहिलेल्या असतात व निरनिराळ्या अनुभवांप्रमाणे त्यांमध्ये फेरफार केलेला असतो. चाचण्यांचे निकाल आकडेशास्त्राच्या मदतीने नमूद केले जातात. अशा तऱ्हेने तयार केलेल्या चाचण्यांनी प्रत्येक मुलाची परीक्षा घेतली जाते. तिजवरून मुलाच्या शारीरिक व मानसिक वयाचे प्रमाण काढले जाते. या प्रमाणाला शास्त्रीय परिभाषेत Intelligence Quotient अथवा थोडक्यात I. Q. असे म्हणतात. या I. Q. च्या मदतीने मुलांचे वर्गीकरण करणे अधिक शास्त्रीय आहे, असे आढळून आले आहे. चातुर्याच्या दृष्टीने मुलांचे जे बिनचूक वर्गीकरण करता येते, तसे ज्ञानाच्या बाबतीत त्यांचे वर्गीकरण का करता येऊ नये, असा प्रश्न प्रयोजकांपुढे उपस्थित झाला. त्याबरोबर 'नवीन परीक्षा' या नावाखाली ज्ञानाच्या चाचण्या ( Attainment Tests ) तयार करण्याकडे त्यांचे लक्ष वळले. या चाचण्यांचा हेतू मुलांची ज्ञानप्राप्ती किती झाली आहे, हे तर्कावर मार्क देऊन ठरविणे हा नसून, त्या ज्ञानप्राप्तीच्या मापनाचे एक शास्त्रीय साधन उपलब्ध करणे हा होय.

सध्याच्या परीक्षेत एक असा दोष आहे की, तिच्यात परीक्षक हा एक मोठा ग्रह आहे. त्यामुळे परीक्षेचा निकाल परीक्षकांच्या पूर्वग्रहाने किंवा मानसिक व शारीरिक अवस्थेने बाधित असतो. परीक्षेच्या अशा निकालावर मुलांच्या ज्ञानाची पारख करणे याला शास्त्रीय दृष्ट्या मुळीच किंमत राहत नाही. नवीन परीक्षापद्धतीत अशा प्रकारच्या चाचण्या काढलेल्या असतात की, कोणीही परीक्षक असला, तरी यंत्राप्रमाणे मुलाला योग्य तितके गुण बरोबर मिळालेच पाहिजेत. चाचणीतील प्रत्येक प्रश्न एकोत्तरी ( Fool-proof ) ७६ असल्याकारणाने त्यास दुसरे उत्तर संभवतच नाही. व त्यामुळे हे उत्तर बरोबर की दुसरे उत्तर बरोबर, अशा प्रकारचा संशय परीक्षकांच्या मनात येऊन त्यांची वृत्ती द्विधा होत नाही. आजपर्यंत निरनिराळी उत्तरे असणारे प्रश्न घालून विद्यार्थ्यांना फसविण्याकडे शिक्षकांची प्रवृत्ती होती. पण त्या योगाने विद्यार्थी फसण्याऐवजी परीक्षकच स्वतः फसत आले आहेत. अनेकोत्तरी प्रश्नाचा नमुना असा देता येईल :—

" तुमची ज्या माणसाची ओळख नाही अशा माणसाला पाहिल्यावर तुमचे

---

७६ " A fool-proof test is one that prevents the examiner from making a fool of himself. Each question is so constructed as to admit of one answer only-one clear, simple, unequivocal answer."— Dr. Ballard ' s ' Group Test of Intelligence ', page 4.

त्याच्याविषयी काय मत होईल ? "

या प्रश्नाला तीन उत्तरे देता येतील : ( १ ) तो चांगला मनुष्य असावा. ( २ ) तो वाईट मनुष्य असावा. ( ३ ) प्रथमदर्शनी त्याजविषयी काहीच मत बनविता येणार नाही. एकापेक्षा अधिक उत्तरे ज्यास संभवतात, अशा प्रकारचा प्रश्न दिल्याने त्या उत्तरांपैकी कोणते उत्तर योग्य, याविषयी विद्यार्थी साशंक होतात, व विचार न करता अनुमानाने कोठले तरी एक उत्तर ते लिहितात. अशा प्रश्नाच्या उत्तराविषयी परीक्षकांचे नेहमीच ऐकमत्य असते, असे नाही. त्यांना जे उत्तर बरोबर वाटेल, तेवढ्याच उत्तराला ते पूर्ण गुण देतात. अशा रीतीने परीक्षक व परीक्ष्य यांच्या मतांचा एकमेळ जमणे फारच दुरापास्त होते. अशा तऱ्हेच्या प्रश्नांचा सामान्य नमुना म्हणजे कोठल्या तरी विषयावर लिहावयास सांगितलेला निबंध हा होय. अमुक एक तऱ्हेचा निबंध म्हणजे अगदी नमुनेदार असतो, असे काही ठरलेले नाही. विद्यार्थी आपापल्या मगदुराप्रमाणे व माहितीप्रमाणे निबंध लिहितात. परीक्षकही आपल्या आवडीप्रमाणे व कलाप्रमाणे त्यांचा बरेवाईटपणा ठरवितात. एकाच निबंधाच्या गुणाविषयी निरनिराळ्या परीक्षकांचा निरनिराळा ग्रह होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या निबंधाची निव्वळ गुणांवरून कधीच पारख होत नाही. आता वरील अनेकोत्तरी प्रश्न एकोत्तरी करावयाचा असल्यास त्या प्रश्नाच्या बरोबर त्याची संभवणारी तिन्ही उत्तरे दिली. त्यांतील सर्वांत सयुक्तिक उत्तर कोणते, हे विद्यार्थ्यांना निवडून काढण्यास सांगितले म्हणजे झाले, अर्थात सयुक्तिक उत्तर एकच असल्याने तो प्रश्न एकोत्तरी होतो.

पूर्वीच्या परीक्षेतील दुसरा दोष म्हटला म्हणजे, तिच्यात एखाद्या विषयाची परीक्षा घेताना केवळ त्या विषयाच्या ज्ञानाचीच परीक्षा घेतली जात नसून, परीक्षेची जी भाषा माध्यम असेल, त्या भाषेचीही त्याबरोबर परीक्षा घेतली जात असे. त्या योगाने भाषाविषयात कच्चा असलेल्या विद्यार्थ्याची फारच गैरसोय होत असे. एखाद्या विषयाचे उत्कृष्ट ज्ञान असूनसुद्धा केवळ भाषाज्ञानाच्या अभावामुळे त्याला नापास होण्याचा प्रसंग येई. या दोषावर टीका करताना New Examiner या ग्रंथाचे कर्ते डॉ. बॅलार्ड असे लिहितात :—

" प्रचलित परीक्षेचे स्वरूप निबंधात्मक आहे. निबंधाच्या पायावरच तिची उभारणी झाली आहे. या निबंधाच्या कसोटीला उतरणे म्हणजेच परीक्षेच्या कसोटीत सर्वस्वी उतरणे असे समीकरण मानण्यात येते. भाषेच्या प्रश्नपत्रिकेत तर प्रत्येक प्रश्नाचे उत्तर निबंधाच्या स्वरूपाचे असतेच. पण इतिहास व भूगोल या विषयांतील प्रश्नांची उत्तरे म्हणजेही निरनिराळे स्वतंत्र निबंध असतात. या निबंधांच्या बऱ्यावाईटपणावरून आपण मुलांची किंमत ठरवीत असतो. मुलांना भाषाविषयाचे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे, याविषयी कोणाचाही मतभेद नाही. पण परीक्षेच्या कृत्रिम

परिस्थितीत व मार्क देण्याची पद्धती सदोष असताना, या निबंधस्वरूपाच्या उत्तरांनी मुलांच्या ज्ञानाचे योग्य मापन होईल की नाही, याविषयी शंका आहे. या निबंधात्मक परीक्षेने मुलांच्या इतिहासभूगोलादी विषयांच्या ज्ञानाची पारख तर होत नाहीच नाही; पण त्यांच्या मातृभाषेच्या ज्ञानाचीही पारख होत नाही." डॉ. बॅलार्ड यांचा या निबंधात्मक परीक्षेसंबंधी इतका आक्षेप का आहे, हे त्यांनी दिलेल्या पुढील उदाहरणावरून कळून येईल. एका ट्रेनिंग कॉलेजमधील प्रिन्सिपॉल आपल्या विद्यार्थ्यांना निबंध लिहावयास सांगत असत. त्यांत दोन विद्यार्थी होते. एक इंग्लिश विद्यार्थी होता व दुसरा वेल्श होता. हे दोघे एकमेकांच्या सल्ल्यानेच आपले निबंध लिहीत असत व जवळ जवळ त्यांचे निबंध सारख्याच गुणांचे असत. पण प्रिन्सिपॉलच्या तपासणीत इंग्लिश विद्यार्थ्याच्या निबंधावर 'उत्तम' असा शेरा येई व वेल्श विद्यार्थ्याच्या निबंधावर 'बरा' असा शेरा येई. प्रिन्सिपॉल अतिशय काळजीपूर्वक निबंध तपाशीत असे व त्याचे जे अगदी प्रामाणिक मत होत असे, तेच तो निबंधावर लिहीत असे. असे असूनसुद्धा वेल्श विद्यार्थी इंग्रजी चांगले लिहिणे शक्यच नाही व इंग्लिश विद्यार्थी चांगल्याच तऱ्हेने इंग्रजी लिहीत असला पाहिजे, असा त्याचा त्या दोघांविषयी अहेतुक ग्रह झाला होता. एके दिवशी त्या दोघांनी निबंधांची उलटापालट करून ते आपल्या अक्षरात लिहून प्रिन्सिपॉलकडे तपासण्यास दिले. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे इंग्लिश विद्यार्थ्याच्या नावावरील निबंधाला 'उत्तम' व वेल्श विद्यार्थ्याच्या नावावरील निबंधास 'बरा' असे शेरे मिळाले. विद्यार्थ्यांनीच जवळ जवळ ही परीक्षकाची चाचणी घेतली व त्यांना असे आढळून आले की, हेतू असो वा नसो, परीक्षक हा नेहमी पूर्वग्रहदूषित असतो.

डॉ. बॅलार्डनी दुसरे उदाहरण दिले आहे, ते अधिक मौजेचे आहे. एका परीक्षेत इतिहासाच्या प्रश्नपत्रिकेची उत्तरे तपासण्यास सहा परीक्षक नेमले होते, पास व्हावयास पूर्ण गुणांपैकी शेकडा ६० मार्क मिळावयाचे असल्यामुळे परीक्षेचे काम अत्यंत काळजीपूर्वक व्हावे, कोणत्याही विद्यार्थ्यावर कसल्या प्रकारचा अन्याय होऊ नये, म्हणून ६० मार्कांच्या खाली मार्क असलेल्या उत्तराचे कागद प्रत्येक परीक्षकाकडे पुन्हा परीक्षणासाठी पाठविले जात. त्या सहा परीक्षकांपैकी एक जण अत्यंत टापटिपीचा व सदसद्विवेकबुद्धीस अनुसरून काम करणारा असा होता. त्यांनी स्वतः नमुन्यादाखल एक उत्तराचा कागद लिहून ठेवला होता. नजरचुकीने तो इतर उत्तरांच्या कागदांत मिसळला जाऊन दुसऱ्या परीक्षकांकडे तपासण्यास गेला. तो विद्यार्थ्यानेच लिहिलेला कागद आहे, अशा प्रामाणिक समजुतीने इतरांनी तो तपासला व त्याला शेकडा ४० ते ८० पर्यंत निरनिराळ्या परीक्षकांनी मार्क दिले, म्हणजे परीक्षक स्वतःच आपल्या परीक्षेत नापास होण्याचा प्रसंग ओढवला!

एखाद्या मुलाची योग्यता, त्याची वर्षभर प्रगती पाहत असलेल्या त्याच्या शिक्षकाला

दा. क्र. ३९३९ निबंध शाखा (स्थळ प्रत)

जितकी ठरविता येईल, तितकी एखाद्या अनोळखी परीक्षकाला चार दोन प्रश्नांच्या उत्तरांवरून ठरविता येणार नाही, हे उघड आहे. कित्येक नालायक मुले परीक्षेत पास होतात व लायक मुले नापास होतात, असा पुष्कळ शिक्षकांचा अनुभव आहे. याचे कारण काय ? कित्येक मुलांना परीक्षेच्या वातावरणात अस्वास्थ्य उत्पन्न होते. कित्येकांना जलद लिहिता येत नाही. कित्येकांना वळणदार अक्षर लिहिता येत नाही. कित्येकांना जलद विचार करून समर्पक उत्तरे लिहिता येत नाहीत. घोकंपट्टी केलेले विद्यार्थी अपेक्षेप्रमाणे प्रश्न आले, तर विचार न करता प्रश्नांची उत्तरे लिहून अधिक मार्क मिळवतात, तर हुशार विद्यार्थी विचार करून, स्वतःच्या भाषेत लिहिण्याचा प्रयत्न करीत असूनसुद्धा त्यांना तितके मार्क मिळवता येत नाहीत. ज्या परीक्षापद्धतीत अशा प्रकारचे अनेक दोष आहेत व जिच्यात अनिश्चयाला पुष्कळच जागा आहे, तिचा काय उपयोग आहे ? तशात विद्यार्थ्याविषयी ज्यांना यत्किंचितही ज्ञान नाही, अशा लोकांना परीक्षक नेमणे म्हणजे परीक्षेचे मूळचे दोष अधिक वाढविण्यासारखेच आहे.

निबंधात्मक विषयांच्या बाबतीतच सांप्रदायिक परीक्षेचा फोलपणा दिसून येतो, असे नव्हे; तर ज्या विषयांत बिनचूक ज्ञान असावे लागते, अशा शास्त्र ( Science ), गणित इत्यादी विषयांच्या बाबतीतदेखील असाच घोटाळा उत्पन्न होतो, असे प्रयोजकांच्या अनुभवाला आलेले आहे. एक भूमितीचा पेपर तपासताना परीक्षकांचा कसा मतभेद झाला होता, याचे उदाहरण एका ग्रंथकाराने दिले आहे. भूमिती विषयातील एका प्रश्नपत्रिकेच्या व तिच्या उत्तरपत्रिकेच्या अनेक प्रती काढून त्या निरनिराळ्या शिक्षकांकडे तपासण्यास पाठविण्यात आल्या. त्या उत्तरपत्रिकेला १५१ परीक्षकांपैकी दोघांनी ९० मार्क दिले, तर एकाने अवघे ३० मार्क दिले. २० जणांनी ८० किंवा त्यापेक्षा अधिक मार्क दिले. २० जणांनी ६० मार्क दिले. ४९ परीक्षकांनी पास होण्यापुरते मार्क दिले होते, तर ५९ परीक्षकांनी त्या उत्तरपत्रिकेला नापास केले. भूमिती—विषयात मतभेदाला फारशी जागा नसताना परीक्षकांच्या मतांत इतके वैचित्र्य; तर अनिश्चयात्मक अशा निबंधस्वरूपाच्या परीक्षेत मतभेदाला कितीतरी जागा राहील !

जुन्या परीक्षापद्धतीच्या दोषांचे इतके विवरण झाले. आता हे दोष कसे सुधारता येतील ? परीक्षा असावी की नसावी, याविषयी कोणाचाही फारसा मतभेद नाही. पण प्रचलित परीक्षापद्धती मानसशास्त्रदृष्ट्या अत्यंत सदोष असल्याने तिला शास्त्रीय किंमत काही नाही. नवीन परीक्षापद्धतीत असे दोष राहू न देण्याची खबरदारी घेण्यात आलेली आहे तिचा उगम बुद्धिमापक चाचण्यांमधून ( Intellingence tests ) झाला असल्याकारणाने दोहोंतील स्वरूपात पुष्कळच साम्य आहे. विद्यार्थ्यांना पुष्कळशा गोष्टी करावयास सांगून त्यांपैकी त्यांना किती बरोबर करता येतात,

यावरच त्यांचे चातुर्य पारखता येते; त्यामुळे त्यांच्या अंगी असलेल्या शक्तींचे निरनिराळे नमुने आपणांस पाहावयास मिळतात, या तत्त्वावरच 'नवीन परीक्षे'ची उभारणी झाली आहे. जुन्या परीक्षेत मुलांच्या बुद्धिमत्तेचे व ज्ञानाचे नमुने आपणांस पाहावयास मिळत; पण ते फारच थोडे व विस्कळित स्वरूपाचे असत. शिवाय त्यास वेळही पुष्कळच लागे. नवीन परीक्षेत थोड्या वेळात मुलांच्या ज्ञानाचे निरनिराळे नमुने आपणास मिळविता येतात. आजपर्यंत अशी समजूत होती—किंवा अद्यापीही आहे की, प्रश्नपत्रिकेत लहान प्रश्न विचारले की, मुलांच्या ज्ञानाची पारख करता येईल. ही समजूत चुकीची आहे. सर्वसाधारण स्वरूपाच्या ५/६ प्रश्नांपेक्षा, निरनिराळया दृष्टीचे अनेक लहान लहान प्रश्न विचारले, तर मुलांचे एकाद्या विषयासंबंधी ज्ञान किती आहे, हे बिनचूक कळून येते. नवीन परीक्षेत अशा प्रकारचे प्रश्न विचारले जातात. मुलांना विषयाचे योग्य ज्ञान असेल, तर तो त्यांची झटपट उत्तरे देऊ शकतो. प्रश्नांची निवड विस्तृत प्रमाणावर असल्याने प्रश्नपत्रिकेत विषयाच्या प्रत्येक भागाचा समाचार घेता येतो. घोकंपट्टी करून येणारी मुले अशा परीक्षेत तोंडघशी पडतात. व ज्यांचे ज्ञान यथार्थ व व्यापक आहे, अशीच मुले पास होऊ शकतात. प्रश्नांची मर्यादा अत्यंत व्यापक असल्याने ठराविक प्रश्नांपुरती तयारी करून देणारी टिपणांची पुस्तके ( Annotations ) या परीक्षेत कुचकामी ठरतात. नवीन परीक्षेच्या एका प्रश्नपत्रिकेत किती प्रश्न असू शकतात, याची कल्पना पुढील गोष्टीवरून येईल. अमेरिकेत सैनिकांना दिल्या जाणाऱ्या आल्फा ( Alpha ) नावाच्या चाचणीत एकंदर २१२ प्रश्न विचारतात व त्यांची उत्तरे २३ मिनिटे व १५ सेकंद एवढ्याच अवकाशात द्यावयाची असतात. या वेळात जो सैनिक कमीत कमी १३५ प्रश्नांची बरोबर उत्तरे देईल, त्याची बुद्धिमत्ता चांगल्या प्रकारची, असे ठरवितात. अर्थात ही चातुर्यमापनाची कसोटी आहे. डॉ. वुडबर्नने नवीन परीक्षापद्धतीप्रमाणे एक प्रश्नपत्रिका काढली होती व तिच्यात १६० प्रश्न विचारले होते. ५।६ प्रश्नांच्या नेहमीच्या प्रश्नपत्रिकेची उत्तरे लिहिण्याला जितका वेळ देण्यात येतो. तितकाच वेळ या ठिकाणी दिलेला होता. वेळ अपुरा पडतो. अशी कोणत्याही विद्यार्थ्याकडून तक्रार आली नाही. अशा तऱ्हेच्या प्रश्नपत्रिकेत नेमलेल्या पुस्तकाच्या प्रत्येक प्रकरणावर कमीत कमी आठ प्रश्न तरी विचारता आले व त्यामुळे अमुक एक भाग शिकविला असून त्यासंबंधी प्रश्न विचारता आले नाहीत व अमुक एका भागाची तयारी असून त्यासंबंधी काही प्रश्न आले नाहीत, अशी रुखरुख परीक्षकांना किंवा विद्यार्थ्यांना वाटली नाही.

जुन्या परीक्षेत विद्यार्थ्यांना शिकविलेल्या विषयातील एका विवक्षित भागाकडे लक्ष देऊन एकंदर परीक्षेत पास होण्याइतके गुण मिळविता येत असत. हुषार व धोरणी विद्यार्थ्यांना परीक्षेत प्रश्न कोणत्या प्रकारचे येतील याची सहज अटकळ बांधता

येते. शिक्षक वर्गात कोणत्या भागावर विशेष जोर देतात, त्यावरून किंवा पूर्वीच्या प्रश्नपत्रिकेत कोणते प्रश्न वारंवार विचारलेले आहेत, ते पाहून उमेदवाराला परीक्षेची जुजबी तयारी थोडक्या वेळात करणे शक्य असते. नवीन परीक्षेत असे होत नाही. वर वर ज्ञान मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची तिच्यात निराशा होते व काळजीपूर्वक अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आपण किती बारकाईने अभ्यास केला आहे, याची परीक्षकाला खात्री पटवून देता येते. डॉ. वुडबर्नने या बाबतीत आपला विद्यार्थी-दशेतला एक अनुभव दिलेला आहे. एकदा इंग्रजी विषयाच्या परीक्षेला त्यांना तीन कविता तयार करावयाच्या होत्या. अध्यापकाच्या शिकविण्यात Keats कवीच्या 'Ode to Autumn' या काव्यावर विशेष जोर देण्यात आला होता व त्या तीन कवितांपैकी ती एक होती. तेव्हा त्यांनी इतर दोन कवितांकडे दुर्लक्ष करून तीच कविता तेवढी मुखोद्गत करून ठेवली. सुदैवाने, परीक्षेत त्याच कवितेवर प्रश्न आल्याकारणाने तो प्रश्न त्यांना उत्कृष्टपणे लिहिता आला. अशा तऱ्हेने निव्वळ धोरणावर त्यांनी पूर्ण मार्क मिळविले व तिन्ही कविता तयार करून येणाऱ्या विद्यार्थ्यांवर नंबर मिळविला. अध्यापकांनी ज्या भागावर जोर दिला असेल, तो भाग विद्यार्थ्यांनी विशेष तयार करू नये, असे म्हणणे नाही; पण त्याच्या आधारावर विद्यार्थी आपले श्रम वाचवू पाहतात, हे वाईट आहे. जुन्या परीक्षेत तोंडपाठ अभ्यास करण्याकडे विद्यार्थ्यांचा अधिक ओढा असे व तसा त्यांना वावही मिळत असे. जे विद्यार्थी वर्षभर अभ्यासाची हेळसांड करतात, तेच तोंडपाठीच्या आडवाटेने जातात. कधी कधी परीक्षेत वर नंबर मिळवावा, या आकांक्षेने विद्यार्थी अभ्यास मुखोद्गत करतात. नवीन परीक्षेतदेखील असा दोष आहे, असे काहीजण आक्षेप घेतात. पण ते बरोबर नाही. नवीन परीक्षेतील नमुन्याचे प्रश्न मुलांनी मिळवून त्यांची उत्तरे पाठ करायला सुरुवात केली, तर त्या योगाने एक विवक्षित भाग मुखोद्गत होत नसून, सर्वच भाग त्याला हळूहळू मुखोद्गत करावा लागतो. कारण प्रश्न विषयाच्या सर्व भागांसंबंधी असतात. त्यामुळे तोंडपाठ अभ्यास करून श्रम वाचविण्याचा विद्यार्थ्यांचा उद्देश साध्य होत नाही. त्यांना सर्वच विषयाची तयारी करावी लागते. आणि ही गोष्ट वाईट नाही, हे कोणीही कबूल करील. एवढेच काय, पण मुलांना आधी प्रश्नपत्रिका माहीत असली, तरी तिची उत्तरे शोधून काढण्याकरिता त्यांना सर्वच पुस्तक वाचावयास लागेल. दुसरी गोष्ट अशी की, नवीन परीक्षेत पास होण्यास किती गुण लागतात, हे आधी ठरविलेले नसते. त्यामुळे अमुक एक मर्यादेपर्यंतच अभ्यास करावयाचा की काय, हे विद्यार्थ्यांना आधी कळत नाही. विद्यार्थ्यांचे पेपर तपासून झाल्यानंतर सर्व गुण अनुक्रमाने मांडून त्यांचा 'मध्य' काढतात. पास होण्यास कमीत कमी या 'मध्या' इतके गुण मिळवावे लागतात. अशा तऱ्हेने पास होण्यास लागणाऱ्या मार्कांचे प्रमाण त्रिकालाबाधित ठरलेले नसून परीक्ष्य विद्यार्थिसंघाच्या एकंदर मगदुरावर ठरले जाते. त्यामुळे अमुक

एक वर्षी किंवा ठिकाणी निकाल कडक लागला किंवा सढळ लागला, असली तक्रार करण्याचे कारणच राहात नाही.

जुन्या परीक्षेत, विद्यार्थ्यांनी उत्तरे लिहिल्यानंतर परीक्षकांचे हाल सुरू होतात. प्रश्नपत्रिका काढणे हे काम त्यांना हातच्या मळासारखे वाटते. नवीन परीक्षेत प्रश्न-पत्रिका तयार करताना परीक्षकांना आपले बुद्धिसर्वस्व खर्च करावे लागते व उत्तरे तपासण्याचे काम अगदीच सुलभ असते. उत्तरे ठराविक असल्याने ती लिहून जवळ ठेवली तर वाटेल त्याला उत्तराचे कागद तपासता येतील. त्यात कसलीही चूक होणार नाही. डॉ. बॅलार्ड म्हणतात की अशी उत्तरे तपासण्याचे एखादे यंत्रदेखील निघेल.

आता, या नवीन परीक्षेत प्रश्न कोणत्या तऱ्हेचे असतात, ते पाहू. या प्रश्नांचे तीन प्रकार असतात :

**१. पूरक प्रश्न :** काही वाक्ये किंवा परिच्छेद ( paragraph ) देऊन त्यांतील महत्त्वाचे शब्द गाळलेले असतात. विद्यार्थ्यांना या मोकळ्या जागेत समर्पक शब्द भरावयास सांगतात. ज्या विद्यार्थ्यांना विषयाचे पूर्ण ज्ञान आहे, त्यांनाच या मोकळ्या जागी शब्द योजता येतील, अशी प्रश्न काढताना काळजी घेतलेली असते.

उदाहरण : खालील प्रश्नात मोकळ्या जागी योग्य शब्द वापरा :

क्रिस्तोफर कोलंबस हा इ. सन......त...शहरी जन्मला. त्याला लहानपणा-पासून......चा नाद फार होता. त्यामुळे त्याने उपलब्ध असलेली निरनिराळ्या...ची वर्णने लक्षपूर्वक वाचली होती....शास्त्राचेही त्याने अध्ययन केले आणि......व......महासागरात अनेक सफरी केल्या.

**२. सत्यासत्य प्रश्न :** या प्रकारात निरनिराळी विधाने केलेली असतात. त्यांपैकी साधारण निम्मी बरोबर व निम्मी चुकीची असतात. त्यांतील बरोबर व चूक कोणती, हे विद्यार्थ्यांना हुडकून काढावयास सांगतात. या ठिकाणी काही मुले अनुमानाने उत्तरे देतील व ती बरोबर आल्यास कदाचित पूर्ण गुण मिळवतील, असा कोणी आक्षेप काढतील. पण असा आक्षेप उद्‌भवू नये म्हणून या प्रश्नांच्या उत्तरांना गुण देण्याची पद्धत निराळी योजिली आहे. बरोबर व चुकीची अशी दहा विधाने घेतली, तर निव्वळ अनुमानाने त्यातील ५ उत्तरे बरोबर व ५ उत्तरे चूक येतील, असे समजू. आता चुकीच्या उत्तराला एक मार्क कापण्यात येतो व बरोबर उत्तराच्या गुणांतून चुकीच्या उत्तराचे गुण वजा करण्यात येतात. तेव्हा अनुमानाच्या जोरावर १० पैकी ५ उत्तरे बरोबर व ५ उत्तरे चुकीची देणाऱ्या विद्यार्थ्यास शून्य मार्क मिळेल. ज्या मुलांना उत्तरे बरोबर माहीत नसतात, त्यांनी उत्तरे देण्याचा प्रयत्न न केल्यास त्याबद्दल मार्क कापले जात नाहीत. अशा रीतीने विषयाचे पूर्ण ज्ञान असल्याशिवाय विद्यार्थ्यांना पूर्ण गुण मिळविता येत नाहीत.

उदाहरण : खालील विधानांपैकी काही चुकीची व काही बरोबर आहेत. त्यांजपुढे

चूक असल्यास ‘ चूक ’ व बरोबर असल्यास ‘ बरोबर ’ असे लिहा. ( अंशमात्र चूक असलेले विधान चुकीचेच समजावयाचे. )

१. जेथे जेथे पर्वत असतात, तेथे तेथे फार पाऊस पडतो.

२. एस्किमो लोकांची बर्फाची घरे आतून अत्यंत उष्ण असतात. त्यामुळे ते आत गेल्यावर आपले कपडे काढून टाकतात.

३. हिंदुस्थानचे व्हाईसरॉयसाहेब एरवी दिल्लीस असतात. उन्हाळ्यात ते कलकत्त्यास जातात.

४. इंग्लंडात कापडाच्या गिरण्या अधिक असण्याचे कारण त्या देशात कापूस अधिक पिकतो.

५. समुद्रालगतच्या प्रदेशातील हवेत उन्हाळ्यात थंडपणा व हिवाळ्यात उष्णता असते.

६. पृथ्वी सूर्याभोवती फिरत असल्याने दिवसरात्र होतात.

**३. तार्किक प्रश्न :** या प्रकारात काही विधाने देऊन त्यांची निरनिराळी कारणे सुचविलेली असतात. त्यांपैकी सर्वांत सयुक्तिक कारण कोणते, हे विद्यार्थ्यांना शोधून काढावयाचे असते. असे करताना विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना मिळते व तर्कशास्त्रदृष्ट्या योग्य अनुमान कसे करावे, याचे त्यांना शिक्षण मिळते. असे प्रश्न अर्थात एकोत्तरी असावे लागतात.

**उदाहरण :** १. मांजर अतिशय उपयोगी आहे. कारण—

( अ ) ते उंदीर खाते.

( ब ) ते गरीब असते.

( क ) ते कुत्र्याला भिते.

२. हिवाळ्यातील दिवस उन्हाळ्यातील दिवसांपेक्षा लहान असतात. कारण

( अ ) थंडीने त्यांचे आकुंचन होते.

( ब ) धुक्याने सूर्य झाकला जातो.

( क ) पृथ्वीचा तो भाग सूर्यापासून दूर असतो.

नवीन परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचे हे तीन मुख्य प्रकार झाले. याशिवाय दुसरे काही प्रकार नाहीत, असे नाही. नवीन परीक्षेच्या उपयुक्ततेची जाणीव जसजशी अधिक होत जाईल, तसतसे तिच्या स्वरूपात अधिकाधिक वैचित्र्य येईल. तेव्हा, संक्षेपतः नवीन परीक्षेने विद्यार्थ्यांच्या ज्ञानप्राप्तीचे बिनचूक परीक्षण करता येईल, विषयाचे पूर्ण ज्ञान असल्याशिवाय त्याला पास होता येणार नाही, पाठशक्तीच्या जोरावर श्रम वाचवून परीक्षकांना फसवू पाहणारी मुले तोंडघशी पाडतील व विद्यार्थ्यांना पास होण्यासाठी वर्षारंभापासून काळजीपूर्वक अभ्यास करावा लागेल. शिक्षकांनाही ठोकळ प्रश्नाचे वर्गात विवरण करून श्रम वाचविण्याची किंवा व्याख्यान-

पद्धतीचा अवलंब करण्याची जी दुष्ट सवय लागलेली आहे, ती सोडून द्यावी लागेल व मुलांकडून व्यापक दृष्टीने अभ्यास करवून घ्यावा लागेल. हल्लीच्या काळी टिपणांचे ( Annotations ) जे बंड बोकाळले आहे, ते कमी होईल. एतावता, परीक्षा पास होणे यात काही तरी पूर्वपुण्याईचा अंश आहे—परीक्षा म्हणजे निव्वळ जुगार आहे, ती काही ज्ञानाची खरी कसोटी नव्हे; मोठमोठी हुषार मंडळीदेखील तिच्यात नापास होतात, अशा प्रकारचे उद्गार जे आपणांस आजकाल ऐकू येतात, ते नवीन परीक्षा-पद्धतीमुळे बंद पडतील व ज्ञानमापनाचे एक शास्त्रीय उपकरण अशा दृष्टीने परीक्षेची शिक्षणक्रमात मान्यता होईल.

**आधारभूत पुस्तके :**

१. " New Examiner " by Dr. P. B. Ballard.
२. " Group Tests of Intelligence " by the same author.
३. " Human Nature and Education " by Dr. A. S. Woodburne.

[ अध्यापन, मे १९३१ ]

# ५

# डाल्टन-पद्धती

शिक्षणाकडे पाहण्याच्या आपल्या दृष्टिकोणात दिवसेंदिवस फरक पडत चालला आहे. पूर्वीच्या कल्पना विसरल्याशिवाय नवीन कल्पनांची ओळख होणार नाही. पूर्वीचे टाइमटेबल म्हणजे एक जुलमी मालक होय. कारण प्रत्येक दिवस, आठवडा, महिना, टाइम-टेबल बांधून टाकते. शिक्षण हे एक शास्त्र आहे. यात नवीन शोध लागू शकतात. आधिभौतिक विज्ञानशास्त्रात नवीन शोध लागतात, तसे या शास्त्रातही शोध लागतात. शिक्षकाने काव्यमय दृष्टीने या विषयाकडे पाहिले पाहिजे. हल्ली शाळांतून मुले स्वतःलाच शिकवितात. शिक्षकांकडे जात नाहीत. जगाच्या आरंभापासून शिक्षकाने काम करून ठेविले आहे. जसे वैद्यकशास्त्राचे ध्येय सर्वांनी निरोगी होणे हे आहे, तसे शिक्षणाचे अंतिम ध्येय काय? तर मास्तरांची आवश्यकता नाहीशी करणे हे होय. सरकारी नियमाप्रमाणे १० मुले वर्गात असली, म्हणजे त्यांना शिकविण्याचे काम सुरू होते. वर्गात काही मुले लक्ष देतात, काही लक्ष आहे, असे नुसते दाखवितात, काही जांभया देत असतात, तर काही दुसराच व्यवसाय करीत असतात. दुर्लक्ष हीसुद्धा एक देणगी निसर्गानेच मानवांना दिलेली आहे. नाही तर आळशी मुलांना खरोखर त्रास झाला असता. बाटल्यांवर पाणी फेकले असता जसे फारच थोडे पाणी काही बाटल्यांत शिरते, तसे ज्ञानरूपी दूध मुलांवर फेकले असता फारच थोडे उपयोगी होते हे दिसून येईल. घेण्याची क्रिया झाल्याशिवाय देण्याची क्रिया पुरी होत नाही. मुलांनी ज्ञान घेतल्याशिवाय शिक्षकाचे काम पुरे होणार नाही. हे कळले तर पूर्वीच्या शिक्षकाला मोठा धक्काच बसेल. आपल्या पद्धतीत दोष असेल, तर तो काढून टाकला पाहिजे. शिक्षकाचे बोलणे ही एक शिक्षणात मुख्य गोष्ट

समजली जाते. शाळेत सुरू असलेल्या गोंगाटावरूनसुद्धा तेथे शिक्षण चालले आहे, असे आपण समजतो. काही ठिकाणी मुकी माणसेसुद्धा शिकवितात. अडचणीपुरते सांगावयाचे, असा एक प्रकार करण्यात येतो. सुज्ञ व डोळस शिक्षक हे प्रयोग करू शकतो. फक्त मुलांकडून काम करून घ्यायचे व ते जबाबदारी टाकून करून घ्यायचे, हे धोरण पाहिजे.

मॉंटेसरीपद्धतीप्रमाणे प्रत्येक मुलाने स्वतःला शिकविले पाहिजे. तेथे वर्ग नसतात. मूल आपल्या कामात गुंतलेले असते. ते नाना तऱ्हेचे व्यवसाय करीत असते. अभिरुचीमुळे स्वयंशिक्षणपद्धती मुले उपयोगात आणतात. मुलांना आत्मीयत्व वाटले पाहिजे. तरच त्यांचे हातून जास्त खटपट होते. आयुष्याला ज्ञानाची किती जरूरी आहे हे पाहिले पाहिजे. एखाद्या समारंभाच्या वर्गणीचा हिशेब करताना गणित विषयाची मुलांना गरज भासते. आपण त्यांना वेळी अवेळी शिक्षण देतो, त्यामुळे गोडी वाटत नाही. मुलांना जरूर कोणती आहे, हे परिस्थितीवरून ओळखले पाहिजे. विमान उडत आहे, हे पाहिले म्हणजे कुतूहल उत्पन्न होते व त्याच वेळी ती माहिती देणे जरूर असते. मुले कार्यामध्ये मग्न असताना शिक्षकाच्या शिस्तीची जरूरीच लागत नाही. मॉंटेसरीपद्धतीत वेळापत्रक नाही. अभिरुची आहे, तोपर्यंतच माहिती देणे उपयोगी ठरते.

**डाल्टन प्लॅन :** कोणतेही आश्चर्य नऊ दिवस टिकत असते. पुढे त्याचा जोर कमी होतो. निसर्गाचे वेळापत्रक मुलांना हितावह होईल. ज्या वेळी जे ज्ञान पाहिजे असे वाटत असते, त्या वेळी तेच ज्ञान त्यांना दिले पाहिजे. वेळापत्रकाचा अंमल कित्येकदा असह्य होतो. सर्वांची मने एकाच वेळी एकाच विषयात मग्न होणे शक्य नाही. म्हणून अमेरिकेत डाल्टन गावी एका इंग्रजी शाळेत मिस् पॅखर्स्ट या बाईने ही नवी पद्धत शोधून काढली. ही बाई मॉंटेसरीबाईची शिष्यीण होती. तिने प्राथमिक शाळेत ही पद्धत सुरू केली व स्वतःच्या नावाचा अभिमान न धरता ज्या गावात ती सुरू झाली, त्या गावाचे ‘ डाल्टन ’ हे नाव या पद्धतीला दिले.

अमेरिकेत जाऊन आलेल्या एका गृहस्थाने आपल्या गावच्या शाळेत डाल्टन-पद्धती सुरू करण्याचे ठरविले. शिक्षकाने काही करावयाचे नसते, हे ऐकून मुलांस चमत्कारिक वाटले. त्यांनी एक महिन्याचा अभ्यास वाटून दिला. त्यात शिक्षकांनी काय करावयाचे, हा विचार चालू असता, त्यांचेपुढे मुलांच्या लेखी कामाचे भारे येऊन पडले. या पद्धतीत प्रत्येक विषयाच्या लेखी कामाचे ढीग पडतात. मुलांस स्वातंत्र्य मिळाले, पण शिक्षकांना गुलाम बनविले. एक महिन्याने शिक्षक कंटाळले, मुले कंटाळली, कारण परंपरा व रूढी यांच्या गुलामगिरीचा अंमल त्यांच्या मनांतून नाहीसा झाला नव्हता. म्हणून पुन्हा जुनी पद्धती सुरू करण्यात आली, हा काही नव्या पद्धतीचा दोष नव्हे. या नव्या पद्धतीप्रमाणे काम करणाऱ्या शाळेला

जागा बरीच पाहिजे. खोल्या पुष्कळ पाहिजेत. जागेची अडचण नसावी, तर प्रत्येक विषयाला स्वतंत्र खोली असावी. त्या त्या विषयाची पुष्कळ नवी नवी पुस्तके, उपकरणे, साधने भरपूर असावी. तज्ज्ञ शिक्षक तेथे अधिकारी असावे. या पद्धतीत शिक्षक आपल्या आवडत्या विषयाच्या खोलीत बसून राहतो. त्याने आपली जागा सोडायची नाही. मुलांना जरूर वाटेल तेव्हा त्यांनी त्या खोलीत जावयाचे व पुस्तके वाचून अभ्यास करावयाचा. जरूर लागल्यास तेथे हजर असलेल्या शिक्षकाची मदत मागावयाची असते. या पद्धतीत खास मुलांच्या उपयोगी अशी पुस्तके लिहिलेली मिळाल्यास फार उत्तम. पण आज तशी पुस्तके लिहिलेली आपल्या देशात मिळत नाहीत.

ज्या पुस्तकात मुलांना योग्य अशा सूचना देऊन माहिती दिलेली असते, ते खास मुलांकरिता लिहिलेले पुस्तक म्हणता येईल. या दृष्टीने हल्लीची उपलब्ध असलेली शालेय पुस्तके योग्य ठरत नाहीत. शिवाय निरनिराळ्या विषयांवर सचित्र पुस्तके व संदर्भग्रंथ निर्माण झाले पाहिजेत. खोलीत बाकांची अडचण वाटत नाही. खुर्च्या नसल्या तरी चालतील. मानापमानाची कल्पना मुलांत या ठिकाणी काम करताना नसते. पण स्वातंत्र्याचे वातावरण असले पाहिजे. वर्षारंभी शिक्षकाने वार्षिक अभ्यासाचे टाचण करावे. सुटीत शिक्षकाला ही योजना करण्याचे काम भरपूर असते. ही टाचणे लिहून ठेवावी किंवा छापून काढावी. प्रत्येक महिन्याचा, आठवड्याचा किंवा तासाचा अभ्यास किती, तेही ठरविले पाहिजे. मुलांनी तासभर अभ्यास केल्यावर शेवटी त्यांना प्रश्न देतात. त्याची उत्तरे मुले वहीत लिहितात व त्या उत्तरांवरून मुलांचा अभ्यास कसा काय झाला, हे ठरवितात. वर्ग मुळीच नाहीत, असे नाही; पण पुष्कळसे काम नेमून दिलेले असते. प्रत्येक मुलाजवळ वर्षात केलेल्या कामाची हकीकत लिहिलेली असते. असा प्लॅन नसेल, तर पालकांना मुलाचा अभ्यास काय चालला आहे, हे समजण्याची अडचण पडते.

मुलांना भूगोल वाचावा असे वाटले, म्हणजे ते भूगोलाच्या खोलीत जातात. तेथे नियमित मुलांची सोय केलेली असते. किती वेळ अभ्यास करणे हे मुलाच्या मनावर व उत्सुकतेवर अवलंबून राहील. हल्लीच्या पद्धतीत हुशार मुलाची कुचंबणा होते. एकंदर निर्णय वर्षअखेर लागायचा असतो. डाल्टनप्लॅनमध्ये एका एका विषयात वाटेल तेवढी प्रगती मुलास करता येईल. सर्व विषय बरोबर चालले आहेत, सर्वांगीण प्रगती होत आहे असे दिसले, म्हणजे शिक्षकांनी पुढचा अभ्यास घ्यावयाचा असतो. मुलांना स्वातंत्र्य फक्त अभ्यासाचे असते. वाटेल ते कृत्य करण्याची मुभा नसते. अभ्यासाचे महत्त्व वाटत नाही, तोपर्यंत मुलांत चुकारपणा दिसतो; पण महत्त्व कळल्यावर प्रत्येक पावलागणिक माहिती लिहून ठेवण्याचे अवघड कामही मुले करू लागतात. अंगचुकार शिक्षकांना सध्याच्या पद्धतीत पुष्कळ सोय असते; पण डाल्टन–

प्लॅनमध्ये ही सोय नाही; कारण वाचण्याचे व तपासण्याचे काम तेथे बरेच असते. हल्ली आपणांमध्ये स्वतंत्र बुद्धीची माणसे का नाहीत? कारण स्वतंत्र प्रज्ञेला वाव मिळेल अशी सोय हल्ली नाही; पण डाल्टनमध्ये ती सोय आहे.'प्रगतीचे गमक मार्क–कार्ड असते, ते प्रगती दाखविते. पैलवान मेहनत करीत असताना मधून मधून वजन करीत असतो; कारण वजनावरून काय प्रगती झाली, हे कळते. इतरांस त्रास होऊ नये म्हणून वर्गात शिक्षकाने शांतता राखली पाहिजे. शांततेकरिता शिक्षकाला शिस्त राखावी लागते. येथे शिक्षकाचे हाती शिस्त असते. पण डाल्टनमध्ये शिस्त मुलेच संभाळतात. शिक्षकाचे काम बरेच कमी होते; कारण मुले एकमेकांशी विचारविनिमय करतात व अडचणी सोडवतात. सर्वांना न कळणारा भाग शिक्षक सर्व वर्गाला एकाच वेळी सांगतो. या पद्धतीत मुले नवीन भाग वाचून येतात; त्यामुळे शिक्षकांचे सांगणे लौकर समजते. सामान्यतः मुलेच बहुतेक काम करतात. काही मुले चुकार असतात, त्यांचेसाठी निराळी खोली असून तेथे शिक्षक त्यांना स्वतंत्रपणे शिकवितात. अनुभव असा आहे की, दिलेल्या कामापैकी कठीण भाग मुले प्रथम सोडवतात व मागाहून सोपा भाग सोडवतात. त्यामुळे उतार जमिनीवर सायकल चालविणाऱ्या माणसाला जसे पाय फिरविण्याचे श्रम पडत नाहीत; पण फक्त दिशा बरोबर संभाळली म्हणजे मोठ्या आनंदाने तो मार्ग तोडीत असतो, तसाच कठीण भाग आधी करून नंतर सोपा भाग करणाऱ्या मुलांना मोठा आनंद वाटत असतो.

काव्य शिकविताना या डाल्टनपद्धतीचा उपयोग फारसा करता येत नाही. काव्यातील सौंदर्य शिक्षकानेच दाखविले पाहिजे. तेव्हा या पद्धतीने काव्य शिकविता येत नाही. काव्यात शिक्षक रंगलेला असतो व ते शिकविण्यास शिक्षकाची जरुरी फार असते. तसेच भाषाज्ञान, व्याकरण, इतिहासातील स्फूर्ती उत्पन्न करणारे प्रसंग, धर्म वगैरे शिकविताना शिक्षक जरूर पाहिजेच.

आपल्या शाळेत या पद्धतीचे फायदे मिळवावयाचे असतील, तर एकदम फेरबदल करू नका. हळूहळू सुरुवात करा. एकेक विषयाची सोय करा, मुलांचे अंगावर जबाबदारी टाकून त्यांना प्रयत्न करण्यास प्रवृत्त करणे व त्यांच्या स्वतंत्र बुद्धीला उत्तेजन देणे हा मुख्य हेतू आहे. उत्तर हिंदुस्तानात अशा प्रकारच्या पद्धतीने शिक्षण देणाऱ्या शाळा बऱ्याच आहेत. एखादा मुलगा गैरहजर राहिला म्हणजे हल्लीच्या पद्धतीने त्याचे फार नुकसान होते. पण या डाल्टनपद्धतीने जादा श्रम घेऊन इतर मुलांबरोबर पल्ला लवकर गाठता येतो. या योजनेने पालक खूष होतील. कारण पुष्कळशी पुस्तके शाळेमार्फत घेतली जातील. मुलांना लेखी काम भरपूर मिळेल.

श्रम फार होणे, अभिरुची न लागणे या गोष्टी डाल्टनपद्धतीने घडत नाहीत. मुलांच्या स्वतःच्या अभिरुचीवर ही योजना अवलंबून आहे. मात्र मुलांनी न आवडणारा विषय ही केव्हातरी केलाच पाहिजे, ही भावना ठेविली पाहिजे. अभ्यासाला सर्व

विषय आहेतच, फक्त कोणता विषय केव्हा करायचा, हे मुलाने ठरवावयाचे असते; तसेच धड्यांच्या क्रमाचे स्वातंत्र्य असते. पण कोणताही विषय सोडता यावयाचा नाही. एवंच, मुलांच्या कलाने व अभिरुचीने या गोष्टी कराव्या. भरपूर पैसा, भरपूर जागा व माहितगार शिक्षक वगैरे गोष्टींच्या अडचणी भासतात, पण प्रयत्न केल्याने त्या दूर होतील. मुलांत आनंद उत्पन्न करण्याची जागा या पद्धतीत आहे. या पद्धतीचा उपयोग विशेषतः दुय्यम शाळांतून पुष्कळच होतो. तथापि, प्राथमिक शाळेतील काही वर्गांतून पुष्कळ गोष्टी करून घेता येतील.

[ **प्राथमिक शिक्षण**, मार्च १९३५ ]

# ६

# इंग्लंडातील मुलांची जोपासना

इंग्लंड हे राष्ट्र सुधारणेत फारच पुढे असल्यामुळे त्याचे अनुकरण एकदम आपल्या देशास झेपणार नाही. तिकडील सर्व लोक समंजस आणि सुशिक्षित असल्या-मुळे तिकडील शिक्षकांवर मुलांची फारच थोडी जबाबदारी पडते. अनाथ, व्यंग अशा मुलांचे शिक्षण, तसेच बेकार पालकांच्या मुलांचे शिक्षण चांगल्या प्रकारे व्हावे आणि ते पूर्ण झाल्यावर ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे त्यास पुढील आयुष्यक्रमा-करिता व्यवसाय मिळवून द्यावा, याकरिता तिकडे अनेक संस्था स्थापन झाल्या आहेत. मला फक्त लंडन कौंटी कौन्सिलची माहिती आहे. तेव्हा हे कौन्सिल मुलांची काळजी कोणत्या प्रकारे घेते, ते मी आज सांगणार आहे. कमीजास्त प्रमाणात त्या देशातील इतर कौंटीमध्येही अशीच व्यवस्था आहे.

तेथे शाळा म्हटली की, तिच्याकरिता प्रशस्त इमारत, खेळण्यास भरपूर जागा, बाग या गोष्टी असावयाच्याच. लहान मुलांकरिता किंडरगार्टनपद्धतीचे शिक्षण असावयाचे. अशा वर्गात लहान मुलांस इकडून तिकडे ठेवता येतील अशा लहान खुर्च्या असतात. मुलांस झोप आल्यास निजण्याकरिता प्रत्येक वर्गात काही आराम-खुर्च्या असतात आणि गाणी, गोष्टी, खेळ, नाच यांचेद्वारे शिक्षण दिले जाते.

किंडरगार्टनपद्धतीचे शिक्षण संपल्यावर प्राथमिक शिक्षणास सुरुवात होते. ते पूर्ण झाल्यावर मुले दुय्यम शिक्षणाचे शाळांत जातात, परंतु ज्यांना अशा शाळांत शिक्षण घेणे शक्य नसते, अशा मुलांकरिता ' सेंट्रल स्कूल्स ' म्हणून शाळा असून तेथे दुय्यम शाळेतीलच अभ्यासक्रम असून तेथे त्याला धंदेशिक्षणाची जोड देण्याची व्यवस्था केलेली असते.

पंधरा वर्षेपर्यंत शिक्षण सक्तीचे असून मुलांना शाळा सोडल्यावरही १८ वर्षे वयापर्यंत पुरवणी शिक्षण घ्यावे लागते. वाचनाची गोडी मुलांना लागावी, म्हणून सार्वजनिक वाचनालयांशी वारंवार सहकार्य करण्यात येते.

याशिवाय लंडन शहरात आंधळ्यांकरिता, अधू दृष्टीच्या मुलांकरिता बहिरे, मुके, क्षयी, पंगू अशांकरिताही स्वतंत्र शाळा आहेत. अशा रीतीने प्रत्येक तऱ्हेच्या मुलाला त्याच्या योग्यतेप्रमाणे व मगदुराप्रमाणे शिक्षणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

लंडनमध्ये जगातील प्रसिद्ध स्थळांचा व विविध गोष्टींचा एक मोठा वस्तुसंग्रह आहे. आफ्रिका खंडाची माहिती द्यावयाची असल्यास मुलांस तेथे नेण्यात येते व त्यांस शिद्दी वगैरे लोक, त्यांची राहाणी, वाळवंट, कालवे वगैरे गोष्टी यांचे नमुने दाखविण्यात येतात. त्यामुळे देश, त्याची परिस्थिती व तिला अनुरूप अशी लोकांची राहणी यांचे ज्ञान मुलांस उत्तम होते. सृष्टिनिरीक्षणाकरिता मोठमोठाल्या बागा ठिकठिकाणी आहेत; तेथे मुलांस नेण्यात येते. इंग्लिश मुले स्वभावतःच खेळाडू आहेत व त्यांस खेळण्याचे कामात शिस्त लागावी म्हणून फुटबॉल, क्रिकेट, हॉकी वगैरे खेळ शिकवितात. पोहोण्याच्या शिक्षणाची जागोजाग सोय केलेली आहे. ‘ रॉयल ह्युमॅनिटेरियन सोसायटी ’मार्फत पाण्यात बुडणाऱ्यांचे प्राण वाचविणाऱ्यांस बक्षिसे देण्यात येतात.

चौथ्या वर्षापासून १४ वे वर्षापर्यंत ४ वेळा मुलांची शारीरिक तपासणी विद्वान डॉक्टरांकडून करविण्यात येते. त्याकरिता पुष्कळ डॉक्टर नेमिलेले आहेत. तपासणीचा रिपोर्ट पालकांकडे पाठविला जातो. तसेच व्यंग मुले आढळल्यास त्यांची काळजी घेण्यास परिचारिका नेमिलेल्या आहेत. त्या मुलांच्या पालकांच्या गाठी घेतात व सल्लामसलत देतात. प्रत्येक प्राथमिक शाळेला जोडून ‘ केअर कमिटी ’ ( Care Committee ) म्हणून एक मंडळ असते. त्यातील सभासद वैद्यकीय तपासणीच्या वेळी हजर असतात व जर एखाद्या पालकाने मुलाच्या रोगनिवारणाकडे दुर्लक्ष केले तर त्याच्यावर खटला करण्यात येतो. ‘ केअर कमिटी ’ने मुलांची काळजी घेण्याचे काम स्वयंस्फूर्तीने आपल्या अंगावर घेतले आहे.

याखेरीज ‘ ॲडव्हायसरी कमेटी ’ म्हणून एक मंडळ असून त्याचे ‘ मिनिस्ट्री ऑफ लेबर ’शी सहकार्य असते. त्या मंडळाचे काम मुलांनी पुढील आयुष्यक्रमात कोणता व्यवसाय घ्यावा याचा सल्ला देणे व शक्य तर तो व्यवसाय मिळवून देणे हे आहे. अशा रीतीने ‘ कौन्टी–कौन्सिल ’ व निरनिराळी मंडळे ही मुलांच्या शिक्षणाची इतकी काळजी घेतात की, पालकांस काही करावयाचेच उरत नाही. पालक समंजस असल्यामुळे एक गोष्ट मात्र करतात. ती ही की, कौन्सिलमध्ये स्वार्थत्यागी व कळकळीची माणसे निवडून देतात.

[ प्राथमिक शिक्षक, नोव्हें. १९३० ]

# ७

# इंग्लंडातील प्राथमिक शिक्षण

देशाच्या भरभराटीला जी अनेक कारणे लागतात, त्यात देशातील उत्कृष्ट शिक्षण हे एक कारण आहे. इंग्लंडची प्रगती त्यातील उत्कृष्ट शिक्षणामुळेच भराभर होत चालली आहे. प्रगतिरूपी नदीची शिक्षण ही गंगोत्री म्हणावयास हरकत नाही.

इंग्लंडमधील प्राथमिक शिक्षणाची प्रगती फार अलीकडची आहे. इ. स. १८७० पर्यंत तर तिकडे प्राथमिक शिक्षणाची फारच अनास्था होती. १८७० ते १९०२ पर्यंत हे शिक्षण रेंगाळतच चालले होते. १९०२ ते आतापर्यंत ह्या पंचवीस वर्षांत प्राथमिक शिक्षणात अतोनात सुधारणा झाली आहे व ती अधिकाधिक होत आहे. १९०२ पासून तिकडे 'स्कूलबोर्डा' ऐवजी 'लोकल ॲथॉरिटी' निर्माण करण्यात आल्या. अर्बन डिस्ट्रिक्ट व बरो– ( Borough ) मधील लोकल ॲथॉरिटीच्या हातात प्राथमिक शिक्षणाची सर्व व्यवस्था देण्यात आली. तिकडे प्राथमिक शिक्षण सक्तीचे झालेले आहे. काही ठिकाणी ही सक्ती नव्हती; पण १९२१ पासून कायद्याने प्रा. शिक्षण पूर्ण सक्तीचे झालेले आहे. हल्ली सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा ५ ते १४ ही आहे. ही ५ ते १५ करण्याची वाटाघाट हल्ली चालू आहे. तिकडे साक्षरता किती आहे. हे पुढील गोष्टीवरून कळेल. एकदा एक गृहस्थ रेल्वेने प्रवास करीत होता. त्याने डब्यातील एका १८/२० वयाच्या माणसास त्याच्या शिक्षणाबद्दल विचारले. तो निरक्षर असल्याचे आढळून आले! त्या गृहस्थाला आश्चर्य वाटले. त्याने ही गोष्ट वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली व सरकारवर कडक टीका केली.

शाळेची वेळ ९ ते १२ व १॥ ते ४॥ अशी असते. अभ्यासास सुरुवात ९॥ वाजता होते. ९ ते ९॥ सार्वत्रिक प्रार्थना, धर्मपर गोष्टी वगैरे कार्यक्रम असतो. तिकडील

शाळांत उशिरा आलेली मुले फारच क्वचित. प्रत्येक वस्तीत मध्यवर्ती शाळा असल्याने शाळा व घर यात अंतर फार थोडे असते. पालक आईबाप मुलांची काळजी फार घेतात. शनिवार व रविवार ह्या दोन दिवशी शाळांना सुटी असते. ह्या सुटीत शिक्षक मुलांना, सहलींना नेतात. तिकडे आपल्या इकडच्याप्रमाणे पुष्कळ सुट्या नसतात. आपल्या इकडे भिन्न भिन्न धर्मांचे लोक आहेत, म्हणून सुट्या फार अशी स्थिती तिकडे नाही.

शाळेची इमारत विटांनी बांधलेली व बहुधा तिमजली असते. वर्गाच्या खोल्या ५० ते ६० मुले मावतील अशा असतात. प्रत्येक वर्गात ४० ते ४५ मुले असतात. ही संख्या कमी करण्याचा प्रयत्न चालू आहे. प्राथमिक शिक्षकाला बहुधा एकच वर्ग शिकवावा लागतो. ऑस्ट्रेलियात खेडोपाडी सर्व शाळेवर एकच शिक्षक असतो व तो सातही वर्ग शिकवितो. आपल्याकडेही खेड्यातील शिक्षकास चारपाच वर्ग शिकवावे लागतात, तसे इंग्लंडात नाही.

शिक्षण जसे सक्तीचे तसे ते मोफतही आहे. शिक्षण साहित्यही तिकडील मुलांना शाळेतूनच दिले जाते. हातात पाटी, गळ्यात बुकांची पिशवी, अगर दुसऱ्या हातात बुकांचे गाठोडे घेऊन शाळेत जाणारी मुले आपल्याकडे आढळतात, तसा देखावा तिकडे दृष्टीस पडत नाही.

प्रत्येक शाळेचे स्वतंत्र क्रीडांगण असते. प्रत्येक वर्गाचे चार संघ केलेले असतात. अशा रीतीने सगळ्या शाळेचे चार भाग होतात. ह्या भागाभागांतून खेळांचे सामने होतात. फूटबॉल हा तिकडील फार महत्त्वाचा खेळ समजला जातो. खेळांचे सामने पाहण्यास लोकांची अतोनात गर्दी होत असते. वयातीत माणसेही तिकडे खेळात भाग घेत असतात. एकदा केंब्रीज व ऑक्सफोर्ड येथील विद्यार्थ्यांमध्ये सामना झाला. लाखो लोक सामना पाहण्यास जमले होते. प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या तरी एका पक्षाचा अभिमान होता. खेळ संपला. एक पक्ष विजयी झाला. पण पुढे मारामारी मात्र झाली नाही. सर्व सलोख्याने व आनंदाने घरी गेले. आपल्याकडे मारामारी-शिवाय असल्या सामन्यांचा शेवटच नाही. त्यांचे खेळ व सामन्यांच्या पद्धती ह्या गोष्टी आपण घेतल्या; पण खेळाच्या मुळाशी असलेली भावना मात्र आपण घेतली नाही.

प्राथमिक शिक्षकाचा वर्षाचा पगार १८० पौंड ते ५००/६०० पौंड इतका असतो. वर्षाच्या १८० पौंड वेतनात या शिक्षकाला सुखाने राहता येते. मी एका सामान्य प्राथमिक शिक्षकाच्या कुटुंबात राहात होतो. त्याचे घर फारच सुशोभित, टापटिपीचे, आधुनिक सुखसोयींनी सुसज्ज असे होते. त्याच्या घरात ३/४ हजार पुस्तकांची तर लायब्ररी होती. इंग्लंडमध्ये विभक्त कुटुंबपद्धती असल्यामुळे घरात माणसे थोडी असतात. शिक्षकाला पगाराशिवाय जास्त पैसे मिळविण्याची बहुधा आवश्यकता

नसते. ह्या सर्व परिस्थितीमुळे प्राथमिक शिक्षक आनंदी, खेळाडू, उत्साही, व्यासंगी असा असतो. त्याला आपल्या कामाचा योग्य मोबदला मिळतो. म्हणून तो केव्हाही कंटाळलेला असत नाही.

शाळेतील शिक्षणासंबंधी तात्त्विक नियम लोकल ॲथॉरिटी करते. ती तत्त्वे डोळ्यांपुढे ठेवून इयत्तावार शिक्षणक्रम ठरविणे व पुस्तके निवडणे यांत हेडमास्तरांना पूर्ण स्वातंत्र्य असते. हेडमास्तर अभ्यासाचा वर्षाचा क्रम आखून देवितात. वर्ग-शिक्षक आठवड्याचा अंदाज करतात व त्याप्रमाणे शिक्षण देतात. रोजची टाचणे ते काढीत नाहीत.

तिकडील शिक्षक बोलण्याचे काम फार थोडे करतात. याचे कारण असे की, प्रत्येक विषयाची पुस्तके फार सोपी, केवळ मुलांकरिता लिहिलेली अशी असतात. विद्यार्थ्यांनी त्यावरून अभ्यास करावयाचा व अडेल तेथे शिक्षकाला विचारावयाचे. आपल्याकडे मुख्यत्वेकरून शिक्षकांच्या दृष्टीने पुस्तके लिहिलेली असतात. तिकडे शिक्षकांकरिता वेगळी व विद्यार्थ्यांकरिता वेगळी पुस्तके असतात. आपल्यकडेही आता विद्यार्थ्यांकरता पुस्तके होऊ लागली आहेत.

अमेरिकेत डाल्टन प्लॅन नावाची एक नवीन शिक्षणपद्धती निघाली आहे. ह्या पद्धतीत विद्यार्थी स्वतःचे श्रमाने अभ्यास करतो. शिक्षकाचे काम फक्त मदतनिसाचे असते. विद्यार्थी अडेल तेवढे शिक्षकाला विचारतो. ही पद्धती इंग्लंडमध्ये सुरू नाही. तरी त्या पद्धतीतील तत्त्व मात्र घेतले गेले आहे. प्राथमिक शाळेतील शिक्षक वर्गात फिरून काम करीत असतो, खुर्चीवर बसलेला असा आढळून येत नाही.

प्राथमिक शाळेत शिकविल्या जाणाऱ्या विषयांसंबंधी थोडक्यात माहिती अशी :

**गद्यपद्य :** इकडील शाळांतून गद्य हा विषय शिकविण्याची जरूरच भासत नाही. कारण पुस्तके सोप्या भाषेत लिहिलेली असतात. आपल्याकडील पुस्तकांतील विषय कठीण व भाषाही कठीण असते. तिकडे पद्य हा विषय शिकविला जातो. कवीचे हृद्गत, कवितेचे सार, कवितेतील मुख्य कल्पना सांगतात. काव्याबद्दल आवड व रसिकता उत्पन्न होण्याच्या दृष्टीने हा विषय शिकवितात.

**इतिहास-भूगोल :** प्रवास हे हा विषय शिकविण्याचे एक उत्तम साधन होय. दर शनिवारी व रविवारी मुले सहलीला नेतातच; शिवाय दर तीन तीन महिन्यांनी शाळेतील मुलांना दूरच्या गावी प्रवासास नेतात. अशा प्रसंगी ह्या विषयाचे चांगले शिक्षण देता येते. त्या देशात इतिहासाच्या साधनांचा फार चांगला संग्रह केलेला आहे. लंडनमध्ये एके ठिकाणी मेणाच्या चित्रांचा फार मोठा संग्रह केलेला आहे. त्यात ८००/९०० वर्षांत झालेल्या ऐतिहासिक पुरुषांच्या प्रतिमा पाहाण्यास मिळतात. तसेच तेथील इंपीरियल इन्स्टिटयूटमध्ये जगातील निरनिराळ्या देशांची माहिती मिळण्याची सोय केलेली आहे. हिंदुस्तानची माहिती शिकवावयाची म्हणजे मुलांना

त्या ठिकाणी नेऊन ती शिकवावयाची. त्या ठिकाणी हिंदुस्तानातील पिके, लोक, चालीरीती, लोकांचे पोषाख वगैरे माहिती एके ठिकाणी मिळते. शैक्षणिक चलच्चित्र-पटही ( सिनेमा ) तेथे नेहमी दाखविले जातात. त्या वेळी निरनिराळया शाळांना आळीपाळीने बोलावणे असते.

**वाचन :** अभ्यासाच्या पुस्तकांशिवाय इतर पुस्तकांचे वाचन फार होते. आपल्याकडे गोष्टींचे महत्त्व अद्याप पटलेले नाही. वाचन हाच खरा ज्ञानप्राप्तीचा मार्ग होय. मुलांना योग्य अशी पुस्तके आपल्याकडे कमी आहेत, हे एक कारण सांगितले जाते. पण आहेत ती पुस्तके तरी विकत घेऊन मुलांना देण्याची पालकांची प्रवृत्ती नाही. तिकडे सर्वसाधारणपणे मुलगा आठवड्यात अभ्यासाशिवाय इतर अशी ४००/५०० पाने वाचतो.

चित्रकला, संगीत, हस्तव्यवसाय व नाच या विषयांना प्राथमिक शाळेत फार महत्त्व देतात.

**संगीत :** आरंभापासून ह्या विषयाचे शिक्षण मिळत असल्यामुळे तिकडे सर्वच लोक थोड्या फार प्रमाणाने गाणारे असतात. सार्वजनिक उत्सवप्रसंगी लाखो लोक एकत्र जमतात. तेथे ते एकत्र गातात. सर्व लोकांनी एकत्र जमून एकदम एका सुरात गाण्याने, सलोखा, एकी व प्रेम वृद्धिंगत होण्यास फार मदत होते.

**चित्रकला :** ह्याही विषयाचे शिक्षण आरंभापासूनच मिळत असल्यामुळे प्रत्येक इंग्रजाला ह्या विषयाचे थोडेफार ज्ञान असते. ह्या विषयाची तिकडे फार भरभराट झालेली आहे. वर्गात काढावयाच्या चित्रांचा व इतर विषयांचा संबंध ठेविला जातो. आपण मात्र ह्या विषयाबद्दल उदासीन आहोत.

**हस्तव्यवसाय :** लाकूडकाम, धातुकाम यांचे शिक्षण दिले जाते. ह्या शिक्षणा-करिता ५।५ शाळांसाठी एक मध्यवर्ती ठिकाण केलेले असते. तेथे देण्यात येणाऱ्या शिक्षणात व्यवहारापेक्षा सौंदर्याकडे अधिक लक्ष दिले जाते.

**नाच :** ( Folk-dancing ) हा विषय तिकडील शाळांतून शिकविला जातो. प्राथमिक शाळेतील ह्या विषयाची कल्पना द्यावयाची म्हणजे रासक्रीडेप्रमाणे हा नाच घेतला जातो.

**पोहणे :** इंग्लंड हा थंड हवेचा देश असल्यामुळे तेथील लोक रोज स्नान करीत नाहीत. आठवड्यातून एकदाच स्नान करणारे लोक फार. ती सोय प्रत्येकाच्या घरी असतेच असे नाही. म्हणून म्युनिसिपालिटीने स्नानगृहे बांधलेली आहेत. येथे मुलांना स्नानास नेतात. २/३ महिन्यांनी पोहण्याच्या शर्यती होतात. त्या पाहण्यास मुलांच्या आया मोठ्या कौतुकाने येतात.

**शारीरिक तपासणी :** प्रत्येक शाळेतील मुलांची सरकारी डॉक्टरांकडून ८ वर्षांतून चार वेळा संपूर्ण तपासणी केली जाते. त्या तपासणीच्या वेळी पालकांना बोलावितात.

मुलांच्या प्रकृतीतील दोष पालकांना सांगतात. पालक स्वतः दुसरीकडे औषधपाण्याची सोय करीत नसल्यास शाळेच्या खर्चाने त्या मुलांच्या औषधपाण्याची सोय केली जाते.

**शिस्त :** शिस्तीबद्दल हा देश प्रख्यातच आहे. इंग्रज मुलांना लहानपणापासूनच शिस्त लाविली जाते. शिस्त लावण्याचे कामी शिक्षकांना फार कमी श्रम पडतात. आपल्याकडे याच्या अगदी उलट आहे. शिस्त लावण्याची सर्व जबाबदारी शिक्षकावर! हळू बोलणे, ओळीने चालणे, धांदल न करणे ह्या गोष्टी तर इंग्रजांच्या फारच अंगवळणी पडलेल्या आहेत. शहरांतून मोठमोठाली सार्वजनिक हिरवीगार मैदाने असतात. तेथे लोक करमणुकीकरिता जमतात. हजारो लोक तेथे जमलेले असतानाही गोंगाट ऐकू येत नाही. हीच शिस्त वर्गात दिसते.

**शिक्षा :** तिकडे छडीचा उपयोग जवळ जवळ करीतच नाहीत. शारीरिक शिक्षा करण्याचा अधिकार फक्त हेडमास्तरांना आहे. त्यांनी शिक्षा केलेल्या मुलांचे रजिस्टर ठेवावयाचे असते व ते वरिष्ठांकडे पाठवावयाचे असते. त्यांना शिक्षेचे कारण योग्य वाटले नाही, तर हेडमास्तरांना ते अधिक खुलासा विचारतात.

मुलांच्या गुन्ह्यांचा विचार मानसशास्त्रदृष्ट्या केला जातो. त्याकरिता मानसशास्त्रज्ञ नेमलेले आहेत. एकदा एका शाळेत एक सालस मुलगा एकाएकी उद्दामपणाने वागू लागला. शिक्षकाने लागलीच मानसशास्त्रज्ञाला बोलाविले. त्याने चौकशी करून मुलाच्या उद्दामपणाचे कारण शोधून काढले. त्या मुलाची आई मरण पावल्यावर त्याच्या बापाने दुसरे लग्न केले असून ती बाई खाष्ट स्वभावाची होती. ती त्या मुलाला खूप छळू लागली. त्यामुळे मुलाच्या वर्तनात फरक पडत चालला. शेवटी शेवटी तर तो मुलगा अतिशयच उद्दाम झाला.

मुलाच्या बापाला ते कळविले, तेव्हा त्याने काळजी घेऊन मुलाची स्थिती सुधारण्याची योजना केली.

आपल्याकडे परीक्षेची जी कल्पना आहे, तशा परीक्षा तिकडील शाळांत नाहीत. प्राथमिक शिक्षणाचा काळ ५ ते १४ वर्षे हा आहे. व ५ ते ११ वर्षांतील शिक्षण घेतल्यावर मुलगा दुय्यम शाळेत जाण्यास लायक होतो. त्या वेळेस परीक्षा घेतली जाते. ज्या मुलांना दुय्यम शाळांत जावयाचे नसते, ती पुढील तीन वर्षे प्राथमिक शाळेतील शिक्षण घेतात.

वयाला १४ वर्षे पुरी झाल्यानंतर मुलगा प्राथमिक शाळेतून बाहेर पडतो. पुढे ४ वर्षेपर्यंत मुलाची इच्छा असल्यास कामधंदा करूनही शिक्षण घेण्याची सोय असते. अशा शाळांना 'पूरक शिक्षणाच्या शाळा' म्हणता येईल. मुलाला नोकरी मिळवून देण्यासाठी शाळेला जोडलेल्या कमिट्या असतात. यांमध्ये पालक, शिक्षक व कारखानदार असतात. ते मुलांचा अभ्यासक्रम संपताच त्यांना अनुरूप अशा नोकऱ्या

शोधून काढण्याचे काम करीत असतात. खटपट करूनही एखाद्या मुलाला नोकरी मिळाली नाही, तर नोकरी लागेपर्यंत या मुलाला दर आठवड्यास सुमारे १० शि. मदत म्हणून दिली जाते. ही रक्कम पुढे त्याच्या प्राप्तीतून काढून घेतात.

बहुतेक विद्यार्थी एकाच धर्माचे असल्यामुळे धार्मिक शिक्षणाचा प्रश्न तिकडे आपल्या इकडच्या इतका बिकट नाही.

मुलामुलींना एकत्र शिक्षण घेण्याच्या विरुद्ध मत तिकडे आहे. त्यांपकी केंब्रिज येथील ' मॉल्टिंग हाऊस स्कूल 'मधील प्रयोग अत्यंत नावीन्यपूर्व व महत्त्वाचा आहे. ही शाळा मि. जेफरे पाईक या श्रीमान गृहस्थाने काढलेली आहे.

त्या शाळेत वर्ग नाहीत व अभ्यासक्रमही नाही. शाळेतील विद्यार्थ्यांचे मिळून एक कुटुंब समजले जाते. त्या शाळेत ३ ते ९ वर्षे वयाची १५ मुले आहेत. ती मुले आपल्या स्वतःच्या मनाने वाटेल त्या गोष्टी करीत असतात. शिक्षक दूर बसलेले असतात. मुलाला वाटेल ते करण्याची परवानगी आहे. त्या शाळेत शिक्षकाने आपण होऊन काहीही शिकावयाचे नाही. एका मुलाने एके दिवशी आपली पुस्तके जाळून टाकली. दुसरे दिवशी पुस्तके वाचावयास मिळाली नाहीत, तेव्हा त्याला आपली चूक कळली. तो पुस्तकांकरिता खूप रडला. उपयोगी वस्तू जाळू नयेत, हे ज्ञान त्याला पक्के झाले. एक मुलगा–लहान मुलगा–उंच शिडीच्या टोकावर जाऊन बसे. त्याच्या कृतीला अडथळा केला गेला नाही. कारण लहान मुले आपले संरक्षण करण्यास समर्थ असतात. त्यांना आपल्या जिवाची काळजी असते. त्या शाळेत लघुलेखक ठेवलेले आहेत. ते मुले आपापसांत काय बोलतात, शिक्षकांशी काय बोलतात, वगैरे सर्व लिहून ठेवतात. अशा लेखांची बाडे तेथे आहेत. त्यावरून तेथील मंडळी नवीन शोध लावणार आहेत. ह्या पद्धतीस ' स्वयंशोधन पद्धती ' असे नाव दिले आहे.

एकंदरीत, तिकडील शिक्षणाची उभारणी मानसशास्त्राला अनुसरून व तेथील परिस्थितीस अनुरूप अशा तऱ्हेची प्रगमनशील आहे.

( रा. रा. प्र. के. अत्रे, हेडमास्तर, कॅंप एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल, यांच्या ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणे येथे झालेल्या व्याख्यानाचा सारांश. सारांशलेखक– सि. वा. सुभेदार, प्रॅ. स्कूल पुणे. )

[ **प्राथमिक शिक्षण**, नोव्हेंबर १९२८ ]

# ८

# बालक-दिन

ता. २२ मार्च रोजी पुणे येथील प्राथमिक शाळेतील मुलांकडून ‘ बालक-दिन ’ पाळण्यात आला. सदर दिवशी निरनिराळ्या शाळांमधील बालविद्यार्थ्यांनी आपापल्या शिक्षकांच्या देखरेखीखाली ‘ शिवाजी पुतळ्या ’च्या उघड्या मैदानात जमून व तेथे दोन हजार मुलांची सांघिक कवाईत पाहून तदनंतर मिरवणुकीच्या स्वरूपात नव्या मंडईपाशी येऊन मग घरोघर जावयाचे, असा मुख्य कार्यक्रम ठरलेला होता. शिवाय संध्याकाळी मुलांना निरनिराळ्या सिनेमागृहात शैक्षणिक किंवा मनोरंजक चित्रपट दाखविण्याची सोय केलेली होती. तसेच काही ठराविक जागी पालकांच्या सभा भरल्या व त्यांत मुलांसंबंधीच्या त्यांच्या:कर्तव्याबद्दल अधिकारी शिक्षकांकरवी चर्चाही झाली. या वर्षीच्या ‘ बालकदिना’त ‘ शिशुवर्गा’तील अत्यंत छोट्या मुलांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. कारण उघड आहे. या शहरातील निव्वळ प्राथमिक शाळांतील विद्यार्थी जमेत धरले, तरी त्यांची संख्या चौदा ते पंधरा हजार भरेल. एवढा मोठा समूह शिस्तीने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे, हे काम अत्यंत जबाबदारीचे व कठीण आहे. तेव्हा या झुंडीत अगदी लहान मुलांना आणणे आज तरी धोक्याचे आहे. इंग्रजी शाळेतील विद्यार्थी ‘ बालकां’च्या व्याख्येत जमा होत नसल्याने त्यांचा ‘ बालकदिना’त समावेश करण्यात आला नाही.

अशा तऱ्हेने ‘ बालक-दिन ’ साजरा करण्याची ही कल्पना इकडे अगदी नवीन आहे. हा दिन साजरा करण्याची फलश्रुती कोणाही समंजस माणसाला सहज समजून येईल. मुलांच्या दृष्टीने त्यांच्यांत अधिक शिस्त व संघटना उत्पन्न करून त्यांच्यांत आपलेपणाची जाणीव जागी करणे व पालकांच्या दृष्टीने त्यांना आपल्या

मुलाबाळांविषयीच्या शैक्षणिक जबाबदारीची आठवण करून देणे, एवढाच या बालक-दिनाचा इत्यर्थ आहे. त्याशिवाय उत्सवजन्य आनंदाची अनायासेच दोघांनाही प्राप्ती होणार असल्याने तो फायदा निराळा.

राखोळी घातलेल्या जनावराप्रमाणे मुलाला एकदा शाळेत पोहोचविले म्हणजे आपले कर्तव्य संपले, अशी पुष्कळ पालकांची समजूत–अर्थातच गैरसमजूत असते. यापेक्षा फार झाले तर मास्तर ‘ठेवणे’ व वर्षाअखेर मुलाला ‘वर ढकलणे’ या दोन शैक्षणिक चळवळींत काही पालक भाग घेऊ शकतात. ‘शाळा’ नामक जागेत रविवार आणि इतर सुटीचे दिवस वजा करून बाकीच्या दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जी कामगिरी चालते, त्याचे नाव शिक्षण, अशी पुष्कळ पालकांनी आपल्या मनाशी खूणगाठ बांधून ठेविलेली असते. मुलाला चांगले पौष्टिक अन्न देणे, त्याला स्वच्छ कपडे घालणे, त्याच्या शरीराची योग्य ती काळजी घेणे व त्याला ‘मनुष्यप्राण्या’प्रमाणे वागविणे इत्यादी गोष्टींचा शिक्षणाशी काही संबंध असल्याचे त्यांच्या गावीही नसते. शाळेत येणाऱ्या पुष्कळशा मुलांचा पोषाख व रंगरूप पाहून त्यांचे आईबाप हयात असल्याबद्दल शिक्षकांना खात्रीपूर्वक अनुमान काढता येत नाही. रस्त्यावर भय्याभडबुंजांनी तयार केलेले पदार्थ विकत घेणारी किंवा विश्रांतिगृहात भजीमिसळादी ‘सत्त्वशील’ वस्तू अधाशी ओठांआड स्वाहा करणारी बालके दृष्टीस पडताच त्यांच्या घरी ‘दुर्गादेवीचा दुष्काळ’ पडला असल्याचा संशय आल्याशिवाय राहात नाही. सिनेमागृहात तोंडात बोटे घालून शिट्या किंचाळणारे व मधून मधून धुळवडीचा शब्दकोश पाठ असल्याबद्दलचा पुरावा देणारी वाक्ये उच्चारणारे राष्ट्राचे ‘भावी आधारस्तंभ’ पाहिले, म्हणजे त्यांच्या घरांत मुंबईच्या ‘सात रस्त्या’वरील संस्कृतीपेक्षा अधिक उच्च दर्जाची संस्कृती असावी, असे वाटत नाही. संमेलनाची बाबत असो अगर सुटीचा प्रश्न असो—वाटेल त्या क्षुल्लक कारणासाठी महात्मा गांधींच्या वीरश्रीने हरताळ पुकारून शिवाजीमंदिराच्या सार्वजनिक शाळेत घेतलेल्या शिक्षणाचे धडे व्यवहारात आणणारे ‘उमेदवार देशभक्त’ पाहिले, म्हणजे त्यांच्या घरांतली शिस्त ‘जुन्या बाजारा’तील शिस्तीपेक्षा अधिक किंमतीची असावी, असे वाटत नाही. अशा तऱ्हेने आजची तरुण व बालक पिढी स्वच्छतेला, सुदृढतेला, सुसंस्कृतीला व संघटनेला पारखी झालेली दिसून येते. या अनवस्थेला पुष्कळ अंशी पालकांची बेजबाबदार व निष्काळजी वृत्तीच कारणीभूत असते. आपला मुलगा शाळेत कोणत्या वर्गात आहे, हे खात्रीपूर्वक सांगावयास कचरणारे काही पालक आढळणे कठीण नसते, तर काही पालकांना शिस्तीची इतकी जाणीव असते की, ‘या कारट्याला तुम्ही ठार मारलेत तरी मला वाईट वाटावयाचे नाही’ अशी, ‘केशरिया’ करावयास तयार झालेल्या रजपूत बापाच्या निष्ठुर स्वार्थत्यागाने ते मास्तराला ‘जादा’ परवानगी देऊन

ठेवावयास चुकत नाहीत !

मुलांपेक्षा आजकाल बऱ्याचशा पालकांना सक्तीच्या शिक्षणाची जरूर आहे. कोठल्याही गोष्टीची शास्त्रीय माहिती नसताना वाटेल त्या शैक्षणिक प्रश्नावर चार ऐकीव बातम्यांच्या आधारावर अधिकारपूर्वक बोलण्याची पुष्कळ लोकांना अलीकडे वाईट सवय लागली आहे. 'अलीकडची शिक्षणपद्धतीच Useless आहे', 'डायरेक्ट मेथडने इंग्रजी कच्चे राहते', 'अलीकडे पोरांना पाठांतर नसते', 'वह्या व पुस्तके फार लागतात', ही या गप्पाशास्त्रातील काही महत्त्वाची सूत्रे आहेत. 'चार थपडा दिल्याशिवाय मुलांच्या डोक्यांत काही शिरणे शक्य नाही !' हे यांच्या शिस्तीचे ध्येयवचन असते. मराठी पहिल्या वर्गातील मुलांना एक आणा फी व इंग्रजी सातवी इयत्तेतील मुलांना, फार झाले तर,. चार रुपये फी, हे त्यांचे शैक्षणिक अर्थशास्त्र असते. अशा तऱ्हेने चुकीच्या मानसशास्त्रविषयक कल्पनांमध्ये आमचा पालकवर्ग गुरफटला आहे. त्यांना यांमधून जागृत करण्याकरिता निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करण्याचा शिक्षणाधिकाऱ्यांनी प्रयत्न करणे जरूर आहे. 'बालक–दिन' हा एक असाच पण मर्यादित स्वरूपाचा मार्ग आहे. त्या दिवशी तरी त्यांनी आपल्या मुलांविषयी त्यांच्या शिक्षणाविषयी योग्य तऱ्हेने विचार करण्याची सुबुद्धी होईल.

कोठल्याही नवीन गोष्टीकडे पाहताना नाके मुरण्याचा समाजातील काही जुनाट जीवांचा जुना–पुराणा शिरस्ता आहे यात त्यांचा दोष नाही. त्यांची मनोरचनाच त्यांच्या या दोषैक दृष्टीला जबाबदार आहे. 'बालक–दिना'वरही मोडक्या बोटांचा मारा झाल्याशिवाय राहणार नाही. शिवाय पुण्यात नुकताच 'महिला–दिन' साजरा झालेला आहे. महिलाजनांनी आपला 'दिन' आधी साजरा केला असल्याने आता यापुढे 'बालक–दिन' साजरा व्हावा, हे क्रमप्राप्तच आहे. तथापि, यानंतर 'तरुण-दिन' व 'वृद्ध–दिन' पण उरकून घेण्यात यावा, असल्या निर्बुद्ध कोट्या काही विघ्नसंतुष्टांकडून करण्यात येतील, हे या ठिकाणी आम्ही आधीच सुचवून ठेवतो. ज्या देशात 'पोळा' नामक 'बैलांचा दिन'देखील थाटात पार पाडला जातो, त्या ठिकाणी चालत्याबोलत्या व अधिक बुद्धीच्या अर्भकांचा 'दिन' पाळण्यात काहीच हास्यास्पदता नाही.

स्त्रिया व मुले यांच्या हक्कांविषयी यापुढे उदासीन राहून चालावयाचे नाही. मुलांना अधिक सहानुभूतीने व दक्षतेने शिक्षण द्यावयास पाहिजे. मुलास शाळेत पाठवून दिल्याने पालकांचे कर्तव्य संपत नाही. मुलांचा खरा शिक्षक पालक हाच असतो. घर हीच शिक्षणाची गंगोत्री आहे. घरात सुसंस्कृत वातावरण नसेल, तर शाळेतील मर्यादित शिक्षण अगदी निरुपयोगी आहे. स्वच्छ पोषाख, सत्त्वशील अन्न आणि प्रेमळ शिस्त या तीन गोष्टींकडे पालक आपल्या मुलांच्या बाबतीत नियमाने

लक्ष पुरवतील, तर शाळेतील शिक्षकांच्या प्रयत्नांना यश येण्यास मुळीच अडचण पडणार नाही. यंदाच्या ‘ बालक–दिना ’ने पालकांमध्ये एवढी जरी जागृती केली, तरी पुष्कळच झाले, असे म्हणावयास हरकत नाही.

[ **रत्नाकर,** मार्च १९३० ]

९

# आधुनिक कवितेचे अध्यापन

भाषेचे ज्ञान देताना विद्यार्थ्यांच्या मनाशी संबंध येतो, पण मुलांच्या हातात द्यावयाच्या पुस्तकांची निवड करताना योग्य तऱ्हेने न करता आपण मुलांच्या हाती पुस्तके देतो. पुष्कळ शिक्षकांना मुलांच्या मनाची प्रगती किती झाली आहे, हे माहीत नसते. क्रमिक पुस्तकातील काव्ये जुन्या काळातील लोकांनी ३०–४० वर्षांपूर्वी निवडलेली आहेत. चाळीस वर्षांपूर्वीच्या कविता आपण मराठी शाळांतील मुलांना अद्याप शिकवीत असतो, मुलांच्या मनाची प्रगती अगर त्यांच्या मनावर झालेला आधुनिक शैक्षणिक परिस्थितीचा परिणाम व अलीकडच्या भाषेतील सुधारणा या गोष्टी शिक्षक बिलकुल विचारात घेत नाहीत. साधारणपणे कविता शिकविताना जे हेतू मनासमोर उभे राहतात, त्यांमध्ये शब्दसंग्रह, भाषाज्ञान, उपदेश वगैरे अनेक हेतू असतात. संस्कृत शब्दांनी भरलेली मराठी कविता पाहिजे, असे काही लोकांचे मत आहे; नवीन गोष्टीचे ज्ञान काव्यद्वारा मिळाले पाहिजे, असे कित्येकांस वाटते. तसेच काव्यापासून उपदेश, नैतिक वळण व शीलसंवर्धन व्हावे अशीही पुष्कळांची समजूत आहे; पण वर सांगितलेले हे हेतू मुख्य नव्हत, शब्दसंग्रह वाढविण्याकरिता शब्दकोश अगर गद्य वाचावे. ज्ञानवृद्धीकरिता ज्ञानकोश वाचावे; उपदेशपर पुस्तके वाचावी. जुन्या कवितांतून उपदेश पुष्कळ आहे. वास्तविक उपदेशाचा व काव्याचा काही एक संबंध नाही. काव्य शिकवीत असताना काव्यातून जर काही उपदेश सहजासहजी मुलांना मिळाला, तर तो हवा आहे.

जगात ज्या ज्या सुंदर गोष्टी आहेत, त्या कवी दाखवितो. वाचकाची सौंदर्यदृष्टी वाढविण्याचा प्रयत्न करतो. कवी हा पायाळू माणसाप्रमाणे आहे. पायाळू माणसाला

जमिनीत अदृश्य असलेले धन जमीन न उकरता जसे कळते, तसे सामान्य लोकांना न दिसणारे सृष्टीतील अगर वस्तूतील सौंदर्य कवी दाखवितोः— ' काचेमधूनी दिसते जनांला ! धोंड्यामधूनी दिसते कवीला ! ' यावरून सौंदर्य हाच काव्याचा मुख्य हेतू आहे. व शब्दसंग्रह, भाषाज्ञान, उपदेशप्राप्ती वगैरे गोष्टी मुख्य नसून दुय्यम आहेत, हे सर्वांच्या लक्षात येईल.

## कवी आणि शास्त्रज्ञ

कवीची दृष्टी वेगळी व शास्त्रज्ञाची दृष्टी वेगळी. कवीचे लक्ष सौंदर्य दाखविण्याकडे असते; पण शास्त्रज्ञाचे लक्ष तपशीलवार व बिनचूक माहिती देण्याकडे असते. सर्वांना दिसते, तसे शास्त्रज्ञ वर्णन करतो; चूक होऊ देत नाही; पण कवीची दृष्टी कशी असते, हे पुढील कवितेवरून दिसून येईल.

फुलपाखरू । छान किती दिसते । फुलपाखरू ॥
या वेलीवर, फुलांबरोबर । गोड किती हसते । फुलपाखरू ॥
पंख चिमुकले, निळे जांभळे । हालवुनी डुलते । फुलपाखरू ॥
मौजेची किती, संगत याची । फार मला रुचते । फुलपाखरू ॥
मी धरु जाता, येई न हाता । दूरचि ते जाते । फुलपाखरू ॥

कवी हा पाखरावरचे ठिपके मोजीत नाही, किंवा त्याचे पंखही मोजीत नाही; फक्त त्याच्या हालचालींतील सौंदर्य पाहात असतो. शास्त्रज्ञ हा फुलपाखराला मारण्याच्या दृष्टीने पकडतो, कारण त्याच्या शरीराला टाचण्या बोचून त्याला ते जतन करून ठेवावयाचे असते. कवीची भावना अधिक शुद्ध असते. राजा रविवर्मा यांची चित्रे पाहिली असता सुंदर असतात; परंतु लक्ष्मी व सरस्वती यांची चेहरेपट्टी हुबेहुब सारखी असते. फक्त पोषाख तेवढा भिन्न असतो. आधुनिक चित्रकार चेहऱ्यांचा भिन्नपणा दाखवीत असतात. चित्रकाराप्रमाणेच कवी हा चार कुंचले मारतो, पण निरनिराळे रूप दाखवितो. जगात जे आढळत नाही, ते जर कवीने दाखविले, तर जगाला जास्त आनंद होईल.

शिक्षकाने कविता शिकविताना शब्दांनी व्यक्त होणाऱ्या कल्पना मुख्यतः स्पष्ट केल्या पाहिजेत; नुसता शब्दार्थ सांगून काम भागणार नाही. आधुनिक मराठी कवितेत फार मोठी प्रगती झाली आहे. विषयवैचित्र्य, विचारवैचित्र्य व वर्णनवैचित्र्य या तीन विशेष गोष्टी प्रामुख्याने हल्लीच्या मराठी काव्यात दिसून येतात. जुने कवी ठराविक विषयांवर काव्ये रचीत असत, परंतु हल्लीचे कवी त्या विषयांशिवाय इतर अनेक विषयांवरसुद्धा कविता लिहीत असतात व त्यातही सुंदर कल्पना घालून वाचकांचे मन वेधून घेतात. ' डाकवाला ' या कवितेत मूल म्हणते की, हा रोज

सकाळी येतो, बाबांना पत्र देतो, आईला देतो, काकांना देतो, '**मला मात्र देत नाही !**' ही शेवटची कल्पना वाचून वाचकांचे मन काही वेळ गुंगून जाते ! स्त्रियांच्या वेणीतल्या फुलांपासून तो डबक्यात पडलेल्या फुलापर्यंतचे विषय काव्याला चालतात.

**सुलभ शब्द :** शब्दांच्या मागे काही चित्र असते; वाचकापुढे हे चित्र उभे करण्याचे काम सुलभ शब्दांची योजना करून कवी करीत असतो. उगाच संस्कृत अगर अवघड शब्द न वापरता व्यावहारिक शब्द वापरावे. बालकवीचे पद्य "हिरवे हिरवे गार गालिचे" हे सोप्या शब्दांनी रचलेले असले, तरी उत्कृष्ट विचारांनी भरलेले आहे.

**लघुकाव्य :** हल्लीचे कवी खंडकाव्ये किंवा मोठी काव्ये लिहीत नाहीत, हा दोष नसून गुणच आहे. बहुजनसमाजाला या जीवनकलहात काव्यवाचनाला वेळ मिळत नाही व त्यामुळे जास्त वाचण्याची आवड नसते; म्हणून आधुनिक कवी लहान लहान काव्ये लिहून लोकांच्या भावना वाढवीत असतात व मनोरंजन करीत असतात.

**गाता येणारे काव्य :** पुष्कळ कवी लोकलाजेमुळे गात नाहीत, पण काव्य हे गायले पाहिजे. कवितेचे वृत्त पाहून तीतील भावना ओळखावी लागते. एखाद्या मालिनीवृत्तात रचलेल्या कवितेचे रूपांतर स्रग्धरा वृत्तात करता येईल, पण त्यातील भावनेचे सौंदर्य नाहीसे होईल. कित्येक कवींना गोड आवाज नसल्यामुळे आपल्या कविता उत्कृष्ट असूनसुद्धा गाऊन दाखविता येत नाहीत. आधुनिक कविता लोकप्रिय होण्याचे कारण ती म्हणण्यास फार सोपी असते. कविभूषण तांबे यांची 'अंगाई' ही कविता म्हणण्यास व भावना उत्पन्न करण्यास फारच चांगली आहे :

जो, जो, जो, जो रे ॥
हंमा ही दू, दू, देउनि पाही । निजली गोठ्यात
रे छकुल्या, राघू मैना निजल्या । आपल्या पिंजऱ्यात ॥

तसेच रा. पटवर्धन यांची 'सांगा माझे नाव, गड्यांनो, सांगा माझे नाव' ही कविता फार सोपी व सुंदर आहे. प्रोफेसर मायदेव यांची 'मजला काय वाटते व्हावे' ही कविता फारच हृदयंगम, मनोवेधक, रम्य कल्पनांनी भरलेली व गाण्याला अतिशय सोपी अशी आहे.

## दोन प्रमुख उद्देश

मी स्वतः गंभीर व विनोदी कविता लिहिल्या आहेत. पुष्कळ वाचकांना विनोदी कविता वाचणे फार आवडते, असे वाटते. विनोदी कविता लिहिण्याचा हेतू काय हे सांगणारे अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. हे जग दुःखमय आहे. सर्व आयुष्य दुःखमय होऊ नये, म्हणून विनोद हा पाहिजे. प्रत्येक ठिकाणी रडणे योग्य नाही. मनाला

मधून मधून विरंगुळा पाहिजे. जपानमधील सुंदर स्त्रीचे बदामी आकाराचे डोळे व पसरट गाल पाहून आपणास हसू येते. पण जपान देशात याच गोष्टी सौंदर्य म्हणून समजल्या जातात. एखादी नीग्रो तरुणीही आपल्या नवऱ्याचे कुरळे केस पाहून आनंद व्यक्त करीत असते. सारांश, प्रत्येकाचा दृष्टिकोण निराळा असतो. लोकांची करमणूक करणे व भावनांना आंदोलन देणे हे दोन उद्देश आधुनिक कवितेत विशेष आढळतात.

[ **प्राथमिक शिक्षण**, एप्रिल १९३३ ]

# १०

# ‘ तगरीचे फूल ’ : पाठाचे प्रात्यक्षिक

**‘ तगरीचे फूल ’**

[ दिंडी ]

फूल तगरीचें सर्वगुणीं साधें
दृष्टि पडतां सहज हें चित्त वेधे
रूप नखऱ्याविण रुचिर कसें पाहीं
डौल नसुनी बेडौल मुळीं नाहीं !

शुभ्रतेला शुद्धता शोभवीते
मंदतेनें मधुरता सुगंधातें
कसें साधेंपण शोभवी गुणातें
बघुनि घे हें या पाहुनी फुलातें.

पाकळी ही वांकडी गोजिरीच
नागमोडी ही कडा साजिरीच
पाकळ्या या नांदती जरी स्वैर
तरी नयनांला दिसत नसे गैर.

अहा ! डेंखावर बिंदु हा कशाचा ?
दुधाचा हा गुटकाच का सुखींचा ?
वृत्ति पाहुनि म्हणणार नाहिं कोण
पुष्पसृष्टीचें बाळ हें लहान ?

‘ सुमन ’ असलें हें आज तुझे पायीं
भक्तिभावें, शारदे, तुला वाहीं
भाव जेथें प्रश्न ना तिथें कांहीं
गुलाबाचा जाइचा जुईचाही !

**कविता :** श्री. ह. स. गोखले यांच्या ‘ कांहीं तरी ’ काव्यसंग्रहातील ‘ तगरीचें फूल ’ ( पान ४७ )

**इयत्ता :** मराठी ४ थी; मुलांचे वय :–१० वर्षे; वेळ : ३० मि.

**१. हेतू :** ‘ तगरीचे फूल ’ ही कविता गाऊन दाखवून तिच्याविषयी मुलांच्या मनात गोडी उत्पन्न करणे.

**२. साहित्य :** तगरीची काही ताजी फुले ( मुलांना आणावयास सांगावी. )

**३. तयारी :** मुलांना तगरीची फुले दाखवावीत. पाहिली आहेत ही तुम्ही फुले ? कुठे ? आणखी कोणती फुले तुम्ही पाहिली आहेत ? मग कोणते फूल तुम्हांला आवडते ? का ? तगरीची फुले कोणाला आवडतात ? का ? त्यांचा रंग कसा आहे ? वास कसा आहे ? घेऊन पाहा. मग आवडतात का ही फुले ? प्रत्येक माणसाची आवड निराळी आहे. कोणाला गुलाबाची फुले आवडतात. कोणाला शेवंतीची आवडतात. पण तगरीचीही फुले पुष्कळांना आवडतात. किती साधी आणि सुंदर आहेत, पाहिले ना ? मला स्वत:लादेखील तगरीचीच फुले फार आवडतात. या फुलांवर एका कवींनी फार सुंदर कविता केलेली आहे.

**४. हेतुकथन :** दाखवू का म्हणून तुम्हांला ? ऐका बरं का.

**५. गायन :** शिक्षकाने सदर कविता गोड गळ्यावर म्हणून दाखवीत असत मुलांनी ती स्वस्थपणे ऐकावी. त्यांचे लक्ष पुस्तकाकडे जाऊ नये. आवडली कविता तुम्हाला ? पुन्हा म्हणून दाखवू ? मुलांनी ‘ हो ’ म्हटल्यास पुन्हा कविता गाऊन दाखवावी.

**६. रसास्वाद :** आता आपण या कवितेत तगरीच्या फुलाविषयी काय काय सुंदर विचार सांगितले आहेत, ते पाहू, बरे का. तगरीच्या फुलांच्या अंगात कोणते गुण आहेत ? ‘ ते साधे आहे ’, ‘ ते नखरेबाज नाही ’, ‘ ते बेडौल नाही ’, ‘ त्याच. रंग शुभ्र आहे ’, ‘ वास कोमल आहे ’, ‘ पाकळ्यांची गर्दी आहे ’, ‘ त्याच्या डेखावर एक थेंब आहे ’ ( या सर्वसाधारण कल्पना मुलांकडून काढून घ्याव्यात. )

( अ ) बरे, आता हे या फुलांचे गुण कवीने आपल्या गोड भाषेत कसे सांगितले आहेत, ते पाहा ! तगरीचे फूल साधे आहे ! कशामध्ये ? सर्वगुणी ! कोणकोणत्या गुणांत ? रूप, रंग, वास, ठेवण यांत ! हे पाहून आपणास काय वाटते ? आपले मन त्याकडे वेधले जाते ! इतक्या साध्या फुलास पाहून मन वेधले जाते, हे कसे ? तुम्ही तेरड्याचे भपकेबाज फूल पाहिले आहे ना ? कसा नखरा असतो त्याचा ? आणि

डौल अन् मिजास तरी काय असते त्याची ! पण त्याच्याकडे ढुंकून पाहतो कोण ! तगरीची फुले रुचिर म्हणजे सुंदर का दिसतात ? ती अगदी साधी आहेत म्हणून ! ती रिकामा थाट करून बसत नाहीत ! ( त्या ठिकाणी एखादा साधा स्वच्छ पोषाख केलेला मनुष्य व नटवा पोषाख करणारा मनुष्य यांची थोडक्यात तुलना करावी. )

( ब ) रंग कसा आहे याचा ? शुभ्र. आणि फूल आहे कसे हे ? स्वच्छ. अगदी पवित्र. मग याच्या स्वच्छ रूपाला याचा पांढरा रंग कसा शोभून दिसतो नाही ? याचा पांढरा रंग आणि पवित्र रूप पाहताच मन कसे आनंदून जाते ! पाहा, मग या तगरीच्या फुलापासून तुम्ही काय शिकाल, ते सांगा. ( हा मुद्दा फार उगाळू नये. )

( क ) पाकळी बघा याची. वाकडी आहे ना ? तरीदेखील सुंदर आहे ना ? काय मौज आहे बघा. पाहा, रूप चांगले नसले तरी सुंदर दिसता येते बरे ! पाकळीची कडा कशी आहे ? नागमोडी. त्यामुळे पाकळी अधिकच छान दिसते. आता या फुलात पाकळ्यांची किती गर्दी उडाली आहे, ते पाहा. वाटेल तिथे, वाटेल तशी पाकळी बसली आहे ! तरी पण फूल कसे सुंदर दिसते ? ( गुलाबाच्या पाकळ्यांशी तुलना करावी. )

( ड ) हा बिंदू पाहिलात या फुलावर ? कशाचा बरे आहे हा ? पाण्याचा ? कसले पाणी ? दवाचे. तुम्ही सकाळी झाडाच्या पानांवर व फुलांवर पडलेले टपोरे थेंब पाहिले आहेत ! कसे दिसतात, बरे ते ? तसाच हा दवाचा एक थेंब या डेखावर आहे ? अरे, पण हा पाण्याचा थेंब आहे का दुधाचा ! मला वाटते दुधाचाच ! या चिमुकल्या फुलाला त्याच्या आईने आताच दूध पाजलेले दिसते आहे ! त्या दुधाचा एकच थेंब त्याच्या ओठावर अजून उरलेला आहे ! खरेच, हे फूल एखाद्या गोजिरवाण्या मुलासारखे दिसते आहे, नाही ? ( ही कल्पना मुलांना फार आवडेल. )

( इ ) मग इतके हे साधे आणि सुंदर फूल आपण तोडून आणले आहे, त्याचे काय करावयाचे ? आपण स्वतः त्याचा वास घ्यावयाचा ? छे.छे. तो अगदी अप्पलपोटेपणा होईल ! आपण शारदादेवीला वाहून टाकू ! म्हणजे तिला किती आनंद होईल ! तुम्ही ‘ नमन शारदे ’ हे पद म्हणता ना ? त्या वेळी आपण ही फुले शारदादेवीच्या पायी वाहू. पण शारदादेवी रागावणार तर नाही ना ? हो, नाही तर ती म्हणावयाची की, गुलाब, जाई, जुई असली फुले टाकून देऊन ही फुले कशाला आणून दिलीत मला ? छे, शारदा फुलांच्याकडे पाहात नाही. ती आपल्या मनाकडे पाहते. आपण प्रेमाने व भक्तीने फुले वाहिली म्हणजे झाले ! फुले कोणती का असेनात.

आवडली का कविता ? कोणत्या कोणत्या गोष्टी आवडल्या तुम्हाला ? शब्द कोणते चांगले घातले आहेत या कवितेत ? इत्यादी. म्हणून दाखवू ?—

७. **पुनर्गायन :** पुन्हा आता ? शिक्षकांनी पुन्हा कविता म्हणून दाखवावी. किंवा मुलांना बरोबर घेऊन म्हणावी. [ **अध्यापन**, जाने. १९३१ ]

## ११

# मराठी क्रमिक पुस्तकांचा जीर्णोद्धार–पूर्वार्ध

मुंबई इलाख्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेत हल्ली जी मराठी क्रमिक पुस्तके वापरली जात आहेत, त्यांची घटना सन १९०३ ते १९०५ सालांमध्ये झाली. म्हणजे त्यांची उमर आता अदमासे पाव शतकावर झालेली आहे. ही पुस्तके निर्माण करण्याचे काम एका जादा कमिटीकडे सोपविले होते. त्या कमिटीचे अध्यक्ष मे. जे. जी. कॉव्हर्नटन—त्या वेळचे उत्तर विभागाचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर–हे होते. त्यांनी आपल्या एकंदर कामाचा अहवाल १९०६ साली प्रसिद्ध केला होता. त्यावरून क्रमिक पुस्तके रचण्याचे कामी कमिटीने कोणते कोरण स्वीकारले, त्यांच्यापुढे ध्येय कोणते होते, रचनाकार्य त्यांनी कोणत्या उपायांनी साधिले, इत्यादी गोष्टींची आपणांस कल्पना येते. म्हणून या लेखमालेच्या पूर्वार्धात त्या अहवालाचे दिग्दर्शन करण्याचा आमचा मानस आहे. म्हणजे या भूमिकेवर आमचे क्रमिक पुस्तकांचा जीर्णोद्धार करण्यासंबंधीचे टीकात्मक विचार विशेष आग्रहावाचून पटविता येतील.

सदर व्हरनॅक्युलर टेक्स्टबुक रिव्हिजन कमिटीपुढे फक्त प्राथमिक शाळेसाठीच नव्हे, तर माध्यमिक व प्राथमिक शिक्षकांच्या ट्रेनिंग कॉलेजमध्येही उपयोगी पडतील, अशी क्रमिक पुस्तके तयार करण्याचे काम सोपविण्यात आलेले होते. शिवाय ही वाचन पुस्तके मराठी, गुजराती, सिंधी व कानडी या चार भिन्न भाषांत तयार करावयाची होती. त्यामुळे कमिटीपुढे अत्यंत बिकट अशा प्रकारचे काम होते. ही क्रमिक पुस्तके तयार करण्यापूर्वी कमिटीने इलाख्यातील निरनिराळ्या विभागांची भाषावार पाहाणी केली व तीस अनुसरून आपले पुढील धोरण आखले. प्रस्तुत

लेखात मराठीखेरीज इतर भाषांसंबंधी कमिटीचे विचार मांडण्याची जरूर नाही. मराठी भाषेसंबंधी कमिटीने पुढीलप्रमाणे उद्गार काढले आहेत.—

" मुंबई इलाख्यातील सर्व भाषांत मराठी ही अधिक प्रख्यात आणि महत्त्वाची भाषा आहे. वास्तविक मराठीचे सिंधी भाषेशी अधिक जवळचे नाते आहे. तथापि, हल्ली गुजराथी भाषेशी निदान बाह्यतः तरी तिचे अधिक साम्य आहे, असे दिसून येते. मुंबई इलाखा मध्यप्रांत व निझामचे राज्य मिळून मराठी भाषा बोलणाऱ्यांची १ कोट ८० लक्ष संख्या आहे. या भाषेत फारशी अगर अरबी शब्द फारच थोडे आढळून येतात. जे आहेत, ते बखरीत अगर इतर ऐतिहासिक कागदपत्रांत आढळतात. हल्लीच्या भाषेचा कल संस्कृतप्राचुर्याकडे आहे. पुण्यात अगर पुण्याचे आजूबाजूस आणि एकंदरीने दक्षिणेत मराठी भाषा शुद्ध व नमुनेदार बोलण्यात येते. मराठीत दोन लिपी आहेत. एक देवनागरी व दुसरी मोडी. देवनागरी मुद्रणात व क्वचित् लेखनात वापरतात. तथापि, पत्रव्यवहाराची व एकंदर सर्वसाधारण लेखनाची लिपी मोडीच आहे, आणि मराठे लोकांची तीच राष्ट्रीय लिपी आहे, असे म्हणावयास हरकत नाही. मराठी वर्णमाला निरपवाद ध्वनिवाचक नाही. उदाहरणार्थ, 'च' व 'ज' या व्यंजनांचे निरनिराळे उच्चार संभवतात. पुष्कळ वेळा लिखाण व उच्चार यांत भेद आहे. तथापि, शुद्धलेखनात सुधारणा सुचविण्याचे अगर त्यांचा क्रमिक वाचनपुस्तकांत अंगिकार करण्याचे काम कमिटीने आपल्याकडे घेतले नाही.

मराठी वाङ्मयासंबंधी फारसे लिहिण्याची आवश्यकता नाही. तेराव्या शतकापासून पुढचे जुने वाङ्मय उपलब्ध आहे. ते सर्व पद्यमय व भक्तिपर आहे. या भक्तिपर लिखाणाचा उत्कर्ष तुकारामाच्या अभंगात प्रकर्षाने झाला. जेथे जेथे मराठी बोलतात, तेथे तेथे तुकारामाचे अभंग म्हटले जातात. तदनंतर अभिजात संस्कृत वाङ्मयाच्या धर्तीवर पद्यवाङ्मय निर्माण होऊ लागले. त्यामुळे काही जुन्या बालबोध मराठी कवींचे उच्चाटण झाले. मोरोपंतांची कविता संस्कृतप्रचुर असली, तरी पुष्कळशी कळण्यासारखी आहे. अलिकडे मराठी गद्यवाङ्मय निर्माण होऊ लागले आहे, ते गुजराथी वाङ्मयापेक्षा अधिक दमदार आहे. तथापि, त्यामध्ये फारसे विचारस्वातंत्र्य आढळून येत नाही. पुष्कळसे गद्य लिखाण संस्कृत पद्धतीवरच आहे, असे दिसून येते. "

कमिटीने मराठी भाषेची पाहणी ज्या वेळी केली, त्या वेळी मराठी भाषेच्या इतिहासाची व वाङ्मयाची काय स्थिती होती, हे त्यांच्या अहवालातील वरील अवतरणावरून दिसून येईल. गेल्या पंचवीस वर्षांत आपल्या भाषेची जी सर्वांगीण अपूर्व प्रगती झालेली आहे, तिची कल्पना अर्थातच त्या वेळी कमिटीला असणे शक्यच नव्हते. " पुष्कळसे लिखाण संस्कृतप्रचुर आहे, गद्यलेखनात फारसे विचारस्वातंत्र्य नाही ", अशी हल्लींच्या किंवा गेल्या पाव शतकात निर्माण झालेल्या वाङ्मयावर टीका करणे आता फारच धाष्टर्याचे किंवा अज्ञानाचे दर्शक होईल.

कमिटीच्या काळी इलाख्यातील मराठी शाळांची स्थिती काय होती. हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणजे त्यावरून त्या वेळी शाळेत भाषाविषयक गरजा काय होत्या, याची आपणांस कल्पना येईल.

हल्लीप्रमाणेच त्या वेळी प्राथमिक मराठी शाळेचा अभ्यासक्रम बालवर्ग सोडून सात वर्षांचा होता. साधारणतः तेराव्या वर्षी मुलांचा मराठी अभ्यासक्रम जरी पूर्ण होई, तरी खेडेगावांतून पुष्कळशी वयातीत मुले प्राथमिक शाळांतून आढळून येत. पुष्कळ मुलांची प्रगती मराठी चवथीच्या पुढे होत नसे. किंवा बरीचशी मुले चवथ्या इयत्तेनंतर इंग्रजी शाळेत जात. प्राथमिक शाळेत बाकीची उरलेली थोडी मुले पब्लिक सर्व्हिस परीक्षेसाठी तयारी करीत. त्यांत पास झाल्यास त्यांना कनिष्ठ दर्जाच्या सरकारी नोकऱ्या मिळत.

त्या वेळी इंग्रजी शिक्षणाकडे विद्यार्थ्यांची ओढ सुरू झाली होती. त्यामुळे मराठी प्राथमिक शाळांच्या वरच्या वर्गांना मोठाच धक्का बसला होता. इंग्रजी अभ्यासक्रमापेक्षा मराठी अभ्यासक्रम कनिष्ठ दर्जाचा आहे, अशी लोकांची समजूत होऊ लागली होती. तथापि मराठी प्राथमिक शाळेतील वरच्या वर्गाचा अभ्यासक्रम माध्यमिक शाळेतील पहिल्या तीन इयत्तांच्या अभ्यासक्रमापेक्षा ( इंग्रजी सोडून ) कोणत्याही तऱ्हेने कमी नव्हता. जनतेला इंग्रजी शिक्षण देण्यापेक्षा मातृभाषेचे उत्कृष्ट शिक्षण देणेच अंतिम ध्येयाच्या दृष्टीने फायद्याचे आहे, याची कमिटीला जाणीव होती. त्या वेळी इलाख्यात प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या ५३३,२८२ होती. त्यांतील ४५१,१४१ मुलगे व ८२,१४१ मुली होत्या. शाळेत जाण्यास योग्य असणाऱ्या १००० मुलांपैकी २२५ मुलगे प्राथमिक शिक्षण घेत होते. मुलींना शेकडा ४ या प्रमाणात शिक्षण मिळत होते. .सरासरीने दर पाच मैलांच्या अंतराला एक प्राथमिक शाळा होती. तथापी, काही जिल्ह्यांत ३० ते १०० चौरस मैलांच्या क्षेत्रफळात एकच प्राथमिक शाळा होती. प्राथमिक मराठी शाळांतही पुष्कळ प्रकार होते. काही शाळांतून बालवर्गासह संपूर्ण सात इयत्तांचे शिक्षण मिळत होते. अशा शाळा अधिक सुधारलेल्या वस्तीच्या भागांत होत्या. तर मागासलेल्या विभागांतील जरा निराळ्या तऱ्हेचे शिक्षण देणाऱ्या शाळा होत्या. त्यांना ‘ खेडेगावातील ’ अगर ‘ मोडी ’ शाळा असे म्हणत. या शाळांतून लेखन, वाचन, गणित खेरीज करून कविता म्हणणे, पत्रलेखन, भूगोल, जमाखर्च, वस्तुपाठ, शेतकीची व पिकांची माहिती इत्यादी गोष्टी शिकविल्या जात. याशिवाय मुसलमानांसाठी उर्दू शाळा, मुलींच्या शाळा, अस्पृश्यांसाठी व भिल्ल; कोळी अशा जंगली लोकांच्या मुलांसाठी शाळा, तात्या पंतोजीच्या गावठी शाळा इत्यादी प्रकार होते. यावरून इलाख्यातील निरनिराळ्या लोकांच्या जाती व त्यांचे सामाजिक विभाग यांचे प्राथमिक शाळांवर प्रतिबिंब पडलेले आढळून येते. शहरांत व तालुक्याच्या गावांत प्राथमिक शिक्षण

घेणाऱ्यांत कारकून व व्यापारी वर्गांच्या मुलांचा भरणा अधिक, तर खेडेगावांत शेतकऱ्यांच्या मुलांची संख्या जास्त. त्याशिवाय जंगली लोकांची व अस्पृश्यांची मुले त्या ठिकाणी असण्याचा अधिक संभव. लोकांची असमाधानकारक सांपत्तिक स्थिती लक्षात घेता, शिक्षणाची त्या वेळची झालेली प्रगती आश्चर्यकारकच होती, असे कमिटीचे मत होते.

ज्या क्रमिक पुस्तकांची पुनर्घटना करण्याचे काम कमिटीकडे सोपविलेले होते. ती प्रथम अस्तित्वात कशी आली, हा इतिहास जसा मनोरंजक आहे, तसाच महत्त्वाचा आहे. या इलाख्यातील शिक्षणपद्धतीची सुरुवात आरंभी ज्या देशी भाषेतील थोड्या पुस्तकांच्या आधारावर झाली, त्यांची परंपरा सुव्यवस्थित रीतीने चालविण्याचा मान या क्रमिक वाचनपुस्तकांना मिळाला होता. देशी भाषेतून हिंदी लोकांना शिक्षण द्यावे का राजभाषेतून द्यावे, हा जो आरंभी या देशातील शिक्षणतज्ज्ञांत मोठा वाद माजून राहिला होता, त्या वादाचा निकाल निदान प्राथमिक शिक्षणापुरता तरी देशी भाषेच्या पुरस्कर्त्यांच्या बाजूला झाला, याची प्रत्यक्ष साक्ष म्हणजे ही क्रमिक वाचनपुस्तके. या वादात अधिक खोल शिरण्याची जरूरी नाही. तथापि, क्रमिक पुस्तकांची सुरुवात कशी झाली, त्याचा इतिहास या ठिकाणी नमूद करणे जरूर आहे.

१८२० च्या पूर्वी या इलाख्यात शिक्षणाची फारच तुटपुंजी साधने उपलब्ध होती. सरकारच्या मुलकी खात्याला उपयोगी पडतील, असे ' पंडित ' निर्माण करण्याचे काम पुण्याचे 'हिंदू कॉलेज' करीत होते. काशी येथे लॉर्ड मिंटोने जशा तऱ्हेचे ' हिंदू कॉलेज ' काढले होते किंवा नडिआ व तिऱ्हूट येथे १८११ साली जशा तऱ्हेची कॉलेजे काढण्याचे घाटत होते, तशाच तऱ्हेचे हे पुण्याचे कॉलेज होते. असल्या तऱ्हेच्या संस्थेचा एकाद्या विशिष्ट अल्पवर्गाशिवाय करून इतरांना फारसा उपयोग नसतो. १८२० मध्ये एक महत्त्वाची गोष्ट घडून आली. ती ही की, त्या वर्षी ' नेटिव्ह स्कूलबुक ॲन्ड स्कूल सोसायटी ' नामक एक संस्था निर्माण झाली. पुढे १८२७ साली संस्थेचे नाव ' बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी ' असे बदलण्यात आले. आणि १८४० मध्ये या संस्थेच्या शाळांचा ' एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशन 'ला जोडलेल्या शाळांमध्ये अंतर्भाव करण्यात आल्यामुळे त्या ' बोर्ड ऑफ एज्युकेशन 'च्या देखरेखीखाली आल्या.

ही जी ' नेटिव्ह स्कूलबुक ॲन्ड स्कूल सोसायटी ' निघाली म्हणून वर सांगितले, ती १८१७ साली तशाच प्रकारची एक संस्था कलकत्त्यास रे. रॉबर्ट मे नावाच्या मिशनऱ्याच्या सूचनेवरून निघाली, तिचीच हुबेहूब प्रतिकृती होती. देशी भाषांमध्ये शालेय पुस्तके प्रकाशित करून व शाळा स्थापून हिंदी लोकांच्या शिक्षणाची सोय करावयाची, हा या संस्थेचा आद्य हेतू होता. अशा संस्थेच्या प्रयत्नामुळे आणि

विशेषतः त्या वेळचे गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन साहेब यांच्या उदार धोरणा-मुळेच या इलाख्यातील आरंभीच्या शैक्षणिक चळवळीला जोराची चालना मिळाली. एल्फिन्स्टनसाहेबांचे मत जरी हिंदी लोकांना इंग्रजी शिकविण्याने ज्ञानाचा प्रसार अधिक पटीने होईल, असे होते, तरी इंग्रजी भाषा शिकविणे, हा सर्व शाळांचा प्रधान हेतू असावा, ही गोष्ट त्यांना मुळीच मान्य नव्हती. तेव्हा या नवीन अस्तित्वात आलेल्या संस्थेला आश्रय देताना इंग्रजी भाषेपेक्षा देशी भाषेकडे अधिक लक्ष्य पुरविण्यासंबंधी साहेबमजकुरांनी बजाविले. याचा अर्थ असा नव्हता की, या संस्थेने इंग्रजी भाषेत पुस्तके प्रसिद्ध करू नयेत. पण देशी भाषांमधून ज्ञानप्रसार करण्यासाठी त्या भाषेस क्रमिक पुस्तके निर्माण करणे व शाळा स्थापणे या गोष्टीकडे प्रथम परिश्रमपूर्वक लक्ष्य पुरवावे, असा या सूचनेचा अर्थ होता. या पुस्तकप्रकाशनाच्या योजनेत धार्मिक पुस्तकांचा समावेश न करण्याबद्दल ठरलेले होते, ही एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. नैतिक व उपदेशपर पुस्तके प्रसिद्ध करण्यास, अर्थात हरकत नव्हती.

ब्रिटिश आमदानी सुरू होण्यापूर्वी कोणत्या प्रकारची शिक्षणपद्धती चालू होती व त्या पद्धतीतील कोणत्या तत्त्वांचा अंगीकार नव्या शिक्षणपद्धतीत करता येईल, या गोष्टीची पहाणी करण्याकरता एल्फिन्स्टनसाहेबांनी चौकशी सुरू केली होती. पण या चौकशीपासून काही फारशी निष्पत्ती झाली नाही. फक्त 'मालचाटे पद्धती' (Monitorial method) व धूळपाटीची व्यवहार्यता या दोन गोष्टी चौकशी-मंडळाने 'शोधून' काढल्या. तथापि, एक गोष्ट विशेष प्रामुख्याने उघडकीस आली. ती ही की, शिक्षणोपयोगी पुस्तकांची फारच मोठी वाण असल्यामुळे शिक्षणाचे परिणाम टिकाऊ स्वरूपाचे होत नाहीत. तेव्हा प्राथमिक व उच्च शाळांच्या उपयोगासाठी ताबडतोब पुस्तके लिहून प्रकाशित करावी, अशी सूचना 'नेटिव्ह सोसायटी'च्या एका कमिटीने केली. प्राथमिक शाळांसाठी मराठीत पुस्तके लिहावयाची होती व वरिष्ठ शाळांसाठी इंग्रजीत लिहावयाची. ही मराठीत लिहावयाची पुस्तके एक इंग्रजीतून भाषांतर तरी करावयाची किंवा इंग्रजी पद्धतीवर लिहावयाची अशी मूळ कल्पना. सदर कमिटीच्या मदतीला सरकार पुढे आले व १८२४च्या सुमारास भाषांतरकार व लेखक यांनी आपल्या कामास सुरुवात केली. त्या वेळी शिळाछापाचे छापखाने चालू होते, तथापि टाइपाचे प्रेस आणि इंग्रजी व बालबोध टाइप इंग्लंडमधून मागविण्यात आले.

१८२४ च्या सुमारास 'नेटिव्ह स्कूलबुक व स्कूल सोसायटी'च्या किताबखान्यात पुढील पुस्तके तयार होती.

**१. लिपिधारा :** (गुजराती व मराठी) यामध्ये वर्णमाला, बाराखड्या व पाच अक्षरांपर्यंतचे शब्द दिले होते. हे पुस्तक 'पंडित' लोकांनी तयार केले होते.

२. **अंकमाला :** ( मराठी ) यात अंक, पाढे, वजनाची व मापाची कोष्टके दिलेली होती.

३. **गणित :** ( गुजराती व मराठी ) हे पुस्तिक कॅप्टन जॉर्ज जर्व्हिस याने युरोपियन पद्धतीवर तयार केलेले होते. याचे दोन भाग होते.

२. **बोधवचन :** यात सोप्या वाक्यांत मुलांना उपदेश केलेला होता. लेखक : सदाशिव काशिनाथ.

५. **शाळेची व्यवस्था :** ( गुजराती व मराठी ) यात लॅंकेस्टरपद्धतीचा अवलंब केलेले होता. कर्ता कॅप्टन मोल्स्वर्थ.

६. **कल्पित कथा :** ( गुजराती ) 'बनिया' गुजरातीत एक व पार्शी गुजरातीत एक अशा या पुस्तकाच्या दोन निराळ्या आवृत्त्या होत्या.

७. **पंचोपाख्यान :** ( मराठी ).

८. **विदुरनीती :**

९. **बाळगोष्टी :** ( लहान मुलांसाठी गोष्टी ).

१८३२ पर्यंत ही पुस्तकांची संख्या पुष्कळच वाढली. पण बहुतेक सर्व पुस्तके भाषांतरितच होती. उदाहरणार्थ :–पिनॉकच्या 'सामान्यज्ञानविषयक प्रश्नोत्तर पुस्तका'चे भाषांतर झाले होते. 'बाळमित्र' हे बर्किनच्या पुस्तकाचे भाषांतर होते. ग्रँट डफ चा 'मराठ्यांचा इतिहास' तसेच त्रिकोणमिती, भूमिती, बीजगणित, महत्त्वमापन, अंकगणित, भूगोल व खगोल इत्यादी विषयांवरील इंग्रजी पुस्तकांची मराठी भाषांतरे प्रसिद्ध करण्यात आली. १८३३ मध्ये 'इंग्लंडचा इतिहास' मराठीत प्रसिद्ध झाला. व १८३६ मध्ये 'पदार्थविज्ञान' व 'इजिप्तचा प्राचीन इतिहास' या पुस्तकांची भरती झाली. हे सर्व ग्रंथ बहुधा मराठी व गुजराती या भाषांत प्रसिद्ध झाले. कानडी भाषेत भाषांतराचे काम काही काळाने हाती घेण्यात आले, तथापि त्या भाषेत तर्जुमा करणे कठीण असल्याने या बाबतीत फारशी प्रगती झाली नाही.

देशी भाषेतील शिक्षणाचा यापुढे प्रसार करण्याचे पुष्कळसे श्रेय माल्कमसाहेबांना जाते. हिंदी लोकांना इंग्रजीच्या ज्ञानाचा प्रसार करण्याच्या मताचे साहेबमजकूर नव्हते. ते पक्के 'पौर्वात्यपंडित' होते. मुंबई इलाख्यातील शिक्षणपद्धतीचे वैशिष्ट्य प्रस्थापित करण्याला माल्कमसाहेबांच्या मतांचा फार उपयोग झाला. त्यांच्या मते देशी भाषांतून सर्व तऱ्हेच्या ज्ञानाचा प्रसार करता येणे शक्य होते किंवा आता नसले तरी काही काळाने तरी बोधभाषा होण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी आणता आले असते. विषयाचे ज्ञान मिळविण्यापुरती इंग्रजीची जरूर आहे. म्हणून इंग्रजी थोड्या लोकांनीच शिकावे व त्यांनी इंग्रजी भाषेतील ज्ञानाचा संचय स्वभाषेत आणून आपल्या अनेक देशबांधवांस सुशिक्षित करावे व आपल्या भाषेतील वाङ्मय समृद्ध करावे. त्या वेळी इंग्रजी पुस्तकांची जी भराभर भाषांतरे होऊ लागली होती, त्याच्या

मुळाशी ही माल्कमसाहेबाची विचारसरणी होती. या सर्व पुस्तकांचा उपयोग शाळांतून होतच होता, असे नाही. त्यांपैकी काही वरिष्ठ शाळांत व काही ट्रेनिंग कॉलेजात वापरण्यात येत असत. १८४५ पर्यंत रसायनशास्त्र, व्याकरण, व्युत्पत्ती, भौगोलिक गणित, प्राणिशास्त्र इत्यादी विषयांवर पुस्तके प्रसिद्ध झाली. अशा तऱ्हेने शालेय मराठी वाङ्मयाची वाढ क्रमाक्रमाने होत गेली.

तथापि, शाळेच्या उपयोगाच्या दृष्टीने ही पुस्तके सर्वस्वी योग्य नव्हत, अशा तऱ्हेची जाणीव त्या वेळी उत्पन्न झाली होती. कारण बहुधा या पुस्तकांचे कर्ते स्वतः शिक्षक नसल्याने अध्यापनाच्या दृष्टीने विषयांची मांडणी त्यांमध्ये झालेली नसे. ही पुस्तके शब्दशः भाषांतरित असल्याने हिंदुस्थानच्या परिस्थितीला अनुसरून त्यांत फेरबदल केलेला नसे. शिवाय, त्यांत क्रमिकपणा मुळीच नव्हता. तसेच दिलेली माहिती अमूर्त स्वरूपाची असल्याने ती तोंडपाठ करून स्मरणात ठेवल्याशिवाय दुसऱ्या पद्धतीने आत्मसात करणे शक्य नव्हते. तेव्हा निरनिराळ्या वर्गांना उपयोगी पडतील अशी क्रमिक पुस्तके लिहिण्याची कल्पना उद्भवून, तदनुसार काही काळाने मराठी पुस्तकांचे काम मेजर कँडी यांजकडे सोपविण्यात आले. मेजर कँडी हे प्रख्यात इंग्रजी-मराठी कोशाचे कर्ते व अनुभवी शिक्षणतज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. प्रथमतः तीन पुस्तके प्रसिद्ध करण्याचे ठरले; पण पाठीमागून ही संख्या दुप्पट करण्यात आली.

या पुस्तकांतील बराचसा भाग 'स्वतंत्र' लिहिलेला होता. बाकीचा काही भाग इंग्रजीतून भाषांतर केलेला व इतर मराठी पुस्तकांतून निवडलेला होता. स्वतंत्र भागाची रचना त्या वेळच्या विद्वान मराठी पंडितांनी केलेली होती. ही क्रमिक पुस्तके तयार करण्याचे कामी मेजरसाहेबांनी पुढील इंग्रजी व मराठी पुस्तकांचा प्रामुख्याने उपयोग केला होता :–नीतिबोधकथा, विदुरनीती, बाळमित्र, इसापनीती, प्राण्यांची माहिती; आयरिश शालेय पुस्तकमाला, मॅकलाक-वाचनमाला, टॉडचे राजस्थान इ. क्रमिक पुस्तकांचे लिखाण १८५७ मध्ये सुरू होऊन १८६१ मध्ये पुरे झाले. १८६७ मध्ये मेजरसाहेबांच्याच देखरेखीखाली पुन्हा त्याजमध्ये सुधारणा झाली. त्यामधील बराचसा भाग गाळण्यात आला; काही नवीन भाग घालण्यात आला व पुस्तकांचा क्रमिकपणा अधिक बारकाईने वाढविण्यात आला. १८९६ मध्ये या सहा पुस्तकांत सातव्या पुस्तकाची भर पडली. या पुस्तकांत मुख्यत्वे शास्त्रीय धडे घालण्यात आले. या पुस्तकाची रचना कै. महादेव शिवराम गोळे यांनी केली.

या क्रमिक पुस्तकांचे गुजराथी काम त्या वेळचे उत्तर विभागाचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर मि. होपसाहेब ( पुढे सर टी. सी. होप ) यांनी केले. मि. होप हे स्वतः शिक्षणशास्त्रज्ञ होते. पाश्चात्त्य देशांत ज्या शिक्षणविषयक चळवळी चाललेल्या होत्या, त्यांच्याशी त्यांचा परिचय होता. पेस्टालोत्झीची शिक्षणतत्त्वे, वस्तुपाठ, तसेच

हर्बार्टचे ' अभिरुची ' उत्पन्न करण्याचे तत्त्व इ. गोष्टी त्यांना माहीत होत्या. त्यांनी फार काळजीपूर्वक विचार करून क्रमिक पुस्तकांबाबत एक विस्तृत योजना तयार केली. प्रत्येक पुस्तकात पाने किती असावी, विषयवारी कोणती असावी, ती क्रमशः कशी वाढवावी, इ. गोष्टींचा त्यांनी विचार केलेला होता. उदाहरणार्थ, पहिल्या पुस्तकात ५० पाने, दुसऱ्यात १००, तिसऱ्यात १५०, चौथ्यात २००, पाचव्यात २२५, सहाव्यात २२५ व सातव्यात २५० असावी, असे त्यांनी सुचविले. धड्याची लांबी एकंदर वेळेच्या हिशेबावरून ठरविण्यात आली. धड्यातील अवघड शब्द आरंभी द्यावेत असे ठरले. सुलभ विषय आरंभीच्या पुस्तकात सुरू करून ते पुढील पुस्तकांत क्रमवार अवघड करीत न्यावयाचे, अशी काळजी घेण्यात आली. पुढील काही टिपणांवरून ते दिसून येईल.

**पुस्तक २ :** ( १ ) नैतिककथा व कल्पित कथा; ( २ ) ज्ञानेंद्रिये व शरीराचे अवयव; ( ३ ) प्राणी, पक्षी व झाडे; ( ४ ) अन्न व आच्छादन; ( ५ ) संकीर्ण विषय; ( ६ ) सोपी गाणी.

**पुस्तक ५ :** ( १ ) नैतिक व मनोरंजक कथा; ( २ ) आरोग्य, उपचार इ. ( ३ ) प्राणी, पक्षी, झाडे; ( ४ ) भूगोलविषयक धडे; ( ५ ) हिंदुस्थानच्या इतिहासाचे धडे; ( ६ ) निरनिराळ्या लोकांच्या रीतीभाती; ( ७ ) उद्योगधंदे व सामान्य माहिती ( ८ ) सोपे फटके, कविता इ.

**पुस्तक ७ :** ( १ ) नैतिक व मनोरंजक कथा; ( २ ) प्राणी, धातू, वनस्पती; ( ३ ) भौगोलिक धडे; ( ४ ) प्राचीन व अर्वाचीन जगाचा इतिहास. ( ५ ) जल-पर्यटने, प्रवास, रीतीभाती; ( ६ ) सामान्य माहिती; ( ७ ) उद्योगधंदे व यंत्रसामग्री; ( ८ ) आर्थिक माहिती; ( ९ ) खगोल; ( १० ) प्राथमिक गतिशास्त्र; ( ११ ) प्रकाश, उष्णता, विद्युत्, वाफ; ( १२ ) कविता.

अशा तऱ्हेने निरनिराळ्या पुस्तकांतील विषयांचे वर्गीकरण केलेले होते.

मराठी क्रमिक पुस्तके १८६१ मध्ये तयार झाली. गुजराती एक वर्ष आधी पूर्ण झाली होती. १८७४ पर्यंत सिंधी पुस्तके तयार झाली. कानडी पुस्तके ही सिंधी पुस्तकांच्या बरोबरच प्रसिद्ध झाली.

एकंदरीत क्रमिक पुस्तकांचे काम त्या वेळी यशस्वी झाले, असे म्हणावयास हरकत नाही. हिंदुस्थानातील इतर विभागांत यांच्या तोडीची त्या वेळी पुस्तके नव्हती, असे म्हणतात. १८७७ साली हिंदुस्थानात सरकारने ' रिव्हिजन कमिटी ' नेमली होती. तिने या पुस्तकांची फारच प्रशंसा केली. विशेषतः होपसाहेबांची गुजराती पुस्तके आदर्शभूत होत, असे कमिटीचे मत पडले. मराठी पुस्तकांचीही काही कमी वाखाणणी झाली नाही. मध्यप्रांतात हीच पुस्तके परिस्थित्यनुरूप फेरफार करून सुरू करावीत, असे कमिटीने सुचविले. असे असताही या क्रमिक पुस्तकांत

पुष्कळसे दोष राहिले होते. चारी भाषांतील पुस्तके सारख्याच उच्च दर्जाची नव्हती. पद्धतीच्या व क्रमिकतेच्या दृष्टीने होपसाहेबांची गुजराती पुस्तके अधिक सरस होती. वरच्या इयत्तेच्या पुस्तकांतील विषय कठीण असल्याने मुलांच्या बुद्धीच्या आटोक्यात नव्हते. शास्त्रीय विषयांत वर्णनपद्धतीचा अवलंब केलेला असल्यामुळे तो भाग तोंडपाठ करण्याकडे मुलांची साहजिक प्रवृत्ती होत असे. कवितांच्या उताऱ्यांची निवड नीट झालेली नव्हती व मुद्दाम स्वतंत्रपणे या पुस्तकांसाठी लिहवून घेतलेल्या कविता अगदी भिकार होत्या. नैतिक शिक्षणाच्या अवास्तव कल्पनेचा पगडा जागोजाग बसलेला दिसून येत असे. बहुतेक भाग उपदेशप्रधान होता. शिवाय ज्या मूळ पुस्तकांच्या आधारावर क्रमिक पुस्तकांतील धडे रचले होते, ती पुस्तके बहुधा जुनाट असल्याने क्रमिक पुस्तकांत कालक्रमदोष उत्पन्न झाला. नवीन ज्ञानाच्या शोधाचा त्यावर परिणाम झालेला नव्हता. सालोसाल नवीन आवृत्तीचे वेळी जरी या क्रमिक पुस्तकांत फेरबदल करण्यात येत होता, तरी त्यात आमूलाग्र फरक करावा, असे कोणाला वाटले नाही. जवळ जवळ ही पुस्तके अगदी ‘ वज्रलेप ’ च झाली होती, असे समजावयास हरकत नाही.

[ **अध्यापन, एप्रिल १९३१** ]

# १२

# ‘ वासंती ’ : प्रस्तावना

काही वर्षांपूर्वी एका प्राथमिक मराठी शाळेतील तिसऱ्या इयत्तेच्या वर्गात तेथील शिक्षक क्रमिक पुस्तकातील कविता शिकवीत असताना जाण्याचा मला प्रसंग आला. वर्गातील मुलांची उमर सरासरी आठ ते नऊ वर्षांची असेल. मराठी वाचनाची व त्यांची ओळख होऊन दोनच वर्षे झाली होती; तथापि आरंभीचा गाण्यामार्फत काव्याशी झालेला त्यांचा परिचय जमेत धरला नाही, तर कवितागायनाचा श्रीगणेशा गिरवायला आरंभ करून त्यांना एकच वर्ष पुरे झाले असेल-नसेल, इतकेच. शिक्षक-मजकूर ‘ धरा बुद्धि पोटीं विवेकें तुम्ही हो। बरा गुण तो अंतरामाजि राहो ’ हा श्लोकार्ध आपल्या मगदुराप्रमाणे मन लावून शिकवीत—अगर शिकविण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्याच शब्दांची पुनरावृत्ती करायची म्हणजे आपल्या ( हाताने दाखवून ) पोटात नव्हे, आपल्या मनात इथे ( हात छातीवर मारून ), “ ‘ विवेकें ’ म्हणजे विचाराने–विचार म्हणजे काय ? ”–येथे शिक्षकमजकुराचा आवाज घोगरा पडला व त्यांना स्वतःलाच विचार पडला. अशा रीतीने प्रत्येक शब्दाची छाननी करून त्या काव्याचा त्यांनी अक्षरशः पंचनामा मांडला होता. पुराण ऐकणाऱ्या भाविकांप्रमाणे मुले जांभया देऊन आपली रसिकता दर्शवीत व शिक्षकांचा प्रश्न आलाच तर “ बुद्धी म्हणजे बुद्धी ” असे झोपेतून उठल्याप्रमाणे किंचाळत होती. गाफील श्रोत्यांच्या गलबलाटाकडे दुर्लक्ष करून ज्याप्रमाणे निर्ढावलेला वक्ता गिरणीच्या यांत्रिक निर्जीवतेने वाक्यांमागून वाक्ये फेकीत जातो, तद्वत् सदर शिक्षकांनी त्या काव्याची विल्हेवाट चालविली होती. दुसरा कोणीही शिक्षक त्यांचे जागी असता तरीदेखील त्या काव्यावरील त्याच्या विवेचनाचा मुलांकडून अधिक लक्षपूर्वक सत्कार

झाला असता किंवा नाही, याविषयी साशंक असल्याने, त्या शिक्षकाच्या सहनशीलतेचे कौतुक करीत व मुलांची आणि त्या काव्याची कीव करीत मी वर्गाबाहेर पडलो.

आजतागायत आमच्या शालेय सृष्टीतील काव्याची ही स्थिती आहे. बिगरीसाठी बनविलेल्या पुस्तकापासून तो तहत प्रौढ विद्यार्थ्यांसाठी ‘ वैशाखमासीं प्रतिवर्षी ’ येणाऱ्या पद्यात्मक उताऱ्यांच्या पुस्तकांपर्यंत सरसहा दृष्टोत्पत्तीस येणारे काव्य एकाच दर्जाचे व लायकीचे ( किंवा नालायकीचे ) असते. शिक्षणाची व जीवनाची फारकत झाल्याने शिक्षण निरुपयोगी ठरते, या शैक्षणिक सिद्धांतातील सत्य जर कोठे तीव्रतेने पटत असेल, तर ते हल्लींच्या क्रमिक पुस्तकांतील कविता वाचताना!

सदर पुस्तकातील काव्यापुरतेच सध्या विवेचन करायचे झाल्यास त्या बाबतीत आमच्या शाळाखात्याची स्थिती प्रख्यात अमेरिकन कुंभकर्ण रिप् व्हॅन विंकलसारखी आहे. पंचवीस वर्षांपूर्वी प्राथमिक शाळेत पाऊल टाकल्यावर “ कज्जेकफावती होऊन रस्त्यांत। असावी घरांत शांती सदा ”* हे उच्च दर्जाचे काव्य आम्ही ज्या परवाचावजा चालीवर म्हणत होतो. त्याच सुरावर आजचे ‘ बाबा—लोग ’ “शाळेसी जातांना मुलांनी वाटेंत। तमाशा पहात राहूं नये ” हे पूर्वोक्त काव्याचे तुल्यगुणी भावंड आपल्या कंठांतून काढीत आहेत. स्वतःच्या निष्काळजीपणाने नळाच्या हातात पडलेला बावळट हंस स्वतःच्या सोडवणुकीसाठी ‘ माझी म्हातारी आजारी आहे, तिला सातवा दिवस आहे ’ असल्या साहेबाकडून रजा मिळविण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या कारकुनी सबबी आज वर्षानुवर्षे सांगत आहे, तरी त्याचा अजून कुणाला कंटाळा आलेला नाही. ‘ वोखटें का गोमटें जया नुमटे ’ अशा साधूंची व चार गडी मेळवून खटनटा एकवटणाऱ्या ‘ करंट्यांची ’ लक्षणे ऐकता ऐकता कान किटून अशा काव्यांच्या बाबतीत त्या करंट्याप्रमाणेच ‘ लिहों नेणें, वाचूं नेणें अशी आपली स्थिती असती तर बरे झाले असते, असे पुष्कळांना वाटावयास लागल्यास नवल नाही. हिंदुस्थानातील हिंदी लोकांच्या स्वराज्यविषयक चळवळीचा विलायतेतील पार्लमेंटाच्या वऱ्याचशा मेंबरांना जितका सुगावा आहे, तितकाच आधुनिक महाराष्ट्रवाङ्मयाच्या आणि त्यातील काव्याच्या प्रगतीचा ‘ टेक्स्टबुक रिव्हीजन कमिटी’ला असेल. केशवसुत, विनायक, दत्त, टिळक, गोविंदाग्रज, बालकवी, तांबे, Bee वगैरेंसारख्या वैभवशाली कवींच्या काव्यकुसुमांचा सुगंधी सडा शारदेच्या प्रांगणात भरगच्च सांडून त्याच्या उन्मादक सुवासाने महाराष्ट्र—रसिक वेडावून गेले असताना,

---

* सदर कवितादेखील ‘ Whatever brawls disturb the street, there should be peace at home ” या कवितेचे शब्दशः भाषांतर आहे, असे मला आता आढळून आले आहे.

सदर कमिटीच्या टेबलावर किंवा चौरंगावर अद्यापि ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, मोरोपंत, आनंदतनय, अनंतफंदी यांच्या काव्यांच्या पोथ्या उघडलेल्या असून कमिटीचे मेहेरबान सभासद नाकावर चष्मे चढवून, त्या पुराण कविश्रेष्ठांची इतर अनेक उत्कृष्ट काव्ये वगळून, त्यांतून नेमकी 'करंट लक्षणे', 'दत्ताने केलेले गुरू' 'देवाशी सख्य', 'सत्संग' असली रसाळ काव्ये हुडकून काढण्यात गुंग झालेले आहेत. अपवादादाखल मशारनिल्हे सभासदांनी अपराधी मुलाला न्याहाळणाऱ्या हेडमास्तरी नजरेने आपल्या चष्म्याच्या वरून आधुनिक कवींकडे पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे; पण त्यांच्या नजरेच्या आटोक्यात कालमानाने, त्यांच्या आसपास होते म्हणूनच की काय,—चिंतामणी पेटकर, लोंढे, मोगरे यांहून इतर कवी मावू शकले नाहीत.

'मांटफर्ड रिफॉर्म्स' होऊन तदनंतर आता 'सायमन-कमिशन'चा रिपोर्ट बाहेर पडण्याची वेळ आली, तरी ज्या क्रमिक पुस्तकांचे विद्यार्थी अद्यापि १८५७ सालच्या 'राणीचा जाहीरनामा' वाचीत बसले आहेत, त्या पुस्तकामध्ये काव्याच्या बाबतीत तर इतक्या आधुनिक दृष्टीची अपेक्षा करणेच निष्फळ ठरेल. 'हरिततृणाच्या मखमालीच्या हिरव्या हिरव्या गार गालिच्या'वर बालकवींची फुलराणी 'झोके घेत' आहे, तरी क्रमिक पुस्तकांच्या सृष्टीत अजून 'प्रफुल्ल होऊन सुपुष्प ठेले'च आहे. तिकडे 'जो जो जो जो रे–घरटीं ती। फांद्यांमधुनी झुलती। निजले चिउ काऊ' असली गुंगविणारी अंगाईगीते तांबे यांची शारदा किरकिऱ्या बाळांना गात बसली आहे, तर क्रमिक पुस्तकातील आई आपल्या छबुकड्याला निजविण्यासाठी 'सुतार उत्तमसा आणवून' 'पाळणा रंगीत' कसा 'बनविला', हा पाळण्याच्या उत्पत्तीचा इतिहास सांगत बसलेली आहे. 'मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा', 'आमुचा प्रियकर हिंदिस्तान' किंवा 'हा हिंददेश माझा' असली मायभूमीच्याविषयी रोमांचयुक्त अभिमान उत्पन्न करणारी गाणी महाराष्ट्रातील घराघरांतून गायली जात असताना शाळेच्या आवारात मात्र अद्यापी 'खाड्या त्या तव जन्मभूमि नयनीं पाहीन केव्हां तरी!' असले निर्जीव श्लोक म्हटले जात आहेत. 'कोठचा शिवजी राजा, निज धर्माचा अभिमानी। यापुढें?' अशा तीव्र जाणिवेने इकडे विनायक तळमळत असताना व 'यापुढें न भगवा झेंडा, कोठेंही नाचायाचा!' असे हृदयभेदक उद्‌गार माधव काढीत असताना, तिकडे क्रमिक पुस्तकातील अलम ऐतिहासिक काव्याची मिरासदार गोपिकाबाई 'पुढें माझा नारा–यण तरुण तो पुत्र तिसरा' * असा आपल्या मृतपुत्रांबद्दल क्रमवार शोक करीत बसलेली आहे. 'प्राप्तकाल हा विशाल

* या व यानंतरच्या दुसऱ्या ओळीत लागोपाठ झालेल्या हास्यास्पद यतिभंगाला सबंध मराठी काव्यात जोडीदार मिळणार नाही.

भूधर, सुंदर लेणीं तयांत खोदा ' आणि नीतीची द्वाही पसरवून ' समतेचा ध्वज उंच धरा रे ' असा आजच्या परिस्थितीला अनुरूप उपदेश तिकडे केशवसुत तरुण पिढीस करीत असताना, इकडे क्रमिक पुस्तकाच्या नीतिपर काव्याची मदार ' असों आम्ही अतिपतित दुराचारी । तूंच होउनि बा सदय अम्हां तारीं ' असल्या परमेश्वरा-पुढे स्वतःची विनाकारण नाचक्की करून घेणाऱ्या सांप्रदायिक पद्धतीच्या भक्तिपर वेच्यांवर किंवा ' बरें सत्य बोला ' आणि ' भला रे भला बोलती ' ते करा, असल्या कानी कपाळी पडून बोथट झालेल्या नीतिपर श्लोकांवर अथवा ' विडा पैजेचा उचलू नको, गहाण डुबवू नको, जामीन राहू नको ' अशा कोर्टाच्या वातावरणात मुरलेल्या कायदेबाजाच्या ओठांत शोभणाऱ्या व्यावहारिक फटक्यावरच असलेली दिसून येते. सदर नीतिपर काव्यांत उपदेशाच्या परिणामकारकतेकडे जसे दुर्लक्ष केलेले आढळते, तद्वतच कालपरिस्थितीकडेही कानाडोळा केलेला आढळतो. आज महाराष्ट्रातून अगदी इंग्रजी न बोलणारे लोकदेखील ' ब्रिज ' किंवा तत्सम पत्त्यांचे सुधारलेले डाव खेळत असताना शाळेतील मुलांना ' खेळू नका केवळ गंजिफांचे, ते खेळ गादीवर बैसण्याचे ' किंवा ' त्या सोंगट्या भांडणे लाविताती ' असा पेशवाईच्या काळातील ऐदी तरुणांस केला, तरच शोभणारा उपदेश क्रमिक पुस्तकांतून केला आहे. विषयाच्या आणि विचाराच्या दृष्टीनेच केवळ क्रमिक पुस्तकांतील काव्य मागासलेले नसून रचनेच्या आणि मुलांच्या वयानुरूप निवडीच्या दृष्टीनेदेखील त्याच्यात तितकाच ढिलेपणा आलेला आहे. ' कुणि नाहीं ग कुणिं नाहीं । आम्हांला पाहत बाई ' इतकी सोप्या व काव्यमय रचनेची गाणी हाताळगत असताना क्रमिक पुस्तकातले काव्य मात्र ' पेरूनियां तें मण धान्य एक, खंडीस घे शेतकरी अनेक ' किंवा ' खेळामधें खेळ तथापि पाऱ्या । व्यायाम देण्यास तयार मोठ्या ' असल्या सुलभतेवर रमले आहे. तसेच ' प्रतीतीविणें बोलणें व्यर्थ होतें ' किंवा ' द्वैताला विसरूं नको ' असल्या ओळींचा अर्थ नऊ वर्षांच्या मुलांना समजला पाहिजे, अशी जी ' टेक्स्ट् बुककमिटी ' अपेक्षा करते, तीच ' म्हणतात जे मराठी भाषा होणार ही असे नष्ट । मिळणार काय करुनी व्यर्थ हिला वाचवावया कष्ट ?' असल्या आर्यांचा अर्थ करावयाला तेरा वर्षांच्या मुलांना सांगत आहे.

एवंच, आजकालच्या नाटकातील पद्यात जितके काव्य असते, तितकेच आमच्या शाळाखात्यातील क्रमिक पुस्तकांत सापडते. राणीच्या शिक्क्याच्या आधारावर अगदी गुळगुळीत झालेला १८६७ सालचा पैसा आज व्यवहारात जसा चालवून घ्यावा लागतो, तद्वत् ' मंजुरी 'चा शिक्कामोर्तब जोपर्यंत या क्रमिक पुस्तकांवर आहे, तोपर्यंत त्यांच्या आतील पद्य किंवा गद्य कितीही जुनाट झाले, तरी ' चालवून ' घेण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. आज जवळ जवळ दोन तपे होत आली, तरी आमच्या क्रमिक पुस्तकांचा ' कंपोज '—त्यावरील आवृत्तीच्या व सालाच्या आकड्याखेरीज आणि राजाराणीच्या

फरकाशिवाय ( ईश्वर त्यांचे रक्षण करो ! )–बदललेला आढळून येत नाही. ‘ बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी ’ म्हणून सालोसाल मागील आवृत्तीबरहुकूम प्रकाशित होणाऱ्या ‘ बैबला ’प्रमाणेच ती वर्षानुवर्षे छापली जात आहेत, हे छपाईच्या दृष्टीने जरी कितीही सोयीचे असले, तरी छापखान्याबाहेर पसरलेल्या सृष्टीत अत्यंत गैर-सोयीचे व अनर्थकारक आहे, याची जाणीव अद्यापि ‘ खात्या ’ला होत नाही; ही दुःखाची गोष्ट आहे.

असले ‘ पद्य ’ वाचण्यास सरावलेली बालके शाळेच्या आवाराबाहेरील सृष्टीत जेव्हा येतात, तेव्हा ‘ घोडा, घोडा म्हणतात, तो हाच काय ! ’ असे चाचपडत विचारणाऱ्या जंगली ऋषिकुमाराच्या अजागळ अजाणपणाने ‘ काव्य, काव्य म्हणतात ते हेच काय ? ’ असे विचारू लागतात. सुंदर शब्दांना, कोमल कल्पनांना व गोड चालींना बाळपणापासून मुकलेली ही अर्भके मोठी झाली की, सौंदर्यपूर्ण निसर्गाकडे कौतु-हलोत्पादक जीविताकडे आणि गूढ भविष्यकाळाकडे विटलेल्या आणि थकलेल्या दृष्टीने पाहू लागतात. त्यामुळेच मासिकांतून अधेमधे छापलेल्या कवितांची पाने, पुस्तकांतील चित्रे शोधणाऱ्या मुलांच्या घाईने उलटणारे वाचक आज वाढत्या प्रमाणावर आहेत. गायन ऐकणाऱ्या श्रोतृगणात आगगाडीतून रात्री प्रवास करणाऱ्या उतारू-प्रमाणे डुलक्या घेणाऱ्या रसिकांची संख्या आज अधिक आहे. या सर्व दोषांची जबाब-दारी निःपक्षपात बुद्धीने सांगायचे म्हणजे प्राथमिक शाळांतून आजकाल आमच्या मुलाबाळांना ज्या दर्जाचे काव्य व ज्या किमतीचे गायन शिकविले जात आहे, त्यावर आहे.

क्रमिक पुस्तकांच्या पुरवणीदाखल काही काव्यसंग्रह ‘ केवळ मुलांसाठी ’ म्हणून प्रकाशित झालेले अलीकडे आढळात येऊ लागले आहेत. पण या नूतन ‘ संग्रहां ’तून पूर्वोक्त पुस्तकांतील काव्याचेच लोण पुढे पोहोचविलेले असते, इतकेच. जुन्या कवीं-विषयी कोठलाही अनादर न बाळगता मला असे विचारावेसे वाटते की, मुलांसाठी काव्याचे उतारे काढावयाला बसले म्हणजे ज्ञानेश्वर-एकनाथादी जुन्या कवींचे वेचे आरंभी तोरणाप्रमाणे टांगले पाहिजेत, असा कोणी संग्राहकांवर जुलूम केला आहे की काय ? या संतकवींची घोंड आमच्या मुलांच्या मानगुटीवर नेहमी नेहमी काय म्हणून ? मुलांच्यासाठी कविता निवडणाऱ्यांची–मग ते शाळाखाते असो अगर इतर संग्राहक असोत–एक मोठी चूक होत असते. मुलांची नीती व शील सुधारण्याच्या कामी हे लोक जेव्हा काव्याचा साधन म्हणून उपयोग करण्याचा अट्टाहास दाखवितात, तेव्हा त्यांच्या अज्ञानाची कीव करावीशी वाटते. लहानपणापासून नीतिपर काव्याचा खुराक चालू ठेवूनसुद्धा आजकालच्या तरुणांचे शील बरोबर नाही, अशी ओरड नीतिपर काव्ये शिकविण्याचा आग्रह धरणारे हेच जुनाट आत्मे करीत असतात. यावरून काय दिसून येते ? वर्गाच्या भिंतीवर डकविलेली साधुसंतांची निवडक

वचने वाचून मुलांची नीती जितकी सुधारते, तितकीच ती क्रमिक पुस्तकांतील नीतिपर वेचे वाचून सुधारते. नीतिशिक्षकाचे मार्ग व पद्धती निराळ्या आहेत. काव्याने नीतिशिक्षण देणे म्हणजे एखाद्या शस्त्रवैद्याच्या नाजूक धारेच्या हत्याराने पेन्सिली ताशीत बसण्यासारखे हास्यास्पद आहे. हिरवळीतून लपत छपत जाणाऱ्या रुपेरी ओढ्याच्या प्रवाहाप्रमाणे निसर्गातल्या प्रत्येक वस्तुवस्तूंमधून लपंडाव खेळणारे सौंदर्य हुडकून काढण्यास जे मदत करते, तेच काव्य! 'खरे सत्य बोला, यथातथ्य चाला' हे काव्य नव्हे! 'आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चहूंकडे' किंवा 'आकाशाच्या तारेसंगे झिम्मा खेळू ये' हे खरे काव्य आहे. काव्याचे पहिले कडवे कानांवर पडताच मुले आनंदाने डोलू लागली पाहिजेत. कविता शिकत असताना समोरील फळ्यावर त्यांना शब्दांची निर्जीव जंत्री न दिसता, त्यांच्या चित्रफलकावर नवीन, नवीन कल्पनांची चित्रे उमटताना दिसावयाला पाहिजेत. ज्यातील शब्द वहीत टिपून घ्यायचे असतात, ते काव्य नव्हे. "आमचे काव्य वाचल्याने मुलांचा शब्दसंग्रह वाढेल," असे प्रस्तावनेत आश्वासन देणारा लेखक सदाशिवरावभाऊ पेशव्याच्या तोतयाप्रमाणे काव्यावर आपला हक्क सांगत असतो. तसेच, मेलेल्या बेडकाच्या अवयवांचे पृथक्करण करणाऱ्या प्राणिशास्त्राच्या विद्यार्थ्याप्रमाणे कवितेच्या ओळीओळींतील शब्दांच्या अन्वयासाठी उलथापालथ करावयालाच पाहिजे–तशा कसोटीला न उतरणारे काव्यच नव्हे, असे आग्रहपूर्वक सांगणाऱ्यांच्या काव्यविषयक कल्पना एखाद्या पुराणवस्तु-संग्रहालयात ठेवण्याच्या लायकीच्या आहेत.

जे विचार सरळ गद्यात मांडता येतील, ते मुद्दाम अवघड शब्दांचा गोपाळकाला करून व्यक्त करण्याचे काव्य हे जसे माध्यम नव्हे, तसेच नीतीचे व ज्ञानाचे धडे देण्याचेही ते साधन नव्हे. ज्यांना ज्ञान पाहिजे असेल, त्यांनी पंडिताकडे पळावे; उपदेश पाहिजे असल्यास हरदासी कथेला हजर राहावे. कवींच्या तोंडूनच अशा गोष्टी ऐकावयाला मिळाल्या पाहिजेत, असली आततायीपणाची अपेक्षा त्यांनी करू नये. कवीचे कार्य अगदी निराळे आहे. पायाळू माणसाला ज्याप्रमाणे भूमिगत द्रव्य दिसते असे म्हणतात, त्याप्रमाणे निसर्गातल्या निरनिराळ्या दृश्यात दडलेली सौंदर्याची व सत्याची दौलत केवळ कवीच्याच नजरेला दिसत असते. आयुष्यातील अगदी 'साध्या साध्या' गोष्टींवर अतिपरिचयाने पडलेले उपेक्षेचे अवगुंठन कवी आपल्या हलक्या हाताने बाजूला करून त्यामध्ये किती सुंदर 'आशय' भरला आहे, याची जगास जाणीव करून देतो. गुप्त कल्पना उजेडात आणणे व सुप्त भावना चेतवणे हेच कवीचे खरे काम आहे. असल्या कवींची काव्ये जर आमची मुलेबाळे गुणगुणू लागतील, तरच त्यांना 'ज्ञाताची कुंपणे' ओलांडून प्रतिकूल परिस्थितीचा पडदा फाडून, पलीकडे पसरलेल्या सौंदर्याच्या चिरंतन सृष्टीत स्वच्छंद विहार करता येईल. फुलपाखरे ही नेहमी सुंदर फुलांवरच बागडत असतात. सुंदर कल्पना जर मुलांना

दिसल्या, तर ती आपोआपच त्यांच्याभोवती रुंजी घालू लागतील. अशा कल्पना त्यांच्या ओठांवर अष्टौप्रहर खेळतील. " उद्या या कविता पाठ करून या ", असली जादा ताकीद त्यांना अशा काव्यांबद्दल देण्याची पाळी केव्हाही येणार नाही.

मुलांसाठी काव्याची निवड करण्याच्या बाबतीत आतापर्यंत शाळाखात्याने जी हेळसांड केलेली आहे, किंवा इतर संग्राहकांनी जे अंधानुकरण केलेले आहे, ते लक्षात आणून व तशा दोषांची पुनरावृत्ती न करण्याची सावधगिरी बाळगून श्री. वि. स. सुखटणकर हे ही ' वासंती ' मुलांच्या हवाली आज करीत आहेत. श्री. सुखटणकर हे स्वतः उत्तम कवी व रसिक असल्याने असल्या ' संग्रहा 'ची जबाबदारी अंगावर घ्यावयास ते सर्वतोपरी लायक आहेत. ' वासंती 'मधील काव्यांची निवड करताना तद्वारे ' मुलांच्या मनात सौंदर्याची अभिरुची उत्पन्न करून त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देणे व त्यांचे जीवितविषयक ध्येय व्यापक करणे हाच अत्यंत योग्य हेतू त्यांनी आपल्या डोळ्यांपुढे धरिला आहे. कै. गोविंदराव कानिटकरांपेक्षा अधिक जुन्या नसलेल्या कवींच्या कवितेपासून तो कालपरवा ' आनंदा 'त आलेल्या कवितेपर्यंत सर्व निवडक आधुनिक कवींची वेचक स्फुट काव्ये या संग्रहात सामील करण्याचा दृष्टीचा ताजेपणा संग्राहकांनी राखलेला आहे. त्यामुळे हा संग्रह वाचताना मुलांना आपण एखाद्या इतिहास-संशोधकमंडळाच्या सभेत असल्याचा भास न होता, आज सकाळी डोळ्यांदेखत उमललेल्या फुलांनी वहरलेल्या बागेत बसलो आहोत की काय, असेच वाटेल. या संग्रहाच्या उंबरठ्यावर उभे राहिल्यास मुलांना अधिक कविश्रेष्ठांच्या वैभवशाली काव्यप्रसादाचे सोनेरी कळस दिसू लागतील व त्यामुळे त्या प्रासादाच्या अंतर्भागातील शोभा–संपत्ती पाहण्याची तळमळ त्यांना या वयापासून लागेल.

या पुस्तकात निवडलेल्या कविता अपेक्षित कसोटीला उतरतील, असे खुद्द संग्राहकाचेदेखील म्हणणे नाही. तथापि, आधुनिक कवींच्या विविध काव्याच्या सागरातून मुलांना कळतील, पटतील व खुलवतील अशी काव्ये नेमकी निवडून काढण्याचे काम किती अवघड आहे, ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे प्रस्तुत संग्रहाचे काम किती योग्य धोरणाने व समाधानकारक रीतीने झाले आहे, हे दिसून येईल. गोविंदकवीची ' भूपाळी ' अगर बी कवींचा ' चाफा ' यासारखी एखाद दुसरी कविता किंवा यातील काही एक कल्पना ज्या वयाच्या मुलांसाठी हा संग्रह केलेला आहे, त्यांना दुर्बोध असल्या, तरी सर्वच सुगम नसलेली पण काही विशेष गुण असलेली कवितासंग्रहात अंतर्भूत करण्याच्या ' संग्राहकाच्या धोरणाबद्दल कुणाचेही दुमत होऊ नये, असे वाटते. निवडलेल्या कवितांत सुलभ, भक्तिपर, राष्ट्रीय, ऐतिहासिक, सामाजिक, निसर्गवर्णनात्मक, नवकल्पनात्मक, विचारप्रवर्तक अशी विविध प्रकारची काव्ये असल्याने ' वासंती 'ला शोभायुक्त वैचित्र्य आले आहे. टिळकांचा ' हिंदिस्तान ' व टेकाड्यांचा ' हिंददेश ' आपली मायभूमी ' भूगोलाचा अलंकार '

आणि ‘ थोरांत थोर ’ आहे, अशी ग्वाही देत आहेत. जन्मभूमिविषयक प्रेमाच्या व्यापक भूमिकेवर ‘ जरिपटक्याच्या ’ व ‘ भगव्या झेंड्याच्या ’ महाराष्ट्राविषयी गोविंदाग्रज अभिमान उत्पन्न करीत असल्याने त्यावर प्रांतिक अंधपणाचा आक्षेप येणार नाही. माधव, तिवारी, कुंजविहारी हे कवी महाराष्ट्राच्या गत इतिहासाचा हृदयभेदक चित्रपट डोळ्यांपुढून सरकवीत असताना मायभूमीच्या सद्यःस्थितीची दारुण जाणीव मनात उत्पन्न होऊन समोर साहजिकच विनायकाची ‘ हतभागिनी ’ उभी राहते. संकटकाळी मार्ग न सुचला तर परमेश्वरी सहाय्याकडे आशेने बघणारी मानवी प्रवृत्ती ‘ भारता तार, या कालिं कालिं । हरि वाजिव गीतामुरली ’ असा गोविंदकवीच्या मुखाने धावा करू लागते. तथापि, अशा परिस्थितीत जडमूढ झालेल्यांना ‘ भ्रांत तुम्हा का पडे ? ’ असा छातिठोक सवाल करून माधव जूलियन् त्यांना ‘ कायदा गतीचा ’ पाळावयाला सांगतात; तर ‘ मातेस्तव व्हा सिद्ध मराया ’ असा दिव्य मंत्र तांबे देत आहेत. ‘ महाराच्या पोरा ’ची हृदयद्रावक गोष्ट सांगून दडकर समाजातील विषमतेबद्दल चीड आणतात व त्यामुळे ‘ आधी भाकर दर एकाला मिळेल ’ ‘ अशी ‘ समता ’ आज समाजाला हवी, असे आनंदाप्रमाणे वाटू लागते. ‘ संकटांनी सर्द ’ होणाऱ्या पुरुषांनी ‘ मर्दाची छाती ’ करून ‘ स्त्रियांच्या रक्षणा कुरवंडीन काया ’ असा कृतनिश्चय केला पाहिजे, असे ठाकरे आपल्या खड्या सुराने सांगत आहेत. अशा राष्ट्रीय विचारप्रवर्तक चैतन्ययुक्त काव्यांचा भरणा या संग्रहात प्रामुख्याने असल्याने इतिहासाची पुस्तके अगर चलनी वर्तमानपत्रे वाचून जो परिणाम होणार नाही, तसला प्रेरक व इष्ट परिणाम मुलांच्या मनावर होईल यात शंका नाही.

या संग्रहातील दुसरे वैशिष्ट्य म्हटले म्हणजे बहुतेक सर्व काव्य गाता येण्यासारख्या चालीवर असल्याने अगदी व्यवहारी दृष्टीने पाहावयाचे तर, केवळ शाळेतच नव्हे, तर शाळेबाहेरील जगातही निरनिराळ्या प्रसंगी मुलांना त्यांचा उपयोग होईल. इंग्रजी काव्य न गाता ते गद्याप्रमाणे पठण करण्याचा प्रघात आहे; पण त्याचा एक अनिष्ट परिणाम मराठी कविता शिकविण्याच्या बाबतीत असा झाला आहे की, शिक्षक वर्गात मुलांना कविता गाऊन कधीच दाखवीत नाहीत. कोणत्याही कवितेच्या हृदयात शिरायचे असेल, तर ते गोड सुरांच्या मार्गानेच शिरले पाहिजे. कविता कशी गावी, हे पुष्कळांना कळत नसल्याने त्यांना तिच्यामधील रसास्वादाच्या आनंदाला मुकावे लागते. कवी कविता लिहीत असताना स्वतःशी गात असतो; तो ती गद्यात बडबडत नाही. कविता रूक्ष आवाजात ‘ वाचत ’ गेल्याने कवीच्या उद्दिष्ट कल्पना अगर विचार यांपेक्षा अधिक ‘ काहीतरी ’ आहे, ते काहीतरी ’ गोड गळ्यातूनच हृदयाला पटते. या कवितासंग्रहातील कविता वर्गात शिकविण्याचा जर कोणाला प्रसंग आला, तर अन्वयार्थ पद्धतीने त्यांची विल्हेवाट न लावता, त्या आरंभी गोड

गळयावर पुन्हा पुन्हा गाण्यात याव्यात. कविता गातागाताच त्यांतील अर्थ मुलांच्या मनांत उमलू लागेल. अशा तऱ्हेने मुलांच्या मनांवर कवितेचा अनुकूल संस्कार झाला, म्हणजे मग शिक्षकांनी आतील कल्पनेचे कोवळे कोवळे पदर उलगडून दाखविण्याचे काम हाती घ्यावे.

मुलांना आनंद देण्यासारखे समाधान जगात दुसरे कशात नसेल ! असे पवित्र कार्य श्री. सुखटणकर हे या पुस्तकाच्या द्वारे यशस्वी रीतीने करणार असल्याने, दुष्ट काव्याच्या दडपणाखाली दाबल्यामुळे खऱ्या सौंदर्याला, निर्व्याज आनंदाला, जित्या विचाराला मुकलेली आतापर्यंतची अभागी बालसृष्टी आज त्यांना हसऱ्या तोंडांनी व मोकळ्या कंठांनी दुवा देईल. या त्यांच्या भाग्याचा अत्यंत अल्पांशाने का होईना, पण जर वाटा मिळत असला, तर प्रस्तावनालेखनाच्या निमित्ताने त्यांच्या हाताला हात लावण्याची संधी कोण गमावील ?

जून १९२९

[ वि. स. सुखटणकर संपादित ‘ वासंती ’
या कवितांच्या वेच्याची प्रस्तावना. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३७३७
(स्थळ प्रत)

# १३

## ' नकाशासंग्रह ' : प्रस्तावना

भूगोल या विषयासंबंधी सामान्य लोकांत जितका गैरसमज असलेला आढळून येतो, तितका दुसऱ्या एखाद्या विषयासंबंधी असलेला क्वचितच आढळून येत असेल, ' भूगोल ' हा शब्द उच्चारताच पुष्कळांच्या तोंडावर तिरस्काराची छटा तरंगू लागते. त्या विषयाच्या कंटाळवाण्या अभ्यासाची अप्रिय आठवण मनात जागी होते, व स्मृतिचक्षूंत भौगोलिक नावांची भीषण भुतावळ सरकू लागते. ते डोंगर, त्या नद्या, ती भूशिरे आणि आखाते, ते व्यापारी वारे— एक ना दोन, अशा निरर्थक संज्ञांच्या लांबलचक याद्या डोळ्यांपुढे लोंबू लागतात. या गैरसमजाचा जन्म मुख्यत्वेकरून भूगोलविषयाच्या शास्त्रीय अभ्यासाच्या अभावाच्या पोटीच झालेला असतो. तसेच त्या विषयाचे शिक्षण यथार्थ पद्धतीने व समर्पक साधनांच्या सहाय्याने दिले जात नसल्याने हा गैरसमज अधिकाधिक फैलावत गेलेला आहे.

कोणत्याही सामान्य भूगोलाच्या पुस्तकात आरंभीच भूगोल या विषयाची व्याख्या दिलेली आढळते. या व्याख्येवरून या विषयासंबंधीचा साधारण लेखकांचा व वाचकांचाही दृष्टिकोन कसा असतो, याची आपणांस कल्पना होईल. ही व्याख्या बहुधा अशी किंवा यासारखीच असलेली आढळून येईल : " आपण ज्या पृथ्वीवर वास्तव्य करतो, त्या पृथ्वीच्या स्वरूपाचे व तिजवरील भिन्न भिन्न देशांचे वर्णन म्हणजे भूगोल." कोणत्याही विषयाच्या सुरवातीस इतके विकृत विधान बेमालूमपणे ठोकून देण्याचे धाडस केल्याचे आमच्या आढळात नाही. भूगोलाच्या कमनशिबाने असा ' मक्षिकापात ' अगदी 'पहिल्या घासा'तच होत असल्याने त्या विषयाच्या पुढील अभ्यासाच्या मनोरंजकतेवर विरजण पडावे, हे अगदी साहजिक व क्रमप्राप्तच आहे. या व्याख्येत

पृथ्वीच्या स्वरूपाच्या वर्णनावर विशेष जोर दिला असल्याने भूगोलविषयाचे प्रतिपादन वर्णनात्मक स्वरूपाचे होऊन बसले आहे. ज्या मनुष्यप्राण्याच्या रहिवासाने या पृथ्वीला एवढे महत्त्व व सौंदर्य प्राप्त झाले आहे, व ज्यांच्या अभावी हा अवाढव्य विस्तार स्मशानसदृश झाला असता, त्या मनुष्यप्राण्याचा उल्लेखदेखील या व्याख्येत केलेला आढळून येत नाही. मनुष्यप्राण्यावाचून पृथ्वी म्हणजे प्राणावाचून निर्जीव कलेवर. तेव्हा पृथ्वीच्या नुसत्या पृष्ठभागाचा किंवा तिच्यावरील प्रदेशांचा अभ्यास करणे म्हणजे भूगोल खास नव्हे. रा. ब. पटवर्धन यांच्या 'भूगोल विद्येची मूळतत्त्वे, भाग ३' ( किंमत १॥। आणे ) या भूगोलाच्या पौराणिक क्रमिक पुस्तकात सुरवातीसच भूगोलाची व्याख्या दिली आहे. "भूगोलविद्या म्हणजे पृथ्वी, तिजवरील देश व त्या देशांतील लोक यांचे वर्णन होय." या व्याख्येत लोकांच्या वर्णनाचा उल्लेख अगदी शेवटी गौणत्वाने केलेला आहे. यावरून भूगोलाच्या वास्तविक व यथार्थ स्वरूपाची कल्पना होईल, अशी जर कोणाची समजूत होणार असेल, तर ती निव्वळ कल्पनाच ठरेल. कारण सबंध पुस्तकात लोकासंबंधींचे वर्णन "येथील लोक बौद्धधर्माचे आहेत." "त्यांच्या रीतीभाती काही हिंदू लोकांप्रमाणे व काही चिनी लोकांप्रमाणे आहेत." "लोक गरीब असून त्यांच्या अंगी धाडशीपणा मुळीच नाही." "येथील राजाही तसाच अव्यवस्थित आहे."–या संक्षिप्त वाक्यांपलीकडे केलेले दिसून येणार नाही. तेव्हा नुसते लोकांचे उडत उडत व अळेबळे केलेले वर्णन म्हणजेही भूगोल नव्हे. मनुष्याच्या रहिवासाची जागा अशा दृष्टीने पृथ्वीचा अभ्यास करणे व भोवतालच्या भौगोलिक परिस्थितीची व मनुष्याची जी क्रिया व प्रतिक्रिया सारखी चाललेली असते, त्यांचे अवलोकन करणे हा भूगोलविषयाचा मुख्य हेतू आहे.

पृथ्वी हे मनुष्याप्राण्याचे घर आहे. या घरात तो कशा रीतीने राहतो, याचा अभ्यास करताना त्या घराची रचना कशी आहे, त्याचे स्वरूप कसे आहे, याकडे लक्ष जाणे यथानुक्रमच आहे. जमीन व पाणी यांचा विस्तार किती आहे, पर्वतांच्या रांगा कशा पसरलेल्या आहेत, कोणते प्रदेश उष्ण आहेत व कोणते थंड आहेत, निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या वनस्पतींची विभागणी कशी झाली आहे, पर्जन्याचे मान कोठे जास्त आहे व कोठे कमी आहे, कोणत्या दिशेने वारे वाहातात व त्यांचा एखाद्या प्रदेशाला काय फायदा होतो, इत्यादी गोष्टींचा संबंध भूगोलात येतो हे खरे. पण मनुष्याची वस्ती, पृथ्वीवर नसती, तर या गोष्टींच्या अभ्यासाला काहीच किंमत राहिली नसती. केवळ मनुष्याच्या अस्तित्वानेच त्याला महत्त्व आले आहे. परमेश्वराने निर्माण केलेल्या या नवलपूर्ण व चमत्कृतिमय सृष्टीत मनुष्य कसा रहातो, निरनिराळ्या परिस्थितीचा त्याच्या वर्तनावर, राहाणीवर, चालीरीतीवर, उद्योगधंद्यावर कसा परिणाम झालेला आहे, याचा मनोरंजक इतिहास हाच भूगोलाचा मुख्य विषय आहे, नुसत्या पृथ्वीच्या बाह्य स्वरूपाचे वर्णन हे सृष्टिशास्त्रांत अंतर्भूत होते; किंवा

सामाजिक व राजकीय प्रगतीसाठी मनुष्यजातीची जी रात्रंदिवस धडपड चाललेली असते, तिचे वर्णन इतिहासाच्या प्रांतांत जमा होते. या दोन्ही प्रकारच्या वर्णनांचा भूगोलाशी प्रत्यक्ष संबंध येत नाही. भौगोलिक परिस्थिती व मनुष्यप्राणी यांचा अन्योन्य संबंध जेथे जेथे येतो, तेथे तेथे भूगोलाचा विषय निर्माण होतो. एखाद्या नदीच्या प्रवाहाचा जमिनीवर व खडकावर काय परिणाम होतो, हा प्रश्न सृष्टिशास्त्राचा झाला, पण त्या नदीच्या योगाने तेथील प्रदेशांतील लोकांच्या जीवनक्रमावर काय परिणाम झाला, हा प्रश्न भूगोलाचा झाला. तसेच एखाद्या प्रदेशातील लोकांनी आपले सामर्थ्य कसे वाढविले व आपला उत्कर्ष कसा करून घेतला, या गोष्टींचा विचार इतिहासाच्या क्षेत्रात येतो; पण त्या लोकांच्या अंगात विवक्षित गुणांचा परिपोष होण्यास त्यांच्या प्रदेशाची भौगोलिक परिस्थिती कशी अनुकूल होती, याचा विचार भूगोलाच्या प्रांतात पडतो. अशा रीतीने एक पाय सृष्टिशास्त्राच्या प्रांतात व दुसरा पाय इतिहासाच्या प्रांतात ठेवून भूगोल हा विषय उभा राहिलेला आहे. भूगोल-विषय मनोरंजक असण्याचे कारण हेच आहे. भूगोल हे रूक्ष शास्त्र नव्हे, भूगोल ही एक रंजक गोष्ट आहे. मनुष्यप्राण्याचे अद्‌भुतरम्य जीवनाचे रहस्य उलगडून दाख-विणारी एक रसपूर्ण नवलकथा आहे. कादंबरीतील काल्पनिक नायकावर ओढूनताणून पाडलेल्या काल्पनिक संकटांची वर्णने वाचकांच्या अंगावर रोमांच उभे करतात; पण या विस्तीर्ण पृथ्वीवरच्या अत्यंत गहन प्रदेशांचा शोध लावताना निरनिराळ्या धाडसी प्रवाशांवर व संशोधकांवर जी प्राणांतिक संकटे गुदरली त्यांचे खरेखुरे वर्णन वाचून वाचकांची वृत्ती बेभान होऊन जाईल. नाटकी रंगभूमीवर नायिकेच्या सुखासाठी आपल्या सुखांचा त्याग करणारा नायक प्रेक्षकांना सर्व सद्‌गुणांचा पुतळा दिसू लागतो. पण जगाच्या अपार ज्ञानभांडारात भर टाकावी, या उदात्त ध्येयाने आपल्या ऐहिक सुखावर व प्राणांवर, तिलांजळी देणाऱ्या कॅप्टन स्कॉटसारख्या प्रवाशांच्या चारित्र्यात उच्च गुणांचा केवढा तरी उत्कर्ष वाचकांना व अभ्यासकांना दिसून येईल.

भौगोलिक परिस्थितीचा मनुष्यप्राण्यावर व त्याच्या आयुष्यक्रमावर कसा परिणाम होतो, हे आपणांस पुढील गोष्टीवरून थोडक्यात कळून येईल. ऑस्ट्रेलिया खंडाचा शोध ज्या वेळी गोऱ्या लोकांनी लावला, त्या वेळी तेथील मूळचे काळे लोक अत्यंत निकृष्ट अवस्थेत होते. ते नग्न स्थितीत राहात व शिकार करून आपली उपजीविका करीत असत. शिकार करण्यापलीकडे त्यांना दुसरे कसलेही ज्ञान नव्हते. एकापासून पांचपर्यंत आकडे मोठ्या कष्टाने त्यांना मोजता येत होते. त्यापलीकडे त्यांना संख्येची कल्पना नव्हती. त्यांच्या या रानटी अवस्थेचे कारण त्यांच्या भोवतालची परिस्थिती हे होय. ऑस्ट्रेलियाचा बराच मोठा भाग वैराण व निर्जल आहे; हवा उष्ण व कोरडी आहे. पोषणास उपयोगी अशा वनस्पतींचा तशात अभाव. शेतकीला व उपजीविकेला

उपयोगी पडणारी जनावरेही नव्हती. ते
कृषिवृत्ती करून आपला उदरनिर्वाह
शिवाय त्यांना गत्यंतरच नव्हते. त्य
काहीच अर्थ नाही. ज्या परिस्थितीत
घेतली, म्हणजे त्यांच्या जीवनक्रमाचा

अगदी उत्तरेकडे हिमप्रदेशात राहा
तर हेच दिसून येईल. हे लोक एका
जमाव करून राहात नाहीत. त्यांच्या दे
कारण, त्यांचा प्रदेश अत्यंत थंड हवेच
त्यामुळे वनस्पती किंवा पिके उगवणे श
करावी लागते. तेव्हा हे लोक समुद्राच
असतात. यांची घरे हिवाळ्यात बर्फाची
घरे बांधणे सोयीचे असते. शिवाय अ
हा उष्णता-प्रवाहक नाही. उन्हाळ्यात
एस्किमो लोक ती सोडून जातात व त
ड्याचे तंबू करून त्यांत राहातात. पृ
असेच दिसून येईल की, मनुष्यप्राणी
अनुसरून वर्तन करीत असतो. ही गो

आता भूगोलात नकाशाला काय
पाहिजे याचा विचार करू. पृथ्वीसंबं
मिळवावयाचे असते, एवढ्याच व
फार महत्त्व आलेले आहे. नकाशा म
संकेतांच्या सहाय्याने पृथ्वीच्या पृ
करतात, त्यास नकाशा म्हणतात. चि
शाची नकाशापेक्षा अधिक यथार्थ कल्पना आपणास येईल हे खरे आहे; परंतु चित्रात किंवा फोटोत पृथ्वीच्या अगदी अत्यल्प भागाची कल्पना समाविष्ट करता येते. त्यामुळे मोठमोठ्या प्रदेशांचा किंवा खंडांचा आकार रेखाटावयाचा झाल्यास नकाशाशिवाय दुसरे साधनच नाही.

नकाशामध्ये आपणांस एखाद्या प्रदेशाची निरनिराळ्या तऱ्हेची माहिती दाखविता येते. स्वाभाविक विभाग, उंचसखलपणा, दळणवळणाचे मार्ग, उष्णतामान व पर्जन्यमान, वनस्पतींची विभागणी, राजकीय विभाग, लोकसंख्येचे प्रमाण वगैरे किती तरी गोष्टी थोडक्याशा संकेतांच्या साहाय्याने नकाशावर चितारता येतात. हीच माहिती शब्दांत द्यावयाची असल्यास भूगोलाच्या पुस्तकाची पानेच्या पाने खर्च करावी

लागतील. एवढ्याच कारणासाठी एखाद्या प्रदेशाचा प्रारंभीचा अभ्यास त्या प्रदेशाच्या भूगोलाच्या पुस्तकावरून करण्यापेक्षा नकाशावरून करणे अधिक सुलभ व मनोरंजक असते.

सामान्यतः, राजकीय विभागाचे नकाशे फार वापरण्यात येतात. शाळेतून, वाचनालयांतून, भूगोलाच्या किंवा इतर विषयांच्या पुस्तकांतून नेहमी जे एक छापाचे नकाशे आपणांस दृष्टीस पडतात, ते बहुतांशी राजकीय नकाशे असतात. त्यामुळे नकाशाची एवढीच तऱ्हा असू शकते, असा पुष्कळांचा गैरसमज झाला असल्यास आश्चर्य नाही. बऱ्याचशा शाळांतून या एकाच रंगीत पडद्यावर भूगोलाचे नाटक किंवा फार्स चाललेला असतो. वस्तुतः या एकाच नकाशावरून प्रदेशाचा सर्वांगीण अभ्यास होणे शक्य नसते. राजकीय नकाशात गावे, शहरे, रस्ते व राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठी केलेले राजकीय विभाग ही माहिती असते. डोंगर, नद्या, सरोवरे, किनारे हे स्वाभाविक विभागही त्यात दाखविलेले असतात. पण बहुधा या नकाशांतून गावांच्या व शहरांच्या नावांचे इतके दाट जंगल माजलेले असते की, त्यामुळे चांगल्या चांगल्या माहितगारांची दिशाभूल होते; मग अजाण अर्भकांना हा वनवास किती जाणवतो, याची कल्पना प्रत्येकास आहे. तेव्हा, या नकाशात स्वाभाविक विभाग जरी दाखविले असले, तरी गावां-शहरांच्या गर्दीत, जुन्या बाजारात तुरळक तुरळक बसणाऱ्या नव्या सामानाच्या दुकानदारांप्रमाणे, ते उठावाने दिसून येत नाहीत. एखाद्या प्रदेशाच्या निरनिराळ्या बाजूंचा अभ्यास करण्यासाठी त्या प्रदेशाचे निरनिराळे नकाशे असणे अत्यंत आवश्यक असते.

स्वाभाविक विभागाच्या नकाशात निरनिराळ्या रंगांच्या सहाय्याने एखाद्या प्रदेशाचा उंचसखलपणा चांगल्या तऱ्हेने दाखविता येतो. या नकाशासंग्रहातील पृष्ठ ४ वर आशियाखंडाच्या पृष्ठभागाची व आकाराची नीट कल्पना येईल. तळाच्या एका कोपऱ्यात निरनिराळ्या रंगांचा तपशील दिलेला आहे; त्यावरून पृष्ठभागाची समुद्रसपाटीपासून किती उंची आहे हे ताबडतोब कळते. ज्या ठिकाणी पोपटी रंग दिलेला आहे, त्याची समुद्रसपाटीपासून ६०० फूटपर्यंत उंची आहे. तपकिरी रंग समुद्रसपाटीपासून १३००० फुटांवर उंची दाखवितो. यासंबंधी शिक्षकांनी मुलांना एकदा दिशा दाखविली की, मुले शिक्षकाच्या सहाय्यावाचून स्वतःही माहिती गोळा करू शकतात. तेव्हा स्वाभाविक विभागाची माहिती शिक्षकाने नीरस रीतीने पुस्तकातून वाचून न दाखविता ती नकाशावरून विद्यार्थ्यांना गोळा करावयास सांगावे. स्वाभाविक विभागाच्या नकाशात इतर अप्रस्तुत माहितीची गर्दी नसते, त्यामुळे मुलांना अशा नकाशाच्या अभ्यासाचा कंटाळा येत नाही. शिवाय, त्यांचे लक्ष इतर अनावश्यक गोष्टींकडे जात नाही.

भूगोलाच्या अभ्यासात नकाशाचा संबंध पदोपदी येत असल्याने त्याची ओळख

मुलांना आरंभापासूनच करून द्यावयास हवी. नकाशा पाहाताना मुलांना प्रथम दिशांचे ज्ञान असावयास पाहिजे. मराठी पहिल्या इयत्तेत त्यांना दिशांसंबंधीची माहिती सांगितली जाते. त्यानंतर त्यांचा नकाशाशी परिचय करून देण्याच्या दोन रीती आहेत. पहिली रीत अशी : प्रथमतः त्यांना एखाद्या स्थळाचे चित्र, किंवा फोटो दाखवावा व नंतर त्याच स्थळाचा सपाट कागदावर काढलेला नकाशा दाखवावा, व त्यातून चित्रात पाहिलेल्या गोष्टींची स्थळे दाखविण्यास त्यांना सांगावे. एखाद्या स्थळाचे चित्र व त्याचा नकाशा यांत काय अंतर असते, हे मुलांना यावरून कळून येईल. मुलांना नकाशा काढावयास लावून त्यायोगे त्यांना नकाशाची माहिती करून द्यावयाची, ही दुसरी रीत आहे. मुलांना स्वतःच्या वर्गाचा नकाशा काढावयास सांगावे. तेथे नकाशाचे प्रमाण किंवा स्केल काय धरावे, ही अडचण मुलांपुढे उभी राहते. वर्गाच्या आकाराएवढा त्याचा नकाशा काढावयाचा झाल्यास कोणत्या अडचणी येतील, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून द्यावी. त्याचबरोबर एखाद्या स्थळाचे किंवा इमारतीचे चित्र त्या स्थळापेक्षा किंवा इमारतीपेक्षा कितीतरी अंशाने लहान असते, हेही मुलांच्या नजरेस आणावे. म्हणजे एखाद्या क्षेत्रफळाचा नकाशा कागदावर काढताना प्रमाण धरणे कसे आवश्यक असते, हे त्यांना कळून येईल. वर्गाची लांबी व रुंदी मुलांकडून पावलांनी मोजून घ्यावी व कागदावर त्यांचे प्रमाण काय धरावे, हे त्यांच्याच संमतीने ठरवावे. वर्गाच्या चार भिंती दाखविणाऱ्या रेषांना त्या त्या दिशेची नावे द्यावीत. हा नकाशा मुले काढीत असताना शिक्षकानेदेखील त्यांच्याबरोबर तो काढावा. आरंभापासून शेवटपर्यंत पायरीपायरीने कसे जावयाचे, हे प्रत्यक्ष कृतीने विद्यार्थ्यांना दाखवावे. वर्गाच्या नकाशाचा आराखडा तयार झाल्यावर त्यात विद्यार्थ्यांने आपले बसावयाचे स्थळ व शिक्षकाची बसावयाची जागा यांचा उल्लेख करावा. त्या नकाशा-संबंधी विद्यार्थ्यांला आपुलकीची भावना वाटू लागेल. यानंतर शाळागृहाचा नकाशा काढण्याचे काम हाती घ्यावे. या नकाशात इमारतीचा विस्तार, शाळेचे आवार व क्रीडांगण, व बाजूचे रस्ते या गोष्टी दाखवाव्यात. याच्या पुढील पायरी म्हणजे गावाच्या ज्या मोहल्ल्यात शाळा वसली असेल, त्या टापूचा नकाशा तयार करणे. एवढ्यासाठी शिक्षकाने मुलांना बरोबर घेऊन प्रत्यक्ष त्यांच्याकडून पाहणी व मोजणी करवून घ्यावी. मुले हे काम मोठ्या हौसेने करतात व एखाद्या प्रदेशाचा नकाशा तयार करताना तो कोणत्या पद्धतीने करतात व त्याकरिता किती परिश्रम करावे लागतात, याचा प्रत्यक्ष अनुभव, अगदी अत्यल्प अंशाने का होईना, पण येतो. या टापूच्या नकाशात मुलाने आपले घर कोठे आहे, हे दाखवून आपण शाळेस कोणत्या रस्त्याने जातो, हेही नमूद करावे. हा नकाशा काढताना स्केल काय वापरले त्याचा उल्लेख नकाशाच्या एका कोपऱ्यात करावा व दिशाही दाखवाव्यात.

नकाशाचा अभ्यास करताना मुलांची (व कित्येक शिक्षकांचीही) एक मोठी

गैरसमजूत होत असते. तिचे कारण म्हणजे भिंतीवर नकाशा टांगणे हे होय. आपण भिंतीवर नकाशा टांगतो, याचे कारण तसे केल्याशिवाय नकाशा नीट पाहाता येणे शक्य नाही किंवा त्याशिवाय प्रदेशाची कल्पना बरोबर येणार नाही, हे नसून केवळ आपल्या सोयीसाठी आपण तो तेथे टांगतो, ही कल्पना पुष्कळांना नसते. आणि त्या योगाने त्यांच्या भूगोलविषयक कल्पना व शब्दप्रयोग चुकीचे होतात. पुष्कळ वेळा ‘ दिल्ली ’ कोठे आहे. असे विचारताच मुले मुंबईच्या ‘ वर ’ आहे, असे उत्तर देतात. ‘ मद्रास ’ मुंबईच्या ‘ खाली ’ आहे असे सांगतात. त्याप्रमाणे कित्येक शिक्षक ‘ आपण विषुववृत्तापासून जो जो वर जावे, तो तो उष्णतेचे मान कमी होते. ’ अशी भाषा वापरतात किंवा नकाशातील एखादे गाव विद्यार्थ्यास न सापडल्यास ‘ जरा खाली ये ’ किंवा ‘ थोडा वर जा ’ अशा सूचना शिक्षक देत असतात. या व अशाच प्रकारच्या भाषाप्रयोगाने विद्यार्थ्यांच्या मनावर पृथ्वीची रचना एखाद्या मनोऱ्या-सारखी आहे अशी कल्पना प्रतिबिंबित झाल्यास नवल नाही. तेव्हा, शिक्षकांनी अशा तऱ्हेच्या भाषाप्रयोगापासून सावध असावे. एवढेच नव्हे, तर आरंभी नकाशाचा अभ्यास सपाट पृष्ठभागावर ठेवूनच करावा. नकाशातील दिशा वास्तविक दिशांकडे कराव्यात म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागाची मुलांना यथार्थ कल्पना होऊन तेथे ‘ वर व खाली ’ असा काही प्रकार नाही, हे त्यांच्या ध्यानी येईल. प्रदेशाच्या आकाराचा मुलांच्या मनावर योग्य ठसा झालेला आहे, हे पडताळून पाहण्याची एक चांचणी आहे. ती अशी : नेहमी ज्या तऱ्हेने आपण नकाशा भिंतीवर टांगतो त्याच्या उलट म्हणजे दक्षिण दिशेचा भाग वर करून नकाशा भिंतीवर लावावा; अशा स्थितीत त्या नकाशांतील प्रदेशाकडे पाहताना मुलांना कोणत्याही प्रकारची दिशाभूल किंवा गैरसोय वाटली न पाहिजे. भिंतीवर नकाशा टांगण्याच्या प्रघातामुळे दिशाभूल कशी होते, याचा दाखला आम्हांस प्रत्यक्ष मिळाला आहे. नकाशातील दिशा सांगताना एका शिक्षकाने मुलांना बजावून सांगितले, “ मुलांनो, नकाशातल्या दिशा व्यवहारा-तल्या दिशांपेक्षा फार निराळ्या आहेत बरे ! नकाशात उत्तर डोक्याकडे असते व दक्षिण आपल्या पायाकडे असते. आले ध्यानात ! ” यापेक्षा यासंबंधी अधिक लिहिण्याची जरुरी नाही.

तसेच दुसऱ्या एका गोष्टीबद्दल शिक्षकाने खबरदारी घ्यावयास पाहिजे. नकाशाच्या अभ्यासात विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा कोंडमारा होता कामा नये. नकाशा हे साधन आहे. त्याचा साध्य म्हणून केव्हाही उपयोग करावयाचा नाही. नकाशा पाहणे म्हणजे भूगोलाच्या अभ्यासातला मोक्ष नव्हे. मुलांची दृष्टी नकाशावर खिळून न राहता त्याच्या पलीकडे जावयास पाहिजे. नकाशात दर्शविलेल्या गोष्टी त्यांच्या चित्तचक्षूंपुढे उभ्या राहिल्या, तरच नकाशा पाहाण्याचे सार्थक. ज्या मुलांना पृथ्वीचा आकार व पृष्ठभाग नकाशात दाखविल्याप्रमाणे दिसतो असे वाटते, त्यांना नकाशापासून काहीच

उजेड मिळाला नाही, असे समजण्यास हरकत नाही. उठावाचे नकाशे वापरण्यात देखील हीच भीती असते. गगनचुंबित हिमालयपर्वत त्यांना बोटाएवढा उंच वाटतो. म्हणूनच ' उठावाचे नकाशे ही पृथ्वीची चेष्टा आहे ' असे एका ग्रंथकाराने म्हटलेले आहे. नकाशाच्या सहाय्याला त्या प्रदेशांतील स्थळांची, नद्यांची, डोंगरांची किंवा अरण्यांची सुंदर चित्रे घ्यावीत. नकाशा समजण्याला त्यांची फार मदत होते. तसेच, शिक्षकाने प्रवाशांच्या पुस्तकांतून त्या त्या स्थळांची हृदयंगम वर्णने वाचून दाखवावीत किंवा स्वतः कथन करावीत. या योगाने मुलांच्या कल्पनाशक्तीचा परिपोष होऊन विषयाला मनोरंजकत्व येते. नकाशाच्या अभ्यासाचा आरंभ परिचित स्थळांपासून करण्याचादेखील हाच उद्देश आहे. कारण प्रत्यक्ष अवलोकनामुळे नकाशा पाहाताना त्या स्थळांचे स्वरूप त्यांच्या डोळ्यापुढे साक्षात उभे राहाते. अशा रीतीने नकाशा पाहाताना त्यावरील प्रदेश मूळ स्वरूपात कसा असेल, ते चित्र अंतश्चक्षूपुढे आणण्याची कल्पनाशक्तीला सवय लागते. यावरून आपणांस कळून येईल की, नकाशा पाहाणे म्हणजे त्यातील प्रदेशांच्या सरहद्दीवरून बोटे फिरविणे नव्हे. किंवा तेथील गावांडोंगरांची नावे हुडकून काढणे हेही नव्हे. कल्पनाशक्तीचा परिपोष करावयाचा ही जाणीव नकाशाच्या अभ्यासात मनात राहावयास पाहिजे. प्रदेशाच्या मर्यादा दाखविणे किंवा गावांचे दिग्दर्शन करणे हे अगदीच निरर्थक आहे असे नव्हे. त्यायोगाने विद्यार्थ्यांच्या अंतःकरणावर प्रदेशाच्या आकृतीचा आराखडा उमटतो, हे आम्हांस कबूल आहे. पण केवळ नकाशाच्या अभ्यासाचे ते एक सारसर्वस्व आहे अशा समजुतीने जेव्हा शिक्षक त्यात विनाकारण कालाचा अपव्यय करीत बसतात, तेव्हा त्यांना धोक्याची सूचना देणे अत्यंत जरुरीचे आहे.

मोठ्या नकाशावरून एखाद्या प्रदेशाची माहिती कशी गोळा करावी व त्यावरून कोणकोणती अनुमाने काढावी, हे शिक्षकांनी शिकविल्यानंतर मुलांनी आपापल्या नकाशासंग्रहांतून ती माहिती मिळविण्याचा प्रयत्न करावा. एवढ्यासाठी प्रत्येक मुलाजवळ नकाशासंग्रह असणे अत्यंत अपरिहार्य आहे. नकाशासंग्रह म्हणजे विलास नव्हे. ती एक जरूरी आहे. दुर्दैवाने मराठीत अनुरूप असा नकाशासंग्रह आजपर्यंत नव्हता. ही उणीव प्रस्तुतच्या नकाशासंग्रहाने भरून निघेल अशी अपेक्षा केल्यास गैर होणार नाही. मुलांजवळ नकाशासंग्रह असला म्हणजे केवळ भूगोलातच नव्हे; तर इतर विषयांत जेथे जेथे स्थलांचा संबंध येईल, तेथे त्यांना चटकन नकाशात पाहून आपले समाधान करून घेता येते; स्मरणशक्तीला विनाकारण ताण देण्याचे कारण पडत नाही. नकाशावरून प्रदेशांचा अभ्यास झाल्यावर त्याची उजळणी करावयाचे वेळी मुलांना आराखड्यांचे नकाशे द्यावेत, त्यांवर स्वाभाविक विभाग किंवा इतर माहिती भरावयास सांगावी. प्रथम मुलांना योग्य स्थळी माहिती भरता. येणार नाही; पण ती साधारण बरोबर असली म्हणजे पुरे आहे. पुढे सवयीने त्यांचे

काम निर्दोष होत जाईल. कित्येक शिक्षक मुलांना वाटेल त्या प्रदेशाचा नकाशा स्मरणातून काढावयास सांगतात. हे अनावश्यक व अशक्य आहे. स्वतःच्या देशाचा किंवा इलाख्याचा नकाशा मुलांना स्मरणाने काढता आला पाहिजे, ही गोष्ट रास्त आहे; पण हिंदुस्थानच्या मुलांना उत्तर अमेरिकेचा नकाशा स्मरणातून काढता आला पाहिजे, अपेक्षा करणे बरोबर नाही. उत्तर अमेरिकेच्या नकाशाचा त्यांना आराखडा दिला, तर त्यांत मुलांना एखादी माहिती योग्य तऱ्हेने भरता आली म्हणजे झाले.

देशाच्या मर्यादा व स्थळे यांचा अभ्यास इतिहासाच्या साहचर्याने अधिक मनोरंजक करता येतो, व त्या योगाने त्या गोष्टी मुलांच्या स्मरणात ठसून राहण्यास मदत होते. उदाहरणार्थ राजकीय मर्यादा किंवा विभाग विवक्षित तऱ्हेने असण्याचे काय कारण असावे. तेथील स्वाभाविक विभागांचे, नद्यांचे व डोंगराचे त्याला सहाय्य कितपत झाले, याचा विचार उद्बोधक होतो; किंवा एखाद्या स्थळाला व्यापारीदृष्ट्या किंवा ऐतिहासिकदृष्ट्या काय महत्त्व आले आहे, त्या स्थळाची मूळ हकीगत काय होती, हेही चित्ताकर्षक रीतीने सांगता येते. स्थळांच्या नावाचाही इतिहास फार मनोरंजक असतो व त्या इतिहासावरून कित्येक गूढ गोष्टींचा चटकन उलगडा होतो. अगदी परिचयाचे उदाहरण घ्यावयाचे झाल्यास जमशेटपूर किंवा किर्लोस्करवाडी या औद्योगिक दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या स्थळांच्या नावांचा इतिहास मुलांना सांगितला, म्हणजे तेथील उद्योगाची माहिती अनुषंगिक रीतीनेच मुलांना समजते. अशा रीतीने स्थळांचा अभ्यास जो रूक्ष व नीरस म्हणून समजला जातो, तो मनोरंजक व अर्थपूर्ण होतो. म्हणून भूगोलात इतिहासाचे साहचर्य नेहमी घेत जावे. त्या योगाने भौगोलिक तत्त्वे अगदी अनायासे व अधिक व्यापक दृष्टीने मुलांना कळतात.

नकाशासंबंधी प्रश्न विचारताना शिक्षकांचा गोंधळ उडतो. या प्रश्नाला कसलाही अनुक्रम व धरबंध राहात नाही. अगदी ' रूढि मंजूर ' पद्धत म्हणजे ' अमके गाव कोठे आहे ? " या छापाचे प्रश्न विचारावयाचे. त्याबरोबर मुलाने पळत पळत जाऊन त्या गावाच्या नावावर नेमके बोट ठेवले तर बरे, नाही तर भूगोलाच्या अज्ञानाचे खापर त्याच्या माथ्यावर फुटले म्हणून समजावयाचे. शाळा तपासावयास येणारे काही अधिकारीदेखील भूगोलशिक्षकाच्या अध्यापनाची पारख मुलांना नकाशात स्थळे दाखविता येत आहेत किंवा नाही, यावरून करितात. कारण सर्वांत सोपा व कमी आयासाचा हा मार्ग आहे. आधुनिक पद्धतीने भूगोल शिकलेल्या विद्यार्थ्याला ' तिंबकतू ' हे गाव कोठे आहे, हे कदाचित दाखविता येणार नाही. पण ते गांव त्याच स्थळी का वसले, याचे कारण तो खास सांगू शकेल. जुन्या भूगोल शिक्षणपद्धतीत व नवीन भूगोल शिक्षणपद्धतीत हाच फरक आहे. तेव्हा शिक्षकाने

विद्यार्थ्यांना एखादे स्थळ नकाशात बरोबर दाखविता आले म्हणजे समाधान मानून न घेता, त्याविषयी कार्यकारणे कोणती आहेत, याचा विचार करावयास लावावे. गंगेच्या काठच्या प्रदेशांत लोकवस्तीचे प्रमाण जास्त का? तिबेटच्या पठारावर लोकवस्ती विरळ का? नाईल नदी उत्तरेकडे का वाहाते? अशासारखे कार्यकारण-संबंधांचा विचार मनात जागृत करणारे प्रश्न शिक्षकांनी विचारावेत. शिक्षणाचा प्रधान हेतू मुलांच्या विचारशक्तीला चालना देण्याचा आहे. भूगोल विषयात अशी संधी पदोपदी येते. एवढेच नव्हे, तर त्या कारणानेच भूगोलाला वैशिष्ट्य प्राप्त झाले आहे. कार्यकारणसंबंधाचा विचार करण्याची विद्यार्थ्यांना सवय लागली, म्हणजे दिलेल्या माहितीवरून ते अनुमाने काढू शकतात व काही स्वतः काढलेली अनुमाने वस्तुस्थितीस कितपत धरून आहेत, हे पुस्तकातून पडताळून पहाणे, यासारखी मनोरंजक दुसरी कोणतीही गोष्ट नाही.

नकाशा व भूगोलपुस्तक यांचे सहकार्य कितपत असावे हा भूगोलातला एक महत्त्वाचा मुद्दा आहे. वर दर्शविल्याप्रमाणे पूर्वी नकाशाचा उपयोग स्थल-दर्शनाच्या कामी वाजवीपेक्षा फाजील केला जात असे. एखाद्या प्रदेशाचे वर्णन पुस्तकातून वाचण्याच्या आधी तेथील भूशिरे, उपसागर, नद्या, प्रांत, शहरे. इ. गोष्टी नकाशावरून तोंडपाठ करण्याचा प्रघात असे. कित्येक शिक्षक तर जगाची संपूर्ण माहिती नकाशावरून मुलांनी मुखोद्गत केली म्हणजे पुस्तकास हात घालीत. त्या वेळची भूगोलाची पुस्तकेही त्याच किंमतीची असत. कारण नकाशावर जी माहिती मिळत असे, त्यापेक्षा पुस्तकात जास्त काहीच नसे. फरक एवढाच, नकाशा-वरची माहिती एका मोठ्या कागदावर पसरलेली असे, व पुस्तकातून ती पाचपंचवीस कागदाच्या तुकड्यांवर विभागलेली असे. नवीन भूगोलपद्धतीत नकाशा व भूगोल पुस्तक यांचे निकट साहचर्य ठेविले जाते. कारण एकावाचून दुसऱ्याचा अभ्यास अर्थहीन व नीरस होतो. भूगोल पुस्तकात हरवडी येणारे स्थलांचे संदर्भ कळावयास जसे नकाशा पाहिल्यावाचून गत्यंतरच नसते, तसे नकाशावरील त्रोटक व सांकेतिक माहिती अर्थपूर्ण करावयाची असल्यास भूगोलपुस्तकाचे सहाय्य घेणे अत्यंत आव-श्यक असते.

निव्वळ नकाशावरून पृथ्वीचा व तिजवरील प्रदेशाचा अभ्यास करण्यात एक मोठी चूक होत असते. त्यामुळे पृथ्वीच्या वाटोळ्या आकाराची व निरनिराळ्या प्रदेशाच्या सापेक्ष स्थितीची मुलांना कल्पना येत नाही. नकाशा सपाट पृष्ठभागावर काढण्यात येत असल्याने पृथ्वीच्या वक्र पृष्ठभागाची कल्पना त्यावरून कशी येणार? तेव्हा नकाशावरून पृथ्वीच्या आकारासंबंधी होणाऱ्या चुकीच्या कल्पना दूर करण्यास पृथ्वीचा गोल वापरणे अपरिहार्य असते. कोठल्याही नवीन खंडाचा अभ्यास सुरू करताना प्रथम पृथ्वीचा गोल वापरावा. म्हणजे इतर खंडांचा व त्याचा अन्योन्य

संबंध काय आहे, याची मुलांना नीट माहिती मिळेल. शिवाय प्रवाशांच्या धाडसाचा इतिहास सांगावयाच्या वेळी किंवा व्यापारी मार्ग, हवेतले मार्ग, ध्रुवप्रदेश इ. गोष्टींच्या संदर्भाला पृथ्वीचा गोल जरूर वापरावा. पूर्वीच्या काळी केवळ ज्योतिषविषयक भूगोल शिकविताना शिक्षक गोलाचा उपयोग करीत असत. बाकीच्या वेळी हा गोल शिक्षकांच्या खोलीतील पुस्तकांच्या कपाटावर गवयाच्या तंबोऱ्याप्रमाणे तांबड्या बासनाच्या आच्छादनाखाली पडलेला असे. शिवाय, आपल्या वापरण्यात असलेले सर्वसाधारण गोल आता प्रघातबाह्य झालेले आहेत. कारण त्यावर निरनिराळ्या देशांतील गावांच्या व स्थळांच्या नावांची इतकी गुंतावळ माजलेली असे की, ती उकलावयाची झाल्यास एखाद्या घड्याळजीप्रमाणे सूक्ष्मदर्शक भिंग घेऊन बसावयास पाहिजे. गावांची नावे आम्हाला नकाशावरून कळतात. त्यांचा ससेमिरा त्या गोलावर कशाला ? अलीकडे काळ्या रंगाचे स्लेटचे गोल निघाले आहेत. त्यांवर ठळक पांढऱ्या रंगात रेखावृत्ते, अक्षवृत्ते, निरनिराळ्या खंडाचे आराखडे इ. माहिती सुवाच्य दिलेली असते. यावर लागेल तर शिक्षकाला कोठलीही माहिती रंगीत खडूने भरता येते व काम झाले म्हणजे पुन्हा फिरून पुसटून टाकता येते. साधेपणा हा गोलाचा विशेष आहे. याशिवाय अंतरिक्षात पृथ्वी आपल्या कललेल्या आसावर कशी फिरत असते, याची जाणीव मुलांना रहावी एवढ्यासाठी टांगते गोल निघालेले आहेत. हे भूगोलाच्या वर्गात मध्यभागी टांगून ठेवण्याचा प्रघात असतो.

पृथ्वीचा वाटोळेपणा ही एक मुलांना न पटणारी गोष्ट आहे. ‘ पृथ्वीचा आकार नारिंगासारखा वाटोळा आहे, ’ या मुलांना मुखोद्गत असलेल्या वाक्यांतील शब्दाच्या अर्थापलीकडे त्यांना काय बोध होत असतो, हे असली निरर्थक वाक्ये पटवून घेण्याचा दुराग्रह दाखविणारा एक भूगोलशिक्षकच जाणे ! ‘ अमेरिका कोठे आहे ? ’ हे मुलांना विचारताच ती पटकन पश्चिमेकडे बोट दाखवितात. पण त्यांच्या बोटाच्या दिशेने सरळ रेघ ओढली तर अमेरिका हवेत तरंगत ठेवण्याची आपत्ती ओढवते, हे त्यांना कळत नाही. अमेरिका पश्चिमेकडे आहे असे सांगून भागत नाही, तर ती पृथ्वीच्या दुसऱ्या भागाला आहे. एवढ्यासाठी पश्चिमेकडे पण खाली बोट दाखवावयास पाहिजे. असल्या अवघड कल्पना गोलाच्या साहाय्याने सुगम होतात. गोल नेहमी वापरण्यात असला म्हणजे पृथ्वी वाटोळी असण्याबद्दलचे कायदेबाज पुरावे गंभीर तोंड करून निराळे सांगण्याची जरूर पडणार नाही.

प्रस्तुत ठिकाणी, प्रथम नवीन भूगोलाची कल्पना व दिशा व नंतर भूगोलाच्या अभ्यासात नकाशाचे महत्त्व व तो कसा वापरावा याबद्दलचे दिग्दर्शन थोडक्यात करण्याचा प्रयत्न केलेला आहे; तो भूगोलाच्या शिक्षकांना व थोड्या प्रयत्नाने विद्यार्थ्यांना साहाय्यभूत होईल अशी आशा आहे या नकाशासंग्रहाच्या प्रकाशनाने मराठीतून भूगोलाचा अभ्यास करण्याची जी गैरसोय होत असे, ती बऱ्याच अंशाने दूर

होईल व त्यामुळे भूगोलाचा अभ्यास योग्य दिशेने होण्यास चांगलीच मदत होईल, अशी सबळ आशा धरून ही प्रस्तावना पुरी करतो.

१५–७–१९३३

# १४

# ‘ यशस्वी अध्यापन ’ : पुरस्कार

परळ येथील मराठी ट्रेनिंग कॉलेजमधील प्रा. य. न. पंडित यांच्या ‘ यशस्वी अध्यापन ’ ह्या पुस्तकाचा पुरस्कार करण्यास मला आनंद होत आहे. शिक्षणाचे दोन भाग पडतात; एक शास्त्र आणि दुसरा व्यवहार. शास्त्राचे अध्ययन करावयाचे आणि त्याप्रमाणे वर्गात अध्यापन करावयाचे. अध्यापन ही एक अतिशय अवघड कला आहे. कलावंताला ज्याप्रमाणे विशिष्ट व्यक्तिमत्त्व लागते, त्याप्रमाणे यशस्वी अध्यापकालाही प्रभावी व्यक्तिमत्त्वाची आवश्यकता असते. अध्यापनाचा हेतू ज्ञान देणे हा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे, हे त्याचे खरे उद्दिष्ट आहे. एका दिव्याने दुसरा दिवा लागावा त्याप्रमाणे शिक्षकाच्या तेजस्वी व्यक्तिसामर्थ्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो; हे जरी खरे असले, तरी शिक्षकाला अध्यापनाच्या कलेचे तंत्र माहीत असणे आवश्यक आहे. अध्यापनाची आधुनिक कला ही मुलांच्या मानसशास्त्रावर आधारलेली आहे. सुप्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ पेस्टॅलॉत्सी हा या नवीन अध्यापनाचा जनक होय. त्याच्या तंत्राचा विकास हरबार्टने केला. हरबार्टने रचलेल्या घड्याच्या पायऱ्यांवरून अध्यापनकलेची प्रगती झालेली आहे. सदर पुस्तकात वर्गामध्ये निरनिराळे पाठ कसे घ्यावेत आणि त्यांची टाचणे कशी करावीत, याची अतिशय सुबोध आणि सुसंगत माहिती देण्याचा प्रा. पंडित यांनी प्रयत्न केलेला आहे. पाठाच्या निरनिराळ्या पायऱ्यांचा हेतू काय असतो, आणि ह्या पायऱ्यांची यशस्वी अंमलबजावणी वर्गामध्ये कशी करावयाची, त्याच-प्रमाणे विषयानुसार पाठाच्या पायऱ्यांत कोणता फरक करावयाचा, यासंबंधी मार्मिक आणि मनोरंजक माहिती प्रा. पंडित ह्यांनी ह्या पुस्तकात दिलेली आहे. पुस्तकाच्या

अखेरीस बौद्धिक आणि समवाय पाठांची प्रत्यक्ष टाचणे दिल्याने ह्या पुस्तकाची उपयुक्तता तर अधिकच वाढलेली आहे. मराठीमध्ये अशा प्रकारचे सोपे आणि सोयीस्कर पुस्तक माझ्या पाहण्यात नाही.

मात्र पाठाच्या ह्या तंत्राचा अभ्यास करणाऱ्या शिक्षकांना ह्या ठिकाणी सावधगिरीची एक सूचना देणे जरूर आहे. ती ही की, पुष्कळसे शिक्षक ह्या पाठाच्या तंत्राचे पुढे पुढे गुलाम होतात. धड्यांच्या निरनिराळ्या पायऱ्यांचा अनुक्रम अक्षरशः पाळला की, अध्यापन यशस्वी होते, असा बरेचसे शिक्षक समज करून घेतात. त्यामुळे त्यांच्या पाठात निर्जीवपणा आणि कृत्रिमता हे दोष निर्माण होतात. पाठाच्या तंत्राचा शिक्षकांनी काळजीपूर्वक अभ्यास तर करावाच; पण तो अभ्यास केल्यानंतर त्या तंत्राचे विस्मरण जितक्या लवकर त्यांना होईल तितके चांगले. वर्गात मुलांना शिकविणे ही कला पाण्यामध्ये पोहण्यासारखी आहे. पोहण्याचे तंत्र तर माहीत असायला हवेच; पण तंत्राची जाणीव एकसारखी मनात ठेवणे हे पोहणाराला धोक्याचे ठरल्याशिवाय राहणार नाही. धड्याच्या पायऱ्यांची जाणीव नाहीशी झाल्यावाचून शिक्षकाला पाठाशी समरस होता येणार नाही. अर्थात् अध्यापनकलेमध्ये प्रभुत्व आल्यावाचून ही गोष्ट साधणार नाही.

'यशस्वी अध्यापक' निर्माण करण्याचा प्रा. पंडित यांचा हेतू यशस्वी होवो, असे मी इच्छितो.

[प्रा. य. न. पंडितकृत 'यशस्वी अध्यापन' (१९५०) या पुस्तकाला लिहिलेला पुरस्कार.]

# १५

# प्राथमिक शिक्षकांची दुरवस्था : भाषण

शिक्षक बंधूंनो नि भगिनींनो,

आपण मुंबई इलाख्यातील प्राथमिक शिक्षक दरवर्षीप्रमाणे आज आपल्या व्यावसायिक जीवनाचा, परिस्थितीचा आणि भवितव्याचा विचार करण्यासाठी जमलेले आहात. गेल्या दोन वर्षांत राष्ट्राच्या राजकीय जीवनात प्रचंड क्रांती घडून आलेली आहे. जनतेच्या राजकीय, आर्थिक नि शैक्षणिक आकांक्षा, प्राप्त झालेल्या अधिकाराने नि अनुभवांनी अधिक चेतलेल्या आहेत. राष्ट्रीय जीवनाच्या सर्वांगीण पुनर्घटनेच्या योजना चोहोंकडे चालू झालेल्या आहेत. मुंबई इलाख्यापुरते बोलावयाचे तर शारीरिक शिक्षण, औद्योगिक शिक्षण, प्रौढांचे शिक्षण, प्राथमिक शिक्षकांचे अध्यापन इत्यादी शिक्षणाच्या निरनिराळ्या विभागांत आमूलाग्र सुधारणा करण्यासाठी आमचे कॉंग्रेस सरकार निरनिराळ्या समित्या नेमीत आहे. त्यांनी सुचविलेल्या सूचनांची अंमलबजावणी कशी करावी, या विचारात शिक्षणमंत्री नि शिक्षणतंत्री गर्क आहेत. जीवनाची नि शिक्षणाची सांगड घालण्यासाठी नि शिक्षण स्वावलंबी नि उपयोगी करण्यासाठी वर्धा-शिक्षणयोजना निर्माण झाली आहे. ही योजना फलद्रूप करण्यासाठी तज्ज्ञ शिक्षक तयार करण्याचे अध्यापनवर्ग निघत आहेत. आणि वर्धा-शाळा काढण्याचे प्रत्यक्ष प्रयोगही चालू होण्याच्या अवस्थेत आहेत.

अशा तऱ्हेने शिक्षणक्षेत्रात नवविचारांचा व सुधारणांचा मोठाच पूर आला आहे— किंवा एक प्रचंड आवर्तच निर्माण झालेला आहे. पण आपण प्राथमिक शिक्षक यात कोठे आहो? नर्मदेतल्या गोट्यापेक्षाही आपण जास्त पाणबंद ( Water proof ) आहोत. एवढ्या प्रलयाच्या पाण्यातही आपण अद्यापि आहोत तसेच कोरडे आहोत!

चिखलात अडकलेली मोटारीची चाके जशी स्वतःच्या भोवती गरगर फिरत राहतात आणि मोटारगाडी आहे तशीच राहते, त्याप्रमाणे शिक्षणाच्या सुधारणेची यंत्रे कितीही फिरत राहिली, तरी प्राथमिक शिक्षकांचा खटारा आहे त्याच विपन्नावस्थेच्या चिखलात रुतून राहणार असा रंग दिसतो. शिक्षणाबाहेरील राजकीय क्षेत्रातही सुधारणेची केवढी धुमश्चक्री चालू आहे! मुंबई सरकारचे नवे बजेट पाहिले तर जनतेच्या फायद्यासाठी लाखो रुपयांची तूट सोसूनही मद्यपानबंदीची योजना अंमलात आणण्याची सिद्धता झालेली आहे! तथापि शिक्षकांच्या शेकडो शतके चालत आलेल्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त दारिद्र्यबंदीची योजना काढण्याचे अद्यापि कोणाच्याही डोक्यात आलेले नाही ! मद्यपानाच्या व्यसनामुळे राष्ट्राचे जेवढे नुकसान होत असेल, तितकेच– किंबहुना त्याहीपेक्षा जास्त नुकसान प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष होत गेल्याने नि शिक्षकवृत्तीला दारिद्र्यात ठेवल्याने झालेले आहे, याची जाणीव कोणालाही होत नाही. कापसाच्या गिरणीतल्या मजुरांच्या पगारवाढीचा प्रश्न तावडतोब हाती घेऊन तो धसाला लावला गेला; पण राष्ट्रातील मुलामुलींना ज्ञानामृत पाजण्यासाठी पखाली भरून आणणारे भिस्ती अजून तसेच रखडपट्टी करीत आहेत. मुंबईतील पट्टेवाल्यांना एक रुपयाची सरसहा पगारवाढ करण्याचादेखील प्रश्न हाती घेण्यात आलेला आहे ! आणि इकडे प्राथमिक शिक्षकांच्या पगाराचे स्केल कमी कसे करता येईल, त्यांना मिळत असलेला अलाबन्स बंद कसा करता येईल, याबाबत निरनिराळ्या क्लृप्त्या काढण्यात तज्ज्ञ मंडळी गर्क झालेली आहेत. शिक्षणाखेरीज इतर क्षेत्रांत अद्ययावत सुधारणा कशा करता येतील, प्रगतीची कमाल मर्यादा कशी गाठता येईल, याबद्दलच्या चर्चा चालू आहेत ! तर १९३९ सालातल्या प्राथमिक शिक्षणाला १८८७ सालमधील पगाराची योजना कशी लावता येईल, या-बद्दल शिक्षणतज्ज्ञांची खटपट चालली आहे ! तसे पाहिले तर शिक्षकाखेरीज बाकीच्या धंद्यांत अजून पुष्कळ आबादीआबाद आहे. प्रगतीची नि उत्कर्षाची आशा करायला निदान इतरांना पुष्कळ अवकाश तरी आहे ! पोस्टमनला पोस्टमास्तर होता येईल ! कारकुनाला मामलेदार होता येईल ! तिकिट कलेक्टरला स्टेशनमास्तर होता येईल ! पण मराठी शाळामास्तरला काय होता येईल ? सुपरवायझर ! कदाचित ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर ! शक्य नाही ! इन्स्पेक्टर ! चौऱ्यायशी लक्ष योनी फिरून आला तरी नाही ! नवीन योजनेप्रमाणे जास्तीत जास्त पन्नास रुपयांचा हेडमास्तर त्याला होता येईल. शेकडा नव्वद शिक्षकांना, आहे त्याच परिस्थितीत तेलाच्या घाण्याला जुंपलेल्या बैला-प्रमाणे एकाच ठिकाणी गरगर फिरत राहावे लागणार ! आपल्या पोराबाळांचे नि कुटुंबाचे संरक्षण स्वाभिमानाने त्याला करता येणे यापुढे तरी अशक्य होणार आहे. बहुधा आपल्या पोरांना त्याला अनाथाश्रमात पाठवावे लागणार, पेन्शन घेतल्यानंतर स्वतःला अनाथपंगुगृहात पाठवावे लागणार नि मेल्यावर सार्वजनिक वर्गणी जमा

केल्याशिवाय परलोकी जाणे त्याला अशक्य होणार! म्हणून राजकीय क्षितिजावर उजाडले असले, प्रांतिक स्वराज्याचा अरुणोदय झाला असला, आणि नव्या युगाचे सोनेरी उन्ह चोहोंकडे पसरले असले, तरी तात्या पंतोजीच्या झोपडीत अजून अवसेची मध्यरात्रच करकरते आहे. अशा अत्यंत निरुत्साहाच्या वातावरणात प्राथमिक शिक्षकांनी दरवर्षी एकत्र जमून विचार कसला करायचा? अन्नावाचून जगण्याचा अद्यापी शास्त्रीय शोध न लागल्यामुळे किंवा सापाप्रमाणे हवेवर जगण्याची कला शिक्षकमंडळींस अद्यापी साध्य न झाल्यामुळे सामुदायिक स्वरूपात संन्यास कसा घेता येईल, किंवा थोडक्या खर्चात आणि नातेवाइकांना त्रास न पडेल, अशा तऱ्हेने आत्महत्या कशी करता येईल, याव्यतिरिक्त आज दुसरा विचार काय करता येण्यासारखा आहे?

आज आपणा सर्वांची मानसिक परिस्थिती अशी आहे! अशा परिस्थितीत आपल्याला आज दुसऱ्या कोणत्याही शैक्षणिक बाबींचा विचार करता येणे शक्य नाही. शिक्षणशास्त्राच्या निरनिराळ्या तत्त्वांचा नि पद्धतींचा, शिक्षणसृष्टीतील निरनिराळ्या प्रायोगिक घडामोडींचा, अभ्यासक्रमातील निरनिराळ्या महत्त्वाच्या प्रश्नांचा, शैक्षणिक साहित्याचा नि उपकरणांचा विचार करण्याच्या मनःस्थितीमध्ये आपण आज नाही! त्यांचा विचार करण्याची वेळ व स्थळ हे खास नव्हे. आजपर्यंत शिक्षकपरिषदेतून, गटसंमेलनांतून, भागसंमेलनांतून अशा तऱ्हेची शैक्षणिक चर्चा आपण पुष्कळ केलेली आहे. काव्यरसाने बुभुक्षिताचे पोट ज्याप्रमाणे भरत नाही, त्याप्रमाणे शिक्षणशास्त्राच्या रसाळ चर्चेने कंगाल शिक्षकांची तहानभूकही भागू शकत नाही! पोटात कावळ्यांची कर्कश ओरड सुरू असता, माध्यान्हीचा सूर्य स्वयंपाकघरावर तापला असताना, पंचपक्वान्नांच्या रसभरित मेजवानीच्या नुसत्या वर्णनाने आत्म्याचे कसे समाधान होणार? ज्याच्या पोटात आतड्यांशिवाय दुसरे काहीच नाही, त्याच्या मज्जातंतूंना शीण देण्यात काय हशील? म्हणून प्राथमिक शिक्षकांच्या पोटापाण्याच्या प्रश्न समाधानकारक तऱ्हेने मिटल्यावाचून त्यांना दुसऱ्या कोणत्याही शैक्षणिक गोष्टीचा विचार करणे प्रस्तुत काळी अशक्य आहे.

दारिद्र्याचा शिक्का अनादिकालापासून शिक्षकांच्या कपाळावर बसलेला आहे. शेक्सपिअरने आपल्या 'व्हेनिसचा व्यापारी' या नाटकात शायलॉक नावाच्या ज्यू पात्राच्या तोंडात जे वाक्य घातले आहे--"हालअपेष्टा सहन करणे हेच विधिलिखित आमच्या जातीच्या कपाळी आहे!" त्या वाक्यात यत्किंचितही बदल न करता ते शिक्षकांच्या कपाळावर खोदून ठेवावयाला हरकत नाही. शिक्षकाने जगाच्या आरंभापासून तो आतापर्यंत दरिद्री राहावे, असाच एक प्रचंड कट सबंध शिक्षकेतर जगाने केलेला दिसतो आहे! 'शिक्षकाचा धंदा म्हणजे अत्यंत पवित्र!', 'तरुण पिढीचे भवितव्य शिक्षकांच्या हाती असते!', 'राष्ट्राची प्रगती ही शिक्षकावर अव-

लंबून आहे', 'गुरू म्हणजे देवापेक्षाही पवित्र दैवत आहे!', 'गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णुः, गुरुर्देवो महेश्वरः!', असल्या भरमसाट स्तुतीने आणि तोंडपूजेने शिक्षकवर्गाला समाजाने मारून टाकले आहे. 'दारिद्र्य हा शिक्षकांचा जन्मसिद्ध हक्क आहे', 'विद्वान लोक नेहमी दरिद्री असतात', 'सरस्वती आणि लक्ष्मी यांचा संगम क्वचित होत असतो,' अशा तऱ्हेच्या आपमतलबी कल्पना समाजात पसरवून भांडवल-वाल्या स्वार्थी वर्गाने शिक्षकवर्गाला अनादिकालापासून दारिद्र्याच्या गर्तेत ढकलून दिलेले आहे. वाटर्लूची लढाई म्हणे ईटनच्या शाळेच्या क्रीडांगणावर जिंकली गेली. हे खरे आहे, तर वाटर्लूचा वीरश्रेष्ठ ड्यूक ऑफ वेलिंग्टन हा जगाच्या इतिहासात अमर झाला! पण त्याला शिकविणाऱ्या शिक्षकांपैकी एकाही शिक्षकाचा जगाला पत्ता असेल तर शपथ! शिक्षकाचे दारिद्र्य हे गुरुत्वाकर्षणाच्या कायद्याप्रमाणे स्वयंसिद्ध सत्य आहे. हिंदुस्थान देशापेक्षा इतर देशांत शिक्षकाची आर्थिक परिस्थिती पुष्कळच समाधानकारक असली, तरी कोणत्याही राष्ट्रातील निरनिराळ्या महत्त्वाच्या खात्यांतील अधिकाराच्या नोकरांच्या पगाराची तुलना केली, तर शिक्षकांचे पगार त्यांच्या पासंगालाही पुरणार नाहीत! सैन्यातील शिपाई, पोलिस शिपाई, राजकीय खात्यांतील नोकरवर्ग, रेल्वेतील नोकर यांच्यापेक्षा अनेक पटींनी राष्ट्रीय महत्त्वाचे आणि उपयोगाचे काम शिक्षक करीत असता त्यांची अशी आर्थिक विपन्नावस्था काय म्हणून? लष्कराची वाढ करणे, प्रांताची पुनर्घटना करणे, धरणे, पूल, रस्ते बांधणे, कालवे खोदणे, मोठमोठ्या इमारती उभारणे इत्यादी अनेक घडामोडींत लाखो रुपये खर्च पडले, तरी त्याबद्दल हू की चू न करता डोळयांवर कातडे ओढून स्वस्थ बसणारे लोक शिक्षकांच्या पगारवाढीचा प्रश्न निघाल्याबरोबर एकदम डोळे पांढरे करून किंकाळ्या मारीत का उठतात? "बोलूच नका, हे शक्य नाही! पैसे आणावयाचे कोठून?" अशा गर्जना करीत ही मंडळी सैरावैरा का धावू लागतात? शिक्षणशास्त्रावर तासचे तास चर्चा करणारे, अमुक तऱ्हेने शिकवावे, तमुक तऱ्हेने शिकवावे, म्हणून हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवणारे शिक्षणाधिकारी, शिक्षकाच्या पगाराचा प्रश्न निघताच एकदम तोंडावरून वारे गेल्याप्रमाणे गप्प का बसतात? या सर्वांचे उत्तर एकच! शिक्षणाचे आणि शिक्षकाचे महत्त्व अद्यापी कोणालाही या जगात कळलेले नाही! जर कळले असेल तर त्याचे स्वरूप शाब्दिक उच्चारापलीकडे गेलेले नाही! ज्या थोड्या धूर्त मुत्सद्यांना आणि सत्ताधाऱ्यांना शिक्षकांचे सामर्थ्य आणि महत्त्व कळलेले आहे, त्यांनी हा बुद्धिमान वर्ग दारिद्र्यात राहावा, अशाच तऱ्हेने नेहमी आटोकाट प्रयत्न केलेले आहेत. कारण त्यांना पूर्ण माहिती आहे की, हा बुद्धिमान वर्ग जर आर्थिक दृष्ट्या प्रतिष्ठित झाला, तर राष्ट्राच्या राजकारणाची धुरा याच्या हाती गेल्याशिवाय कधीही राहाणार नाही! मानवी समाजाच्या कोणत्याही अवस्थेत अत्यंत आवश्यक नि अपरिहार्य असे जर कोणते दोन

व्यवसाय असतील, तर ते शिक्षक आणि वैद्य या दोघांचे होत. वकिलासारखा समाजाच्या दुर्गुणावर नि अधोगतीवर जगणारा आणि सामाजिक स्वास्थ्याचा विध्वंस करणारा असा शिक्षकाचा धंदा नाही! वैद्य नि डॉक्टरांचा संबंध मनुष्याच्या जीवन-मरणाच्या प्रश्नाशी येत असल्याने आणि अज्ञानाच्या दुष्परिणामापेक्षा मृत्यूचे दुष्परिणाम जनतेला तत्काळ पटत असल्याने वैद्य-डॉक्टरांची आर्थिक परिस्थिती शिक्षकांपेक्षा पुष्कळच समाधानकारक आहे.

शिक्षकाच्या वृत्तीकडे बघण्याची ही जगाची कंजूष आणि दरिद्री दृष्टी बदलेपर्यंत शिक्षकांना चांगले दिवस येणे शक्य नाही, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. तोपर्यंत शिक्षकांनी संघटित होऊन एकसारखी प्रयत्नांची परिसीमा केली पाहिजे. लोकमत बनविण्यासाठी प्रचंड चळवळी केल्या पाहिजेत. सरकारच्या दरवाजावर एकसारखे धक्के देत राहिले पाहिजे!–शिक्षकाच्या सहनशीलतेला तरी सीमा आहे की नाही! शिक्षकाबद्दल होत असलेल्या अन्यायाची आता परमावधी झालेली आहे. हालअपेष्टांचा, कष्टांचा, त्यागाचा सारा वाटा आम्ही घ्यावा आणि सुखाचा मलिदा समाजाने लाटावा, हा प्रकार यापुढे थांबलाच पाहिजे. हाडाची काडे करून आम्ही राबावे आणि आमच्या घामावर आणि कामावर समाजाने सुखाने जगावे, ही परिस्थिती यापुढे बंद झाली पाहिजे! शेतकरी, मजूर, कामकरी यांच्याप्रमाणे शिक्षकांनी आपली व्यापक आणि क्रांतिकारक संघटना करण्याची वेळ आता नजीक येऊन ठेपलेली आहे. साऱ्या न्याय्य नि कायदेशीर मार्गांचा अवलंब करूनही आपल्या हक्कांचा आणि मागण्यांचा योग्य विचार न झाल्यास सार्वत्रिक सत्याग्रह नि संप करण्याचीही सर्व सिद्धता शिक्षकांनी आज करून ठेवली नाही, तर अमेरिकेतल्या गुलामांपेक्षाही आपली अत्यंत अवनत परिस्थिती झाल्याशिवाय राहाणार नाही.

शिक्षकांवर इतर देशांत किंवा प्रांतांत आजपर्यंत नाना तऱ्हेचे अन्याय झाले असतील. त्यांची रोमांचकारक वर्णने पुष्कळांनी वाचलेली असतील. पण मुंबई इलाख्यातील प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात गेल्या वीस वर्षांत ज्या काही अद्‌भुत घडामोडी चाललेल्या आहेत, त्यांना कोणत्याही इतिहासात तोड आढळणार नाही!

प्राथमिक शिक्षणाची प्रगती झाली आहे का? प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होतो आहे का? प्राथमिक शिक्षण सक्तीचे नि मोफत झाले आहे का? प्राथमिक शिक्षकांची आर्थिक परिस्थिती समाधानकारक आहे का? यांपैकी कोणत्याही प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळणार नाही! विशेषतः प्राथमिक शिक्षकांच्या पगाराचे स्केल ठरविण्याच्या बाबतीत जी काही अस्मानी सुलतानी झालेली आहे, तिला काही सुमारच नाही! प्राथमिक शिक्षकांच्या पगाराच्या उतरत्या भाजणीचा इतिहास अत्यंत हृदयभेदक आणि प्रक्षोभक आहे! आपणा सर्वांना तो इतिहास विदित आहे. तथापी, शिक्षकेतर दुनियेला हा सारा इतिहास वारंवार ओरडून सांगितल्याशिवाय

आपल्याला न्याय मिळणार नाही!

प्राथमिक शिक्षकांच्या पगाराची हल्ली एकंदर चार कोष्टके चालू आहेत :—

(१) १९२३ च्या पूर्वीचे शिक्षक;

(२) १९२३ ते १९२९ पर्यंतचे शिक्षक;

(३) १९२९ ते १९३५ पर्यंतचे शिक्षक;

(४) आणि १९३५ नंतरचे शिक्षक.

अशी शिक्षकांची वर्गवारी करण्यात आलेली असून त्यांपैकी प्रत्येक वर्गाला निरनिराळ्या स्केलने पगार मिळत असल्याने जो काही गोंधळ उडालेला आहे, त्याला सीमा नाही.

महायुद्धोत्तर काळात सुधारणेच्या कायद्यामुळे ज्या काही नवीन घडामोडी घडून आल्या, त्यांत साठे-परांजपे-योजनेचा १९२०–२१ साली जन्म झाला.

**नं. १–साठे-परांजपे–योजना–१९२०**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अन्ट्रेन्ड | : | रु. २५ | रु. ४० | |
| १ ले वर्ष | : | रु. ३० | रु. ५० | रु. ५५ |
| २ रे वर्ष | : | रु. ३५ | रु. ६५ | रु. ७५ |
| ३ रे वर्ष | : | रु. ४० | रु. ८० | रु. १०० |

शिक्षकांच्या पगाराची इतकी समाधानकारक योजना आतापर्यंत दुसरी तयार झालेली नाही. तथापी 'पैसा नाही' या सरकारच्या नेहमीच्या धोरणामुळे आणि सक्तीच्या शिक्षणाची योजना पुढे येऊन प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास झाल्यामुळे या योजनेचे जनक खुद्द डॉ. परांजपे शिक्षणमंत्री झाले असूनही ही योजना व्यवहार्य होऊ शकली नाही.

त्यानंतर ३० जून १९२३ पूर्वी कायमच्या झालेल्या शिक्षकांसाठी पुढीलप्रमाणे स्केल मंजूर केले :—

**नं. २–१९२४ ची योजना—**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अन्पास्ड | : | रु. २० | | |
| अन्ट्रेन्ड | : | रु. २५ | ते | रु. ३० |
| १ ले वर्ष | : | रु. ३० | ते | रु. ४० |
| २ रे वर्ष | : | रु. ३५ | ते | रु. ५० |
| ३ रे वर्ष | : | रु. ४० | ते | रु. ६० |

या स्केलला हजेरी अलावन्सची जोड देण्यात आली. म्हणजे हेडमास्तर नि फर्स्ट असिस्टंट यांना मुलांच्या हजेरीच्या सरासरीवर अलावन्स देण्याचे ठरले.

३० जून १९२३ नंतर कायम झालेल्या शिक्षकांसाठी सन १९२९ साली पुढील योजना मंजूर करण्यात आली :–

**नं. ३–१९२९ ची योजना**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बिगर पास | : | रु. १५ | | |
| हंगामी पास | : | रु. १५ | | |
| कायम अनट्रेन्ड | : | रु. २० | ते | रु. ३० |
| १ ले वर्ष | : | रु. २५ | ते | रु. ३० |
| २ रे वर्ष | : | रु. ३० | ते | रु. ५० |
| ३ रे वर्ष | : | रु. ३५ | ते | रु. ६० |

या योजनेलाही हजेरी अलावन्सची जोड होती.

यानंतर १ एप्रिल १९३५ च्या पुढे नेमण्यात आलेल्या शिक्षकांना पुढील स्केल लावण्यात आले :—

**नं. ४–१९३५ ची योजना**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बिगर पास | : | रु. २० | | |
| पास | : | रु. २५ | | |
| १ ले वर्ष | : | रु. २५ | ते | रु. ३० |
| २ रे वर्ष | : | रु. ३० | ते | रु. ४० |
| ३ रे वर्ष | : | रु. ३५ | ते | रु. ५० |

साठे-परांजपे–योजनेनंतर शिक्षकांच्या पगाराची घसरगुंडी सुरू झाली ! प्रत्येक नवीन योजना म्हणजे मागील योजनेत काटाकाट, छाटाछाट ! आणि आता या सर्वांचा कळस सरकारने नुकत्याच नेमलेल्या मोरे–कमिटीची पगारयोजना अमलात आणल्याने होणार आहे.

## मोरे–कमिटीची योजना

अनट्रेन्ड : रु. २५ ते रु. २५

ट्रेन्ड : रु. २५–३०–४० सिलेक्शन ५० ( ट्रेन्ड म्हणजे ७ वर्षे प्राथमिक शिक्षण, पुढे ३ वर्षे लोकशाळेचे शिक्षण आणि दोन वर्षे अध्यापनशास्त्राचे शिक्षण )

म्हणजे साठे-परांजपे–योजना हा शिक्षकांच्या पगाराचा बाष्पबिंदू ( Boiling point ) ठरतो, तर मोरेकमिटीची योजना हा त्या योजनेचा बर्फ–बिंदू ( Freezing point ) ठरल्याशिवाय राहणार नाही.

आणि ‘ गण्डस्योपरि पीटिका संवृत्ता ’ या न्यायाने आता यापुढे येऊन ठेपलेल्या

संकटाची सावली ता. १ एप्रिल १९३९ पासून बंद होणाऱ्या अलावन्सने पडणार आहे.

मोरे-कमिटीची योजना अमलात आल्यास आजपर्यंत शिक्षकांच्या पगाराच्या बाबतीत जो एकसारखा अन्याय होत आलेला आहे, त्याचा कडेलोट होणार आहे.

'निरनिराळ्या स्केलमुळे शिक्षकवर्गात हिंदुधर्माप्रमाणे चातुर्वर्ण्य उत्पन्न झालेले आहे. त्यामुळे प्राथमिक शाळांतून हेवा, दावा, मत्सर आणि जातिद्वेष उत्पन्न झाला आहे. म्हणून शिक्षणातील शैक्षणिक आणि आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी आपल्या कमिटीची योजना आहे', असा श्री. मोरे यांनी नुकताच खुलासा केला आहे.

निरनिराळ्या पगारांची स्केले निर्माण केली कोणी? प्राथमिक शिक्षकांत चातुर्वर्ण्य निर्माण केले कोणी? सरकारने केलेल्या अन्यायाचे खापर प्राथमिक शिक्षकांच्या डोक्यावर फोडून त्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी सर्वांना एकाच पातळीत दबवून 'स्नेहपूर्ण वातावरण' निर्माण करण्याची कल्पना अत्यंत अद्‌भुत आहे यात शंका नाही! एका गावात कमी-अधिक उंचीची फार माणसे आहेत, म्हणून त्यांच्यांतले वैमनस्य आणि मत्सर नाहीसा करण्यासाठी त्याची उंची किंवा जाडी तासून त्यांना एकाच चौकटीत आणून बसविण्याइतकेच हे हास्यास्पद आहे. मोरे-कमिटीच्या पगाराखेरीजच्या इतर योजना पुष्कळशा प्रशंसनीय आहेत, हे आम्हांस मान्य आहे. लोकशाळा काढून प्राथमिक शिक्षकांना मातृभाषेतून उच्च शिक्षण देणे आणि अध्यापनशास्त्राचे लागोपाठ दोन वर्षे शिक्षण देणे, या कल्पना अत्युत्तम आहेत. तथापी, 'लोकशाळे'तून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या पदवीधराला पगार किती मिळणार? तर महिना रु. २०! म्हणजे टि. म. च्या वा. वि. ची समाजात जी संभावना होते, तशीच परिस्थिती या लो. शा. च्या पदवीधरांची होणार, यात शंका नाही! या योजनेप्रमाणे प्राथमिक शिक्षकाने सबंध हयात रु. २५ ते ४० (किंवा ५०) एवढ्या पगारावर काढली पाहिजे, असे म्हणणे म्हणजे प्राथमिक शिक्षकाच्या कार्याकडे आणि महत्त्वाकडे जाणून बुजून दुर्लक्ष करण्यासारखे आहे.

श्री. मोरे हे अत्यंत बुद्धिमान आणि सूक्ष्म दृष्टीने समाजाचा अभ्यास करणारे विद्वान आहेत. ते माझे मित्र आहेत. तथापी शिक्षक या 'प्राण्या'संबंधी त्यांच्या मनात निष्कारण पूर्वग्रह उत्पन्न झालेला आहे, याविषयी माझी खात्री झालेली आहे. 'मोरे–कमिटी'च्या पगाराच्या योजनेचे मूळ श्री. मोरे यांनी लिहिलेल्या 'प्राथमिक शिक्षण' या विद्वत्ताप्रचुर ग्रंथात (पाने ३३४–३४८) आढळून येते. त्यांचे एकच वाक्य पहा: 'शिक्षकाला सर्वांत महत्त्वाची वाटणारी बाब म्हणजे पगार व इतर मुशाहिरे वगैरेची!' असे वाक्य लिहून त्यांनी त्या वाक्याचे शेवटी उद्‌गार-चिन्ह छापले आहे. त्यात त्यांची मनोभूमिका स्पष्ट झालेली आहे. शिक्षकाला

पगाराची बाब महत्त्वाची वाटते, याबद्दल त्यांना भयंकर आश्चर्य वाटते! सध्या चालू असलेले अत्यंत प्रतिगामी पगाराचे स्केलही त्यांना 'वाजवीपेक्षा जास्त' वाटते. प्रांतिक कौन्सिलच्या निवडणुकीत शिक्षकांच्या वाढत्या राजकीय वजनाला बळी पडून हे 'उदार' स्केल ठरविण्यात आले आहे, असे त्यांचे मत आहे. काही थोडेफार शिक्षक कौन्सिल–निवडणुकीच्या वेळी यशस्वी उमेदवाराला 'गावगुंडी' स्वरूपाची मदत करीत असले, तरी शिक्षकांना राजकीय वजन आज आहे किंवा पूर्वी होते, असे म्हणणे म्हणजे शिक्षकांच्या डोक्यावर त्यांना न शोभणारे शेला-पागोटे चढविण्यासारखे आहे. श्री. मोरे हे शिक्षकांची आणि शेतकऱ्यांची तुलना करतात. आणि शिक्षकांना पगार देणारा मालक (म्हणजे शेतकरी) चटणी भाकरीला महाग झाला असून नोकर (शिक्षक) पोळीवर तूप मिळावे, म्हणून ओरड करीत आहे, असे ते म्हणतात! शेतकऱ्यांची अधोगती झाली आहे म्हणून शिक्षकांचीही त्यांच्याबरोबर अवनती व्हावयाला पाहिजे, ही विचारसरणी तर्कदूषित आहे. शेतकऱ्यांच्या कार्याचे महत्त्व मान्य केले, म्हणून शिक्षकाच्या कार्याचे महत्त्व थोडेच कमी होते! एक राष्ट्राला शारीरिक अन्न देऊन जगवतो, तर दुसरा बौद्धिक अन्न देऊन राष्ट्राचे संवर्धन करतो. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अवश्य सुधारली पाहिजे, यात मुळीच शंका नाही! पण त्यांच्या दुर्दशेचे खापर शतकानुशतके दरिद्री असलेल्या शिक्षकांच्या डोक्यावर काय म्हणून फोडावयाचे!

ट्रेनिंग कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाची परीक्षा पास झालेला शिक्षक हा इंग्रजी सहाव्या इयत्तेच्या दर्जाचा असतो. त्याशिवाय प्राथमिक शिक्षकांना खाजगी शिकवणीचे आणि पालकांकडून मिळणाऱ्या भाजीपाला, धान्य, दूध, तूप (क्वचित पैसे) असे उत्पन्नाचे इतर झरे असतात, असे श्री. मोरे यांनी जे विधान केले आहे, ते सर्वस्वी अन्यायमूलक आणि विकृत स्वरूपाचे आहे. शिक्षकांच्या आर्थिक परिस्थितीचा शास्त्रीय विचार करताना कर्णोपकर्णी कळलेल्या गोष्टींच्या आधारावर सिद्धान्तस्वरूपाची विधाने करणे किती तर्कदुष्ट आहे, हे कोणालाही सांगावयाला नको.

मुंबई इलाख्यातील प्राथमिक शिक्षकांबद्दल दुसरा एक मोठा गैरसमज पसरविला जात आहे. तो असा की, हिंदुस्थानातील दुसऱ्या प्रांतांपेक्षा मुंबई इलाख्यातील शिक्षकांना सरासरीने जास्त पगार मिळत आहे. बंगाल्यात रु. ८, मद्रासेत रु. १५, पंजाबात रु. १५, तर मुंबईत रु. ४७ अशी सरासरी आकडेशास्त्रज्ञांनी दाखविलेली आहे. या इलाख्यातील प्राथमिक शिक्षकांच्या आक्षेपकांनी आकड्यांवर पुष्कळच तर्कांचे इमले रचले आहेत. याविषयी शिक्षणखात्याच्या १९३२ ते ३७ च्या पंचवार्षिक प्रतिवृत्तात असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, "मुंबई इलाख्यातील शिक्षकांच्या पगाराच्या या सरासरीवर फारशी भिस्त ठेवू नये; कारण इतर प्रांतांत शिक्षकांची राहणी निकृष्ट आहे आणि पुष्कळशा प्राथमिक शाळा या लोकल ऑथॉरिटीने चाल-

विलेल्या नसून खाजगी संस्थांनी चालविलेल्या असल्यामुळे त्या शाळांतील पगाराचे मान आपल्यापेक्षा भिन्न आहे."

या विधानाने सरासरी पगाराच्या आकड्यांतील सूज बरीचशी कमी होईल. इतर प्रांतांतील प्राथमिक शिक्षकांचे पगार कमी आहेत, म्हणून या इलाख्यातील प्राथमिक शिक्षकांनी पगार कमी घेतले पाहिजेत, हा न्याय अजब आहे! रस्त्यातील भिकाऱ्यांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवला, तर शिक्षकांना आहे तो पगारही देण्याची आवश्यकता राहणार नाही! मद्रासी लोक लुंगी नेसतात, म्हणून आम्ही धोतराचा कच्छ विसर्जन करावयाचा की काय? बंगाली लोक बोडके असतात, म्हणून आम्हीही आमच्या पगड्या नि रुमाल अरबी समुद्रात बुडवायचे की काय?

प्राथमिक शिक्षकांची पगारवाढ केल्याने शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसाराच्या मार्गात एक मोठी धोंड उत्पन्न केल्यासारखी होणार आहे. असा एक दुसरा आक्षेप नेहमी घेण्यात येतो. बहुजनसमाजाला साक्षर करण्यासाठी शिक्षकांच्या पगाराला कात्री लावावयाला पाहिजे, असे या आक्षेपकांचे म्हणणे आहे. या आक्षेपाचा विस्तृतपणे विचार करावयाला हवा.

आतापर्यंत प्राथमिक शिक्षणाची जी काही थोडी प्रगती झाली आहे, ती कशी झाली, याचा कोणी विचार केला आहे काय? प्रो. एम्. आर. परांजपे यांनी परवा 'टाइम्स' पत्रात एक लेख लिहून या प्रश्नावर उत्कृष्ट प्रकाश पाडला आहे.

१९२२ ते १९३७ पर्यंत प्राथमिक शाळांत साडेचार लाख विद्यार्थी वाढले. दर विद्यार्थ्याचा सरकारला रु. ९ खर्च पडतो. या किमानपक्षी दराप्रमाणे हिशेब केला तरी या काळात प्राथमिक शिक्षणाला मदतीदाखल सरकारने दिलेल्या रकमेत ३९ लाख रुपयांची वाढ व्हावयाला पाहिजे. पण प्रत्यक्ष वाढ सोळा लाख रुपयांची झाली आहे. म्हणजे सरकारने तेवीस लाख रुपयांची बचत केली. ती कशी? तर शिक्षकांच्या पगाराला काट लावून. तिसऱ्या वर्षाचे ट्रेनिंग सरसहा आणि दुसऱ्या वर्षाचे ट्रेनिंग बहुशः थांबवून—म्हणजे वाढत्या लायकीप्रमाणे जास्त पगार मिळण्याची शक्यता बंद करून! १९२३ सालापासून आतापर्यंत प्राथमिकच्या शिक्षणाचा जो काही प्रसार झाला, तो एकट्या शिक्षकाच्या पगाराची निर्दय छाटाछाट केल्यामुळे झालेला आहे! प्राथमिक शिक्षकांच्या स्वार्थत्यागावर—त्यांच्या अंगातून कापून काढलेल्या रक्तामांसावर आज प्राथमिक शिक्षणाचा विस्तार झाला आहे, हे सत्य जनतेच्या निदर्शनाला प्रामुख्याने आणले पाहिजे! शिक्षणखात्याच्या १९३२ ते ३७ च्या पंचवार्षिक प्रतिवृत्तात पान १०६ वर स्पष्टपणे म्हटलेले आहे, "गेल्या दहा वर्षांत प्राथमिक शिक्षकांची आर्थिक स्थिती एकसारखी घटत चाललेली आहे! त्यामुळे शिक्षकवर्गात असंतोष उत्पन्न होत चाललेला असून बुद्धिवान आणि लायक माणसे या धंद्यात देणे अशक्य झाले आहे; एवढेच नव्हे तर प्राथमिक शिक्षणाचा दर्जा हिणकस होत

चाललेला आहे!"

प्राथमिक शिक्षणाचे अग्निहोत्र प्रज्वलित ठेवण्यासाठी प्राथमिक शिक्षकाने आतापर्यंत आपले हातपाय तोडून या अग्नीत समर्पण केलेले आहेत. आता प्राथमिक शिक्षकाचे कबंध उरलेले आहे! याउपर बहुजनसमाजाच्या शिक्षणासाठी शिक्षकाने आपले शिरकमल तोडून द्यावे, असे म्हणणे म्हणजे राक्षसीपणाची पराकाष्ठाच होय! आणि सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार म्हणजे तरी काय? तर सर्व जनतेच्या तोंडाला साक्षरतेचा थोडासा ओलावा लावावयाचा आणि सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार झाला, अशा काल्पनिक आनंदाने स्वतःची पाठ थोपटून घ्यावयाची! अशा तऱ्हेने 'प्रसार' झालेले शिक्षण लौकरच 'पसार' झाल्याशिवाय राहणार नाही. सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी शिक्षण जर स्वस्त करावयाचे असेल, तर या स्वस्ताईसाठी एकट्या प्राथमिक शिक्षकानेच त्याग करायला पाहिजे, अशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे आहे. समाजातील सर्व लोकांनी या महत्कार्यासाठी आपल्या खिशाला कात्री लावावयास तयार व्हावयास पाहिजे. यापुढे प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी किंवा दुसऱ्या अन्य प्रकारच्या शिक्षणाच्या प्रगतीसाठी प्राथमिक शिक्षक एक पैचीही झीज सोसावयास तयार नाहीत, अशी एकमुखाने या इलाख्यातील सर्व प्राथमिक शिक्षकांनी गर्जना केली पाहिजे! प्राथमिक शिक्षकांची आर्थिक परिस्थिती ताबडतोब सुधारल्याशिवाय प्राथमिक शिक्षणाची प्रगती होणे शक्य नाही! प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात बुद्धिवान आणि लायक शिक्षक प्रविष्ट होणे शक्य नाही! प्राथमिक शिक्षण देणे म्हणजे मुलांना लिहायवाचायला आणि हिशेब करायला शिकवणे, एवढेच नसून, मुलाला उत्तम नागरिक बनवणे, समाजाच्या जीवनात त्याला जबाबदारीने भाग घेण्यास लायक करणे आणि राष्ट्राच्या आकांक्षा सफल होण्यास मदत करण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी आणणे, या टॉमस कमिटीच्या ध्येयवचनाप्रमाणे जर प्राथमिक शिक्षकाने आपले कार्य योग्य तऱ्हेने करावे, असे समाजाला आणि सरकारला वाटत असेल, तर प्राथमिक शिक्षकाला यापुढे अर्धपोटी, विपद्ग्रस्त आणि भुकेकंगाल ठेवून भागावयाचे नाही! शिक्षकांचा पगार वाढवणे म्हणजे शिक्षकांवर कोणत्याही तऱ्हेचा उपकार करणे नसून समाजाच्या कल्याणासाठी शिक्षकांनी आजपर्यंत जो आत्मघाताच्या मर्यादेपर्यंत कमाल स्वार्थत्याग केलेला आहे, त्याची जाणीव प्रदर्शित करून त्यांना बक्षिस तर दूरच राहो—पण निदान न्याय देणे एवढाच आहे.

या दृष्टीने मोरे–कमिटीने सुचविलेली पगाराची योजना सर्वस्वी असमाधानकारक, अन्यायमूलक आणि आजपर्यंत प्राथमिक शिक्षकांनी केलेल्या स्वार्थत्यागाचा उपमर्द करणारी आहे, असे एकमुखाने जाहीर केल्यावाचून गत्यंतर नाही. प्राथमिक शिक्षकांना स्वाभिमानाने आणि सन्मानाने जगता यावे, त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी त्यांच्या हातून यशस्वी तऱ्हेने पार पडावी, असे जर सरकारला प्रामाणिकपणे वाटत

असेल, तर साठे–परांजपे–योजनेला फिरून मान्यता देणे हा एकच न्यायाचा मार्ग आहे. मोरे-कमिटीच्या योजनेपेक्षा साठे-परांजपे-योजना अमलात आणल्यास वीस लाख रुपये जादा खर्च येईल आणि त्यामुळे ती योजना व्यवहार्य होणार नाही, असा मोठा आक्षेप उपस्थित होईल ! तथापी, साठे-परांजपे-योजना हे प्राथमिक शिक्षकांच्या पगाराचे अंतिम ध्येय मान्य करून त्या दिशेने पुढील पगाराच्या योजनेची आखणी करण्याचे सरकारने मान्य केले, तरी प्राथमिक शिक्षकांना पुष्कळच न्याय मिळणार आहे ! वीस लाख रुपये आणावयाचे कोठून, हा प्रश्न निरर्थक आहे ! आजपर्यंत सरकारने निरनिराळ्या योजनांत लाखो रुपये खर्च केलेले आहेत ! आणि प्राथमिक शिक्षकांच्या पगारात छाटाछाट करून सरकारने शिक्षकांच्या न्याय्य वेतनातून लाखो रुपये हिरावून नेले, त्याचा मोबदला कोण देणार ? सबंध मुंबई इलाख्यातील प्राथमिक शिक्षकांचा प्रश्न समाधानकारक तऱ्हेने कायमचा मिटविण्याच्या दृष्टीने वीस लाख रुपये काहीच नव्हेत ! आजच्या घटकेला शिक्षकांच्या पगारात पैचीही वाढ झाली नाही तरी हरकत नाही; पण शिक्षकांच्या पगाराच्या बाबतीत घोर अन्याय झालेला आहे- आणि त्या अन्यायाचे परिमार्जन आज ना उद्या होणे आवश्यक आहे, एवढी मान्यता जरी सरकारकडून मिळाली, तरी हजारो प्राथमिक शिक्षक आज समाधानाचे सुस्कारे टाकल्यावाचून राहणार नाहीत ! शिक्षकांचे आत्मे जे तळमळत आहेत, ते निव्वळ पगारासाठी नसून केवळ न्यायासाठी, आजपर्यंत केलेल्या स्वार्थत्यागाच्या मान्यतेसाठी आणि कृतज्ञतेच्या कबुलीसाठीच होत !

म्हणून माझ्या साऱ्या शिक्षकबंधूंना माझे कळकळीचे एवढेच सांगणे आहे की, आपण इतरांपेक्षा कमी दर्जाचे आहोत, हा नैकृष्टयगंड मनातून काढून टाका. आत्मपरीक्षणाने आणि अभ्यासाने आपला आत्मविश्वास वाढवा. आजच्या युगातील चळवळीचे सामर्थ्य ओळखून संघटित व्हा. आपल्या न्याय्य हक्कांबद्दल सदैव जागरूक राहा. आणि कॉंग्रेस सरकारच्या न्यायबुद्धीवर आणि सामर्थ्यावर विश्वास टाकून आपल्या मागण्या योग्य आणि सनदशीर मार्गाने त्यांच्यापुढे मांडा, म्हणजे तुमचा कार्यभाग निश्चयेकरून झाल्यावाचून राहणार नाही ! लक्षात ठेवा की, शिक्षकांना उपाशी ठेवून जगणाऱ्या समाजाचे आणि राष्ट्राचे केव्हाही कल्याण होणे शक्य नाही, हे सत्य आज ना उद्या समाजाला पटल्याखेरीज राहणार नाही.

( मुंबई इलाखा प्राथमिक शिक्षकपरिषद, पुणे अधिवेशन ( १९-२-१९३९ ) : अध्यक्षीय भाषण. )

[ **इलाखाशिक्षक**, मार्च १९३९ ]

## परिशिष्ट १

# ‘ अरुण वाचन ’ : प्रस्तावना

दुय्यम शाळांमधील इयत्ता एक ते सहांतील विद्यार्थ्यांकरिता मराठी भाषा व साहित्य या विषयाच्या अभ्यासासाठी ‘ अरुण वाचना ’च्या सहा पुस्तकांची क्रमशः योजना केलेली आहे. दुय्यम शाळेच्या अभ्यासक्रमात मातृभाषेच्या अभ्यासाला अलिकडे विशेष महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे व त्या विषयाच्या अध्यापनपद्धतीची दिशाही आमूलाग्र बदललेली आहे. ती लक्षात घेऊनच या वाचन-पुस्तकांची रचना करण्यात आलेली आहे.

प्राथमिक शाळेतील पहिल्या चार इयत्ता पूर्ण झाल्यानंतर मुलांची भाषाविषयात पुष्कळशी प्रगती झालेली असते. कोणत्याही सामान्य विषयावर थोडे-बहुत विचार भाषण किंवा लेखनातून सुसंगतपणे प्रगट करण्याइतका त्यांचा शब्दसंग्रहही विविध व व्यापक झालेला असतो. वाक्यांची रचना व शब्दांचे स्वरूप समजण्याइतकी व्याकरणाची माहिती त्यांना असते. वाचनाच्या क्रियेतील प्राथमिक अडचणी या वेळी पुष्कळच नाहीशा झालेल्या असल्याने मनात किंवा मोठ्याने बऱ्याच अस्खलितपणे त्यांना वाचता येऊ लागते आणि त्यामुळे वाचनाची अभिलाषा व आवड या वेळी त्यांच्या मनात उत्पन्न होते, म्हणून अनुरूप वाचनखाद्य मिळण्यासाठी ती अत्यंत आतुर झालेली असतात.

तथापि, भाषेच्या कलात्मक स्वरूपाशी त्यांची अद्यापी ओळख झालेली नसते. लेखन ही एक कला असून निरनिराळ्या विषयांवरील विचार व भावना प्रकट करण्याचे निरनिराळे प्रकार व पद्धती असू शकतात आणि इतर कलावंतांप्रमाणे लेखकही आपल्या कृतीत सौंदर्य उत्पन्न करू शकतो, याची विद्यार्थ्यांना या अवस्थेत फारशी

कल्पना नसते. एकच अर्थ अनेक रीतींनी व्यक्त करण्यासाठी किंवा विचाराच्या अत्यंत सूक्ष्म छटा वठविण्यासाठी शब्दांची योजना कशी करता येते, क्रिया, आकार रंग किंवा ध्वनी यांचा बोध विशिष्ट शब्दांनीच कसा होतो, मनात दडून बसलेली अनुभवाची व संस्काराची निरनिराळी अस्पष्ट रेखाचित्रे शब्दांच्या साहाय्याने कशी सचेतन करता येतात, त्याचप्रमाणे शब्दालंकारांच्या व अर्थालंकारांच्या योगाने भाषा डौलदार गोंडस व शोभिवंत कशी दिसू लागते, सर्व लेखकांची भाषापद्धती ठराविक प्रकारची किंवा एकसारखी नसून प्रत्येक उत्तम लेखकाचे लिहिण्याचे वळण, शैली किंवा घाट निरनिराळा कसा असतो व त्या त्या लेखकाचे व्यक्तिमत्त्व त्याच्या लिखाणात कसे प्रतिबिंबित झालेले असते, विशिष्ट विषयांवरील विचार प्रकट करण्यासाठी विशेष तऱ्हेचे किंवा पारिभाषिक शब्द कसे योजावे लागतात, इत्यादी अनेक भाषाविषयक, साहित्यविषयक खुब्या व रहस्ये इंग्रजी पहिल्या इयत्तेत पाऊल टाकणाऱ्या विद्यार्थ्यांना अवगत असणे शक्यच नसते. तसेच, प्राचीन व अर्वाचीन काळी स्वभाषेत निर्माण झालेल्या अभिजात व उत्तमोत्तम वाङ्मयाशी व निरनिराळ्या श्रेष्ठ ग्रंथकारांच्या, प्रतिभाशाली कवींच्या निवडक कृतींशी त्यांचा परिचय झालेला नसतो. या सर्व दृष्टीने विचार केला म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेली वाचनाची चटक उत्तरोत्तर वाढवीत जाणे व स्वतंत्रपणे वाचनव्यवसाय करण्याइतके सामर्थ्य, आकलनशक्ती त्यांच्यांत निर्माण करणे, कलात्मक व वाङ्मयात्मक दृष्टीने भाषेकडे पाहाण्याची त्यांना सवय लावणे, मातृभाषेतील प्राचीन व अर्वाचीन वाङ्मयाबद्दल त्यांच्या मनांत आदर व अभिमान उत्पन्न करणे, हे दुय्यम शाळेतील भाषाशिक्षणाचे प्रधान हेतू आहेत, हे स्पष्ट आहे. हे हेतू पुढे ठेवूनच ' अरुण वाचना 'च्या सहा पुस्तकांची संगतवार व क्रमवार रचना केलेली आहे.

दुय्यम शाळेत येणारे विद्यार्थी वयाच्या दृष्टीने यौवनपूर्व अवस्थेत असतात. अकरा वर्षांपासून ते सोळा वर्षांपर्यंतचा यौवनपूर्वकाळ हा मानसशास्त्रज्ञांच्या मते मनुष्याच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा काळ आहे. यौवनाच्या आगमनाची सिद्धता या काळात होत असल्याने शारीरिक, बौद्धिक व भावनात्मक दृष्ट्या विद्यार्थ्यांच्या जीवनाची एकसारखी पुनर्घटना चालू असते. अशा वेळी विद्यार्थ्यांना उत्तम तऱ्हेचे शैक्षणिक संरक्षण मिळले नाही, तर त्यांचा सर्वस्वी नाश होण्याचे भय असते. भाषाविषयापुरताच विचार केला तर विद्यार्थ्यांच्या उपजत प्रवृत्तींना अनिष्ट वळण लागू नये म्हणून त्यांचे शुद्धीकरण करण्यासारखे सामर्थ्यवान, आकर्षक व चैतन्ययुक्त वाङ्मय त्यांच्यापुढे ठेवणे या वेळी अवश्य आहे. तसेच या वयात उदित होणारी लैंगिक प्रवृत्ती विशुद्ध व उदात्त करण्यासाठी चित्र, नाट्य, संगीत, काव्य इत्यादी ललितकलांशी विद्यार्थ्यांचा परिचय करून देऊन त्यांची सौंदर्यदृष्टी निर्मळ व निरागस करणे हेही एक महत्त्वाचे कार्य भाषाशिक्षकाला साधावयाचे असते. यावरून भाषाविषयक दृष्टी

का बाळगावयाला पाहिजे, हे स्पष्ट होईल.

गेल्या पन्नास वर्षांत मराठी साहित्याची सर्वांगीण वाढ झालेली असून अनेक नामवंत गद्य लेखकांनी व कवींनी वाङ्मयाच्या निरनिराळ्या दालनांत अत्यंत मोलाची भर घातलेली आहे. लेखनाच्या पद्धती व तंत्रे यांमध्येही आमूलाग्र फरक झालेला आहे. लेखनगुण मोजण्याची मापनेही बदललेली आहेत. जागतिक व राष्ट्रीय राजकारणाची झळ वाङ्मयाला चांगलीच लागलेली आहे. जीवनाकडे बघण्याचे तत्त्वज्ञानही बदलत चालल्याने, त्या अनुषंगाने वाङ्मयाचे बाह्य व आंतर स्वरूपही आता पुष्कळच बदललेले आहे. या संक्रमणकाळातील निरनिराळ्या प्रकारच्या वाङ्मयाचा व भविष्यकालीन वाङ्मयप्रवृत्तींचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला नाही, तर शिक्षणाची व जीवनाची सांगड घालावयाला पाहिजे, या शिक्षणशास्त्रातील अत्यंत महत्त्वाच्या तत्त्वाशी द्रोह केल्यासारखे होणार आहे! मात्र त्याबरोबर हेही लक्षात ठेवावयाला पाहिजे की, ज्या प्राचीन वाङ्मयाच्या बळकट पायावर आजच्या मराठी भाषेची व साहित्याची इमारत उभारलेली आहे, त्या गतकालीन अभिजात वाङ्मयाशी विद्यार्थ्यांचा परिचय करून दिला नाही, तर पूर्वजांनी आपल्यावर केलेल्या अपरिमित भाषाऋणातून आपण केव्हाही मुक्त होणार नाही.

ज्ञान हेच केवळ शिक्षणाचे अंतिम साध्य आहे, असे समजून विद्यार्थ्यांना निर्भेळ ज्ञानदान देत सुटणे हा भाषाशिक्षणाचा हेतू नव्हे. पुष्कळशा जुन्या वाचनपुस्तकांची रचना ह्या एकांगी दृष्टीने झाल्यामुळे त्यांना एखाद्या विविध ज्ञानसंग्रहाचे रूक्ष, नीरस व भारूड स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते. अमुक एक विषय, विद्यार्थ्यांना शिकवलाच पाहिजे, या ज्ञानकोशी शैक्षणिक कल्पने – ( Encyclopaedic outlook ) चा पगडा त्या वेळी शिक्षकांच्या मनावर फार असल्याने ज्यांचा वाङ्मयाशी काहीही संबंध नाही, अशा अनज्ज्ञ व अकुशल लेखकांकडून विशिष्ट विषयांवर मुद्दाम लिहवून घेतलेल्या धड्यांचा समावेश पूर्वीच्या वाचनपुस्तकांतून झालेला आढळून येतो. अशा पुस्तकांमध्ये वाङ्मयात्मक दृष्टीचा अभाव प्रामुख्याने दिसून यावा यात नवल ते काय? म्हणून अभ्यासाव्यतिरिक्त या पुस्तकांना हात लावण्याचा मोह त्या वेळच्या विद्यार्थ्यांना क्वचितच होत असे. ‘आत्मशिक्षण’ हा आजच्या नवयुगीन शिक्षणातील महामंत्र आहे. शिक्षकावर अवलंबून राहण्याची विद्यार्थ्यांची परधार्जिणी प्रवृत्ती नाहीशी करून अभ्यासाच्या कामी त्यांना स्वावलंबी करणे, हे आजच्या शिक्षकाचे कर्तव्य आहे. त्या दृष्टीने विचार केला तर विद्यार्थ्यांच्या दृष्टीनेच सर्व शालेय पुस्तकांची रचना व्हावयाला पाहिजे, ही गोष्ट अगदी उघड आहे. विद्यार्थ्यांच्या सहजप्रवृत्ती, त्यांच्या विशिष्ट वयातील आवडीनिवडी व भावना आणि आकांक्षा या लक्षात घेऊन वाचनपुस्तकांची रचना केली, तरच ती विद्यार्थ्यांवर मोहिनी घालू शकतील. ‘अरुण वाचना’चे कोणतेही पुस्तक या कसोटीवर घासून पाहिले, तर ते त्या कसोटीला

उतरल्याशिवाय राहाणार नाही. विद्यार्थी हेच खरे वाचनपुस्तकांचे परीक्षक आहेत आणि त्यांना समाधान व आनंद देणारी वाचनपुस्तके हीच काय ती खऱ्या मानसशास्त्रीय व शैक्षणिक दृष्टीने लिहिलेली पुस्तके ठरतील !

आधुनिक भाषाशिक्षणाची व अध्यापनशास्त्राची तत्त्वे लक्षात घेऊन आणि आरंभापासून अखेरपर्यंत कलात्मक व वाङ्मयात्मक दृष्टी बाळगून 'अरुण वाचन'च्या सहा पुस्तकांची रचना केलेली आहे. पुष्कळ वेळा पुस्तके मनोरंजक करण्याच्या भरात ती फारच सोपी होतात व म्हणून शैक्षणिक दृष्ट्या ती निरुपयोगी ठरतात. हा दोष 'अरुण वाचना'च्या कोणत्याही पुस्तकात आढळून येणार नाही. मनोरंजकत्व म्हणजे सुलभत्व नव्हे प्रत्येक पुस्तक शक्यतितके कसदार व भरदार करण्याचा प्रयत्न केलेला असून विद्यार्थ्यांचे वाढते वय व परिणत होत जाणारी बौद्धिक अवस्था लक्षात घेऊनच निरनिराळ्या पुस्तकांचा क्रम विषयकर्तव्याच्या दृष्टीने वाढवीत नेलेला आहे. आधुनिक वाङ्मयाच्या अतिशयोक्त अभिमानाने जुन्या वाङ्मयाकडे डोळेझाक केलेली नाही. पूर्वीच्या वाचनपुस्तकांतून जुन्या वाङ्मयातील क्लिष्ट व रूक्ष उतारे बहुधा देण्यात आलेले असल्यामुळे प्राचीन वाङ्मयाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनांत साहजिकच तिरस्कार व अनादर उत्पन्न होत असे; पण 'अरुण वाचना'त जुन्या वाङ्मयातील उत्तमोत्तम, सौंदर्यपूर्ण व कलात्मक वेचेच निवडण्याची दक्षता बाळगल्यामुळे प्राचीन वाङ्मयाचे तेजस्वी स्वरूपच विद्यार्थ्यांना दिसून येईल व त्या वाङ्मयाबद्दल त्यांचे अनुकूल मत होईल; एवढेच नव्हे, तर त्यांना त्याविषयी आदर वाटू लागेल.

ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, नामदेव, तुकाराम, रामदास, मोरोपंत, रघुनाथपंडित या प्राचीन कवींपासून तो आधुनिक कालात होऊन गेलेल्या केशवसुत, चंद्रशेखर, दत्त, लेंभे, माधवानुज, रे. टिळक, गोविंदाग्रज, रेंदाळकर, ठोंबरे, हिंगणेकर या कवींपर्यंत सर्व कवींच्या, एवढेच नव्हे, तर विद्यमान काळी प्रसिद्ध असलेल्या तांबे, बी, माधव जूलियन्, यशवंत, गिरीश, अनिल, अज्ञातवासी, गोपीनाथ, ठोकळ, पाटील इत्यादी प्रतिभाशाली कवींच्याही उत्कृष्ट काव्यकृतींची निवड 'अरुण वाचना'त केलेली आहे. गद्यलेखकांत विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगरकर, शिवराम महादेव परांजपे, अच्युत बळवंत कोल्हटकर, विनायक दामोदर सावरकर, दत्तो वामन पोतदार, असे तेजस्वी निबंधकार, किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर, खाडिलकर, केळकर, गडकरी, वरेरकर, अत्रे हे नाटककार, हरि नारायण आपटे, खांडेकर, यशवंत गोपाळ जोशी, कुमार रघुवीर यांच्यासारखे कादंबरीकार व लघुकथाकार, प्रो. फडके, प्रो. दांडेकर, श्री. अनंत काणेकर यांच्या दर्जाचे लघुनिबंधकार अशा उत्तमोत्तम लेखकांच्या उत्कृष्ट गद्य लेखनशैलीचे नमुने या वाचनपुस्तकांत दिलेले आहेत. त्यामुळे ही सहा वाचनपुस्तके प्राचीन व अर्वाचीन मराठी वाङ्मयाचे

प्रतिनिधित्व उत्तम तऱ्हेने पटवतील, अशाच तोलामोलाची झालेली आहेत.

नाटक, कादंबरी, लघुकथा, चरित्र, नाट्यछटा, लघुनिबंध, शब्दचित्र, बखर, आत्मचरित्र, प्रवासवृत्त, पत्रे, कहाणी, हास्यके इत्यादी गद्यलेखनाचे निरनिराळे प्रकार त्याचप्रमाणे भावगीत, नाट्यगीत, 'सुनीत, विडंबन, पोवाडा, अभंग, आरती, विडा, धावा, भूपाळी, अंगाईगीत इत्यादी पद्यातील विविध तऱ्हा यांचा या पुस्तकांतून समावेश करण्यात आलेला आहे. विषयाच्या विविधतेच्या दृष्टीनेही ऐतिहासिक, भौगोलिक, वैज्ञानिक, सृष्टिनिरीक्षणात्मक, धार्मिक, टीकाविषयक अशा अनेक विषयांवरील धड्यांचा अंतर्भाव केला असल्याने या पुस्तकांमध्ये एकांगीपणाचा दोष दिसून येणार नाही. मात्र वाङ्मयात्मक स्वरूप असल्याशिवाय कोणत्याही ऐतिहासिक, भौगोलिक वा शास्त्रीय धड्याची निवड करण्यात आलेली नाही. धर्मसंस्थापकांची व साधुसंतांची स्फूर्तिदायक चरित्रे व वचने, स्वदेशातील आदर्श स्त्री-पुरुषांची व विशेषतः आजच्या घटकेस राष्ट्रपुरुष म्हणून गणल्या गेलेल्या तेजस्वी महात्म्यांची व देशभक्तांची उद्बोधक चरित्रे, अनिष्ट रूढींचा नाश करून समाजकल्याणासाठी झगडणाऱ्या सुधारकांचे प्रगमनशील विचार यांना या पुस्तकांत प्रामुख्याने स्थान दिलेले आहे महाराष्ट्राचा तेजस्वी इतिहास, महाराष्ट्रीय धर्म, महाराष्ट्रीय संस्कृती व महाराष्ट्रातील सौंदर्यस्थळे यांबद्दल प्रेम व अभिमान उत्पन्न करणारे अनेक धडे या पुस्तकांत आढळून येतील, गरिबांबद्दल व दलितांबद्दल विद्यार्थ्यांना सहानुभूती आणि अनुकंपा वाटावी, अंगमेहनत व कष्ट करणाऱ्या लोकांबद्दल त्यांच्या मनांत आदर उत्पन्न व्हावा, समाजाच्या व राष्ट्राच्या कल्याणासाठी स्वार्थत्याग करण्याची त्यांच्या मनाची तयारी व्हावी, अशा दृष्टीने निरनिराळे धडे निवडले आहेत. आतापर्यंत आक्षिप्त म्हणून गणल्या गेलेल्या व आता निर्बंधमुक्त झालेल्या राष्ट्रीय स्वरूपाच्या वाङ्मयाचा उपयोगही आवश्यक तेवढा केलेला आहे. एवं च, मानवी, राष्ट्रीय व महाराष्ट्रीय अशा तिहेरी दृष्टीने या वाचनपुस्तकांची रचना केलेली असल्यामुळे आजच्या राजकीय व सामाजिक संक्रमणाच्या काळी ती अत्यंत उपयुक्त ठरल्याविना राहाणार नाहीत, अशी आमची निश्चिती आहे.

आता अध्यापनाच्या दृष्टीने विचार करावयाचा झाल्यास, प्रत्येक धड्याच्या आरंभी दिलेली 'ओळख' व शेवटी दिलेले 'अध्ययन' व 'लेखन' यांकडे शिक्षकांनी अवश्य लक्ष द्यावे. या पुस्तकांतील धडे शिकविताना निराळी पाठाची टिपणे काढण्याची आवश्यकता नाही, हे शिक्षकांना आढळून येईल. 'ओळख' ही धड्यांची 'पूर्वतयारी' म्हणजे पहिली पायरी होय. पूर्वतयारीचा हेतू मुलांची जिज्ञासा जागृत करणे व धड्यांतील विषयाची माहिती शिकण्याकरिता लागणारी त्यांची विशिष्ट मनोभूमिका बनविणे हा होय. ही दृष्टी बाळगूनच प्रत्येक धड्याची ओळख लिहिण्यात आलेली आहे. धड्याची सुरुवात करताना या 'ओळखी'च्या

आधाराने शिक्षकांनी प्रश्न विचारावे व हेतुकथन करावे. 'मनातील वाचन' ही धड्याची दुसरी पायरी. शिक्षकांनी मुलांना धडा मनातल्या मनात वाचावयाला सांगावा 'अध्ययना'त दिलेले निरनिराळे प्रश्न वाचनहेतू (objectives) म्हणून फळ्यावर लिहावेत, म्हणजे त्या प्रश्नाच्या अनुरोधाने विद्यार्थी, वाचताना धड्यांचा गोषवारा ध्यानात आणतील. कठीण शब्दांचे अर्थ व संदर्भ जागोजाग दिले आहेत. जेथे गरज पडेल तेथे मुलांना कोशाचा उपयोग करण्यास सांगावे. धड्याचा अर्थ समजल्यानंतर व धड्यातील महत्त्वाची स्थळे समजल्यानंतर शेवटची पायरी म्हणजे 'लेखन' ही होय. वाचन व निबंधलेखन यांची सुरुवातीपासून तो शेवटपर्यंत सांगड घालण्याचा प्रयत्न केलेला आहे, मात्र लेखनासाठी जे विषय व प्रश्न सुचविण्यात आले आहेत, ते धड्यांतील मजकुराची पुनरावृत्ती करणारे, मामुली व ठराविक साच्याचे नाहीत. धड्यांची निवड करताना वाङ्मयात्मक दृष्टी बाळगलेली आहे, तीच दृष्टी 'लेखना'च्या बाबतीतही ठेवलेली आहे. मुलांच्या कल्पनाशक्तीला व विचारशक्तीला चालना मिळावी व त्यांची लेखनप्रतिभा जागृत व्हावी, अशा व्यापक हेतूने 'लेखना'तील प्रश्नांची योजना केलेली आहे. किंबहुना, या सहा पुस्तकांतील 'लेखना'च्या मार्गामधून जो विद्यार्थी शिस्तवार जाईल, तो स्वतंत्रपणे लेखन करण्यास समर्थ होईल अशी आशा करणे अयोग्य होणार नाही. कविता शिकविताना निव्वळ कठिण शब्दांचा अर्थ समजावून सांगण्यात व ओळींचा अन्वय लावण्यात शिक्षकांनी कृतार्थता मानू नये. मुलांनी कवितेचा रसास्वाद घ्यावा, त्यांतील कल्पनेचे, रचनेचे, व ध्वनीचे सौंदर्य व त्यामुळे अनावर होणाऱ्या संस्काराचे महत्त्व ध्यानात आणावे, हाच काव्यशिक्षणाचा मुख्य हेतू आहे. याच दृष्टीने सर्व कवितांची निवड केलेली आहे व त्यावर सौंदर्यसमीक्षक दृष्टीने टिपणे दिलेली आहेत. काही धड्यांच्या लेखकांची व त्यांतील निरनिराळ्या प्रसंगांची चित्रे मधून मधून दिलेली आहेत. त्या योगाने मुलांची सौंदर्यदृष्टी वाढण्यास साहाय्य होईल.

या वाचन–पुस्तकांतील कोणताही धडा शिकवताना अध्यापनात मनोरंजकत्व उत्पन्न व्हावे म्हणून भाषाशिक्षकाने पुढील सूचना अंमलात आणाव्यात—

१. कठीण शब्द व कल्पना स्पष्ट करताना वस्तू, चित्रे, फोटो, आराखडे, आलेख इत्यादी मूर्त साधनांच्या साहाय्याने जेथे जसे जुळेल तसे चित्रीकरण करण्याचा प्रयत्न करावा.

२. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाचा प्रत्येक ठिकाणी पडताळा पहाण्याचा प्रयत्न करावा. अमुक एक शब्दाचा अर्थ असा आहे असे सांगण्यापेक्षा त्या शब्दामधली कल्पना किंवा अनुभव तुमच्या डोळ्यांपुढे उभा राहतो का, अशा अर्थाचे विद्यार्थ्यांना प्रश्न विचारीत जावेत. कविता शिकविताना तर ही पद्धत अंगीकारणे अवश्य आहे.

३. विद्यार्थ्यांच्या विचारांना व कल्पनाशक्तीला एकसारखी चालना देत जावी.

लेखक प्रत्येक ठिकाणी सर्वच गोष्टींचे इत्थंभूत वर्णन करीत नाही. पुष्कळदा तो त्रोटक पण सूचक अशा गोष्टी सांगतो. अशा ठिकाणी त्या सूचकतेचा संपूर्ण विस्तार करण्यास विद्यार्थ्यांना सांगावे. 'तुम्ही त्या ठिकाणी किंवा त्या परिस्थितीत असता तर काय केले असते?' अशासारखे प्रश्न विचारावेत व त्यांच्या संशोधकवृत्तीचे संवर्धन करावे.

४. धडा समजवून झाल्यानंतर त्यातील योग्य तो भाग निवडून त्याचे आदर्श वाचन विद्यार्थ्यांपुढे करावे. सर्वच धडे मोठ्याने वाचण्याच्या लायकीचे नसतात. सामान्यतः मूकवाचनाचाच अवलंब करावा. पण मुलांना अस्खलितपणे, योग्य उच्चारासह व आविर्भावासह वाचता यावे म्हणून त्यांना मोठ्याने वाचण्याची सवय लावणे अवश्य असते. शक्य असल्यास धड्यास नाट्यरूप द्यावे. कविता गद्य स्वरावर पठण न करता चालीवर गाव्यात व ज्या मुलांचा गळा उत्तम असेल अशांना पुन्हा पुन्हा म्हणावयाला लावाव्यात.

५. धड्यातील उतारा ज्या पुस्तकातून घेतलेला आहे ते मूळ पुस्तक, किंवा त्याच्या लेखकाचे चरित्र इत्यादी माहिती वारंवार देत जावी.

याशिवाय विद्यार्थ्यांचे भाषाविषयक व साहित्यविषयक प्रेम वृद्धिंगत व्हावे व त्यांना त्याबद्दल वाढता उत्साह वाटत रहावा म्हणून भाषाशिक्षकांनी पुढील गोष्टींकडे लक्ष पुरवावे.

१. प्रत्येक वर्गाचे मासिक किंवा नियतकालिक असावे म्हणजे त्या त्या वर्गातील कल्पक लेखकांना, कवींना व चित्रकारांना उत्तेजन मिळेल.

२. नाट्यप्रयोग करण्यासाठी प्रत्येक वर्गाचे एक मंडळ असावे. या मंडळाने अधून-मधून या वाचनपुस्तकातील किंवा इतर नाटकांतील योग्य ते नाट्यप्रवेश वर्गापुढे करून दाखवावेत. नेपथ्यरचना करण्यासाठी लागणारे जुजबी सामान व साधने वर्गात ठेवण्यात यावीत.

३. प्रत्येक वर्गाचे एक व्याख्यानमंडळ वा चर्चामंडळ असावे. या मंडळाच्या बैठकांतून निरनिराळ्या मनोरंजक विषयांची चर्चा व्हावी. चर्चेसाठी निवडण्यात येणारे विषय अत्यंत सुलभ व विद्यार्थ्यांच्या आटोक्यातील असावेत.

४. वाङ्मयातील चांगल्या चांगल्या कृती जाहीर रीतीने वाचून दाखविण्यासाठी किंवा उत्तम उत्तम कवितांचे गायन करण्यासाठी प्रत्येक वर्गाचे एखादे मंडळ असावे. ज्या विद्यार्थ्यांना उत्तम वाचता अगर गाता येत असेल, अशांनी आळीपाळीने या मंडळाच्या कार्यक्रमांत भाग घ्यावा.

५. वेळोवेळी आढळून येणारे उत्तम गद्याचे व पद्याचे नमुने विद्यार्थ्यांनी आप-आपल्या वहीत छानदार अक्षरात उतरून ठेवावेत. अशा संग्रहाला 'गंगाजळी' किंवा असेच दुसरे नाव द्यावे. वर्षाअखेर जमलेल्या अशा 'गंगाजळी'कडे पहाताना

विद्यार्थ्यांना अभिमान वाटल्यावाचून राहाणार नाही.

६. दिवंगत झालेल्या प्राचीन किंवा अर्वाचीन साहित्यसेवकांचे ' स्मृतिदिन ' वर्गात किंवा शाळेत पाळण्यात यावेत. दरवर्षी एक दिवस ' शारदा–दिन ' म्हणून पाळण्यात यावा.

७. प्राचीन व अर्वाचीन साहित्यसेवकांचे फोटो, हस्ताक्षरे किंवा इतर महत्त्वाच्या आठवणीच्या वस्तू जमवण्यात येऊन त्यांचे एखादे ' वस्तुसंग्रहालय ' बनविण्यात यावे.

८. निरनिराळ्या सुप्रसिद्ध मासिकांचे व नियतकालिकांचे जुने व नवे अंक विद्यार्थ्यांना मिळण्याची सोय व्हावी. शाळेच्या ग्रंथसंग्रहालयाव्यतिरिक्त प्रत्येक वर्गाचा स्वतंत्र वाङ्मयविषयक ग्रंथसंग्रह जमविता येण्यासारखा आहे. असो.

ज्या ज्या थोर दिवंगत व विद्यमान साहित्य सेवकांच्या सुंदर कलाकृतींचा उपयोग आम्ही ही सहा पुस्तके रचताना केलेला आहे, त्या त्या सर्वांशी आम्ही कृतज्ञ आहोत. त्यांनी आणि त्यांच्या वारसदारांनी त्यांच्या लेखांतील वा काव्यांतील उतारे या पुस्तकांमध्ये प्रसिद्ध करण्याची अनुमती उदार अंतःकरणाने देऊन आम्हांस व दुय्यम शाळेतील विद्यार्थ्यांना उपकृत केलेले आहे. आमचे मित्र श्री. केशवराव देशपांडे व श्री. कुलकर्णी या प्रतिभाशाली तरुण चित्रकारांनी कलात्मक चित्रे काढून या पुस्तकांना अलंकृत केल्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोत. शिवाय ज्या अनेक व्यक्तींचे आम्हांला ही पुस्तके तयार करताना वेळोवेळी परोपरीने अपरिमित साहाय्य झालेले आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचेही आभारी आहोत.

दुय्यम शाळांतील व ट्रेनिंग कॉलेजांतील मराठी भाषाविषयाचे अध्यापक ' अरुण वाचना 'चे सप्रेम स्वागत करतील आणि आमच्या या अभिनव प्रयत्नाला उत्तेजन देतील अशी आशा आहे.

१ फेब्रुवारी १९३८ प्रल्हाद केशव अत्रे
पुणे शहर शंकर केशव कानेटकर

## परिशिष्ट २

# एका विद्यार्थी आणि सहकारी व्यक्तीच्या टिपणवहीतून

### [ अ ] शिक्षकाची आचारसंहिता

आचार्य अत्र्यांनी आम्हा शिक्षकांसाठी काही अत्यंत बहुमोल सूचना तयार करून दिल्या होत्या. शिक्षकाची जणू ती एक आचारसंहिताच होय. सूचना अशा :

१. शिक्षकाने स्वच्छ व शोभेसे कपडे घालावेत.
२. शिक्षकाने वर्गावर नेहमी वेळेवर जावे. वर्गात जाताना तोंडात पानतंबाकू किंवा सुपारी चघळत जाऊ नये.
३. शिक्षकाचा चेहेरा नेहमी आनंदी, उत्साही, प्रफुल्ल व हसरा असावा.
४. विद्यार्थ्यांनी वर्गात केलेल्या अभिवादनाचा मोठ्या प्रेमाने स्वीकार करावा.
५. शिकविताना खुर्चीवर किंवा टेबलावर बसून शिकवू नये.
६. बोलण्यामध्ये किंवा आवाजामध्ये नेहमी मृदूपणा व जरूर तो चढउतार असावा.
७. विषयाची तयारी करून त्याचे टिपण जवळ ठेवावे.
८. विषयास लागणारे उपयुक्त साहित्य नेहमी वापरावे. विशेषतः भूगोल शिकवताना नकाशा, ॲटलास जरूर वापरावा.
९. फळ्यावरील लिखाण सुबक अक्षरांत, सुबोध शब्दांत असावे. फळ्याचा उपयोग नेहमी करावा.
१०. विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना देणारे प्रश्न विचारावेत; 'होय' व 'नाही' अशी त्रोटक उत्तरे स्वीकारू नयेत. त्यांना अधिकाधिक बोलते करावे.
११. शिकविताना ज्या ठिकाणी हावभावाची जरुरी आहे, त्या ठिकाणी शिक्षकाने हावभाव करणे फार उपयुक्त ठरत असते.
१२. वर्ग नेहमी बोलका, उत्साही व आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करावा.
१३. विद्यार्थ्यांना आकर्षित करून विषयात गोडी निर्माण करण्याची कला शिक्षकास अवगत पाहिजे.
१४. विषयाचे संपूर्ण ज्ञान असले पाहिजे. ते अत्यंत जरूरीचे आहे.
१५. विद्यार्थ्यांच्या शंकाकुशंका न रागावता समजावून दिल्या पाहिजेत. म्हणजे शिक्षक हजरजबाबी असला पाहिजे, त्याकरिता खूप वाचनाची गरज असते.
१६. छडीचा उपयोग मुळीच करू नये.
१७. विद्यार्थ्यांच्या पोषाखाकडे, स्वच्छतेकडे लक्ष देत जावे.
१८. विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल, वर्तणुकीबद्दल पालकांच्या गाठीभेटी घेऊन त्यांना माहिती द्यावी.
१९. कोणताही निर्णय एकदम घेऊ नये. विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा.
२०. शिक्षकाने वर्गामध्ये पिंजऱ्यातील सिंहासारखे इकडे तिकडे येरझारे करू नयेत.
२१. वर्गात वायफळ गप्पागोष्टी करू नयेत.
२२. विद्यार्थ्यांचा स्वाध्याय ( होमवर्क ) वर्गातील लिखाण काळजीपूर्वक तपासून, त्यातील चुका दुरुस्त करून घ्याव्यात.
२३. विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी, प्रगतिपुस्तके वेळेवर भरून व योग्य सूचना देऊन

त्यांवर पालकांची सही आणण्यास विद्यार्थ्यांस सांगावे.

२४. कॅटलॉग, फीचा हिशोब नेमलेल्या वेळी पूर्ण करावा.

२५. वर्गात कोणी पाहुणे वगैरे आल्यास विद्यार्थ्यांस नमस्कार करण्याचे शिकवावे.

२६. विद्यार्थ्यांस अपशब्द वापरू नयेत. 'मठ्ठ आहेस', 'दगड आहेस' असे बोलू नये.

## [आ] विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी कवितेचे भाषांतर

गुरुवर्य अत्रे यांच्या या आठवणी लिहीत असताना मला माझी मॅट्रिकमध्ये होतो, तेव्हाची इंग्रजीची वही सापडली. बरोबर त्रेसष्ट वर्षे जपून ठेवलेली ही वही आहे.

कवी लाँगफेलो यांच्या 'ए साम ऑफ लाइफ' ('A Psalm of Life') या कवितेचे मराठी भाषांतर त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांना लिहून घेण्यास सांगितले होते, ते मी लिहून घेतलेले वहीत सापडले. त्या कवितेमधील ओळ न् ओळ विद्यार्थ्यांना नीट समजावी आणि तिची अर्थपूर्णता त्यांच्या ध्यानात यावी, म्हणून त्यांनी तिचे हे भाषांतर मुद्दाम केले होते. पेढा जसा आतून बाहेरून गोड, तसा गुरुवर्य अत्रे यांचा स्वभाव आणि लिखाण, तसेच हे भाषांतरही गोड उतरले आहे. अशीच भाषांतरे 'सोहराब आणि रुस्तुम' आणि 'ऑन ड्यूटी' या कवितांचीही लिहून दिली होती.

A Psalm of Life : Longfellow

### जीवित-स्तोत्र

संसार मिथ्या आहे, मायाजाल आहे, असल्या प्रकारचे रडगाणे माझ्यापाशी गाऊ नको. का तर म्हणे, मनुष्य निजला की मेला ? वस्तू दिसतात, तशा नसतात. नाही, संसार मिथ्या नाही ! त्यात सत्त्व आहे. जगण्यात जोम आहे. मेल्याने आयुष्याचा शेवट होत नसतो. 'माती असशी, मातित मिळशी' असे जे मनुष्याला म्हणतात, ते देहाला उद्देशून म्हणतात. हे म्हणणे आत्म्याला लागू नाही. कारण आत्मा अमर आहे. देह नाशवंत आहे. सुख किंवा दुःख हेच आयुष्याचे ठराविक ध्येय नाही; किंवा साधन नाही. कालच्या पेक्षा दोन पावले पुढे प्रगती झाली पाहिजे, हाच आयुष्याचा उद्देश आहे.

ज्ञान अगाध आहे; आयुष्य क्षणभंगुर आहे व आपल्या अंगात कितीही हिंमत किंवा ताकद खेळत असली तरी छातीत सावकाशपणे पडाणारे ठोके, प्रत्येक क्षणी काळ जवळ येत चालला आहे, असे वजावून सांगत असतात.

जगाच्या अफाट रणमैदानावर पडलेल्या आयुष्याच्या छावणीत एखाद्या हिंमत बहादूर लढवय्याप्रमाणे गर्जत रहा.

वाटेल त्यांनी हाकावे, अशा मुक्या गुराप्रमाणे तोंड मिटून बसू नका. मेलेले मुडदे

उकरून त्यावर रडत बसू नका. चालती घडी हातची दवडू नका. हिंमत मर्दा तो मदत खुदा.

थोरांची चरित्रे आपल्या अंतःकरणात हाच आत्मविश्वास उत्पन्न करीत असतात की, त्यांचेप्रमाणे आपणालाही आपले जीवन उदात्त बनविता येईल आणि मेल्यावरही आपल्यामागे काळाच्या किनाऱ्यावर आपणांस कीर्तिरूपाने पावले उमटविता येतील.

संसारसागरातून मुशाफिरी करीत असताना होडी फुटून किनाऱ्यावर येऊन पडलेल्या एखाद-दोन निराश्रित हताश बांधवांना ही पावले दिसताच कदाचित पुन्हा हिंमत येईल. चला, उठा, कमर बांधा, काहीही झाले, तरी सहन करण्याची मनाची तयारी ठेवा. कोणतेही काम तडीस नेत जा. सारखी चिकाटी धरा. फलप्राप्तीसाठी उतावीळ न होता कष्ट करायला शिका.

## [ इ ] शिक्षकासंबंधी उतारा

एस्. टी. सी. वर्गामध्ये 'शिक्षक' ( The Teacher ) यासंबंधी दिलेला इंग्रजी उतारा—

The teacher is a guide, a friend, a philosopher, a counsellor, a story–teller, a learner, an emancipator, an actor, an authority, an inspirer of vision, a facer of reality, a convertor and a builder of Community. In other words, a teacher has many roles to play, but one of the most basic is that of being an example to his students.

[ विठ्ठलराव नारायणराव शिरोळे यांच्या आठवणींच्या हस्तलिखित वहीतून ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3937
ग्रं. क्र. २४८५८
निबंध
१२.१२.८५
शाखा (स्थळ प्रत)

# निर्देशसूची


'अंकमाला' ८६
'अंगाई' ७६
अत्रे दि. वि. १, ११
'अध्यापन' ३७, ४४, ५६, ८०, ८९
अध्यापन : शास्त्र व कला १११
अध्यापनतंत्राच्या मर्यादा ११२
अध्यापन पद्धती : गैरसमज ७२
अनंतफंदी ९२
अनिल १२८
अनुभवजन्य ज्ञान ४४
अनेकोत्तरी प्रश्न ४८, ४९
अपंगांचे शिक्षण ६२, ६३
'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' ४०
'अरुणवाचन : प्रस्तावना' १२५-३२
'अरुणवाचनमाला' २९
'अरुणवाचनमाले'तील वाङ्मयीन दृष्टी १२९–३०
अज्ञातवासी १२८
आकडेशास्त्र ४८, १२१
आगरकर गो. ग. २९, १२८
आगरकर हायस्कूल २८–२९
आत्मशिक्षण १२७
'आधुनिक कवितेचे अध्यापन' ७४–७७
आधुनिक काव्याचे विशेष ७५–७७
'ऑन ड्यूटी' १३५
'आनंद' (मासिक) ९६
आनंदतनय ९२
आपटे ह. ना. १२८
आलेख (ग्राफ) ३९
आल्फाचाचणी ५२
ऑस्ट्रेलियाचा शोध १०१–०२
इंग्रजी काव्याचा अनिष्ट परिणाम ९७
'इंग्लंडातील प्राथमिक शिक्षण' ६४-६९
इंग्लंडातील शिक्षकाचे प्रशिक्षण २४–२७
'इजिप्तचा प्राचीन इतिहास' ८६
इतिहास संशोधक मंडळ ९६
इंपीरियल इन्स्टिटयूट ६६
'इलाखाशिक्षक' १२४
'इसापनीती' ८७
ईटनची शाळा ११५
उजळणी प्रश्न ४२

' उपदेशपर फटका ' ९३
' उपनिषदे ' ३१
एकनाथ ९२, ९४
एक-शिक्षकी शाळा ६५
एकोत्तरी प्रश्न ४८
एल्फिन्स्टन इन्स्टिटयूट ८४
एल्फिन्स्टन माऊंट स्टुअर्ट ८५
एस्किमो १०२
' ओड टु ऑटम ' ५३
कँडी मेजर ८७
कथाकथन-तंत्र ४०, ४१
कन्नड क्रमिक पुस्तके ८१, ८८
' कँप एज्युकेशन सोसायटी ' ४–७, २२, २३, २८, ३०, ३१, ६९
कल्पितकथा ८६
कवी व चित्रकार ७५
कवी व शास्त्रज्ञ ७५
कॉकनी बोली २५
काणेकर अनंत १२८
कानिटकर गोविंदराव ९६
कानेटकर शं. के. ( गिरीश ) २९, १३२
कॉन्व्हर्टन जे. जी. ( मेजर ), ८१
कॉन्व्हर्टन-अहवाल, ८१
कार आर. पी. ( प्रा. ), १६–१७, १९, २४
कारखानीस म. का. ४१
काव्य आणि गेयता ७६, ९७–९८
काव्यप्रयोजन ७४–७५, ९४, ९६
काव्याध्यापनाचा हेतू ७४, १३०
काव्याध्यापनाचा हेतुविपर्यास ७४–७५
काव्याचे वृत्त ७६
' काही तरी ' ७९
किंडरगार्टन पद्धती ६२
किर्लोस्कर ब. पां. १२८
किर्लोस्करवाडी १०७
कीटस् ५३
कुंजविहारी ९७
कुलकर्णी ( चित्रकार ) १३२
कुलकर्णी मंगेशराव २९
कृतिप्राधान्य ४१, ४४
केअर–कमिटी ६३
केम रॉबर्ट २५
केशवसुत ७५, ९३, १२८
केळकर न. चिं. २७, १२८
कोलंबस क्रिस्तोफर ५४
कोल्हटकर अ. ब. २९, १२८
कोल्हटकर श्री. कृ, १२८
कौन्टी काउन्सिल ६२, ६३
क्रमिक पुस्तकांतील कालबाह्य कविता ९१–९८
क्रमिकतेचे तत्त्व १२८
खाडिलकर कृ. प्र. १२८
खांडेकर वि. स. १२८
खेळ ६३, ६५
गंगाजळी ( वाङ्मयीन ) १३१–३२
गडकरी रा. ग. १, १२८
गद्यलेखनप्रकार १२९
गंधे दादासाहेब २८
गरे ( डॉ. ) २५
गॉडर्ड ४७
गांधी महात्मा ४, ७१
गांधी ट्रेनिंग कॉलेज २९
गिरीश १२८
गुजराती क्रमिक पुस्तके ८१, ८७, ८८, ८९

गुन्हेगार मुलांची शाळा ७
'गुरुदक्षिणा' २७
गोखले ह. स. ७९
गोपीनाथ ( तळवलकर ) १२८
गोविंद ९६, ९७
गोविंदाग्रज ९१, १२८
गोळे म. शि. ८७
ग्रंथालये ४०, ६३
'ग्रूप टेस्टस् ऑफ इंटेलिजन्स' ४८, ५६
घाटे वि. द. २९
घोकंपट्टी ५२, ५३, ५५, ७२, ८९
चंद्रशेखर १२८
चर्चामंडळ १३१
चलच्चित्रपट ६७
चातुर्वर्ण्य १२०
'चाफा' ९६
चित्रकला ६७
चित्रदीप ( मॅजिक् लँटर्न ) ३८, ४०
चित्रपट ३८, ४०
चित्रे ३९–४०
चिपळूणकर विष्णुशास्त्री १२८
छायाचित्रे ३९
जमशेटपूर १०७
जयकर मुकुंदराव २९
जर्व्हिस जॉर्ज ( कॅप्टन ) ८६
जातिभेद ३१
जुन्या क्रमिक पुस्तकातील त्रुटी ८९, ९३
जोशी के. जी. ( रा. ब. ) २२–२३
जोशी य. गो. १२८
ज्योतिषविषयक भूगोल १०९
टर्मन ४६
'टाइम्स ऑफ इंडिया' १२२
टॉड ( कर्नल ) ८७
'टॉडचे राजस्थान' ८७
टॉमस–कमिटी १२३
टि. म. चा वा. वि. १२०
'टिपणांची पुस्तके' ५२, ५६
टिळक ना. वा. ( रेव्ह. ) ९१, ९६, १२८
टेकाडे आनंदराव ९६
ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणे ६९
ठाकरे के. सी. ९७
ठुबे ( रा. ब. ) २८
ठोकळ ग. ल. १२८
ठोमरे–बालकवी पाहा
डफ ग्रँट ८६
डाउने ( डॉ. ) ४७
'डाकवाला' ७५
डायरेक्ट मेथड : संभाषण पद्धती पाहा
'डाल्टन-पद्धती' ५७–६१
: डाल्टन प्लॅन ५८-५९, ६६
: क्रमिक पुस्तके ५९
: पूर्वसंयोजन ५९-६०
: मर्यादा ६०
: वेळापत्रक ५७
: शिस्त ६०
: शिक्षकाचे स्थान ५७
: संदर्भ ग्रंथ ५९
: सुविधा ५८–५९, ६१
: स्वयंशिक्षण ५७–५८
ड्यूक ऑफ वेलिंग्टन ११५
'तगरीचे फूल' ७८–८०
'तगरीचे फूल : पाठाचे प्रात्यक्षिक' ७८–८०
तांबे भा. रा. ७६, ९१, ९२, १२८

'तारकांचे गाणे', ९३
तार्किक प्रश्न ५५
तिवारी दु. आ. ९७
तुकाराम ८२, १२८
'तुतारी' ९२–९३
थार्नडाइक ४६, ४७
दडकर पां. बा. ९७
दत्त ९१, १२८
दांडेकर वि. पां. १२८
दातार २३
दुर्गादेवीचा दुष्काळ ७१
दृक् साधने ३८–४०
देवल गो. ब. १२८
देशपांडे केशवराव १३२
देसाई हरिभाई २४
धंदेशिक्षणाची जोड ६२
धार्मिक शिक्षण ६४, ६९, ८५
नकाशा
: उपयोग ३९, १०२
: कल्पनाशक्तीचा परिपोष १०६
: गैरसमज १०४–१०६
: दिशांचे ज्ञान १०३, १०९
: दिशाभूल १०५
: परिचयाच्या दोन रीती १०४
: प्रकार १०३–१०७
: प्रमाणे १०४
: प्रश्नोत्तर पद्धती १०६, १०७-१०८
: रंगांचा उपयोग १०३
: रेखाटन १०४
: व्याख्या १०२
'नकाशासंग्रह : प्रस्तावना' २३, ९९-११०
नन पर्सी (सर) २४–२५, २७
'नवयुग वाचनमाला' २९
नवशिक्षणाचे तत्त्वज्ञान १६–१७, ३२
नवशिक्षणातील शिक्षकाचे कार्य ३४
नवी परीक्षा पद्धती ५१–५६
'नाइटीन्थ सेंच्युरी' ४७
नाटकातील पद्य ९३
नाट्यीकरण १३१
नामदेव १२८
नायडू (डॉ. रा. ब.) २८
निबंधस्वरूपी प्रश्नपद्धती ४९–५१
नियतकालिक १३१
निर्देशसूचीचा उपयोग १८
'नीतिबोधकथा' ८७
नूतन मराठी विद्यालय २२
नेटिव स्कूलबुक ॲन्ड स्कूल सोसायटी ८४, ८५
'न्यू' एक्झॅमिनर' ४९, ५६
पॅंखर्स्ट (मिस्) ५८
'पंचवार्षिक रिपोर्ट' (१९३२–३७) १२१, १२२–२३
'पंचोपाख्यान' ८६
पटवर्धन : माधव जूलियन पाहा.
पटवर्धन सी. वि. १००
पंडित य. न. (प्रा.) १११–११२
'पदार्थविज्ञान' ८६
पद्यप्रकार १२९
पब्लिक स्कूल्स ३, २६
परांजपे एम्. आर. २३, १२२
परांजपे र. पु. (रॅंग्लर) ११८
परांजपे शि. म. २९, १२८
'परीक्षेची नवी पद्धत' ४५–५६
परुळेकर रा. वि. २८

पऱ्यांच्या गोष्टी ४०
पाईक जेफरे ६९
पाटील ग. ह. १२८
'पाठ मनोरंजक कसा करावा ?' ३८-४४
पाठांतर : घोकंपट्टी पाहा.
पाठाध्यापनाच्या पायऱ्या १११, ११२
१२९–३०
पारंपरिक परीक्षापद्धतीचे दोष ४६, ४७–५१, ५३, ५५–५६
पालकवर्ग ( इंग्लंडातील ) ६५
पालकवर्ग ( भारतीय ) ७१–७३
पालकवर्गाची कर्तव्ये ७१–७३
पिनॉक ८६
पुंडलिक कृष्णराव १५
पुराण वस्तु संग्रहालय ९५
पुराणातील गोष्टी ४०
पूरक प्रश्न ५४
पूरक शिक्षणाच्या शाळा ६८
पृथ्वीचा गोल ( साधन ) १०८–१०९
पेटकर चिंतामणी ९२
पेशवा सदाशिवरावाचा तोतया ९५
पेस्टेलॉत्सी ८७, १११
पोतदार द. वा. १२८
पोळा ७२
प्रबोधक प्रश्न ४५
'प्रल्हाद' १२
प्रवर्तक प्रश्न ४२
प्रवासवर्णने १०१, १०६, १०९
प्रश्नोत्तरांचे पाठातील कार्य ४१–४२
प्रश्नोत्तर पद्धती १३०–३१, १३३
'प्राथमिक शिक्षण' १२०
प्राथमिक शिक्षण ६१, ६३, ७७
'प्राथमिक शिक्षकांची दुरवस्था : भाषण' ११३–१२४
प्राथमिक शिक्षकांचे जीवनमान ( इंग्लिश ) २६, ६५–६६, ९४
प्राथमिक शिक्षकांचे जीवनमान ( भारतीय ) ११४, ११६–२२
'प्रियकर हिंदिस्तान' ९२, ९६
'फडके ना. सी. १२८
फळ्याचा उपयोग २०, ३९, १३० १३३
फेअरग्रीव्ह ( प्रा. ) २५
'फुलपाखरू' ७५
'फुलराणी' ९२
बखरी ८२
बर्किन ८६
बर्ट सिरिल २५, ४७
बॅलार्ड ( डॉ. ) २६, ४७, ४८, ४९, ५०, ५४, ५५
बॉम्बे ट्रॅक्ट ॲन्ड बुक सोसायटी ९४
बॉम्बे नेटिव एज्युकेशन सोसायटी ८४
'बायबल' ९४
'बालक दिन' ७०–७३
बालकवी ७६, ९२, ९५, १२८
बालकांचे हक्क ११०–१११
बालके व शिस्त ११०
बालमानसशास्त्र ६८, ६९, ११०, १११
'बाळगोष्टी' ८६
'बाळमित्र' ८६, ८७
बी ९१, ९६
बीने ४७
बुडबॅज अभ्यासक्रम २७
बुद्धिमापक कसोट्या ( आय क्यू. ) ४६ ४७–४८, ५१
'बोधवचन' ८६

बोर्ड ऑफ एज्युकेशन ८४
ब्रॅबोर्न लॉर्ड २८
ब्रिटिशपूर्व शिक्षणपद्धती ८५
भर्डा न्यू हायस्कूल २–४, १२
भावे विनोबा २९
भावेस्कूल १
भाषांतराचे कार्य ८५, ८६
भाषाशिक्षण
: क्रमिक पुस्तके १२७–२८
: जीवन १२७
: माध्यमिक स्तर १२६
: मानसशास्त्र १२६, १२८
: ललित कला १२६
: हेतू १२६
भाषेचे कलात्मक स्वरूप १२५–२६
भुताखेतांच्या गोष्टी ४०
भूगोल
: इतिहास १००–१०१, १०७
: कथाकादंबरी १०१
: गैरसमज ९९–१००, १०७–१०९
: नकाशाचे स्थान ९, १०२–१०३, १०८, १०९
: नवशिक्षण २०, १०७–१०८
: प्रवासवर्णने १०१, १०६, १०९
: रंजकता १०१
: वास्तव कल्पना १
: सृष्टिशास्त्र ९९–१०१
' भूगोलविद्येची मूलतत्त्वे, भा. ३ ' १००
भौगोलिक परिस्थिती आणि मानव १०१–१०२
मॅकूलॉक ८७
' मॅकूलॉक वाचनमाला ' ८७
मॅक्सूटन जिम २७
मद्यपानबंदी ११४
' मराठी क्रमिक पुस्तकांचा जीर्णोद्धार-पूर्वार्ध ' ८१–८९
मराठी क्रमिक पुस्तके ( अव्वल इंग्रजी काळ ) ८५-८७, ८९
मराठी प्राचीन वाङ्मय ८२
मराठी व फारशी ८२
मराठीची वर्णमाला ८२, १२१
' मराठ्यांचा इतिहास ' ८६
' महाराचा पोर ' ९७
' महिला दिन ' ७२
मॉटफर्ड-सुधारणा ९२
मॉटेसरी ( मादाम ) ४०, ५८
मॉटेसरी पद्धती ५८
मॉडेल्स ३९
मातृभाषा ८५, १२०, १२५
माधव ९२, ९७
माधव जूलियन ७६, ९७, १२८
माधवानुज १२८
मानसशास्त्र ५१
मायदेव वा. गो. ७६
मालचाटे पद्धती ( मॉनिटोरियल मेथड ) ८५
माल्कम ८६–८७
' मॉल्टिंग हाऊस स्कूल ' २६, ६९
मिंटो लॉर्ड ८४
' मी कसा झालो ? ' ३१
' मी शिक्षक कसा झालो ? ' १–३१
मुक्तेश्वर १२८
मुंबई इलाखा दुय्यम शिक्षण परिषद २३

'मुरली' ९७
मुलांचे कथाकथन ४०–४१
मूकवाचन १३१
मूलप्रधान शिक्षणपद्धती ३४
मेणांच्या चित्रांचा संग्रह ६६
मोगरे गं. रा. ९२
मोडी लिपी ८२
मोडी शाळा ८३
मोरे शंकरराव १२०–१२१
मोरेकमिटीची योजना ११९–२०, १२३
मोरोपंत ८२, ९२, १२८
मोलियर २
मोल्स्वर्थ (कॅप्टन) ८६
म्हस्के गंगारामभाऊ ४
म्हस्के बाळासाहेब ४, ५, ८, ९, ११, १२, १३–१५
यशवंत १२८
'यशस्वी अध्यापन : पुरस्कार' १११-१२
रघुनाथ पंडित १२८
रघुवीर (कुमार) १२८
'रत्नाकर' ७३
रविवर्मा राजा ७५
राजा धनराज गिरजी हायस्कूल २३, २८
'राणीचा जाहिरनामा' ९२
रॉबर्ट मे (रेव्ह.) ८४
रामदास ९२, १२८
रॉयल ह्युमॅनिटेरियन सोसायटी ६३
रासक्रीडा ६७
'रिप व्हॅन विंकल' ९१
रेंदाळकर ए. पां. १२८
लंडन काउंटी काउन्सिल २६
लंडन डे ट्रेनिंग स्कूल २४–२५
लॉइड जॉर्ज २७
लॉंगफेलो १३४
'लिपिधारा' ७५
लॅंभे १२८
लोककथा ४०
लोकनृत्य ६७
'लोकल ॲथॉरिटी' ६४
लोकशाळा ११९–२०
लोंढे मो. ग. ९२, १३५
वरेरकर भा. वि. १२८
वर्गपद्धती ३४
वर्धा योजना ११३
वस्तुसंग्रहालये ३९, ६३, १३२
वाचन ६७
'वाचन पाठमाला' ८४, ८८
वाटर्लूची लढाई ११५
'वासंती' २३, ९६–९८
'वासंती : प्रस्तावना' ९०–९८
'विदुरनीती' ८६, ८७
विनायक ९१, ९२, ९७
विनोदी काव्य ७६–७७
विल्सन डोव्हर (सर) २५
व्याख्यानपद्धती ३२, ३३, ५५–५६
'व्हेनिसचा व्यापारी' (मर्चंट ऑफ व्हेनिस) ११५
वुडबर्न (डॉ.) ५२, ५३, ५६
वृत्तपत्रे (ब्रिटिश) ६४
वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब १२
व्यवसाय मार्गदर्शन ६३
व्हॅलेंटाइन २७
'शारदावंद' ८०

शारीरिक तपासणी ६३, ६७–६८
शारीरिक शिक्षा ८, ९, ६८, ७२, १३४
शास्त्री श्रीनिवास २९
' शाळापद्धती ' ८६
शाळांचे प्रकार ( जुने ) ८३–८४
शाळेचे संस्कार ३२
शिरोळे वि. ना. १३५
शिस्त ६८
शिक्षण व जीवन ९१
शिक्षणाचे उद्दिष्ट ३२–३३ ४५–४६, ५७, १११
शिक्षणाचे कार्य ५६–६०
शिक्षणाच्या माध्यमाचा वाद ८४, ८५ ८७
शिक्षक व अपशब्द १०, १३४
शिक्षकाची आचरसंहिता ३४–३७, १३३–३४
शिक्षकाचे कार्य ३१, १३५- ३६
शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व ३–४, ९–१०, ३२-३७, ४६, १११
' शिक्षकाचे व्यक्तिसामर्थ्य ' ३२–३७
शिक्षकांच्या तऱ्हा ९–११, ९०
शिक्षकीचा धंदा ३४
शिक्षाविचार मंडळ २३
शिंदे महादजी ६
शीलमापनाच्या चांचण्या ४६–४७
शुद्धलेखन–सुधारणा ८२
शेक्सपियर ११५
शेषाद्री पी. २३
शैक्षणिक मानसशास्त्र ६८, ७२, १०९
शैक्षणिक समस्या ११३, ११५
शोधक प्रश्न ४२
श्रीमहाराष्ट्रगीत ९७
सक्तीचे शिक्षण ६५
संगीताचे शिक्षण ६७
संतकाव्य ९४
सत्तूर ल. म. ११, १३
सत्यासत्य प्रश्न ५४
सदाशिव काशिनाथ ( छत्रे ) ८६
सदोष प्रश्नपद्धती ४२–४३
संभाषण पद्धती २०, २२, ७२
समवाय पाठपद्धती ११२
' सरस्वतीची भूपाळी ' ९६
सहली ३९, ६५, ६६, ६७
साठे परांजपे योजना ११८, ११९, १२४
साने गुरुजी २९
' साम ऑफ लाइफ ' १३४–३५
' सामान्यज्ञानविषयक प्रश्नोत्तर पुस्तक' ८६
सामुदायिक गीतगायन ६७
सायमन-कमिशन ९२
सावरकर वि. दा. १२८
सार्वत्रिक शिक्षण १२२–२३
सिंधी क्रमिक पुस्तके ८१, ८८
सीमों ४७
सुखठणकर वि. स. २३, ९६, ९८
सुट्टया ६५
सुभेदार सि. वा. ६९
सृष्टिनिरीक्षणार्थ बागा ६३
सेंट्रल स्कूल्स ६२
' सोहराब आणि रुस्तुम ' १३५
स्कॉट ( कॅप्टन ) १०१
स्टीरियोस्कोप ३९
स्नानगृहे ६७
स्मृतिदिन १३२

स्वयंशोधनपद्धती ६९
'हतभागिनी' ९७
हॅमले एच. आर. (प्रि.) १६–१७, १९
हरबार्ट ८८, १११
हॅरो काउंटी स्कूल २५
हस्तव्यवसाय ६७
'हा हिंददेश माझा' ९२, ९६–९७
हास्यचित्रे (कार्टून्स) ३९
हिंगणेकर गो. रा. १२८
हिंदू कॉलेज (काशी) ८४
हिंदू कॉलेज (पुणे) ८४
होप टी. सी. ८७–८८, ८९
'ह्यूमन जॉग्रफीज्' २५
'ह्युमन नेचर अॅन्ड एज्युकेशन' ५६
ज्ञानकोश ७४
ज्ञानसंपादनाच्या चाचण्या ४८
ज्ञानेश्वर ९२, ९४, १२८

REFBK-0024757

पारतंत्र्याच्या काळात परकीय सत्ताधाऱ्यांनी स्वार्थासाठी बांधून ठेवलेल्या ध्येयशून्य चबुतऱ्यावर नवभारताच्या शिक्षणाचे गगनचुंबी मनोरे बांधण्याचा हास्यास्पद प्रयत्न सध्या देशात चाललेला आहे. हे मनोरे कसे उभे राहू शकणार? भारताच्या प्राचीन शिक्षकांना आणि त्यांनी देऊन ठेवलेल्या दिव्य मंत्रांना आजचे नेते विसरले आहेत. मानवतेचा शिक्षक होण्याचे सामर्थ्य भारताजवळ आहे. औपनिषदिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान ह्यांच्या तर्कशुद्ध समन्वयातूनच चिरंतन शांतीचा आणि सुखाचा मार्ग मानवतेला सापडेल; पण ते कार्य द्रष्ट्या आणि स्रष्ट्या शिक्षकांचे आहे. प्रतिभेची आणि कल्पनेची विद्युलता ज्यांच्या मस्तकांत कडाडते आहे, अशा महाकवींचे आहे; पण हे कोणी कोणाला सांगायचे? आणि ते ऐकण्याच्या मन:स्थितीत आज आहे कोण?

**आचार्य अत्रे**